॥ श्रीमहामृत्युंजयो जयतितराम् ॥

आयुर्वेदांतील मूलतत्वें.

अथवा

त्रि दो ष.

लेखक

वैद्यभूषण पुरुषोत्तमशास्त्री हिर्लेकर,

हल्लीं मु. उमरावती.

प्रकाशक,

यज्ञेश्वर गोपाळ दीक्षित.

बुकसेलर व पब्लिशर

बुधवार पेठ, पुणें सिटी.

सन १९२५

किंमत १॥ रुपया.

॥ श्रीमहामृत्युंजयो जयतितराम् ॥

आयुर्वेदांतील मूलतत्वें.

अथवा

त्रि दो ष.

लेखक

वैद्यभूषण पुरुषोत्तम सखारामशास्त्री हिर्लेकर,

हल्लीं मु. उमरावती.

प्रकाशक,

यज्ञेश्वर गोपाळ दीक्षित.

बुकसेलर व पब्लिशर बुधवार पेठ, पुणें सिटी.

सन १९२५

आवृत्ति १ ली

किंमत १॥ रुपया.

सूचना.

सदर पुस्तकांत मागें एक दोन ठिकाणीं रसवीर्यविपाका संबंधीं पुढें खुलासा करण्यांत येईल असा उल्लेख केला आहे. सदर विषय या पुस्तकाला जोडून छापण्याचा प्रथम विचार होता. परंतु तो विषय स्वतंत्रपणेंच छापणें अधिक सोयीचें वाटल्यावरून **आयुर्वेदीय द्रव्यगुणशास्त्र** अथवा **रसादिविज्ञान** या नांवाचें पुस्तक निराळें छापण्यांत येईल त्यांत तो केला जाईल. सदरहू पुस्तकाचीं सर्व प्रुफें लेखकास कांहीं अडचणीमुळें पाहण्यास न मिळाल्यानें क्वचित ठिकाणीं अर्थबोध न होण्यासारखी चूक असण्याचा संभव आहे तरी अशी चूक आढळून आल्यास वांचकांनीं क्षमा करून ती आम्हांस कळविल्यास पुढील आवृत्तींत त्याची दुरुस्ती करूं.

प्रकाशक.

मुद्रकः---लक्ष्मण भाऊराव कोकाटे ' हनुमान ' प्रेस, ३००,
सदाशिव, पेठ पुणें.

आयुर्वेदांतील मूलतत्वें
अथवा
" त्रिदोष. "

निवेदन.

आयुर्वेद किंवा आर्यवैद्यक हें शास्त्र भरतवर्षांत फार प्राचीन काळापासून चालत आलेलें असून त्यावर येथील जनतेचा पूर्ण विश्वास होता. व त्याचेच मदतीनें आरोग्यरक्षणाचें कार्यहि उत्तम प्रकारें होत होतें. परंतु थोड्या काळापूर्वीं हिंदुस्थानांत जी एक क्रांती झाली तिचा परिणाम या वैद्यशास्त्रावरहि झाला आणि आयुर्वेदाविषयींचा विश्वास कमी होऊन त्याची मान्यता कमी होता होतां " आयुर्वेद हें शास्त्र आहे कीं नाहीं? आयुर्वेदाची रचना उपपत्ति–पूर्ण नाहीं, तें गृहित सिद्धांतासारखें वाटतें " इत्यादि विधानें नव्या मन्वन्तरांतील नव शिक्षितांकडून प्रत्यक्षाप्रत्यक्ष रीतिनें होऊ लागलीं. राष्ट्राच्या वैभवाचे आणि त्याच्या श्रेष्ठत्वाचे बरोबर संस्कृती आणि शास्त्रीय श्रेष्ठत्व यांचीही विस्मृति पडली म्हणावयास हरकत नाहीं. सुधारलेल्या राष्ट्राचीं जीं अनेक लक्षणें त्यांत राष्ट्रीय वैद्यकाची श्रेष्ठता हें अवश्य होय. राष्ट्रांतील व्यक्तींच्या वैयक्तिक संपन्नतेला जरूर तें आरोग्य ज्या राष्ट्रांतील वैद्यशास्त्र राखूं शकणार नाहीं, त्या राष्ट्राला स्वावलंबी कसें म्हणतां येईल? आर्यांच्या आर्यावर्तांत शास्त्रें, कला इत्यादींची वाढ झाली होती अशी इतिहास साक्ष देतो. पौर्वात्य देशांतील शास्त्रीय प्रगति आणि संस्कृती उच्च दर्जास पोहोंचली असल्याविषयीं विद्वानांत मतभेद नाहीं. मग अशा या संपन्न, सुसंस्कृत आणि बुद्धिप्रधान **आर्यावर्तांत** वैद्यशास्त्रासारखें अत्यंत अवश्य आणि उपयुक्त असें शास्त्र मागसलेलें असेल अशी कल्पना कशी पटेल. आणि तसा सिद्धांत कांहीं एतद्देशीय आधुनिक विद्वान् प्रस्थापित करीत असतां आश्चर्य कां न वाटावें? परंतु आश्चर्य वाटलें तरी वस्तुस्थिति ही मात्र अशी खरी. आयुर्वेदाविषयीं अविश्वास उत्पन्न झाला, पाश्चात्य वैद्यकाचा प्रसार सर्वत्र झाला ही गोष्ट खरी आहे. आंग्लाईच्या नवलाईनें जें एक स्थित्यंतर घडून आलें किंवा जो एक चमत्कार घडून आला तो हा कीं शिक्षितांतील स्वाभिमान नष्ट व्हावा; किंबहुना? स्वतः-

च्या संस्कृतीची निंदा करणें, हेंच सुशिक्षितांचें लक्षण कांहीं दिवस ठरावें ! आर्थिक दृष्टयाहि ही गोष्ट फायदेशीर होत असल्यानें, आर्थिक उन्नतीवर श्रेष्ठत्वाचें मापन होऊन नव्य प्रिय सामान्य जनताहि थोड्या फार प्रमाणांत या विचार सरणीला बळी पडली. स्वाभिमान व आत्मविश्वास ह्या गुणांच्या अभावीं आत्मनिंदा संभवते. पाश्चात्य वैद्यकाचा पगडा जनतेवर बसण्याला जीं अनेक कारणें झालीं त्यांत पुष्कळशीं कारणें अशीं आहेत कीं तीं केवळ दर्शनी थाट या वर्गांत मोडतील. तयार व तींहि बीन त्रासाचीं औषधें हें एक सामान्य जनतेला ओढण्याचें सहज साधन झालें. शस्त्र क्रियेची यशस्वी आश्चर्यकारक वाढ दिपाविण्याला पुरेशी झाली. वाढतें वाङ्मय, वाढत्या सोयी, वाढतीं साधनें, वाढता प्रसार आणि पाश्चात्य वैद्यकाची मध्यस्थी करणाऱ्या वैद्यांचें--डाक्टर्सचें वाढतें वैभव यामुळें गतानुगतिक जनतेच्या मनावर सहज परिणाम झाला कीं देशी वैद्यक खरोखरीच अपूर्ण असावें. आणि त्यामुळें आर्य वैद्यकाची निंदा करणाऱ्या स्वार्थी परदेशी व स्वाभिमानशून्य देशी प्रचारकांच्या सुराशीं सामान्य जनतेचा सूर मिळून या चढेल सुरांत आयुर्वेदाचा अनादर व्यक्त झाला. आर्यवैद्यकाची प्रगती या पूर्वींच थांबलेली होती आणि अशा नवीन परिस्थितींत राजाश्रयाचा फायदा नाहींच पण राजाश्रयी पाश्चात्य वैद्यकासारख्या एका प्रबल प्रतिपक्षाचा मात्र फायदा झाला. आणि राहिला लोकाश्रय तोहि वरील विचारसरणीमुळें नष्ट झाला. मग आर्यवैद्यक कसें असेल, परकीय सत्तेखालीं तेजोहीन झालेल्या लोकांची उपमा त्याला चांगली शोभेल. अशा रीतीनें आयुर्वेदावर जो परिणाम झाला त्यामुळें अर्थातच तो मागें पडला. परंतु थोड्या कालानें ही स्थिति पालटून आयुर्वेदाविषयीं विचार करण्याची प्रवृत्ति थोडीशी सुरू झाली. कांहीं अगदीं थोड्या डॉक्टरांना आयुर्वेदाकडे उडतीनजर तरी टाकावीशी वाटूं लागली. बाकी आयुर्वेदाचा अगदीं विचार न करतां किंवा आयुर्वेद म्हणजे काय आहे याचीहि जाणीव नसतां अगदीं थोडे अपवाद खेरीज करून एकजात सर्व डॉक्टर आयुर्वेदशास्त्र शुद्ध नाहीं असें प्रतिपादन करण्यास मात्र चुकत नसत. परधर्माची दीक्षा घेणारा त्या नव्या धर्माची थोरवी वर्णन करूनच न थांबतां पूर्वींच्या स्वधर्माची टवाळी करून कृतकृत्यता मानतो.

त्याप्रमाणें इंग्रजी वैद्यकाची दीक्षा घेतलेल्या देशी डॉक्टरांचें आयुर्वेदाची निंदा हें प्रमुख कर्तव्य होतें म्हटल्यास अतिशयोक्ति होणार नाहीं. आयुर्वेद ना ? कसलें तें शास्त्र; उगाच कांहीं तरी आचरट कल्पना आहेत झालें. सहज अनुभवानें चार औषधें होतात गुणावह म्हणून तें कांहीं शास्त्र होत नाहीं. असली भाषा डॉक्टरांच्या जीभेवर छापलेली असावयाची. त्यांतल्या त्यांतहि कांहीं शोधक विवेचक महत्वाकांक्षी अशा डॉक्टरांची आयुर्वेदाकडे दृष्टी वळलीच तर टीकेच्याच बुद्धीनें ! पण या थोड्याश्या निरीक्षणानेंहि कांहींच्या मनांत कांहीं थोडा फार विश्वास उत्पन्न होऊन जिज्ञासाहि जागृत झाली. आणि या जिज्ञासेनें आयुर्वेदाचें परिशीलन करणाऱ्यांना त्यांत शास्त्रीयत्व भासूं लागलें. तथापि स्वतःला परिचित नाहीं अशा विचारपद्धतीमुळें व विशिष्ट परिभाषेच्या अज्ञानामुळें आयुर्वेदाची उपपत्ति पटेना आणि ती पटेना यामुळें आयुर्वेदाला शास्त्र तर म्हणतां येईना तरी पण शास्त्र न म्हणतां आयुर्वेदाला सोपपत्तिक न मानतां त्याचा स्वीकार करून योग्य तो फायदा करून घेण्याला तयारी दाखविण्यांत आली. असली विचारसरणी महाराष्ट्रामध्यें प्रथम कै. डॉ. गणेश कृष्ण गर्दे एल्. एम्. एस्. यांनीं जाहीर केली. सदरहू डॉक्टर मोठे विद्वान्, शोधक व जबर व्यवसायी असून त्यांनीं आयुर्वेदाच्या वाङ्मयापैकीं **अष्टांग हृदय व माधव निदान** या ग्रंथांचीं मराठींत भाषांतरें केलीं आहेत. अर्थातच यामुळें त्यांचा आयुर्वेदाविषयींचा व्यासंग उघड होतो. तथापि त्यांचे आयुर्वेदीय व्यासंगामध्यें योग्य ती परिभाषा शुद्ध विचारसरणी नसल्यानें आयुर्वेदाचें शास्त्रीयत्व त्यांना पटलें नाहीं आणि अशा स्थितींत त्यांनी आयुर्वेदाची जी स्तुती म्हणून केली आहे, ती उलट आयुर्वेदाचे नुकसानीलाच कारणीभूत झाली. आयुर्वेदाला शास्त्रीयत्व नाहीं, त्यांतील त्रिदोषांची उपपत्ती चुकीची, काल्पनिक अतएव त्याज्य हें मत त्यांनीं अनेक वेळां प्रतिपादन केलें आहे. इतकेंच काय पण त्यांच्या सर्व विवेचनाचें धोरणच त्रिदोषवाद खोटा मानणें हें आहे असें त्यांनीं माधव निदानाची व अष्टांग हृदयाची भाषांतरापूर्वी जी प्रस्तावना दिली आहे ती पाहणाऱ्याचे ध्यानीं येईल आणि याच मताचा पुरस्कार बरेच दिवसपर्यंत बऱ्याच

डॉक्टरांनीं व इतर विद्वानांनीं केला. परंतु आयुर्वेदाचा अधिक परिचय करणारांची संख्या वाढत असून सध्यां आयुर्वेदातील त्रिदोषांविषयीं बऱ्याच शोधक डॉक्टरांचा ग्रहही अनुकूल होत आहे. मद्रास सरकारानें नेमलेल्या चौकशी मंडळाचा अहवाल पाहतां ही गोष्ट उघड होईल. अलिकडे पुष्कळ विद्वान् व शोधकडॉक्टर आयुर्वेदाच्या उपपत्तिला शास्त्रिय म्हणून लागले असून आयुर्वेदाचा पुरस्कारहि वाढत्या प्रमाणांत आहे. तरीपण त्रिदोषांविषयीं सार्वत्रिक विश्वास असावा तसा नसून आयुर्वेदांतील त्रिदोषांना मान्यता देणाऱ्या मध्येंही त्याविषयीं असावी तितकी खात्री व योग्य कल्पना दिसत नाहीं.

अशा प्रकारची संदेह वृत्ति आयुर्वेदाच्या उद्धारार्थ चाललेल्या प्रयत्नांना फार विघातक आहे. आयुर्वेदाला शास्त्रीयत्व आहे. असें म्हणावयाचें तर त्याचे मूलभूत उपपत्तिला अनुसरून आयुर्वेदाची निदान चिकित्सा पुरी व्हावयास पाहिजे. या गोष्टींकडे दुर्लक्ष्य करण्यांत येतें आयुर्वेदाचा पुरस्कार करणाऱ्या पुष्कळ डॉक्टरांत किंवा कित्येक सुधारणावादी आयुर्वेदीय चिकित्सकांतहि अशा प्रकारचीं मतें दिसतात कीं, त्यांना आयुर्वेदांमध्यें **शारीर, इंद्रियविज्ञान रसायन** इत्यादि विषयांची भर घातल्याशिवाय आयुर्वेदाला पूर्णता येणार नाहीं असें प्रामाणिकपणें वाटतें. पण हे लोक विसरतात कीं, चिकित्सा शास्त्रांत जर इंद्रिय विज्ञान आणि रसायन या मुख्य अंगाची उणीव असेल तर त्याला शास्त्र तरी कसें म्हणावें? आयुर्वेदाला शास्त्र म्हणावयाचें तर आयुर्वेदाच्या त्रिदोषांच्या उपपत्तीनें **स्वास्थविज्ञान, रोगविज्ञान व उपायविज्ञान** या मुख्य गोष्टी उत्तम प्रकारें करतां यावयास पाहिजेत. आणि आयुर्वेदाच्या विशिष्ट पारीभाषिक दृष्टीनें त्रिदोषांचा विचार करतां त्या करतां येतात. मग आयुर्वेदाचें विवेचन संक्षिप्त असेल किंवा तें प्रचलित भाषापद्धतीहून वेगळें असेल त्यांत सुगमता व स्पष्टता येण्यासाठीं त्याचें विस्तृत वर्णन करणें अवश्य असून तें करावयास पाहिजे ही गोष्ट वेगळी. अर्वाचीन पद्धतीप्रमाणें अनेक शास्त्रीय विभागांचें वेगवेगळें वर्णन आयुर्वेदांत नसलें तरी त्याचे सूत्रमय भाषेच्या विशिष्ट परिभाषेला अनुसरून अर्थबोध करून घेतल्यास त्यांत सर्व प्रकारच्या शास्त्रीय शाखांचीं तत्वें सुसंगत रीतीनें उपलब्ध होतात.

आयुर्वेदाचा वाङ्मय विकास थांबल्यामुळें आणि प्रतिकूल

परिस्थितीमुळें त्यांतील तत्वांविषयीं अज्ञान वगैरे समज उत्पन्न झाला आहे व तो जाणें जरूर आहे. आक्षेपकांना आक्षेपक म्हणून विचारांत घेण्याचें कारण नाहीं. पण जिज्ञासूंनीं केवळ सहज पटत नाहीं म्हणून उपेक्षा करूं नये आणि आयुर्वेदीय चिकित्सकांनींहि आयुर्वेदाची भाषा वर्तमान कालानुसार बोधक रीतीनें समाजापुढें ठेवावयास पाहिजे. म्हणजे गैरसमज दूर होऊन योग्य सुधारणा झपाट्यानें घडून येतील. बदललेल्या काळाला अनुसरून योग्य त्या सुधारणा न केल्या तर शास्त्रांत जीवंतपणा राहणार नाहीं; मात्र या सुधारणा करीत असतां मूळतत्वांचा विघात न होईल ही सावधगिरी ठेवणें अगत्य आहे.

आयुर्वेदाचीं मूलतत्वें जे त्रिदोष आणि ज्यांविषयीं सध्यां अनेक प्रकारचे वाद आणि मतभेद माजून राहिले आहेत त्यांविषयीं निश्चित मताची अत्यंत अवश्यकता आहे; कारण त्यावरच सर्व आयुर्वेदाची इमारत अवलंबून आहे. महत्वाचा भाग सोडून आयुर्वेदाची उन्नतीं करूं पाहणारांचें प्रयत्न म्हणजे प्राणशून्य शरीराची जोपासना होय, आयुर्वेदाच्या उपलब्ध वाङ्मयांत सर्वत्र त्रिदोषांचा उपयोग केला आहे. पण त्या त्रिदोषांचे स्वरूपाचें स्वतंत्र आणि स्पष्ट असें वर्णन कोठें असे नाहीं, कीं, ज्यावरून प्राचीन आयुर्वेद प्रवर्तक अमक्या वस्तूंना त्रिदोष समजत असें सांगतां येईल. व यामुळेंच या बाबतींत वाद माजून राहिले आहेत. यासाठीं आयुर्वेदाच्या सुधारणेचे प्रयत्नांच्या मुळाशीं त्रिदोषांची योग्य कल्पना निश्चित होणें जरूर आहे. ही कल्पना अशी असावयास पाहिजे कीं ती आयुर्वेदाच्या वाङ्मयाशीं जुळती आणि निदान चिकित्सेच्या व्यवहारांत नित्यशः पूर्ण उपयोगी. केवळ शाब्दिक व्याख्या ठरवून भागणार नाहीं. त्रिदोषमीमांसेमध्यें, पांचभौतिक संबंध अथवा पाश्चात्य वैद्यकांतील तत्वांचा संबंध लावून कसें तरी शास्त्रीयत्व प्रस्थापित करण्यानें भागणार नाहीं. **त्यांची व्याख्या अशी असावयास पाहिजे कीं, जी स्वीकारली असतां, नैसर्गिक जीवनव्यापार, स्वास्थ्यांतील नैसर्गिक शरीरधर्म व रोगकारक शरीरविकृति यांचा उत्तम खुलासा होऊन चिकित्सेचें धोरण सुगम होईल.** नाहीं पेक्षां तो केवळ शब्दच्छल होईल.

आयुर्वेदाच्या सर्व विवेचनामध्यें ज्या अर्थीं त्रिदोषांना अनुस-

रूनच व्यवहार केला आहे, त्या अर्थी प्राचीन आयुर्वेदप्रवर्तकांना त्यांचा निदानचिकित्सेंत नित्य व्यवहार अपोक्षित होता ही गोष्ट उघड होते. व त्रिदोषांची तीच व्याख्या निश्चित ठरेल कीं जी, स्वस्थशरीरविज्ञान, रोगविज्ञान, व उपचारविज्ञान यांना उपयोगी पडेल. उपलब्ध वाङ्मयाच्या आधारें अशा प्रकारची त्रिदोषांची कल्पना निश्चित होऊन ती शास्त्रीय व्यवहाराला पुरी पडते असें ठरल्यास मग विद्यमान इतर वैद्यकशास्त्रांशीं जुळते कीं नाहीं येवढाच विचार करावयाचा आणि प्रस्तुत निबंध हा याच उद्देशानें लिहिला आहे.

आयुर्वेदाच्या वाङ्मयाकडे अगदीं सहज पाहणारालाहि सहज एक गोष्ट दिसते ती ही कीं, आधुनिक पाश्चात्य वैद्यकाइतकें विस्तृत वर्णन त्यांत नाहीं. परंतु याचें कारण एक असें कीं मुद्रणकलेची हल्लींची सुलभता प्राचीन काळीं नव्हती आणि दुसरें महत्त्वाचें कारण म्हणजे प्राचीनांची सूत्रमय विवेचन पद्धति, एकदां विशिष्ट प्रकारची परिभाषा निश्चित करून मग सर्व विवेचन त्या परिभाषेच्या मर्यादेंत करावयाचें ही सर्व पौर्वात्य शास्त्रांची पद्धति आयुर्वेदानेंहि स्वीकारलेली आहे. यामुळें भाषाबाहुल्य नसलें तरी त्यांत अर्थकार्पण्य असत नाहीं. हें पौर्वात्य शास्त्राचें परिचितांना सहज कळेल.

दुसरी आयुर्वेदांत दिसणारी उणीव म्हणजे प्रत्यक्ष शारिरवर्णनाचा संक्षिप्तपणा ही होय. आणि उपलब्ध वाङ्मयावरून तरी ही उणीव आहे ही गोष्ट खरी.मात्र ही उणीव शास्त्रीयत्वाला बाधक होणारी नाहीं. प्रथमदर्शनीं हें म्हणणें कसेंसेंच वाटेल. चिकित्साशास्त्राच्या परिचितांना माहीत असेल कीं स्थूल शरीराचा सूक्ष्म परीचय शस्त्रचिकित्सेला जितका अवश्य तितका औषधीचिकित्सेला नाहीं. औषधांचा परिणाम स्थूल शरीरावर होत नसून स्थूलांतील सूक्ष्म पदार्थांवर घडतो. यासाठीं या सूक्ष्म भागांचा परीचय औषधि चिकित्सेला अधिक पाहिजे. आयुर्वेदामध्यें शस्त्रचिकित्सेचा प्राचीन काळीं किती विकास झाला होता हा प्रश्न निराळा. पण उपलब्ध वाङ्मय तरी त्या दृष्टीनें अर्वाचीन शोधाच्या मानानें अपुरें आहे खास. आणि सूक्ष्म शारीर किंवा इंद्रिय विभागांचें सूक्ष्म ज्ञान आयुर्वेदाला तितकेंच उत्तम प्रतीचें होतें. दृश्य पदार्थांची मोजदाद करण्याला शास्त्रीय दृष्टीची फारशी आवश्यकताहि नाहीं. तें दृश्यच असतें—खरें शास्त्र म्हणजे अनुभवसिद्ध तर्क होय. निश्चित

अनुमानें हा शास्त्राचा पाया असून तो आयुर्वेदांत आहे व त्रिदोषांची उपपत्ति हीच ती तर्कशुद्ध अनुमानपरंपरा होय. आयुर्वेदाचें शास्त्रीयत्व ठरवितांना ही उपपत्ति किती तर्कशुद्ध आहे व किती व्यवहार्य आहे या एकाच मुद्यावर विचार करावयास पाहिजे. त्रिदोषपद्धति तर्कशुद्ध ठरेल, ती व्यवहार्य ठरेल तर आयुर्वेदाचे शास्त्रीयत्वाला बाध येत नाहीं. मग आधुनिक पद्धतीच्या भाषेनें तिचा विस्तार करणें, आधुनिक कालांत अवश्य अशा आयुर्वेदाच्या विविध अंगांचा विकास करणें हें अवश्य व इष्ट असून तें कार्य करणें कर्तव्य ठरेल. न्यूनता आणि अपूर्णता या दोन गोष्टी भिन्न आहेत. आयुर्वेदाचा कालयोग्य विकास करणें वेगळें आणि त्यांत नवीन तत्वें दाखल करणें वेगळें. आयुर्वेद औषधि चिकित्सेच्या दृष्टीनें अपूर्ण नाहीं, ही गोष्ट त्रिदोषपद्धतीच्या सम्यक् ज्ञानानें निदर्शनास येईल. त्रिदोषांची कल्पना म्हणजे शरीराच्या जीवनव्यापाराची अगदीं सूक्ष्म व तात्विक कल्पना इतकी गोष्ट पटल्यावर मग कोणत्याहि सुधारणांची भर त्यांत घातली तरी नुकसान होणार नाहीं. मात्र ही गोष्ट न पटल्यास किंवा त्रिदोषांची कल्पना असत्य ठरल्यास मग आयुर्वेदाचा शास्त्रीय अभिमान ह्मणजे पोकळ शाब्दिक अभिमान ठरेल.

आयुर्वेदांचीं मूळतत्वें अथवा त्रिदोष यांची शास्त्रीयता पटणें आयुर्वेदाच्या सध्याचे परिस्थितींत अवश्य आहे त्याशिवाय सुधारणेचे मार्गांत दिशाभूल होण्याचा संभव फार. आयुर्वेदाचा अभिमान बाळगावा, आयुर्वेदाचें शिक्षण ध्यावें आणि रोगनिदान, रोग चिकित्सा करतांना मूलभूत त्रिदोषांचा उपयोग अपूर्ण ठरावा त्यासाठीं पाश्चात्य वैद्यकाची पुस्ती पाहिजे, मग आयुर्वेद राहिला कोठें? आयुर्वेदाच्या शिक्षणांत पाश्चात्य पद्धतींतील इंद्रियविज्ञानाची अवश्यकता भासल्यावर मग आयुर्वेदाचें शास्त्रीयत्व तें काय? व्यक्तींचा बहुश्रुतपणा हा गुण निराळा, पण आयुर्वेदीय शिक्षणक्रमांत इंग्रजी वैद्यकाचे मदतीशिवाय न भागेल तर मग आयुर्वेदाची पूर्णता कोठें राहिली ? इंग्रजी वैद्यक शिकून तयार झालेल्या डॉक्टरांनीं आयुर्वेद किंवा इतर शास्त्रांचा परिचय करून घेतल्यानें वाढलेल्या ज्ञानाचा चिकित्सेच्या यशस्वितेला उपयोग होईल. म्हणून इंग्रजी वैद्यकाचे शिक्षणक्रमांत आयुर्वेदाच

समावेश करण्यांत येत आहे काय ? मग आयुर्वेदाच्या शिक्षणांत आम्र इंग्रजी वैद्यकाची आवश्यकता कां ? आणि जर भासेल तर आयुर्वेद अपूर्ण अशी ती कबुलीच नाहीं काय ? ही आवश्यकता हल्लीं कांहीं ठिकाणीं स्वीकारली जात आहे. याचा अर्थ अविश्वास असाच उघड आहे. मग ही पद्धत कोणी डॉक्टरानें अथवा वैद्यानें स्वीकारली असो. अशी आवश्यकता भासते याचें कारण त्रिदोषांची योग्य ती कल्पना नाहीं अथवा आयुर्वेदाच्या शास्त्रीयत्वांविषयीं असावा तसा आदर नसल्यानें योग्य कल्पना करून घेतली नाहीं असेंच म्हणणें भाग आहे.

त्रिदोषांविषयीं थोड्या फार प्रमाणांत विचार सध्यां चालू आहेत त्यालाच अनुसरून हाही एक प्रयत्न आहे. वातादि त्रिदोषांची आयुर्वेदीय कल्पना आणि त्यांची व्यवहार्यता यांना अनुसरून ही एक विचारांची पद्धती विचारी वाचकांपुढें ठेविली आहे. सदर पुस्तकांत स्वीकारलेली विचारपरंपरा केवळ आयुर्वेदाचे आधारानुसार आहे. कितपत पटते तें वाचकांनीं टरवावयाचें. वादग्रस्त ठरलेल्या त्रिदोषांविषयीं विचारांचीं एक दिशा येवढी गोष्ट ध्यानीं घेऊन वाचकांनीं विचार करावा. सदर पुस्तकांत शक्य तों त्रिदोषांचें स्वरूप व्यवहार्य कसें ठरतें याविषयीं विचार शक्य तितक्या सोप्या भाषेंत करावयाचा हें धोरण स्वीकारलें आहे. तरी देखील जितकी सुबोध भाषा असावयास पाहिजे तितकी नाहीं ही जाणीव लेखकाला आहे. परंतु याचें कारण शास्त्रीय परिभाषा न सुटावी हें आहे. सदर पुस्तक वाचीत असतां आयुर्वेदीयांना कांहीं ठिकाणीं थोडा प्रचलित समजुतीला विरोध वाटण्याचा किंवा अर्थाची अतिव्याप्ति स्वीकारल्याचा भास होईल. परंतु एकंदर शास्त्रीय व्यवहारांतील विरोध टाळण्याला तो अवश्य आहे असें विचारांति ध्यानीं येईल. आयुर्वेदाच्या मूलतत्वांविषयीं गैर समज दूर होऊन त्याची व्यवहार्यता व दर्जा वाढावा या एकाच उद्देशानें सदर प्रयत्न आहे व तो यशस्वी होण्यासाठीं आयुर्वेदपारंगत व आयुर्वेदाभिमानी यांनी आयुर्वेदीय दृष्टीनें त्याकडे पाहावें अशी नम्र विनंती आहे.

आयुर्वेदीयांचा नम्र,
पुरुषोत्तम सखाराम वैद्य हिर्लेकर.

आयुर्वेदांतील मूलतत्त्वें
अथवा
त्रिदोष
अनुक्रमणिका

— — —

॥ श्रीमहामृत्युंजयो जयतितराम् ॥

आयुर्वेदांतील मूलतत्वें

अथवा

त्रिदोष.

थोडक्यांत वस्तुबोध.

प्र० १:—त्रिदोष म्हणजे काय ? उत्तरः—शरिरांतील सर्व प्रकारच्या क्रियांचे प्रवर्तक असे सामर्थ्यसंपन्न व सर्व शरीरघटकांत व्यापून राहणारे सूक्ष्म अणु.

प्र० २:—त्रिदोष दृश्य आहेत कीं अदृश्य ? उत्तरः—स्थूळ व सूक्ष्म हे शब्द सापेक्ष आहेत. तथापि सूक्ष्म अशा घटकांतीलहि सूक्ष्म अणु म्हटल्यावर ते दृश्य आहेत असें म्हणतां यावयाचें नाहीं. ते दृश्य नसून तर्कानुमेय आहेत.

प्र० ३:—त्रिदोष दृश्य नाहींत तर त्यांचें अस्तित्व कां मानावें ? उत्तरः—शरीर हा एक अनेक प्रकारच्या पंचभौतिक घटकांचा समुदाय आहे. हे घटक नित्य झिजणारे, आणि नित्य नवे उत्पन्न होणारे आहेत, असें अनुभवास येतें. रोजचे आहाराची गरज हें उघड सुचविते. नित्याची झीज व उत्पत्ति जर या घटकांचे सर्वांशानें झाली असती, तर नव्या आहारानें शरीर अजरामर ठेवतां आलें असतें. तसें घडत नाहीं. यावरून असा एकादा भाग मानणें भाग आहे कीं जो या नित्याचे जनन मरणाचा परिणाम भोगीत नाहीं. आणि जो शतसंवत्सर पावेतों टिकतो. प्रत्येक घटकाचा नित्य विनाशी असा जो भाग त्याहून हा शंभर वर्षेपर्यंत अविनाशी असा भाग आहे. त्यावर नवीन अवयव (घटकाचा) वाढतो, व झिजतो, आणि त्याची शक्ति कमी झाली कीं, ही क्रिया घडत नाहीं. अर्थात् प्रत्येक घटकाचा सूक्ष्म अवयव व त्याकडेच कर्तृत्व असल्याचें मानावें लागतें. आणि असला प्रत्येक घटकाचा सूक्ष्म भाग जरी साध्या डोळ्यांना दिसला नाहीं तरी तार्किक दृष्टीला त्याचें स्वरूप स्पष्ट दिसणारें आहे.

प्र० ४:—त्रिदोष हे केवळ शक्तिस्वरूप कीं पदार्थ ? उत्तरः—सृष्टींतील कोणतेंहि सामर्थ्य, गुण अथवा धर्म हे निराधार राहूं शकत

नाहीं. अत्यंत सूक्ष्म कां होईना, पण एकाद्या पदार्थाचा आधार त्यांना अवश्य असतो. मग त्रिदोष ही तरी नुसती शक्ति कशी असेल ? शिवाय स्थूळ पदार्थरूपी शरिरांत पदार्थाचा अभाव आहे, असें शक्तीला स्थान कोठें मिळेल ? या शक्तीला एकाद्या पदार्थाचा आश्रय करूनच राहणें भाग. असला जो आश्रय तेंच हे अणु व म्हणून त्रिदोष हे पदार्थ होत.

प्र० ५:—सर्व शारीर घटकांतील ' शक्ति ' मानली तरी ती एक असावी. मग दोष तीन कां ? उत्तरः—वस्तुतः जीवनव्यापारांचें कर्तृत्व असलेली शक्ति म्हणजे जीवनशक्ति एकच खरी; पण जीवनव्यापार ज्याला म्हणावयाचा त्याचेंच स्वरूप त्रिविध आहे. असें कीं, नवें उत्पन्न होणें, नव्या जुन्यांचें पृथक्करण होणें. आणि झिजलेल्यांचा उत्सर्ग होणें. या व्यापारालाच जीवनव्यापार म्हणतात. मग जर जीवनव्यापारांत त्रिविधता आहे, तर हा त्रिविध व्यापार सुरळीत पार पाडणारी जीवनशक्ति त्रिविध असावी हें युक्त आहे त्रिविध जीवनशक्तीचे आधारभूत जे अणु, ते शरिरांतील त्रिदोष होत.

प्र० ६:––आयुर्वेदानें त्रिदोषांमध्यें या तीन प्रकारच्या जीवनव्यापाराचा उल्लेख केला आहे काय ? उत्तरः––आयुर्वेदानें जीं दोषांना नांवें दिलीं आहेत, त्यांतच या त्रिविध व्यापारांचा स्पष्ट बोध होईल अशी योजना आहे. वायु–गतिमय–उत्सर्जक; पित्त पाचक, श्लेष्मा–संयोजक. नवीन घटकाचा संयोग प्रथम त्यांतील क्रियाकारी अणूंवर होऊन त्यानंतर त्याचें पचन, पृथक्करण आणि मग उत्सर्जन हा जीवनव्यापाराचा क्रम त्रिदोषांचे नांवांनीं आयुर्वेदानें दाखविला आहे.

प्र० ७:––प्रत्येक घटकामध्यें हा व्यापार चालतो. व त्यावरून सर्वव्यापी त्रिदोषांचें कर्तृत्व पटण्यासारखें व एवढ्यावरून शरिराच्या अनेकविध अवयवांचीं कार्यें कशीं समजतात ? उत्तरः––त्रिदोषविज्ञान हें शरिराच्या सूक्ष्म क्रियांचे स्पष्टीकरणासाठीं आहे. शरिराच्या विविध स्थानांत ज्या विशिष्ट क्रिया चालतात, त्यांचा स्वतंत्र विचार अवश्य केला पाहिजे. मात्र तो करीत असतांहि त्रिदोषविचार सुटत नाहीं. ज्याप्रमाणें एका घटकामध्यें या तीन क्रिया सूक्ष्मपणें चालतात, त्याच सर्व शरिराच्या क्रियांचें सूक्ष्म अवलोकन केल्यास त्यांतहि चौथी क्रिया नाहीं असेंच दिसेल. फरक इतकाच कीं कांहीं शरीरभाग घेण्याचें अगर संग्रहाचें काम करतात, कांहीं पचवितात तर कांहीं उत्सर्जनाचें कार्य करितात. या तीन प्रकारच्या इंद्रियांत त्या क्रिया करणाऱ्या अणूंची संख्या अधिक असते. शरिराच्या सर्व इंद्रियांचें स्थूल वर्गीकरण केल्यास संग्राहक इंद्रियें, पचनेंद्रियें आणि उत्सर्जनेंद्रियें असेंच होतें. मग कोणत्याहि ठिकाणीं त्रिदोषज्ञानाचा उपयोग कां न व्हावा. ?

प्र० ८:--प्रत्येक रोगाचें निदान ठरवितांना आयुर्वेदानें या त्रिदोषांवर सर्व हवाला दिला आहे. एवढयानें रोगज्ञान कसें होतें? उत्तर:—आयुर्वेदानें निदानशास्त्रामध्यें त्रिदोषांच्या केवळ स्थूल कल्पनेवर भिस्त ठेविलेली नाहीं. हें प्रत्येक रोगाची वेगळी संप्राप्ति (रोगोत्पत्तिक्रम) दिली आहे यावरून उघड हेतें. मात्र कोणत्याहि रोगामध्यें त्या रोगस्थानाची जी वास्तविक क्रिया, तिची विकृति ध्यानीं घेऊन रोगस्थानाची संग्राहक शक्ति विकृत झाली, पाचकशक्ति विकृत झाली कीं उत्सर्जक हें समजणें अवश्यक असतें व याचा खुलासा अनुक्रमें कफ, पित्त आणि वायु या नांवांनीं केलला असतो. विकार असंख्य असले तरी त्यांचें स्वरूप तीनच प्रकारचें असावयाचें. याचें कारण अगदीं उघड आहे. शरिराचा प्रत्येक घटक तीन प्रकारचेच व्यापार करतो. असल्या घटकांच्या समुदायानें विशिष्ट स्वरूप पावलेला अवयव तीनच प्रकारच्या क्रिया करतो. विकृति व्हावयाची तर चौथ्या कोणत्या क्रियेंत होणार? रोगाचें स्थान, त्याचा पोटभाग, त्यांतील नैसर्गिक क्रिया यांतील विकृति समजून घेतांना विकृति म्हणजे ती कोणत्या नैसर्गिक व्यापाराची याचा बोध झाल्याविना रोगज्ञान व्हावें कसें? एकाद्या ठिकाणीं संचय झाला हें कळलें तरी संचय होण्याला अधिक संग्रह झाला? उत्सर्जन झालें नाहीं कीं दोनहि अविकृत असून पचनच होत नाहीं? याचा बोध झाल्याशिवाय रोगज्ञान कसें होणार? हें कळावें म्हणून प्रत्येक रोगावर त्रिदोषाचा उपयोग केला आहे. व यासाठींच:--

दोषा एवहि सर्वेषां रोगाणामेककारणम् ॥

सर्व रोगांचें मुख्य कारण दोष असा अभिप्राय आयुर्वेदानें दिला आहे.

प्र० ९:—शरिरांतील पदार्थांमध्यें त्रिदोषांचें सोपें वर्णन कसें करतां येईल? उत्तर--सर्व शरिरांत एकंदर पदार्थ दोन जातीचे एक विनाशी आणि दुसरे अविनाशी हें आतां उघड झालें. पैकीं अविनाशी दोष व विनाशी पदार्थांमध्यें दोन पोटभेद. एक उत्पन्न होत असलेले किंवा उत्पन्नमान आणि दुसरे झिजत असलेले. यांना अनुक्रमें धातु आणि मळ हीं नांवें आहेत. एकूण हे शरिरांतील तीन प्रकारचे पदार्थ होत. चवथा पदार्थ नाहीं. (दोषधातुमलमूलं हि शरीरम्) या तीन पदार्थांपैकीं दोष हे सर्व क्रियाकारी किंवा कारक आणि दुसऱ्या दोन पदार्थांना धारक म्हणजे शरीर (धारण करणारे) अशीं नांवें देतां येतील. दुसऱ्या प्रकारचे पदार्थांत जो भाग झिजका त्याला उत्सर्जनयोग्य म्हणून टाकाऊ या अर्थानें मळ नांव दिलें आहे असा मळ एका

बाजूनें व कारक असे दोषांचें दुसऱ्या बाजूनें धारण करतो. ह्मणून या शरिरांतील नवीन बनणाऱ्या उत्क्रांति पावणाऱ्या पदार्थाला योग्य अर्थाचें धातु हें नांव दिलें आहे. (धारणात् धातवः) कारक खरे पण यांत विकृति झाल्यानें सर्व शरीर बिघडतें. म्हणजे बिघडविण्याची क्रिया हे करतात. ह्मणून यांना आयुर्वेदांत त्रिदोष हें नांव दिलें आहे. वैद्यशास्त्राचा जन्म रोग जन्मानंतर झाला म्हणजे वैद्यशास्त्राला प्रथम प्रश्न बिघडवितो कोण हा करावा लागला. व त्यामुळें कर्तृत्वसंपन्न अशा शारीर घटकांतील अणूंना दोष नांवानें ओळखण्याचा संप्रदाय प्रचारांत आला. (दूषणात् दोषाः) असे शरिरांतील मुख्य तीन पदार्थ आहेत. सामर्थ्यसंपन्न अणूचे भेद तीन. दोष-धातु सात व मळ तीन. एकूण तेरा पदार्थ. यांचा दोष धातु मळ या तीन पदार्थांत अंतर्भाव होतो.

धातु स्थूल व सामर्थ्ययुक्त पदार्थ, मळ स्थूल व सामर्थ्यहीन पदार्थ आणि दोष सूक्ष्म आणि क्रियारूप पदार्थ असें यांचें वर्णन करतां येईल. शरीराचे घटकांतील कार्यकारी आणि सूक्ष्म असे अणु म्हणजे त्रिदोष समजावे. हे अणु म्हणजे शारीर घटकांचा अविनाशी आणि स्थिर भाग. अर्थात् त्यांचें स्वतंत्र अस्तित्व नाहीं.

प्र० १०:—वायु पित्त कफांना व्यावहारिक भाषेंत कोणत्या बोधक नांवांनीं ओळखावें ? उत्तरः—वायु, उत्सर्जक किंवा वियोजक. पित्त-पाचक किंवा विभाजक आणि श्लेष्मा संधायक किंवा संयोजक या नांवांनीं बोध होईल. या क्रियांचा आयुर्वेदांत उल्लेख आहे. मागें सांगितल्याप्रमाणेंच नांवांनींच बोध होतो.

शिवाय

विसर्गादानविक्षेपैः सोमसूर्यानिला यथा ।
धारयंति जगद्देहं कफपित्ताऽनिलास्तथा ॥ १ ॥

विसर्ग—संग्रह-संश्लेष किंवा संयोग, आदान-पचन सात्मी-करण, पृथक्करण किंवा विभाजन आणि विक्षेप फेंकणें, उत्सर्जन किंवा वियोजन, या क्रियांनीं अनुक्रमें कफ, पित्त आणि वायु हे ज्याप्रमाणें याच क्रियांनीं सोम, सूर्य व वायु जगाचें धारण करतात त्याप्रमाणें शरीराचें धारण करितात. कफ किंवा श्लेष्मा, संघटना करणारा. पित्त पचन करणारें व वायु उत्सर्जन करणारा म्हणून शरिरांत प्रमुख आहेत.

———

आयुर्वेदांतील त्रिदोष.

वायुः पित्तं कफश्चेति त्रयो दोषाः समासतः ।
विकृताऽविकृता देहं घ्नंति ते वर्तयंति च ॥ १॥

सर्व शरीरांत वायु, पित्त आणि कफ हे मुख्य दोष (चालक शक्ति) आहेत. हे दोष विकृत झाले असतां शरीरांत विकार उत्पन्न करून त्याच्या नाशालाहि कारण होतात. आणि तेच दोष जर निर्विकार असतील तर शरीराचें आरोग्य कायम राखून त्याची योग्य प्रकारें वाढ करितात. (अ. हृ. सू. अ. १)

आयुर्वेद किंवा आर्यवैद्यक या चिकित्साशास्त्राची उभारणी त्रिदोषावर केली आहे. आयुर्वेदांतील ' स्वास्थ्यसंरक्षण ' आणि ' रोगनिवारण ' हे दोनही प्रमुख भाग त्रिदोषमय असून कोणत्याही गोष्टीचा खुलासा या त्रिदोषांचे मदतीनेंच केला आहे. हे दोष आयुर्वेदांत इतके भरले आहेत कीं, आर्यवैद्यक आणि त्रिदोष यांना पृथक् करूं म्हटलें तर तें अगदीं अशक्य आहे. वातादि त्रिदोष आणि आर्यवैद्यक यांचें अस्तित्व परस्पर सापेक्ष आहे. आयुर्वेदाचें लक्षण काय असें कोणी विचारल्यास संक्षेपतः उत्तर देणें तर दोषमयत्वं आयुर्वेदत्वं ज्या शास्त्रांत सर्वत्र दोषांवर—वायु, पित्त आणि कफ या तीन तत्वांवरच सर्व विवेचन अवलंबून आहे त्याला आयुर्वेद अगर आर्यवैद्यकशास्त्र म्हणावें, असें देतां येईल. आणि या सदोषत्वामुळेंच कीं काय नकळे आयुर्वेद सद्यःकालीं आदरणीय वाटत नाहीं. सदोष शास्त्र कोण स्वीकारील ? एका काळीं आयुर्वेदानें 'स्वास्थस्य रक्षणं व्याधितानां व्याधिपरिमोक्षश्च, निरोग्यांचें आरोग्य रक्षण करणें आणि रोग्यांना रोगमुक्त करणें. या आपल्या उद्देशाप्रमाणें लोकोपकाराचें काम उत्तम केलें असेल, पण तो काल समाजाच्या बाल्यावस्थेचा असल्यामुळें, त्यावेळीं शास्त्रीय सुधारणा आजच्यासारखी परिणतावस्थेला पोंचली नव्हती म्हणून त्यावेळीं जें शास्त्र उत्तम म्हणून गणलें गेलें तेंच सर्व शास्त्रें आणि कला यांची पूर्ण सुधारणा झाली असतां सध्यां आदराला पात्र कसें व्हावें ? प्रत्यक्षप्रमाणाच्या सबळ पुराव्यानें ज्यांतील तत्वें सिद्ध झालीं आहेत, व ज्यांतील विवेचन हेतुपुरःसर स्पष्ट आणि सविस्तर केलें आहे, अशा पाश्चात्य वैद्यकापुढें काल्पनिक त्रिदोषांच्या लटपटित पायावर रचलेलें व ज्यांतील विवेचन संदिग्ध आणि घोटाळ्याचें आहे अशा प्राचीन आयुर्वेदाला मान न मिळाल्यास नवल नाहीं. प्राचीन आयुर्वेदप्रवर्तकांनीं शारीरविषयक आपल्या अज्ञानावर हें काल्पनिक त्रिदोषांचें आवरण टाकून लोकांना चकविण्याचा प्रयत्न केला. आणि ' अज्ञानतमः समीकृत सत्यासत्य ' अशा त्या युगांत जरी तो यशस्वी

झाला असला तथापि सध्याच्या ज्ञानयुगांत या पडद्याआड लपलेलें अज्ञान उघडकीला आल्याशिवाय रहात नाहीं. असल्या प्रकारच्या विचारसरणीनें आयुर्वेदाचा अनादर होऊं लागला तरीपण आयुर्वेदांतील शेंकडों औषधिकल्प निरनिराळ्या विकारांवर अचुक काम देतांना पाहून आपण केलेलें हें अचुक विधान कदाचित् चुकीचें असेल काय ? अशी शंका बहुतेकांना येतेच. आणि ही शंका सोडविण्यासाठीं जी युक्ति स्वीकारण्यांत येते ती मात्र मोठी मनोहर आहे. आयुर्वेदांत औषधें फार चांगलीं आहेत, व अशा गुणकारी औषधांच्या योजनाहि पुष्कळ आहेत. पण आयुर्वेदाची निदानपद्धति सशास्त्र नाहीं. हें विधान करणारे लोक आत्मवंचना मात्र करून घेतात. कारण औषध चांगलें म्हणजे काय ? ज्या विकारावर योजण्यासाठीं तें तयार केलें त्यावर त्यानें गुण दिला पाहिजे ना ? ग्रंथकारानें महारास्नादि काढा लिहिला तो जर चांगला असेल तर त्यानें ज्या वातविकारासाठीं तो लिहिला ते विकार नाश पावले पाहिजेत. नाहींपेक्षां चांगला असें म्हणतां येणार नाहीं. औषध सांगणाराला जर विकाराची माहिती नाहीं तर त्या विकारासाठीं औषध योजलें कसें आणि तें गुणकारी होतें तरी कसें ? कदाचित् दैवयोगानें आणि काकतालीय न्यायाला अनुसरून काय ? आयुर्वेदांतील सर्व औषधें काकतालीय न्यायानेंच गुणकारी होतात असें म्हणण्याचें साहस अगर अप्रयोजकपणा ज्याला थोडातरी सारासार विचार आहे असा मनुष्य केव्हांच करणार नाहीं. औषध चांगलें योजणाराला रोगाचें ज्ञानहि चांगल्या प्रकारचें असलेंच पाहिजे. आणि आयुर्वेदांत तें आहे म्हणूनच आयुर्वेदांतील औषधीकल्प उत्तम ठरतात. आयुर्वेदीय औषधी यथोक्त गुण देत नाहींत हें ठरविण्याची कोणाची तयारी आहे काय ? योजकाचे अज्ञानानें योजना नीट न झाली आणि गुण आला नाहीं तर औषधाचे गुणकारित्वाला किंवा औषध सांगणाऱ्या शास्त्राला बिलकुल बाध येत नाहीं. हें सर्व खरें आहे; तरी सांप्रतकाळीं आयुर्वेदाविषयीं सर्वसामान्य जनसमूहांत विशेष आदर नाहीं ही गोष्ट खरी आहे. आणि याला कारणें जरी अनेक आहेत, तरी मुख्य कारण म्हणजे आयुर्वेदाचें रहस्य सहज कळण्यासारखें विशद नाहीं आणि परंपरा इ० मुखांनीं भलत्या कल्पनांना अवसर दिला हेंच होय. आयुर्वेद ज्या त्रिदोषतत्वांवर अवलंबून आहे ते त्रिदोष म्हणजे काय ? आणि त्यांचा निदानचिकित्सेंत उपयोग कसा होतो ? या तत्वांनीं आयुर्वेदाचें उद्दिष्ट साध्य होईल किंवा नाहीं याचा विचार प्रस्तुतकाळीं अवश्यक झाला आहे. प्रचलित आक्षेपकांचे मताप्रमाणें प्राचीन आचार्यांनीं आपल्या अज्ञानावर टाकलेला हा पडदा आहे कीं, आयुर्वेदाचीं सूत्रें ज्यांत ग्रथित केलीं आहेत असा

आयुर्वेदाचा यथार्थ लेखांकित पट आहे याचा विचार झाला पाहिजे. कदाचित् प्राचीनांचें तें अज्ञानाच्छादनहि असेल. पण याच आवरणाचा आश्रय त्यांनीं कां केला हा प्रश्नहि शोधकबुद्धीला विचारणीय वाटला पाहिजे तात्पर्य काय, सांप्रतकालीं आयुर्वेदीय मूलतत्वें जीं वायु, पित्त आणि कफ हे त्रिदोष त्यांचा खुलासा अवश्य आहे. आयुर्वेदीय ग्रंथ इतर भारतीय शास्त्रग्रंथांप्रमाणें सूत्रमय असल्यानें अर्थबोध सुगम नाहीं. करितां या त्रिदोषांविषयीं यथार्थ कल्पना थोडी तरी यावी आणि त्यायोगें आयुर्वेदाचा योग्य आदर व्हावा या हेतूनें आयुर्वेदाच्या मूलतत्वांचा थोडा विचार करण्याचें योजिलें आहे. भासत असलेली उणीव अंशतः तरी दूर व्हावी येवढयाच उद्देशानें हा प्रयत्न आहे आणि यामुळें आयुर्वेदांतील तत्वविवेचनासंबंधीं लोकांत थोडा तरी आदर वाढला, निदान गैरसमज दूर झाला तरी हा प्रयत्न सफल झाला असें होईल.

विषयोपन्यास.

त्रिदोषकल्पनेचा उगम.

विसर्गादानविक्षेपैः सोमसूर्यानिला यथा ।
धारयंति जगद्देहं कफपित्तानिलास्तथा ॥ १ ॥

[सुश्रुत सू. स्था. अ. २१.]

विसर्ग म्हणजे देणें, भर घालणें किंवा पोषण करणें, आदान म्हणजे शोषून घेणें, आत्मसात् करणें आणि विक्षेप म्हणजे उत्सर्जन करणें अगर फेंकणें या क्रियांनीं क्रमानें सोम, सूर्य आणि वायु हे ज्याप्रमाणें जगाचें धारण करितात त्याप्रमाणें याच क्रियांनीं कफ, पित्त आणि वायु हे शरीराचें धारण करितात.

श्रीमत् जगच्चालकाचे अतवर्य इच्छेनें किंवा यदृच्छाप्रमाणानें निर्माण झालेली जी असंख्य पदार्थस्वरूपी सृष्टि तिचीं मूलतत्वें पृथ्वि, आप्, तेज, वायु आणि आकाश हीं पंचमहाभूतें होत. आणि या पंचमहाभूतांच्या कांहीं विशेष प्रकारच्या असंख्य मिश्रणांनीं असंख्य पदार्थ निर्माण झाले आहेत. या पंचमहाभूतांचें स्वरूप असें आहे कीं, या सर्वांत पृथ्वि ही अत्यंत घन स्वरूपाची, आप् तीहून विरल स्वरूपाचें म्हणजे त्यांत घनता असते परंतु ती फार कमी असून आर्द्रतेमुळें पातळपणा आहे. तेज प्रकाशस्वरूपी आहे प्रकाशणें हा त्याचा धर्म. या प्रकाशस्वरूपी तत्वाला कांहीं तरी आश्रय पाहिजे असतो. तेज हें घनस्वरूपी पार्थिव व

विरल स्वरूपी वायूच्या परिमाणूंच्या आश्रयानें प्रकाशत असतें. पृथ्वी आणि आप यांचे परमाणू स्थूल अर्थात् मूर्त स्वरूपाचे असल्यानें हस्तग्राह्य असतात. तेज स्थूल नाहीं अर्थात् तें हस्तग्राह्य नाहीं, नेत्रग्राह्य आहे. वायु हें तत्व अत्यंत विरल परमाणूंच्या स्वरूपाचें आहे. याचे परमाणु अत्यंत विरल असल्यामुळें त्यांत जडपणा नाहीं, व त्याकारणानें या तत्वाचा धर्म गति—चलन हा आहे. हें हातांत येत नाहीं, डोळ्यांना दिसत नाही, स्पर्शानें ज्ञात होतें. पण आकाश म्हणजे पोकळी अर्थात् पार्थिव व आप्य हें स्थूल स्वरूपाचें किंवा तैजस व वायव्य हें सूक्ष्मरूपी. कोणत्याच प्रकारचे पदार्थाचा परमाणूंचा तेथें अभाव असतो. यामुळेंच आकाशाला शून्य हें नांव आहे. पदार्थाश्रित अशा पंचतत्वांचे प्रतीत होणारे गुणः— पृथ्वीची स्थूलता, आप् आर्द्रता, तेज प्रकाशणें, उष्णता; वायु गति——चलन——आणि आकाश— अवकाश किंवा पोकळी. याप्रमाणें आहेत. हीं सर्वव्यापी तत्वें निरनिराळीं स्वतंत्र रीतीनें उपलब्ध होत नाहींत. तर निरनिराळ्या पदार्थांच्या रूपानें मिश्र झालेलीं अशीं मिळतात. सृष्टींतील प्रत्येक पदार्थांत हीं तत्वें असतात पण त्यांचें प्रमाण मात्र विभिन्न आहे. एरवीं सृष्ट पदार्थांमध्यें विविधता आणि विचित्रता आली नसती. ज्या पदार्थांत ज्या तत्वाचें आधिक्य असतें त्यावरून त्या पदार्थाचा निर्देश केला जातो. जसें पार्थिव, आप्य, तैजस, वायव्य आणि नाभस. आकाशाचें न्यूनाधिक्य हें इतर चार तत्वांवर अवलंबून आहे.स्थूलता अधिक तितकें आकाश कमी आणि सूक्ष्मता अधिक असेल त्या मानानें पोकळी अगर आकाशाला वाढ त्या प्रमाणावर असते. असंख्य स्पष्ट पदार्थांत स्थूल आणि सूक्ष्म असे मुख्य दोन प्रकार संभवतात. पृथ्वी आणि जल यांच्या अंशाधिक्यानें झालेले स्थूल व तेज आणि वायु यांच्या अंशाधिक्यानें झालेले सूक्ष्म. पृथ्वीवर पदार्थत्व पावलेले पदार्थ स्थूल पण मूर्त स्वरूपाचे आहेत व म्हणूनच त्यांना पार्थिव असें नांव देण्यांत आलेलें आहे.

पदार्थांची उत्पत्ति.

कोणत्याहि पदार्थाचे उत्पत्तीला मुख्यत्वें घनद्रव्य अथवा स्थूलद्रव्य पाहिजे. एरवीं पदार्थत्व नाहीं. व म्हणून सर्व पदार्थांना पृथ्वी अर्थात् स्थूलाणु, अवश्य. या उद्देशानें द्रव्याचे उत्पादनामध्यें मुख्याधार म्हणजे अधिष्ठान पृथ्वी आहे, असें सांगितलें आहे. याप्रमाणें पृथ्वी हें द्रव्याचें अधिष्ठान झालें. पृथ्वीचे परमाणु हे द्रव्याची सामुग्री झाली तरी ते एकत्र व्हावयाचे म्हणजे त्यांत आर्द्रता आलीच पाहिजे. आर्द्रता अगर

ओलेपणानेंच हे परमाणु एकमेकांत मिश्र होण्याला लायक होतात. व अशा रितीनें आप म्हणजे जलाच्या संयोगाशिवाय पार्थिव परमाणूपासून द्रव्याची उत्पत्ति होत नसल्यानें द्रव्याला मुख्य कारण किंवा साधन आप हें तत्व आहे. असें सांगण्याच्या उद्देशानें ' अंबुयोनि, ' म्हणजे पाणी ज्याला कारण आहे असें द्रव्याचें विशेषण योजिलें आहे. अशा रीतीनें पार्थिव परमाणु जलाच्या संयोगानें मिश्र झाले तथापि त्यांना पदार्थाचा आकार येत नाहीं. पदार्थ व्हावयाचा तर नुसते परमाणु मिश्र होऊन भागत नसून त्यांचा संयोग व्हावा लागतो. ते एकमेकांना चिकटावे लागतात. आणि ते चिकटण्यासाठीं तेज किंवा उष्णता आणि वायु यांची अवश्यकता आहे. उष्णतेमुळें आणि वायूमुळें पातळ झालेल्या परमाणूंतील जलांशाचें शोषण होतें व त्यांस जरूर तो चिकटपणा प्राप्त होतो आणि मग आकाश अगर अवकाश याला अनुसरून त्याला आकार—द्रव्यत्व—प्राप्त होतें. सृष्टीचा कर्ता आज्ञेय असल्यामुळें अमुक एका पदार्थाला अशा प्रकारचाच आकार कां दिला ? किंवा त्यांत पंचतत्वें अमुकच प्रमाणानें कां मिश्र केलीं याचा खुलासा करण्याला साधन नाहीं. स्वरूप आणि गुणधर्म यांवरून त्यांमधील तत्वांचा निश्चय ठरवून त्याचा उपयोग करून घेणें हेंच मानवीबुद्धीला शक्य व इष्ट आहे. पार्थिव द्रव्याच्या उत्पत्ति स्वरूपाचें स्पष्टीकरण व्हावें यासाठीं एक उदाहरण घेऊं. एकादा घट बनवावयाचा आहे. घट पार्थिव तत्वाशिवाय होत नाहीं. पार्थिव परमाणु अर्थात् माती हें त्याचें अधिष्ठान झालें. पण केवळ मातीनेंच घट होत नाहीं. तो बनविण्याचें ठरतांच मातींत पाणी मिळवून ती ओली करावी लागते. ओली झाल्याशिवाय घट बनणें अशक्य असल्यामुळें घटरूपी द्रव्याला पाणी हें उत्पत्ति कारण झालें. व अशा रीतीनें मृत्तिकेंत पाणी घालून ती पातळ केली, परमाणूंचें मिश्रण झालें. तथापि, त्या परमाणूंचा संयोग होऊन त्यांना घटत्व येत नाहीं. उष्णता आणि वायु यांचे योगानें पुनः शोषण होऊन जरूर तितका चिकटपणा आल्यानंतर त्याला घटाचें रूप देतां येतें. घटत्व आल्यानंतरहि तो पक्का व्हावा, त्यांतील परमाणु पक्के चिकटावे—यासाठीं भट्टींत घालून पुनः भाजावा लागतो. घटाचा आकार आंतील पोकळीवर, अवकाशावर--किंवा आकाशतत्वावर अवलंबून आहे. पोकळीचे अभावीं तो मातीचा गोळा राहील, घटत्व नाहीं. पार्थिव द्रव्याची उत्पत्ति अशा रितीनें झाली. ज्याप्रमाणें कुंभकार आपल्या लहरीला अनुसरून मृत्तिकेचे वाटतील तसले पदार्थ बनवितो व त्यांचा जरूरीप्रमाणें तारतम्य बुद्धीनें उपयोग करून घेतो. तसेंच स्वतंत्र आणि सर्व शक्तिमान् अशा सृष्टीकर्त्यानें सृष्टींत असंख्य प्रकार निर्माण केले आहेत. सजीव, निर्जीव, अल्पज्ञ किंवा बहुज्ञानी,

अल्पायु, दीर्घायु, सचेतन, अचेतन, लहान, मोठे, घन, द्रव, कठीण, मृदु असे अनंत पदार्थ निर्माण केले आहेत. प्रत्येक पदार्थ त्यांतील पंचतत्वाच्या अंशांना व रचनाविशेषाला अनुसरून, गुणधर्म, सामर्थ्य आणि आयुष्य किंवा टिकाऊपणा या बाबतींत मर्यादित असतो. कांहीं पदार्थ नुसते स्थिर आहेत. कांहींना गति आहे. कांहींना वाढ आहे. कांहींना आपल्या उन्नतीचें किंवा अवनतीचें ज्ञान आहे. सजीव पदार्थांत वृक्ष वनस्पति यांची वाढ होते. जवळ असणाऱ्या पोषक पदार्थांतून त्या आपले पोषक अंश शोषून घेतात. पशुपक्षी प्रयत्न करितात. आणि मनुष्यप्राणि परमावधीची सुधारणा. आपण झालों कसे, वाढतों कसे, आपली शक्ति काय, ती वाढेल निदान क्षीण होणार नाहीं कशी, आयुष्य पूर्ण कसें उपभोगितां येईल, तें वाढेल काय, व आपल्याला सुख कसें होईल या सर्वांचा विचार करण्याची शक्ति याला आहे. सर्व सृष्टींतील पदार्थांपासून आपल्याला काय सुख होईल हा मोठा विचार जणुं काय सृष्टींतील सर्व चराचर वस्तुमात्र परमेश्वरानें या मनुष्य प्राण्याच्या चैनीचीं साधनें म्हणूनच निर्माण केलीं आहेत. तें कसेंही असो. सृष्ट पदार्थांचा आपल्या सुखासाठीं उपयोग करण्याच्या प्रयत्नांत त्यानें यश मिळविलें आहे इतकें खरें. अनेक प्रकारें शरीर विकृत होऊन दुःख वाढूं लागल्यावर त्याचा परिहार करण्याच्या उपायांची तर अवश्यकताच आहे. ह्या कारणामुळें मनुष्यशरीर व इतर द्रव्यें यांच्या तत्वांचा विचार होऊं लागला. अशा रितीनें रोगरूपी दुःखाचा परिहार होऊन नैसर्गिक गुण व पूर्ण आयुष्य आणि आरोग्यसुख कसें अनुभवितां येईल याचा विचार ज्यानें केला आहे तें वैद्यशास्त्र होय. प्राचीन ऋषींनीं अशा प्रकारचा विचार ज्यांत केला आहे त्याला आयुर्वेद असें नांव दिलें. व हा विचार करीत असतां सर्वव्यापी अशीं जीं कांहीं मुख्य तत्वें दिसून आलीं, तीं हे त्रिदोष होत. या तत्वांनींच शरीराची उत्पत्ति झाली व वाढ होते.

पहिलें तत्व कफ किंवा श्लेष्मा.

कोणताही पदार्थ पांचभौतिक आहे, ही गोष्ट सिद्ध झाल्यावर, हा पार्थिवाधिक पंचभूतांचा संयोग झाला कसा याचा विचार करतांना प्रथम पार्थिव परमाणु एकत्र करणारी, परमाणु एकमेकांना चिकटवून त्यांना आकारता आणण्याला जी मुख्य कारण झाली, जिचे अभावीं शरीराला शरीरत्वच आलें नसतें अशा प्रकारची श्लेषकशक्ती–परमाणूंना चिकटवून एकत्र करणारी शक्ती–हें एक मुख्य तत्व मानिलें आहे. हें

तत्व सर्वत्र शरीरांत आहेच. शरीराच्या उत्पत्तीला जशी ही शक्ति कारण आहे. त्याप्रमाणें शरीराच्या वाढीलाही तिची आवश्यकता आहे. कारण वाढ ह्मणजे बाह्य सृष्टींतील पोषक पदार्थांचे परमाणु शरीरांतील घटकांशीं संलग्न होऊन एकजीव होणें ह्मणजे पोषण किंवा वाढ होय. आणि जी ही संधीकरण–किंवा संयोगीकरण क्रिया, ती श्लेषकशक्तीचे अभावीं होणार नाहीं, ह्मणून शरीराच्या उत्पत्तीप्रमाणें वाढीलाही ती अवश्य ठरते. श्लेषणाचें कार्य ज्या अवस्थेंत होतें ती पार्थिव परमाणु त्यांत संयुक्त झालेलें जल, आणि या उभयतांचें एक विशेष प्रमाणांत तेजाच्या मदतीनें झालेलें शोषण होय. परंतु या सर्वांना कारण जल किंवा आर्द्रता असते. ही आर्द्रता अधिक झाल्यास शरीरांत शैथिल्य येतें, पोषक घटक नीट संलग्न होत नाहींत व कमी झाल्यास शरीरांत शोषण-कार्य अधिक होऊं लागतें म्हणून आर्द्रतामूलक ही श्लेषक शक्ति शरीराच्या उत्पत्तीला वाढीला आणि आरोग्याला कारण म्हणून आयुर्वेदांत मुख्य मानिली आहे. आणि आलिंगन देणें, चिकटणें या अर्थाच्या 'श्लिष्' या धातूपासून तयार झालेल्या ' श्लेष्मा, या नांवानें आयुर्वेदांत तिचा निर्देश केला आहे. हाच आर्यवैद्यकांतील श्लेष्मा किंवा कफ होय.

आतां प्रत्येक अवयवांत राहून अविकृत असतां तो काय कार्य करितो, विकृत झाल्यास विकृती कशी काय करितो, आयुर्वेदांत वर्णन केलेलें त्याचें स्वरूप कसें आहे व तें यथार्थ आहे किंवा नाहीं तें पाहणें आहे.

श्लेष्म्याचें स्वरूप.

वर लिहील्याप्रमाणें श्लेष्मा किंवा कफ या नांवानें संबोधिली जाणारी जी श्लेषकशक्ति तिचें आयुर्वेदांत वर्णन आहे तें याप्रमाणें:—

" **स्निग्धः शीतो गुरुर्मंदः श्लक्ष्णो मृत्स्नः स्थिरः कफः ॥** "

शरीरांतील कफ स्निग्ध म्हणजे ज्यांत ओषटपणा किंवा तेलकटपणाचा अंश पुष्कळ आहे, ज्याचा स्पर्श शीत आहे, वजनाला जड, ज्याचें कर्तव्य सामर्थ्य मंद आहे असा, ज्यामध्यें चकाकी आणि बुळबुळीतपणा आहे आणि जो गतिविरहित आहे, असल्या प्रकारचा आहे. शरीरांतील या गुणांना कफ ही संज्ञा आहे. गुण किंवा धर्म हा एकाद्या पदार्थाच्या आश्रयानें प्रतीत होत असतो. आणि म्हणूनच वर्णन करतांना त्या गुणयुक्त पदार्थाचें केलें जातें. आयुर्वेदांतील त्रिदोषांचें वर्णनहि अशा प्रकारचेंच आहे. हें वर्णन यथार्थ आहे किंवा नाहीं हें ठरविण्यासाठीं एकाद्या चिकट पदार्थाकडे पाहावें म्हणजे झालें. हा पदार्थ म्हणजे कफ, पृथ्वी आणि आप् यांच्या अंशाधिक्यानें बनला

असल्यानें त्यांत स्निग्धता आणि शीतता हे गुण उत्पन्न झाले. (शीतपिच्छिलावंबुगुणभूयिष्ठौ पृथिव्यंबुगुणभूयिष्ठः स्नेहः—शीत आणि पिच्छिल हे गुण जलतत्वाच्या आधिक्यानें आणि पृथ्वी व अप् दोन यांच्या आधिक्यानें स्नेहगुण उत्पन्न होतो, असें सुश्रुतांत लिहिलें आहे.) पार्थिवांशामुळेंच गुरुता व गुरुत्वामुळें स्थिरता संभवते. मागें सांगितलेंच आहे कीं तेजाच्या संयोगानें यास चिकटपणा आला असतो व चकाकीलाही कारण तेंच आहे. अशा प्रकारें श्लेष्मा म्हणजे एक चिकटविण्याचें सामर्थ्य ज्यांत आहे, अर्थात् चिकट असा पदार्थ आणि त्याचे हे गुण अयथार्थ नाहींत असें दिसून येईल.

श्लेषकत्व किंवा संघटनाची आवश्यकता.

शरीर म्हणजे काय ? असा प्रश्न केला असतां थोडक्यांत उत्तर देतां येईल कीं, हा एक विशिष्ट प्रकारचा पार्थिव परमाणूंचा संघ आहे. हे परमाणु ज्या शक्तीमुळें एकमेकांना चिकटून एकजीव बनले ती श्लेषक शक्ति. श्लेष्मा—अवश्यक आहे हें उघड आहे. आणि शरीराचा अगदीं लहानांत लहान असा भाग जरी घेतला तरी त्या भागाचें अस्तित्व हें श्लेषकतेवरच अवलंबून आहे. तिचे अभावीं परमाणु एकमेकांपासून अलग राहतील व मग आकाराचाच अभाव. अशा रीतीनें ही शक्ति सर्वत्र असल्यानें आयुर्वेदानेंहि श्लेष्मा हा सर्वव्यापि असल्याचें सांगितलें आहे, तेंहि निराधार ठरत नाहीं. एकाच शरीराचे निरनिराळ्या अवयवांमध्यें थोडाफार फरक आहेच. शरीराचे कांहीं अवयव कठीण कांहीं मृदू व कांहीं घनस्वरूपाचे तर कांहीं द्रवरूपाचे आहेत. कांहींत स्निग्धता पुष्कळ आहे तर कांहींत अगदीं कमी आहे. आणि या भेदाप्रमाणें त्या त्या शरीरविभागांत कफाचें प्रमाण कमी अधिक आहे. पण शरीरसंघ कायम आहे तोंपर्यंत संघस्वरूपाला अवश्यक तो श्लेष्मा सर्वत्र आहे हें सूचित करण्यासाठीं दोषांचें स्थूलतया वर्णन करतांना प्राचीन आचार्यांचें 'ते व्यापिनः, दोष हे सर्वत्र व्यापून आहेत.—हें तत्व अबाधितच राहतें. मात्र याच सूत्रापुढें अपि या विकल्पसूचक अव्ययाची योजना करून स्वास्थ्यसंरक्षण व रोगपरिहार या आयुर्वेदप्रसाराच्या मूलोद्देशाच्या संसिद्धीला ही स्थूल माहिती पुरेशी नसून प्रत्येक दोषाचें सूक्ष्म ज्ञान हेंच या कार्याला जरूर पाहिजे. कोणत्या शरीराच्या भागांत कोणत्या दोषाचे किती गुण किती प्रमाणांत आहेत व ते समस्थितींत असतां कोणत्या नैसर्गिक क्रिया सुरळीत राखून आरोग्यसुख देतात, व त्यांत वैगुण्य आलें असतां कशा विकृति उपस्थित होतात, या ज्ञानाचे अभावीं, निदान व चिकित्सा होत नाहीं हें स्पष्ट केलें आहे.

कफाचे स्निग्धादि गुण ज्या भागांत आधिक्यानें आहेत त्यांन 'व्यप देशस्तु भूयसा' आधिक्यावरून कफाचीं मुख्य स्थानें निर्देश करावयाचा या सामान्य नियमानुसार कफाचीं स्थानें समजण्यांत येतें शरीरांत अशीं स्थानें म्हणजे--

उरः कंठशिरः क्लोम पर्वाण्यामाशयो रस. ।
मेदो घ्राणं च जिव्हा च कफस्य सुतरामुरः ॥१॥[अ.हृ सू.स्था.]

कफाचीं मुख्य स्थानें.

ऊर (छाती) कंठ, मस्तक, क्लोम, सांधे, आमाशय, रसधातु व मेदोधातु, घ्राणेंद्रिय व जिव्हा हीं कफाचीं मुख्य स्थानें होत. यास्थानातहि ऊर हें कफाचें प्रमुख स्थान आहे. कारण या स्थानांमध्यें कफाचे सर्व स्निग्धादि गुण आधिक्यानें असतात या मुख्य म्हणून सांगितलेल्या स्थानांतहि स्निग्धादि गुण सारखा नसून प्रत्येक स्थानांत त्याच्या रचनेप्रमाणें व कार्याप्रमाणें त्यांत फरक असतो हें सहज कळण्यासारखें आहे.

कफाचीं अविकृतावस्थेंतील कार्यें.

श्लेष्म्याचीं सर्वव्यापी आणि मुख्य कार्यें--'श्लेष्मा स्थिरत्व स्निग्धत्वसंधिबंधक्षमादिभिः । देहं अनुगृण्हाति' सम म्हणजे अविकृत स्थितींत श्लेष्मा असतां शरीराचे ठिकाणीं स्थिरता, स्निग्धता, संधिबंधन आणि क्षमा वगैरे मनाची शांतता या क्रियांनीं देहावर अनुग्रह करितो. हें वर्णन स्थूल आहे म्हणजे शरीरांत सर्व ठिकाणीं कमी अधिक प्रमाणांत वर लिहिलेल्या ज्या क्रिया त्यांना कारण श्लेष्मा एवढें सूचित केलें आहे. स्थानविभागानुरूप त्याचे अंश ठरविणें हें तर्कावलंबी असून रोगज्ञान करून घेण्याला त्याची फारच जरूर असते. आतां मुख्य स्थानांत कफाचीं कार्यें काय व कशीं होतात तें पाहूं.

कफाचे कार्यांचा खुलासा.

कफाचें मुख्य स्थान ऊर असें सांगण्यांत आलें आहे. सर्व शरीरांत या स्थानाला अधिक महत्व आहे. कारण ज्या क्रियेवर शरीराचें अस्तित्व अवलंबून आहे आणि जीवरून जीविताची प्रतीति होते अशी श्वासोच्छ्वासाची क्रिया या स्थानापासून होते. उरस्थानांत असणाऱ्या सूक्ष्मछिद्रयुक्त अशा मांसपिंडांच्या निसर्गप्रेरित संकोच-प्रसरणामुळें ही क्रिया चालते हा संकोचविकास सुखानें व्हावा यासाठीं स्निग्धादि गुणयुक्त पदार्थ या मांसपिंडांत असणें अवश्य आहे. या ठिकाणीं उत्पन्न होणारा जो श्वसनवायु त्याच्या अखंड संचारानें फुफ्फुसांतील मृदुता कमी होऊन त्यांची कार्यक्षमता कमी होऊं नये म्हणून

श्लेष्म्याची अवश्यकता असून कुशल सृष्टिकर्त्यानें त्याची योजना केली आहे. या इंद्रियाची रचनाच अशी नमुनेदार आहे कीं, आमाशयांत अन्नावर पचनक्रियेचा संस्कार होऊन जो रस तयार होतो तो नंतर यकृतांत येतो व त्यावर यकृत्पिंडांत एक रसायनिक संस्कार घडून त्याला रक्तस्वरूप येतें. (यकृत् रंजकं पित्तस्य स्थानम्-यकृत् हें रंजक पित्ताचें स्थान आहे. या पित्ताला रंजक हें नांव देण्याचें कारण याच्या संयोगानें रसाला रक्तता येते. 'रंजकं रसरंजनात् ').

मग तेथून त्याचा सर्व शरीरांत रक्तवाहिनींच्या द्वारें पुरवठा होतो. (युगपत् सर्वतोऽजस्रं देहे विक्षिप्यते सदा.) हा संस्कार होत असतां रसाचें रक्त बनत असतां त्यांतून जो मळ निघतो तो उरस्थित कफांत भर घालतो. किंवा हा मल म्हणजेच उरस्थानांतील कफ होय. अशा प्रकारें शरीरांतील या निसर्गसंचालित रसायनशाळेंत मोठ्या कौशल्यानें रक्ताची भट्टी चालू असतां फुफ्फुसांत जरूर असलेल्या या श्लेष्म्याची भर घालण्याची योजना केली आहे. यथाशास्त्र आणि प्रमाणमुक्त आहाराचें सेवन केलें व निसर्गाला विरुद्ध नाहीं असा आहार ठेवला म्हणजे इतर धातूंबरोबर हा पदार्थहि योग्य प्रमाणांत उत्पन्न होतो. आणि आहारविहारांत अव्यवस्थितपणा आला कीं पचनक्रियेंत अव्यवस्थितपणा येतो व त्यामुळें या कफाचें प्रमाणहि कमी अधिक होतें. श्वासोच्छ्वास व शरीराचा आधार रक्त यांचे समस्थितीला या कफाचे अविकृत स्थितीची अवश्यकता असून हृदय, इतर कफस्थानें यांतील कफाचें सामर्थ्य या कफावर अवलंबून आहे. (रक्तांतून सर्व शरीराचें पोषण होतें आणि तें रक्त उरस्थित कफाचे साम्यानें सम राहतें म्हणून.) याला मुख्य मानून अवलंबक (अवलंबन करोति) असें नांव दिलें आहे.

कफ हा मळ कीं मुख्य शक्ति ?

येथें अशी एक स्वाभाविक शंका येण्याचा संभव आहे कीं, कफ हा जर अन्नरसांतून निघणारा मल आहे, तर दोष अशी संज्ञा देऊन शरीराचे मुख्य चालकशक्तींत याची गणना कशी केली ?

मल या शब्दाचा सामान्य अर्थ टाकाऊ पदार्थ असा आहे आणि या अर्थावरून कफ हा जर टाकाऊ पदार्थ मानला तर त्याला दोषत्व कसें ?

कफः पित्तं मलः खेषु प्रस्वेदो नखरोमचा स्नेहोक्षित्वग्विशामोजो धातूनां क्रमशो मलाः ॥ १ ॥ कफ, पित्त, कान, नाक, नेत्र यांतील मळ; घाम, नखें, रोम; नेत्र, त्वचा इत्यादींवर असणारा स्निग्धपणा, आणि ओज हे क्रमानें रसादि धातूंचे मल होत. या मलांच्या यादींत

नखें, केश, घाम या बरोबरच कफ, पित्त इतकेंच नव्हे तर ओजाची सुद्धां गणना केली आहे ओजाची व्याख्या देतांना तर 'ओजस्तु तेजो धातूनां शुक्रांतानां परं स्मृतम्' ओज हें सर्व धातूंचें तेज आहे अशी दिली आहे. मग हें तेज मल कसा ? तरी या ठिकाणीं जो मल शब्द वापरला आहे त्याचा अर्थ इतकाच घ्यावयाचा कीं कोणत्याहि पदार्थाचें पचन होत असतां त्यांतून एक स्वच्छ द्रव्य (प्रसाद) व दुसरा अस्वच्छ (किट्ट) असे दोन भेद निघतात. शरीरांतील सप्त धातु हेहि असेच बनतात. रसापासून रक्त, रक्तापासून मांस, इत्यादि तयार होत असतां पूर्व धातूचा प्रसाद पुढचा धातु आणि या पचन संस्कारांत शिल्लक राहणारें किट्ट--या पचनसंस्कारानें धातु जसजसे स्वच्छ होत जातात तसतसें त्यांतून निघणारें किट्टहि अधिक स्वच्छच निघतें. प्रसाद ह्मणून तयार झालेल्या धातूहून मात्र तें कमी स्वच्छ असतें इतकेंच. शेवटचा शुक्र धातु तयार झाला म्हणजे ती अन्न रसाचीच शेवटची व निर्मळ अवस्था असें समजण्यांत येतें.तरी पण त्याचेंहि कार्य गर्भरूपानें परिणत व्हावयाचें असतें. आणि त्यापूर्वीं जें ओज शरीरावर दिसतें त्याला मल गणण्यांत आलें आहे. कारण या ओजापासून दुसरा पदार्थ निघण्याचा नसतो. याप्रमाणें कफ होय. अन्न किंवा ज्याला आहार ह्मणावयाचा तो पार्थिव आणि आप्य अशाच पदार्थांचा असतो. या पदार्थांच्या रसांत वरील महाभूत गुणांचे जे गुण असतात ते रक्त होतांना कमी होतात. आणि कमी होतात ते जातात कोठें ? यकृतांतील रंजक पित्ताचा संयोग झाला कीं त्यांत तैजस अंश वाढून रसांतून सूक्ष्म घटकांचें शोषण होऊन रक्तांत भर पडते. व स्थूल असें जें पार्थिव आप्य द्रव्य त्या आशयांत शिल्लक राहतें तो श्लेष्मा होय. या कफाचे गुण म्हणजे पृथ्वि व अप् यांच्या मिश्रणाचे हें मागील विवेच नावरून लक्षांत येईलच. रक्त बनत असतां याला रक्तापेक्षेनें मलता येते. ह्मणून मल या नांवानें याचा उल्लेख केला आहे. शिवाय या पदार्थस्वरूपी कफाची, ज्या वेळीं तो काढून टाकावा लागतो, कार्यकारी शक्तिहि अदृश्य अशा स्निग्धता, शीतता इत्यादि गुणांत असते व हे गुण ह्मणजे दोष होत. खोकल्यांतून पडणारा कफ किंवा वांतींतून पडणारें पित्त हेच दोष नव्हत तर त्या पदार्थांत दोषांचे गुण पुष्कळ प्रमाणांत असून त्या त्या आशयांत ते आपलें काम करतात. व्यापिनः म्हणून ज्यांचें वर्णन केलें ते स्निग्ध शीतादि गुण होत. हें स्पष्ट करण्यासाठीं कफ पित्तांना मल अशी संज्ञा दिली असतांही खोकल्यांतून पडणारा कफ किंवा या वांतींतून पडणारें पित्त हेंच आयुसंमत दोष अशी आपली काल्पनिक समजूत करून कांहीं आक्षेपक आयुर्वेदावर अप्रयोजकपणाचा शेरा देतात. हा अप्रयोजकपणा कोणाचा ?

कफाधिक्याचें दुसरें स्थान कंठ श्वासोच्छ्वासाचा व अन्नपानाचा हा मार्ग आहे. खालेल्या अन्नांत आर्द्रता व मृदुता येऊन तें न टोचता अमाशयांत उतरावें यासाठीं कंठाचे ठिकाणीं हा कफ असतो. कफाचे स्निग्धपणामुळें अन्नाचा प्रवेश होतो. त्याचप्रमाणें श्वासाचा नेहमीं या ठिकाणीं संचार असतो. येथें इतर ठिकाणांहून स्निग्धता अधिक नसल्यास या भागाचें शोषण होऊन त्यांत कोरडेपणा येईल. मस्तक हें कफाचें स्थान सांगितलें आहे. आणि येथें असणारा कफ इंद्रियांची तृप्ति करणारा असून त्याचें नांव तर्पक असें आहे. मस्तक मेंदूचें स्थान असून त्याचे ठिकाणीं शांतता असतां इतर इंद्रियेंहि शांत असतात कफ हा शीतवीर्य असल्यानें मस्तकांत राहून मेंदूला शांत ठेवितो व त्यामुळेंच याला तर्पक असें नांव देण्यांत आलें आहे क्लोम या स्थानांतहि श्लेष्म्याचा शीत गुण हाच आपल्या वीर्यानें शांतपणा राखतो. व कोठ्यांतील व रक्तांतील जलांश कमी झाला ह्मणजे तहान वगैरे लक्षणें उत्पन्न होतात. शरीरांत प्रत्येक इंद्रियाचें जें कार्य होतें आणि तें घडवून आणण्यासाठीं जी शक्ति लागते तिचा पुरवठा ज्या भागांतून होतो त्या भागाला त्या शक्तीचा आशय असें समजण्यांत येतें. या आशयांत इतर भागांहून ती शक्ती अधिक प्रमाणांत असते त्याप्रमाणें त्या जलांशाचा पुरवठा करणारा क्लोम हा आशय होय. संधीचे ठिकाणीं कफाचें आधिक्य असून आपला चिकटपणा ह्या गुणानें सर्व संधीचें श्लेषण एकमेकांना चिकटवून ठेवण्याचें कार्य—हा करीत असल्यानें त्याला श्लेषक असें नांव आहे.आमाशयांतील कफाला क्लेदक असें नांव आहे.सर्व प्रकारचें अन्न आमाशयांत गेल्यावर त्याचें पचन होण्यापूर्वी सर्व घटक विरघळून एकरूप व्हावे लागतात.व यासाठीं त्यांत पातळपणा यावा लागतो. हें पातळपणा आणण्याचें काम सोमगुणप्रधान असा कफ करितो. अन्न आमाशयांत गेलें कीं त्या इंद्रियांत जे शीतस्निग्धादि श्लेष्म गुण आहेत त्यांनीं अन्नाचे घटक पातळ स्वरूपांत मिळतात. व मग त्याचें शोषण होतें. ही क्रिया नीट न झाल्यास पचन नीट होत नाहीं. रसधातु हा पार्थिव आप्य या आहार पदार्थांतून निघालेला सार भाग आहे. अर्थात त्यामध्यें या दोहोंचे गुण असणार आणि श्लेष्माहि त्याच गुणांचा आहे. सर्व शरीरावयवांचे पोषक घटकांचें हें संमिश्रण आहे. हा रस निरनिराळ्या अवयवांतून फिरत असतां त्या त्या भागांतील पचनशक्ति आपापले अंश शोषून घेते. मेदोधातूंत कफाचा स्नेह हा गुण विशेष आहे. आणि केशवाहिनीमध्यें वगैरे याचे योगानें मार्दव राहतें. घ्राणेंद्रियांत श्वासोच्छ्वासाच्या घर्षणाला सहन करील अशी मृदुता ठवणारा श्लेष्मा अवश्यक असून, जिव्हेवर टाकलेल्या पदार्थांत जी आर्द्रता उत्पन्न होते आणि जीमुळें रसज्ञान होतें असें चर्वणानें त्या पदार्थांत

जो एक प्रकारचा द्रव मिश्र होतो व ज्याच्या योगानें खाल्लेला पदार्थ घशांतून खालीं जाण्यालायक बनतो हें कार्य करणारा श्लेष्मा होय. श्लेष्म्याच्या त्या स्थानांत राहणारे स्निग्धादि गुणांमुळेंच हें कार्य होतें. हीं कफाधिक्याचीं स्थानें व त्यांचीं कार्यें झालीं. ह्या स्थानांपैकीं कोठें स्निग्धता अधिक तर कोठें शीततेमुळें कार्य घडतें. पार्थिव परमाणु हें द्रव्य आणि त्यांत अप् तत्वाचा मिलाफ झाल्यानें हे गुण निर्माण झाले आहेत. आणि त्या अप् तत्वाच्या म्हणजे आर्द्रतेच्या प्रमाणानुरूप प्रत्येक ठिकाणीं त्याचें स्वरूप निराळें आहे म्हणजे या श्लेष्मशक्तीला कारण जलतत्व आहे आणि म्हणूनच शरीराच्या चालकशक्तींत श्लेष्मा ही शक्ति सोमविशिष्ट आहे असें सांगितलें आहे. शरीराच्या रचनाविशेषाचे सामर्थ्यानें खाल्लेल्या पदार्थांतूनच त्या त्या आशयाचे ठिकाणीं या श्लेषक शक्तीची जरूर ती भर पडत असते व त्यामुळें शरीराच्या क्रिया सुरळीत चालतात.

कफाचीं विकृतावस्थेंतील कार्यें.

कफ विकृत झाला असतां तो काय व कशी विकृति उत्पन्न करतो तें पाहूं !

आयुर्वेदांतील कफाचीं विकृतावस्थेंतील कार्यें म्हणजे कफजन्य लक्षणें मुख्य वीस सांगितलीं आहेत. तीं:—तृप्तिश्च, तंद्रा च, निद्राधिक्यं च, सौमित्यं च, गुरुगात्रता च, आलस्यं च, मुखमाधुर्यं च, मुखस्रावश्च, उद्गारश्च, श्लेष्मोद्गिरणं च, मलस्याधिक्यं च, कंठोपलेपश्च, बलासश्च, हृदयोपलेपश्च, धमनीप्रतिचयश्च, गलगंडश्च, अतिस्थौल्यं च, शीताग्निता च, उदर्दश्च, श्वेतावभासता च, श्वेतमूत्रनेत्रवर्चस्त्वं च इति विंशतिः श्लेष्मविकाराः, कफ विकृत झाला असतां म्हणजे त्याची वाढ झाली असतां मुख्यतः हीं लक्षणें उद्भवतात. निरनिराळ्या भागांत कफ हा निरनिराळ्या कारणांनीं आणि अनेक प्रकारांनीं दूषित होऊन अनेक विकार उत्पन्न करितो. विकार कोणत्याहि भागांत झाला तरी कफाचे विकारांत या वीस लक्षणांपैकीं कांहीं असतातच. ज्या आशयामध्यें प्रथम विकार उत्पन्न होतो त्याचे समीपवर्ति लक्षणांचा समावेश विकारांत होतो. कफापासून हीं लक्षणें कशीं उद्भवतात, याचा विचार करूं.

कफाच्या लक्षणांचा खुलासा.

सदर लक्षणांत तृप्ति हें प्रथम सांगितलें आहे. ' तृप्ति म्हणजे भोजनावांचून भोजन केल्याप्रमाणें तृप्ति वाटणें. संपूर्ण शरीराची वाढ भोजनाचे सुव्यवस्थित पचनानें होते. आणि त्याचे अव्यवस्थित-

पणामुळें विकार उद्भवतात. कोणत्याही कफस्थानाला दूषित करण्याला पचनेंद्रिय म्हणजे आमाशय यांतील कफच कारण आहे. आहाराशिवाय कशाचीच वाढ नाहीं. यामुळें आमाशयाश्रयी कफलक्षण तृप्ति हें प्रथम सांगितलें आहे. भोजनाशिवाय तृप्ति वाटणें म्हणजे खाल्लेल्या पदार्थांचें पचन होत नाहीं आणि त्यामुळें दुसरा भोजनकाळ आला तथापि आमाशय रिकामा नसल्याकारणानें अन्नाची इच्छा होत नाहीं. आमाशयांत अन्न गेल्यानंतर त्यावर पाचक रसांचा संस्कार होऊन त्याचें सार आणि किट्ट असें पृथक्करण होतें. सारभूत रसवाहिनींचे द्वारें धातूंत शोषला जातो. आणि मळाचा उत्सर्ग होतो व आमाशय रिकामा होऊन पुनः अन्नाची मागणी होते. ज्यावेळीं नेहमींच्या पचनशक्तीनें पचणार नाहीं असे पदार्थ, अर्थात् जड, शीतल, स्निग्ध भोजनांत येतात अथवा भोजन अधिक होतें त्यावेळीं योग्य वेळांत पचन होत नाहीं. अन्नांत पातळपणा उत्पन्न करणारा 'क्लेदक कफ' मागें सांगितला आहे. त्याची यामुळें वाढ होते. आणि अंत पाचक पित्त ऱ्हास पावतें. या क्रियेला कारण म्हणजे अर्थातच जडत्व आणि शीतत्व ज्यांत अधिक आहे असे पार्थिव आणि आप्य पदार्थ होत. कफामध्यें त्यांचें आधिक्य असतें ह्मणून 'वृद्धिः समानैः सर्वेषाम्' कोणत्याहि पदार्थाची समानधर्मी पदार्थानें वाढ होते. या सामान्य नियमाला अनुसरून कफाची वाढ होते. आणि त्यामुळें तृप्ति किंवा आहाराविषयीं अनिच्छा हें लक्षण उद्भवतें. याप्रमाणें या विकाराचें कर्तृत्व कफाकडे येतें. कफाचें पूर्वोक्त वास्तवस्वरूप ध्यानीं घेतलें ह्मणजे हें लक्षण ज्या आमाशयांत उत्पन्न होतें, तेथील कफ येवढा अर्थ कळून 'आंतड्यांतील पाचक रसाला जितके पदार्थ सहज पचवितां येतील त्याहून' अधिक जड, शीत असे पदार्थ खाण्यांत आल्यानें आमाशयांतील पाचक रसाचें अन्नांत मिश्रण झालें तरी त्याचें प्रमाण कमी पडून योग्य कार्य नियमित वेळांत होत नाहीं. यामुळें या लक्षणाचा प्रादुर्भाव होतो. याच अर्थाला संक्षिप्तरीत्या सांगणारें, कफानें तृप्ती हा विकार संभवतो, हें वाक्य आहे. अशी खात्री होऊन आयुर्वेदीयांनीं उगीच कांहीं तरी सांगितलें आहे अशाविषयीं त्याबद्दल अनादराला जागा राहणार नाहीं. मात्र नीट विचार केला पाहिजे. दुसरें लक्षण तंद्रा. तंद्रा ह्मणजे निद्रार्तस्येव यस्येहा तस्य तंद्रां विनिर्दिशेत्' एखाद्याला झोंप आली असतां तो झोंप न घेतां कांहीं काम करीत असतां जसा अर्धवट झोपेंत व आळसावलेला दिसतो, त्याप्रमाणें जी विकाराची स्थिति तिला तंद्रा असें ह्मणतात. ही कफानें कशी येते ? शरीराचे स्थूल अगर दृश्य भाग ज्याप्रमाणें अन्नरसवाहिनींतून फिरत असतां त्यांतून आपापले घटक निसर्गसामर्थ्यानें शोषून घेऊन पुष्ट होतात. त्याचप्रमाणें सूक्ष्म असा शरीरांतील भाग ज्ञानतंतु

हेहि याच घटकांचा आश्रय करून राहणाऱ्या स्वजातीय सामर्थ्यानें वाढतात. ज्ञानेंद्रियांचीं कार्यें दृश्य नाहींत, तरी कार्यकारी असें सामर्थ्य प्रत्येक अवयवाच्या प्रत्येक घटकावरोबर असून त्याकडून कार्यें होत असतात. हें सामर्थ्य स्थूल घटकांच्या विशिष्ट संमिश्रणापासून उत्पन्न होत असतें. पदार्थाशिवाय सामर्थ्य नाहीं व सामर्थ्यविहीन पदार्थ नाहीं. मात्र पदार्थ ह्मणजे सामर्थ्य किंवा सामर्थ्य ह्मणजे पदार्थ नव्हे. ज्याप्रमाणें गंध हा एकाद्या पदार्थाशिवाय उपलब्ध होऊं शकत नाहीं, परंतु ज्या पदार्थाच्या आधारावर गंधाचें वास्तव्य आहे तो पदार्थ म्हणजे गंध नव्हे. आणि पदार्थाचा नाश केला तर त्याबरोबर गंधाचाही नाश होतो अशा प्रकारचा गुण आणि गुणी किंवा सामर्थ्य आणि सामर्थ्यवान् यांचा अन्योन्य संबंध आहे. आपल्या शरीराचे अवयव सामर्थ्यवान आहेत. हें सामर्थ्य ज्ञानतंतूंत आहे. आणि त्यांकडून कार्यें घडत असतात. कोणत्याहि अवयवाचें कार्य त्यांतील ज्ञानतंतूंचे सबलतेवर अवलंबून आहे. हे ज्ञानतंतु हीनबल झाले कीं अवयवाचें आकारमान जरी नीट असतें तथापि त्याचें कार्य उत्तम प्रकारें होत नाहीं. त्याच्या क्रियेंत शैथिल्य उत्पन्न होतें. शरीराच्या सर्व भागांत—प्रत्येक अवयवांत या ज्ञानतंतूंचें जें सामर्थ्य आहे त्या सर्वांचें केंद्र मेंदु आहे. मागें सांगितलें आहेच कीं मस्तकांतील—मास्तिष्कपिंडांतील—सौम्यता—तर्पक गुण हा इंद्रियांचे ठिकाणीं शांतपणा राखीत असतो. याचें प्रमाण वाढलें कीं अर्थातच सर्व इंद्रियांत अधिक शांतता उत्पन्न होते. ही शांतता म्हणजे ज्ञानतंतूंचे तरतरीचा ऱ्हास आणि असें झालें म्हणजे अवयवांची कार्यकारी जी शक्ति तींतच मांद्य अथवा शैथिल्य आलें म्हणजे कार्यांतहि शिथलता येते. प्रत्येक इंद्रियाचा उत्साह कमी होऊन त्यांत सुस्तपणा येतो. यांत डोळे साफ उघडत नाहींत, मस्तकांतील मस्त पिंड हें मेंदूचें मुख्य स्थान असल्याकारणानें त्याच्या मांद्याचा परिणाम सन्निध असलेल्या नेत्रांवर विशेष होणें अगदीं सहज आहे. मागें कफ म्हणजे जे स्निग्धादि गुण सांगितले त्यांत सौम्यता आहे. म्हणजे हा गुण कफ होय. आणि कफानें तंद्रा येते ह्मणून सांगतांना तंद्रा ज्यांवर प्रतीत होते अशा ज्ञानतंतूशीं ज्याचा संबंध असा तर्पक कफ व तो ह्मणजे सौम्यता हें उघड होतें. व त्याबरोबरच कफानें उत्पन्न होतें असें सांगणें यथार्थ आहे असें कळेल. वर सांगितलेलें तंद्रा किंवा सुस्ति हें लक्षण दोन प्रकारांनीं अनुभवास येणारें आहे. एक सर्वांगीण ह्मणजे सर्व शरीर सुस्त होणें. आणि दुसरी एकाद्या अवयवावर होणारी. याचें कारण असें आहे कीं, एकाच शरीराचे निरनिराळे भाग हे ज्याप्रमाणें परस्पर विभिन्न आहेत, त्याचप्रमाणें त्या त्या अवयवांना पोषक असणारे पदार्थ हे भिन्न गुणाचे असावे लागतात. आणि आहेत ही. पुष्कळ

पदार्थ एकसारखे दिसतात आणि त्यांचे गुणसामर्थ्यांत पुष्कळसें साम्यही पण असतें. तथापि थोडासा सूक्ष्म तरी त्यांत फरक हा असावयाचाच असें नसेल तर त्यामध्यें विचित्रता आली नसती. हा जो पदार्थमात्रांत फरक असतो तो कार्यांतहि भेद पाडितो व याच परस्परांशीं विशिष्टतया प्रतीत होणाऱ्या कार्याला वैद्यशास्त्रांत प्रभाव असें नांव आहे. कोणताहि विकार सर्वांगीण किंवा एक अवयवी होण्याला पदार्थांतील हा प्रभावच कारण आहे. असे कांहीं पदार्थ या प्रभावामुळेंच शरीरांतील एकाद्या भागांतील कफ वाढवितात व कांहीं असे आहेत कीं ते सर्व शरीरव्यापी कफाला एक समयावच्छेदानें दूषित करणारे आहेत. व त्यामुळें सर्व शरीरव्यापी व एकावयवव्यापी असे विकार होतात. शरीरामध्यें एकाच जातीचे विकार निरनिराळ्या भागांत होतात. त्याचें कारण हेंच होय. उदा० शूल हें लक्षण कोणत्याहि शरीरविभागांत होतें. व याला सामान्य कारण वायु आहे. परंतु या वायूनें निरनिराळ्या भागांत शूल उद्भवतात. जर वायु दूषित झाला तर त्यानें सर्वत्र शूल कां उत्पन्न करूं नये. याचें उत्तर हेंच आहे कीं ज्या भागांत शूल झाला तेथील वायु कुपित झाला आहे. आणि उपचार करतांनाही सामान्य शूलनाशक किंवा वातनाशक असे न करतां ज्या भागांतील विकार तन्नाशक असे उपचार करावयाचे. कटिस्थानांत व पृष्ठस्थानीं शूल झाला असतां इतर शूलनाशक पदार्थांपेक्षां एरंडेलच विशेषतः गुणकारी होतें. अशा रीतीनें द्रव्यांतरांतील प्रभाव योग्य रीतीनें उपयोगांत आणणें हेंच चिकित्सेचें रहस्य आहे. अशा प्रकारचा आहार अन्नाशयांत गेला असतां त्याचा जो रस तयार होतो त्यांतून प्रत्येक अवयवांत सौम्यता वाढविणारा जो सौम्य गुण त्याची भर पडते आणि ज्या भागांत तो वाढेल तेथील ज्ञानतंतूचे कार्यांत शैथिल्य येतें. सौम्यता हा गुण कफाचा असल्यामुळें त्याचे वाढीनें उत्पन्न होणारें लक्षण अर्थातच कफाचें ठरत आहे. ज्ञानतंतूमध्येंही सौम्यता योग्य प्रमाणांतच असते अशा वेळीं त्यांचें पोषण होऊन इंद्रियाचा उत्साह वाढतो आणि तीं कार्योत्सुक असतात. अशा रीतीनें तंद्रा या लक्षणाचें कर्तृत्व कफाकडे आहे. निद्राधिक्यं च, झोंप अधिक येणें याला कारण वरीलच आहे. ज्या ज्ञानतंतूच्या फाजील सौम्यतेमुळें सुप्ति उत्पन्न होते त्यामुळेंच ज्ञानतंतु नियमित वेळांत जागृति देण्यास समर्थ होत नाहींत त्यामुळें झोपेचें प्रमाण वाढतें. स्तैमित्यं च—स्तैमित्य ह्मणजे एक प्रत्येक अवयवाच्या क्रियेंत मंदपणा येणें आणि दुसरें 'आर्द्रपटावगुंठनमिव' ओल्या वस्त्रानें शरीर गुंडाळल्याप्रमाणें वाटणें असे दोन प्रकार होतील. पैकीं, पहिल्या अर्थाचा तंद्रा या लक्षणांतच अन्तर्भाव होतो. दुसरा अर्थ ह्मणजे सर्वां-

गौण शीतता कफानें कशी उत्पन्न होते हें पहावयाचें. ही शीतता त्वगिंद्रियाचे ठिकाणीं प्रतीत होत असते. अर्थात् या प्रसंगीं कफ वाढला असें ह्मणणें ह्मणजे त्वचेंत वाढला हें उघड होत आहे. त्वचेंतील उष्णता रक्तावलंबी आहे. आणि रक्ताची उष्णता अन्नरसावर अवलंबून आहे. आहारामध्यें पार्थिव व आप्य पदार्थ अधिक आले ह्मणजे तद्विशिष्ट रस तयार होतो. आणि असा रस रक्तांत मिळाला कीं, त्यांतील जडशीत गुणामुळें सात्मीकरण न होतां उलट रसांतील पूर्वींची उष्णताच कमी होते. उष्णतेच्या हीनत्वामुळें रक्ताचें अभिसरण मंदावतें. व त्यांत आर्द्रता——जलांश—वाढून त्वचेंतील उष्णता कमी होते व त्यायोगें स्तैमित्य हें लक्षण उत्पन्न होतें याला रस धातूंत कफाची वाढ किंवा रसाजीर्ण हें कारण आहे. 'गुरुगात्रताच' अंग जड होणें. वरील प्रकारें रक्ताचें अभिसरण आणि रस धातूचें पचन त्यांतील पार्थिव व आप्य या अंशांचे आधिक्यामुळें नीट न झाल्यानें व असल्याच रक्तानें सर्व धातूंचें पोषण होत गेल्यास, शिवाय अशा प्रकारच्या रसांत एक प्रकारचा चिकटपणा येतो. त्यानें शरीरांतील सूक्ष्म स्रोतसांचा संरोध होऊन मलांचा नीट उत्सर्ग होत नाहीं. अशा स्थितींत मलाचा उत्सर्ग होत नाहीं व पार्थिव आप्य पदार्थांची ह्मणजे गुरुत्वविशिष्ट घटकांची शरीरांत भर, मग जडता येणें स्वाभाविक आहे. आणि हे गुण कफाचे असल्यामुळें यांचें कर्तृत्व कफाकडे असल्याचें सांगितलें आहे. व सदर लक्षण तंद्रेप्रमाणेंच सर्व शरीरव्यापी आणि एकावयवव्यापी असें होऊं शकतें. आलस्यं च-आळस ह्मणजे 'समर्थस्याप्यनुत्साहः कर्मण्यालस्यमुच्यते' काम करण्याची अंगीं ताकद असतांहि तें करण्याविषयीं उत्सुकता नसणें ह्मणजे आळस होय. हा उत्साहाचा ऱ्हास ज्ञानतंतु अगर मज्जातंतु यांचे विकृतीमुळें होतो. तंद्रा उत्पन्न करणारी विकृति अधिक प्रमाणांत असते व आळस करणारी थोडी कमी येवढाच फरक. बाकी दोहोंचेंहि स्वरूप एकाच जातीचें. आळसालाच थोडें व्यापक आणि टिकाऊ रूप म्हणजे तंद्रा होय. सुखमाधुर्य च, मुखास्रावश्च, हीं दोन लक्षणें रसनेंद्रियावर होणारीं आहेत. अर्थात् यांना त्या ठिकाणचे कफाची वाढ कारण आहे हें उघड होय. जिव्हेचे ठिकाणीं जो कफ असतो त्यांत स्निग्धता, श्लक्ष्णता इत्यादि गुण अल्प असून शीतता—आर्द्रता हाच गुण विशेष प्रमाणांत आहे व यामुळेंच कोणताहि पदार्थ जिव्हेवर ठेवतांच त्यांत आर्द्रता येऊन त्याचे रसाचें ज्ञान होतें. कफमय आहारामुळें झालेल्या कफविशिष्ट अन्नरसापासून इतर शरीरविभागांप्रमाणेंच जिव्हेवरही बुळबुळीतपणा येतो. ती चिकट होते, आणि तींतील ज्या सूक्ष्म स्रोतसांनीं रसाचें परिज्ञान होतें तीं भरून जातात व कोणताहि पदार्थ खाल्ला असतां त्यांत रसनेंद्रियाचे

ठिकाणीं वाढलेल्या या पदार्थांचें मिश्रण होऊन त्याची वास्तविक रुचि कळत नाहीं. कफ हा पदार्थ मधुर रसविशिष्ट असल्यानें या अरुचींत गुळचटपणा अगर बेचवपणा येतो. नाहीं तर मुखमाधुर्य हें इष्ट आहे. दुसरें लक्षण मुखस्राव–तोंडाला पाणी सुटणें, याचें कारण असें आहे कीं, कफ वाढून तो पच्यमान अवस्थेंत येतो. त्यावेळीं त्यास खारटपणा येतो. व क्षारत्वामुळें स्राव होतो. यावेळीं कफाचें पचन करणारी उष्णता जागृत होऊन तिचे मिश्रणानें क्षारत्व येतें. विदग्ध अवस्थेंत कफाला क्षारत्व येतें असा उल्लेख आहे ' विदग्धः क्षारतां व्रजेत् ' उद्गारश्च–ढेकरांचें [illegible] प्रमाण वाढणें, [illegible] आणि फुप्फुसें हीं कफानें भरलीं असतां श्वासाचे सुखसंचाराला प्रतिबंध येतो. आणि प्राणवायूच्या संचाराला जो अडथळा येतो त्याचें प्रतिलोमगतीचें हें लक्षण आहे. श्लेष्मोद्गिरणं च, म्हणजे कफ मुखावाटें पडणें, याचा विशेष खुलासा करण्याचें कारण नाहींच. मागें कफाच्या उरस्थानाविषयीं सांगतांना रसपचनाचें कार्य चालू असतां मलरूपी कफ कसा उत्पन्न होतो याचा उल्लेख केला आहे. ज्यावेळीं कफकारक म्हणजे पार्थिवाप्य विशिष्ट अशा पदार्थांची आहारांत विशेष भरती होते त्यावेळीं अर्थातच स्थूल घटकांचे आधिक्यामुळें उरस्थानांत कफाचा संचय अधिक होतो. व त्याचा मुखावाटें उत्सर्ग होतो.

' मलस्य आधिक्यं च ' म्हणजे शरीरांतर्गत मळाचें प्रमाण वाढणें. याला कारण वरीलच आहे. प्रथम अन्नाशयांत अन्नाचें पचन होऊन सारभूत रस तयार होतो त्यावेळीं पार्थिवांश अधिक असल्यामुळें किट्ट–मळ–अधिक प्रमाणांत निघतो. पुढें असल्याच अन्नरसाचा प्रतिधातूंमध्यें पाक होत असतां देखील मलाचें प्रमाण स्वाभाविकतः ज्यास्त होतें. ' कंठोपलेपश्च ' म्हणजे कंठाचे ठिकाणीं चिकटपणा उत्पन्न होणें. श्वाससंचार आणि अन्नाचा प्रवेश सुखानें व्हावा यासाठीं कंठाचे ठिकाणीं निसर्गानें जी स्निग्धता ठेविली आहे तिचें प्रमाण कफकारक स्निग्ध पदार्थांनीं वाढतें व त्यामुळें चिकटपणा येतो.

' बलासश्च ' म्हणजे कफाचें घट्ट पिंडमयस्वरूपांत उत्सर्जन मुखावाटे होणें. (कफाचे बेडके) कफ वाढला असून (छातीमध्यें) उष्णतेमुळें त्यांतील आर्द्रता कमी होते. आणि त्याची अशी स्थिति होते. ह्याचा अनुभव खोकल्यांत येतो.

' हृदयोपलेपश्च ' छातींत फुप्फुसपिंडाचे ठिकाणीं चिकटपणा किंवा सारवल्यासारखें वाटणें, छाती भरून येणें. स्निग्ध बुळबुळीत–जड अशा कफाची वाढ छातींत झाली असतां हें लक्षण सहज होणारें आहे.

' धमनी प्रतिचयः ' शरीरांतील शिरा भरल्याप्रमाणें वाटणें, कफ-

कारक पार्थिव व आप्य गुणविशिष्ट पदार्थांनीं जो रस तयार होतो, ज्याला आम या नांवानें संबोधण्यांत येतें त्यांत नेहमींचा पातळपणा नसणें स्वाभाविक आहे. आणि या घनतेमुळें त्याचें अभिसरण मंदावतें. त्यांतील स्निग्धपणा आणि चिकटपणा यामुळें शिरांना लेप बसतो व त्यामुळें मलोत्सर्ग होत नाहीं. अशा रीतीनें धमनींत जड स्निग्ध असा रस राहिल्यानें मलोत्सर्ग नसल्यानें त्या भरल्यासारख्या वाटतात.

'गलगंडश्च' कंठस्थित रसपिंडामध्यें जड, स्निग्ध, शीत अशा पदार्थांनीं बनलेल्या रसधातूचें पचन व अभिसरण नीट न झाल्यामुळें संचय होऊन त्या पिंडाची वाढ होते व पिकण्याच्या—पू होणाऱ्या क्रियेला सुरुवात होते. कंठ हें कफस्थान आहे, त्यामध्यें कफाची वृद्धि झाल्यानें समीपवर्ती रस—पिंडावर परिणाम होऊन हा विकार होतो, व यासाठीं ह्या विकाराचें उत्पत्तिकारण कफ विकृति आहे.

'अतिस्थौल्यं च' शरीरस्थूल होणें. मेदोधात्वाश्रित कफाचे वाढीमुळें हें लक्षण उत्पन्न होतें. मेदामध्यें कफाचे गुणापैकीं स्निग्धता आधिक्यानें आहे. आणि त्या गुणाला वाढविणारे अर्थात् स्निग्ध पदार्थ अधिक आहारांत आल्यानें मेदोधातूची अभिवृद्धि होते. ओषटपणामुळें सूक्ष्म स्रोतसें बंद होतात व पुढील धातूंची वाढ बंद होऊन सर्वांचा परिणाम मेदोधातूच्या फाजील वाढींतच होतो. हा परिणाम शरीरांत असणाऱ्या विशेष सपाटीच्या अशा भागांवर पोट, स्तनप्रदेश, कटिपश्चात्भाग इत्यादींवर होतो आणि शरीर स्थूल दिसूं लागतें.

'शीताग्निता च' म्हणजे अग्निमांद्य. जठराग्नि आणि धात्वग्नि म्हणजे आमाशयांतील व धातूंतील उष्णता कमी होणें हें कफाचें सामान्य लक्षण स्पष्टच आहे. अशा प्रकारची विकृति झाली असतां अन्नाचें व धातूचें पचन नीट होत नाहीं व हा आम शरीरांत फिरत असतां त्वचेंतील त्याचें अभिसरण नीट न होतां जागोजाग संचय होतो. हा थोडा वेळ टिकणारा असतो. व अंतर्बाह्य दीपन पाचन औषधांनीं त्याचा नाश होतो. त्याला उदर्द म्हणतात. रसधात्वाश्रित कफाचें आधिक्य याला कारण आहे.

श्वेतावभासता 'श्वेतमूत्रनेत्रवर्चस्त्वं च' म्हणजे त्वचा, नेत्र, मूत्र, मल इत्यादींवर पांढूरता येणें. फिक्टपणा येणें. वर सांगितल्याप्रमाणें अन्नरस कफप्रधान व पार्थिव्य आप्य घटकविशिष्ट तयार झाला म्हणजे त्या पित्ताच्या किंवा यकृत् पिंडांतील पाचक रसाच्या मिश्रणानें त्याला रक्तता—तांबडेपणा येतो. त्याचे न्यूनत्वामुळें अन्नरसाचें यथाविधि पचन न होऊन रक्तताहि नीट येत नाहीं. व त्यामुळें रक्ताच्या रंगानें त्वचेच्या पृष्ठभागावर दिसणारी तेजस्विता कमी होऊन फिक्टपणा येतो. अन्नांतील जलांशावर उष्णतेचा पुरेसा संस्कार न झाल्यानें

मलमूत्रांत पांढरेपणा, डोळ्यांतील व नखांतील लाली रक्तावलंबी असते ती रक्ताचेच फिकटपणामुळें कमी होते यामुळें हीं लक्षणें कफकृत मानलीं आहेत. कफाचीं हीं वीस लक्षणें होतात. विकार कफाचे म्हणून सांगतांना ज्या भागांत कफाच्या गुणांची व्यस्त अगर समस्त रूपानें वाढ होते त्या भागाच्या नैसर्गिक क्रियेंत कफाचा परिणाम दिसून येणें येवढेंच धोरण आहे. प्रत्येक इद्रियाची रचना आणि कार्य हें भिन्न आहे. आणि त्याला अनुसरून विकृति व्हावयाची. वर सांगितलेलीं लक्षणें हीं शरीरांत स्निग्धादि गुणविशिष्ट कफ ज्या भागांत आधिक्यानें आहे, त्या स्थानांतील वाढ दर्शविणारीं आहेत. शरीराचीं इंद्रियें परस्परावलंबी आहेत. एकाचें कार्य बिघडलें असतां त्याचा परिणाम दुसऱ्यावर होतो. अशा रीतीनें विकार वाढत जातात. एकाद्या आशयांत एकाद्या गुणाची वाढ होते, परंतु इतर इंद्रियांवर त्याचा परिणाम होत नाहीं त्यावेळीं त्या दोषाची वृद्धि एवढेंच कार्य असतें. परंतु उपचारांचे अभावीं किंवा कारणाचे सामर्थ्यानें वाढ चालू राहिल्यास तिचा परिणाम दुसऱ्या इंद्रियावर होतो. त्यावेळीं रोग म्हणून ओळखण्यांत येतें. वर लिहिलेलीं लक्षणें हीं कफाचीं त्या त्या स्थानांतील वाढ दाखविणारीं आहेत. या वाढीमुळें उन्मार्गगामी कफ कोणते विकार करतो त्याचा विचार करावयाचा.

कफामुळें होणारे कांहीं विचार.

रोग शब्दाचा अर्थ शरीराला त्रास देणारी विकृति असा आहे. अशा विकृतीचें सामान्य कारण ह्मणजे शरीरांतील कोणत्याही भागाचें न्यूनाधिक्य—विषमता—येणें हें आहे. ' रोगस्तु दोष वैषम्यं ' किंवा ' धातुवैषम्यं रोगः ' धातु ह्मणजे शरीरांतील रक्तादि स्थूल व तन्निष्ठ शक्तिस्वरूपी वातादि सूक्ष्म द्रव्यांत न्यूनाधिक्य येणें ह्मणजे रोग होय. अशी रोगाची व्यापक व्याख्या आहे. आणि सामान्यतः जरी ही विषमता रोग नांवानें संबोधिली जाते, तथापि वैद्यशास्त्रामध्यें उपचाराचे सोयीसाठीं रोगसंज्ञा एका निराळ्याच अवस्थेला योजिली आहे. किंवा एका विशिष्ट अवस्थेमध्येंच रोगवर्णन संभवतें. ती अवस्था अशी कीं, जीमध्यें नैसर्गिक देहधर्माहून विभिन्न अशी विकृति दृग्गोचर होऊन शरीराला त्रास भोगावा लागतो. उदाहरणः—कफस्थानामध्यें मुख्य जें ऊर तेथें कफाची वाढ झाली असतां त्या स्थितींत ' हृदयोपलेपः ' हे स्थानसंभाव्य लक्षण उत्पन्न होईल. व कफाचे सामान्य गुरु गुणाचे वाढीनें छाती जड—भरल्या सारखी—वाटेल. या अवस्थेंत शरीराला थोडाफार त्रास होतोच. आणि यासाठीं ' रुक् सामान्यात् ' रोग हे

नांवहि या अवस्थेला देणें चुकीचें होणार नाहीं. तरी पण आयुर्वेदानें रोग नांवानें जिला संबोधिलें किंवा जी विशिष्टावस्थाच विशेष चिकित्स्य असते ती स्थिति ही नाहीं. तर याच कफाचे वाढीच्या समीपवर्ति इंद्रियांवर परिणाम होऊन त्यांच्या क्रियांत बिघाड उत्पन्न होतो. व जे श्वास, कास इत्यादि विकार उद्भवतात त्यांना अनुलक्षून सदर संज्ञा योजिली आहे. या अवस्थेमध्यें दोष उन्मार्गगामी असतो. ह्मणजे ज्या आशयांत त्याची वाढ झाली त्याचे आसन्नस्थित भागांत त्यामुळें विकृति होते. यापूर्वीचे स्थितीला वाढ किंवा संचय अशी संज्ञा आहे. ' चयो वृद्धिः स्वधाम्न्येव ' मात्र हीच उन्मार्गावस्था सर्व विकारांना उत्पादक आहे. प्रस्तुत कफाचे विकार हे कुपितावस्था किंवा उन्मार्गावस्था यांतीलच विचारणीय आहेत. व त्यासाठीं कफविकारांतील कांहींचा उल्लेख केला आहे.

श्वास किंवा दमा.

मुख्य कफस्थान जें उर त्यापासून श्वास या विकाराची उत्पत्ति होते.—या विकारांतील मुख्य कर्तृत्व कफाचे उरस्थानस्थायी अंशाचे वाढीकडे आहे. श्वास किंवा दमा हा विकार सर्वविश्रुत आहे. आणि तो कफानें होतो हें सर्वांना माहीत आहे. त्याचप्रमाणें श्वासविकार कशानें होतो ? असा प्रश्न केला असतां आयुर्वेदीय चिकित्सकही कफामुळें श्वास होतो हेंच उत्तर देणार. पण ह्या उत्तरानें प्रागतिक किंवा विवेचक मनाचें समाधान होणार नाहीं. व म्हणून 'कफानें श्वास' यांतील गर्भितार्थ काय आहे ? इकडे लक्ष्य दिलें पाहिजे. पण श्वास हा विकार फुफ्फुस पिंडापासून उद्भवतो. अर्थात् कफानें म्हणजे त्या त्या स्थानांतील कफानें हें उघड आहे. तेथील कफ चिकट बुळबुळीत या स्वरूपाचा पदार्थ असतो. फुफ्फुसांमध्यें या असल्या पदार्थाची अवश्यकता काय हें मागें सांगितलेंच आहे. या तेथील कफाची वृद्धि कफकारक पदार्थांनीं झाली असतां फुफ्फुसपिंडांतील सूक्ष्म स्रोतसें त्यानें भरून जातात. कफाचे वाढीमुळें तेथील पाचकशक्ति ऱ्हास पावते. आणि वरील स्वरूपाचे पदार्थाचे वाढीबरोबर आर्द्रता वाढते. त्यामुळें त्यांतील घटकामध्यें फुगीरपणा किंवा सूज उत्पन्न होते. व अशा प्रकारें या स्रोतसांचा परस्परांवर दाब पडून त्यांतून श्वास वायूचा संचार नीट होत नाहीं यामुळें श्वासवायु अर्धपथांतून परावृत्त होतो. अर्थात् त्याची ही प्रतिगति विशेष जोराची असते यायोगें श्वसनक्रिया नाकानेंच पुरी न होतां श्वासवायु कदाचित् तोंडानेंहि वाहूं लागतो. वायूचे छातीचे भागांत वेदना होतात. अशा रीतीनें हा श्वासविकार उत्पन्न

होतो. कफाची वाढ हें याला आदिकारण आहे. कफाचा विकार याचा अर्थ कोणत्याही भागांतील कफ असा नाहीं, तर ज्या इंद्रियावयवावर कफाचा विकार उत्पन्न झाला त्यांत असणाऱ्या कफाची विकृति असा समजावयाचा. प्रत्येक अवयवांत दोषांचे अंश निरनिराळे असतात. याचा उल्लेख मागें केलाच आहे; आणि ज्या आहार्य पदार्थांनीं शरीरांतील धातूंमध्यें विषमता येतें, त्यांचे विविधतेमुळें आणि विचित्र प्रभावामुळें निरनिराळ्यावेळीं दोषांचे आणि धातूंचे निराळे अंश दूषित होऊं शकतात. कफकारक या सामान्य गुणाचे पुष्कळ पदार्थ घेतले तर त्यांतून एकादा उरस्थानाश्रयी कफाला दूषित करील. एकादा आमाशस्थ विकृति उत्पन्न करील. एकाद्यानें शिरस्थानाश्रित कफाची वाढ होईल. व एकादा असाहि असेल कीं, त्यामुळें एकसमयावच्छेदानें सर्वांशानें कफाची वाढ होईल. अथवा एकाहून अधिक स्थानांत बिघाड उत्पन्न करूं शकेल. याला कारण, अनंत पदार्थांतील वैशिष्ट्य होय. (याचा विशेष विचार सदर लेखाचे शेवटीं रसवीर्यविपाक प्रभाव या प्रकरणांत येईल, तात्पर्य कफाचा विकार म्हणजे तो ज्या स्थानीं झाला असेल त्या स्थानांतील दोषगुणाचे वाढीचा हें ध्यानीं ध्यावें लागतें. आणि दोष समस्थितींत जें कार्य करीत असतो तें नीट न होणें व समीपवर्ति शरीरविभागावर त्याचा परिणाम हें विकाराचें सामान्यतः स्वरूप असतें. उरस्थानामध्यें श्वासवायूचे सुखसंचाराला साधनीभूत जो स्निग्ध गुण त्याची वाढ झाली असतां, होणारा विकार प्रथमतः श्वसनक्रियेंतच विकृति उत्पन्न करणार. या विकृतीवर उपाययोजनाहि अशीच असते कीं तीमुळें श्वसनक्रियाच सुधारावी, अर्थात् श्वासनाश हें मुख्य व त्याबरोबर उत्पादक श्लेष्मवृद्धीचा नाश हें दुसरें कार्य, या उपायाचें असतें. आयुर्वेदीय चिकित्सक श्वासविकारांत केवळ कफनाशक योजना न करतां, श्वासनाशक म्हणजे श्वासोत्पादक कफनाशक अशीच योजना करतो. अर्थात् ठोकळ त्रिदोषज्ञान चिकित्सेला पुरेसें नाहीं हें उघड होतें. प्रत्येक विकारांत त्यांचा तत्वतः विचार होणें अत्यावश्यक आहे. व यासाठीं प्रत्येक विकाराची संप्राप्ति आणि चिकित्सा निराळी रांगण्यांत आली आहे. नाहींपेक्षां आयुर्वेदाला ‘ बस्तिर्विरेको वमनं तथा तैलं घृतं मधु ’ येवढीच चिकित्सा तीन दोषांवर सांगून मोकळें होणें अशक्य न्हतें. विकारोत्पादक कारणांप्रमाणेंच विकारविनाशक औषधेंहि तशाच विशेष गुणांचीं आहेत. त्यामुळें केवळ फुफ्फुसपिंडांतील श्वासोत्पादक कफाची वाढ व श्वास घालविणारे पदार्थ मिळणें शक्य आहे. आयुर्वेदीय औषधी गुण धर्मशास्त्रांत या विशेष गुणाचा स्पष्टतया उल्लेख केला आहे.

कास किंवा खोकला.

श्वासाप्रमाणेंच कासः—याचेंहि उत्पत्तिस्थान उरस्थानच आहे. हे दोनहि विकार एकाच प्राणवायूचे सुखसंचारामध्यें व्यत्यय आल्यानें होणारे आहेत. या प्राणवायूचे प्रतिलोमनाला कारण फुपफुस पिंडाचे आश्रयाला असलेला कफसंचयच असतो. आणि असें असतां श्वास आणि कास हे विकार निराळे होतात, याला कारण, कासविकारांत आणखी श्वासाचे संचारपंथांतील अवयवांतराची दुष्टि हें असतें. श्वासविकार ज्या अवस्थांमध्यें उत्पन्न होतो त्या अवस्थेंत कफदुष्टीची व्याप्ति उरस्थानांतच मर्यादित असते. व ज्यावेळीं असें एकादें कारण घडून येतें कीं, त्यामुळें उरस्थानाबरोबरच श्वासमार्ग—कंठ- हाहि दूषित होतो. त्या भागांत कफाची वाढ झालेली असते. त्यामुळें उरस्थानांत कफसंरोधानें प्रतिलोम झालेल्या वायूचें घर्षण श्वासमार्गाला सहन होत नाहीं आणि त्या ठिकाणीं शब्दवाहक स्रोतसांतील त्या आघातामुळें एका विशिष्ट स्वरूपाचा धनिस्वरूप खोकला उत्पन्न होतो. कंठप्रदेशांतील ही विकृति सुचविण्यासाठीं आयुर्वेदीय कासनिदानांत,

पूर्वरूपं भवेत्तेषां शूकपूर्णगलास्यता ॥
कंठे कंडूश्च भोज्यानामवरोधश्च जायते ॥ १ ॥

कंठांत तूस भरल्याप्रमाणें वाटणें, खाज सुटणें इत्यादि लक्षणें दिलीं आहेत. कोणत्याहि विकाराचें कर्तृत्व दोषावर आरोपित करण्यापूर्वी विकारी स्थानांतील दोषाची विकृति येवढें ध्यानीं घेऊन विकाराला सुरुवात कोणत्या स्थानांतील कोणत्या दोषांमुळें झाली, याचा तारतम्यपूर्वक विचार करणें अवश्य असतें. या उद्देशाचे स्पष्टीकरणासाठीं

संचयं च प्रकोपं च प्रसरं स्थानसंश्रयं ॥
व्यक्तिं भेदं च यो वेत्ति दोषाणां स भवेत् भिषक् ॥

दोषांचा संचय, प्रकोप, प्रसार आणि विशिष्ट स्थानाचे आश्रयानें होणारे सर्व विकार त्यांचें ज्ञान ज्याला असतें तोच वैद्य समजावा. असा आयुर्वेदीयांचा अभिप्राय आहे. या श्वास कासाप्रमाणें प्रतिविकारांत आशयदुष्टीचा फरक असतो, आणि त्याचें ज्ञान अवश्य आहे. त्याशिवाय उपायांना शास्त्रीयत्व येणार नाहीं.

श्वासाचे संप्राप्तीमध्यें, ' कासवृध्याभवेत् श्वासः ' खोकला वाढल्यानें श्वास उत्पन्न होतो, असें सांगितलें आहे. व त्यामुळें स्वाभाविकपणें अशी शंका उद्भवते कीं, या दोन विकारांमध्यें, दोषांची अधिक व्याप्ति कोणत्या विकारांत समजावयाची ? दोनहि विकारांत कफाची दुष्टि हें खरें. तथापि श्वासविकारांत उरस्थान दूषित असतें. आणि कासविकारांत कंठ विशेषें दूषित असतो. असा यांत फरक आहे. मात्र त्याबरोबर

हेंहि ध्यानांत ठेवणें अवश्य आहे कीं, कासविकारांतील उदरस्थानीय कफविकृतीहून श्वासांत ती अधिक असते. व उर हें कफाचें मुख्य स्थान असल्यानें तेथील विकृति कफविकारांत विशेष सामर्थ्याची, तीमुळें हृदयस्थ व्यानवायूचा क्रियेंत मांद्य येऊन, चालणें, बसणें, उठणें इत्यादि व विशेषें रसविक्षेप (गत्यपक्षेपणोत्क्षेप निमेषोन्मेषणादिकाः ।।) या क्रियांत विकृति–मांद्य–श्वासविकारांत अधिक प्रमाणानें येतें. हृदयस्पंदन हें सर्व जीविताला आधारभूत आहे. आणि श्वासविकारामध्यें तें कासाहून ज्यास्त दूषित होतें. या कारणानें कासाहून श्वासांतच दुष्टि अधिक असते. याकरतांच श्वासविकार महत्वाचा मानला गेला आहे.

कामं प्राणहरारोगा बहवो न तु ते तथा ॥
यथा श्वासश्च हिक्का च हरतः प्राणमाशु च ।। १ ॥

प्राणहारक रोग अनेक आहेत. तथापि हिक्का (उचकी) व श्वास याप्रमाणें शीघ्र प्राणहारक कोणी नाहीं. आतां हें गृहीत धरल्यावर ' कासवृध्या भवेत् कासाः ' या वाक्याचा उपयोग व तात्पर्य काय ? हा प्रश्न राहतोच, उत्पत्तीच्या करणांचा निर्देश करतांना, घशांत धूर, धूळ वगैरे जाणें, अधिक व्यायाम इत्यादींचा समावेश केला आहे. (धूमोपगातात्, रजतस्तथैव व्यायाम रूक्षान्न निषेवणाच्च). हीं कारणें आगंतु स्वरूपाचा खोकला उत्पन्न करणारीं आहेत, हें सहज ध्यानीं येईल. घशांत धूर शिरला व त्यानें खोकला आला ही आगंतु विकृति झाली. हा आगंतु कास वाढल्यानें परंपरेनें सान्निध्यामुळें उरस्थान दूषित होऊन त्यामुळें श्वास उद्भवेल म्हणजे श्वासाचें कासवृद्धि हें कारण होणें शक्य आहे. मात्र कासाचा श्वास हा उपद्रव नव्हे अर्थात् विकृतीचे दृष्टीनें महत्व श्वासालाच राहतें. या दोन विकारांस स्थानदुष्टीचे स्पष्टतेसाठीं आयुर्वेदीय ग्रंथांमध्यें संप्राप्तीकडे पाहिल्यानें स्पष्टतया दोघांचें स्वरूपांतर दिसून येतें तें असें:––

श्वासः––मारुतः प्राणवाहीनि स्रोतांस्याविश्य कुप्यति ॥
उरस्थः कफमुद्धूय हिक्काश्वासान् करोति सः१ (चरक)

उरस्थानांतील वायु कफाला कुपित करून–उन्मार्गगामी करून प्राणवाहक स्रोतसांमध्यें प्रवेश करितो व त्यामुळें श्वास आणि उचकी हे विकार संभवतात. कासामध्यें:––

अधः प्रतिहतो वायुः उर्ध्वस्रोतः समाश्रितः ।।
उदानभावमापन्नः कंठे सक्तः तथोरसि ॥ १ ।। (चरक)

संचारपथांत अधोमार्गीं प्रतिबद्ध होऊन ऊर व कंठ यांत संग पावून–अडकून–कास उद्भवतो. या संप्राप्तीमध्यें, श्वास आणि कास यांमध्यें, अनुक्रमें ऊर व कंठ यांतील प्रधान दुष्टीचा उल्लेख आहे. कोण-

त्याही विकारामध्यें स्थानदुष्टीलाच महत्व असतें. ज्या ठिकाणीं संग म्हणजे प्रतिबंध त्या ठिकाणीं विकारोद्भव असा नियम आहे.

कुपितानां हि दोषाणां शरीरे परिधावतां ॥
यत्र संगः स्ववैगुण्यात् व्याधिस्तत्रोपजायते ॥ १ ॥

त्याचप्रमाणें एकच दोष कारणभेदांनें स्थानांतरांत दूषित होऊन रोगांतर उत्पन्न करितो.

स एव कुपितो दोषः समुत्थानविशेषतः ॥
स्थानांतराणि च प्राप्य विकारान् कुरुते बहून् ॥ १ ॥

या श्वासकास विवेचनांत वायूचा संबंध आलेला आहे. व विकार तर कफाचें, तरी उत्पादक कोण ? वायु कीं कफ हा संशयहि कायम राहतो तरी कफाचे वाढीमुळें वायूचे गतिधर्मांत आलेली विकृति अर्थात् प्राधान्य किंवा कर्तृत्व कफाचें आहे असें सहज ध्यानीं येईल. आतां कफाचे विकारांत किंवा एकंदर विकारांतच ज्याचें प्राधान्य असा राजयक्ष्मा किंवा कफक्षय याचें कर्तृत्व कफाकडे कसें आहे तें पाहूं.

राजयक्ष्मा—कफक्षय.

राजयक्ष्मा या विकाराला कफक्षय या नांवानें ओळखण्यांत येतें. हा विकार कफानें होत असल्यानें याला कफक्षय हें नांवहि अन्वर्थकच आहे. सरसकट क्षय या नांवाखालीं जे विकार येतात त्यांचे दोन प्रकार संभवतात. एक कफजन्य क्षय व दुसरा वातजन्य क्षय. क्षय म्हणजे शरीरांतर्गत रक्तादि धातु क्षीण होणें होय. आणि याच तत्वाला अनुसरून क्षयामध्यें फरक मानण्याचें कारण नाहीं. तथापि दृश्य विकार जरी एकाच स्वरूपाचा असला तरी त्याची कारणपरंपरा प्रसंगविशेषीं भिन्न असते. आणि तिच्या अनुरोधानेंच विकाराचा उपशम करणें शक्य असतें. क्षयाचे उत्पत्तिकारणांचा उल्लेख करीत असतां आयुर्वेदांत मुख्यतः चार कारणें सांगीतलीं आहेत. तीं:—साहसं वेगसंरोधः शुक्रौजःस्नेहसंक्षयः ॥ अन्नपानविधित्यागश्चत्वारस्तस्य हेतवः ॥ १ ॥ साहस म्हणजे शक्तिबाह्य काम करणें, मल, मूत्र इत्यादि त्रयोदश वेगांचा अवरोध करणें, शुक्र, ओज व शरीरांतील मज्जामेदस इत्यादि स्नेहधातूंचा क्षय होणें, व अव्यवस्थित आहार या चारहि कारणांचा विचार केला असतां क्षय हा विकार केवळ वायूचाच अशी अगदीं सहज व उघड उघड कल्पना होते कारण साहसादि हीं सर्व वायूलाच प्रकुपित करणारीं आहेत. अति व्यायाम किंवा श्रम झाल्यानें ऐशी वात विकारांपैकीं, वक्ष उद्धर्षः म्हणजे वक्षस्थलांत जोराचें घर्षण होऊन त्यायोगें क्षत होईल व त्यामुळें क्षय होईल. (तस्य अतिमात्रेण कर्मणा उरः क्षतयुपप्लवते वायुः) (चरक). वेगांचा अवरोध केल्यानेंही वायूचाच

कोप होतो. (न्हीमत्वात् वा घृणित्वात् वा भयात् वा वेगमागतं ॥ तस्य संधारणात् वायुः प्रकोपमापद्यते ॥(चरक.) शुक्रादिकांचे क्षयानें कोप वायूचाच. (च. नि. स्था. अ. ६) त्याचप्रमाणें अन्नपानविधीच्या त्यागानेंहि मुख्यत्वें वायूच दूषित होतो. अशारीतीनें क्षयोत्पादक मुख्य कारणें जर मुख्यत्वें वायूलाच कुपित करणारीं आहेत तर कफानें क्षय होतो याला आधार कोणता ? असा प्रश्न पुढें येतो. राजयक्ष्मा या विकाराची संप्राप्ति देतांना ' कफप्रधानैर्दोषस्तु रुद्धेषु रसवर्त्मसु ' कफ ज्यांत प्रमुख आहे अशा दोषांनीं रसवाहिनींचीं मुखं रुद्ध झालीं असतां हा रोग उत्पन्न होतो असा उल्लेख असून त्याबरोबरच ' अतिव्ययायिनो वापि क्षीणे रेतस्यनंतराः ॥ क्षीयंते धातवः सर्वे ततः शुष्यति मानवः ॥ १ ॥ अति मैथुनानें शुक्र क्षीण झालें असतां अस्थि, मज्जा, मांस इत्यादि धातु अंतराभावामुळें क्रमशः क्षीण होऊन क्षय (शोष) विकार होतो. असें दुसरेंहि कारण दिलें आहे. यावरून वायूनें क्षयसंभव उघड आहे. अष्टांग हृदयामध्यें तर " तैरुदीर्णोऽनिलः पित्तं कफं चोदीर्य सर्वतः " वरील हेतुचतुष्टयानें कुपित झालेला वायु कफ व पित्त यांना

(एकः प्रकुपितो दोषः सर्वानेव प्रकोपयेत् ॥)

या न्यायानें कुपित करतो असा उल्लेख आहे. त्याचप्रमाणें ' त्रिदोषो जायते यक्ष्मा गदो हेतुचतुष्टयात् ' या हेतुचतुष्टयानें त्रिदोष ज्यांत आहेत असा हा विकार होतो, असेंहि वचन आहे हीं सर्व वचनें ध्यानीं घेतलीं म्हणजे प्रथमच अशी शंका उपस्थित होणें स्वाभाविक आहे कीं, कांहीं ठिकाणीं वायूनें व कांहीं ठिकाणीं त्रिदोषांनीं क्षय किंवा राजयक्ष्मा होतो असें सांगीतलें असतां राजयक्ष्मा कफानें होतो कसा व त्याला आधार काय ? या शंकेच्या समाधानासाठीं क्षयाचे संप्राप्तीचें सूक्ष्मदृष्ट्या अवलोकन केलें पाहिजे. रोगनिदानामध्यें संप्राप्तीलाच अत्यंत महत्व आहे. कारण स्पष्ट झालेल्या रोगाचा स्पष्ट इतिहास म्हणजे संप्राप्ति होय. रोग होण्याला कारण कोणत्या स्वरूपाचें झालें, त्यानें कोणता दोष प्रथम बिघडविला, प्रथम कोणत्या आशयांत किंवा स्थानांत विकृति उद्भवली, व तिचा कसकसा प्रसार होऊन कोठें विकार स्पष्ट झाला ह्याची साग्र माहिती झाल्याविना उपचार यशस्वी होणार नाहींत. आणि ही माहिती म्हणजे संप्राप्ती होय. संप्राप्तीची अवश्यकता मधुकोशांत फारच मार्मिक रीतीनें सांगितली आहे. "असत्यांच संप्राप्तौ व्याधेश्चिकित्सोपयोगिनोंशांशं विकल्पना बलकालादेः प्रतीतेश्चिकित्साविशेषो न स्यात" संप्राप्ति नाहीं म्हणजे रोगाचे चिकित्सेला उपयोगी पडणारे अंशांश कल्पना ह्मणजे पोटभेद, बलाबल, काल, इत्यादींचा निश्चय न होऊन नक्की उपचारांची योजना

होणें अशक्य होतें. यासाठीं राजयक्ष्मा या विकाराची जी संप्राप्ति दिली आहे तिचाच विशेष विचार केला पाहिजे.

कफप्रधानदोषांनीं रसवाही स्रोतसांचा अवरोध हें राजयक्ष्म्याचें आदिस्वरूप आहे. यामुळें उघड होत आहे कीं, कफामुळें ज्यावेळीं रसस्रोतसें दूषित होतात त्यावेळीं क्षय उत्पन्न होतो ह्मणजे कफामुळें रसदुष्टि हें कफक्षयाचें कारण होतें. परंतु ज्वरालाही कारण रसदुष्टिच आहे. ज्वराचे संप्राप्तीमध्यें ज्वरदास्यू रसानुगाः अजीर्णामुळें (अर्थात् कफामुळें) रसांतील दोष ज्वर उत्पन्न करितात असें असतां राजयक्ष्म्यांतील रसदुष्टि कोणती ? तीमुळें क्षयच कां व्हावा; आणि ज्वर कां न व्हावा ? याचें उत्तर असें आहे कीं, ज्वरांतील रसदुष्टिही आमाशयांतील अजीर्णामुळें झालेली असते. आणि त्यावेळीं उरस्थानांतील रसविपाकाचें कार्य अबाधित असतें. फुफ्फुसांमध्यें आधींच कफाची वृद्धि असत नाहीं. आणि पाचनादि क्रियांनीं अजीर्णदोष नाहींसा झाला व ज्वर कमी झाला कीं रसविपाकाचें काम सुरळीत होऊन रसादिधातूंचें नीट पोषण होतें. याचे उलट क्षयामध्यें आमाशयांत बिघाडाची शक्यता कमी. किंबहुना प्रथमतः तरी नसतेंच म्हणणेंहि चुकीचें नाहीं. हें या विकाराचें ' अश्नतोऽपि बलक्षयः ' अन्न खात असूनहि शक्तिक्षीण होते या लक्षणावरून सहज सिद्ध होतें. या क्षयविकारामध्यें रसाजीर्णामुळें रक्तादि धातूंचें पोषण होत नाहीं ही गोष्ट खरी. मात्र हें रस जीर्ण आमाशयाचे विकृतीमुळें होत नाहीं तर उरस्थानाचे विकृतीमुळें होत असतें. आणि उरस्थानांतच या विकाराला सुरवात होते. आमाशयांतून कसाहि रस तयार होऊन आला तथापि उरस्थानांत अशी एक विकृति उत्पन्न झालेली असते कीं, त्या रसावर पचनसंस्कार (यकृतांत) न होतां तो कच्चाच राहतो. कफकारक पदार्थांनीं उदरस्थानांतील कफ वाढून असल्या चिकट बुळबुळीत पदार्थस्वरूपीं कफाच्या बऱ्याच कालाच्या सहवासानें फुफ्फुसाची नैसर्गिक शक्ति ऱ्हास पावते. त्यांचे ठिकाणीं एक प्रकारचा फाजील ओलसरपणा येतो व त्यामुळें रसाचें योग्य पचन न होतां उलट त्यांत अपक्क पदार्थांची भरच पडते. ज्याप्रमाणें एकाद्या दलदलीच्या जागीं पाणी टाकलें असतां तें न जिरतां अधिकच ओलसरपणा वाढवितें त्याप्रमाणें स्थिति होते आणि मग जो अपक्क आणि चिकट स्वरूपाचा असला कफप्रधान रस रसवाहिनींत फिरतो. त्यानें सूक्ष्म स्रोतसें बंद होऊन पुढील धातूंचे पोषणाभावीं त्यांचा क्षय होतो.

रसोऽप्यस्य न रक्ताय मांसाय कुत एव तु ।

या रोग्याचा रसधातु रक्त तयार करण्याला समर्थ होत नाहीं मग त्यानें

मांस कोठून व्हावें ? म्हणजे याला कारण उरस्थानांतील कफ व त्याचा रसधातूंतील दूषणात्मक प्रसार होय आणि याप्रमाणें कफाची किंवा उरस्थानीं श्लेषण कार्यकारी श्लेषणाची वाढ हेंच क्षयाला मुख्य कारण असल्यानें या जातीच्या विकाराला कफक्षय हें नांवच योग्य अर्थबोध करणारें आहे. या विकाराची चिकित्सा सांगतांनाहि कफालाच प्रधान मानून कफनाशक गुणाचेच उपायांची योजना आहे.

" **बलिनो बहुदोषस्य स्निग्धस्विन्नस्य शोधनं ॥**
ऊर्ध्वाधोयक्ष्मीणः कुर्यात् सस्नेहं यन्नं कर्शनं "

शक्तिक्षीण झालेल्या उरस्थानांत तीक्ष्ण औषधांनीं क्षत होऊं नये आणि क्षीण धातु अशा रोग्याची शक्ति फार क्षीण होऊं नये या धोरणानें पण वमनविरेचन हेच उपाय प्रथम यावर सांगितले आहेत. यावरून क्षयांतील कफाचें प्राधान्य उघड होत आहे. नाहींपेक्षां क्षीण स्थितीमध्यें बृंहणच सांगितलें असतें. त्यांत लंघनाची योजना (वमनविरेचन) झाली नसती. वायूचा क्षय असल्यास बृंहण सांगण्याची अत्यंत अवश्यकता व क्षयावर पौष्टिक योजना ठरलेलीच. आणि वायूचें शमनहें बृंहणानेंच होतें.

' **बृंहणं शमनं त्वेव वायोः पित्तानिलस्य च** '

तात्पर्य, वरील संप्राप्तीला अनुसरून होणारा हा क्षय कफामुळेंच होणारा आहे. ही संप्राप्ति ध्यानीं घेतल्यावर या विकारांत कोणते उपद्रव असावेत याचाहि खुलासा सहज होतो उरस्थानांतील कफाची वाढ ही आदिकारण असल्यानें तेथील संचयानें प्रथम उरस्थानसंभाव्य श्वास व समीपवर्ति कंठस्थानावर होणाऱ्या परिणामाचा निदर्शक कास हे स्वाभाविकपणेंच उत्पन्न होतात त्याचप्रमाणें प्रथम जिव्हा दूषित झाल्यानें अरुचि होते. श्वास, कास हे विकार उरस्थानांतील कफसंचयाच्या प्रथमावस्थेंत होतात. तोच अधिक काल राहिल्यास त्याचा प्रसार रसवाही स्रोतसांवर होऊन क्षय होतो म्हणूनच ' कासात् संजायते क्षयः ' खोकल्यापासून क्षय होतो असें सांगितलें आहे. रसामध्यें कफदुष्टीमुळें रसाच्या अपक्वावस्थेंत येणारा ज्वरहि या विकारांत स्वाभाविकपणेंच असतो. अपक्व रसामुळें त्वचा, नेत्र इत्यादींवर फिकटपणा येतो. धातूंचे पोषणाचे अभावीं शक्ति क्षीण होते. तथापि प्रथमावस्थेंतच शरीर फारसें क्षीण दिसत नाहीं कारण आमरसामुळें बोजडपणा असतो. मुख्यत्वेंकरून खोकला, मस्तक जड वाटणें, अरुचि, घसा भरून राहणें हीं लक्षणें व धातूंचें पोषण बंद होणें म्हणजे क्षय समजावा. शीत आहारविहार, शीत हवा यामुळेंच याचा विशेषतः प्रादुर्भाव होतो. व म्हणूनच हा कफक्षयच होय. मागें सांगितल्याप्रमाणेंच पदार्थांच्या अनियंत्रित सामर्थ्यामुळें क्षयोत्पादक कफदुष्टी होते. चिकित्सा

प्रसंगीं सूक्ष्मपणें कारणपरंपरा पाहूं लागतां कित्येक समयीं कांहीं रोगांमुळें आलेल्या क्षीणतेंत क्षयाचें बीज रुजत असल्याचें दिसतें. तरी पण या वेळींहि न सोसणारें शीतसेवनच कारण असतें. अशक्तपणामुळें अशक्त झालेल्या फुफ्फुसांना शीतसेवन त्वरित बिघडवूं शकतें. क्वचित् असेंहि होण्याचा संभव असतो कीं, वाढलेल्या कफावर तीक्ष्णोष्ण उपचार करतांना शक्तिमानाच्या विचाराचे अभावीं अतिमात्र उपचारांनीं क्षत होऊन रक्त पडण्याचा संभव असतो. आणि त्यांत पित्ताचा समावेश होतो. एकादे वेळीं क्षयामध्यें कफवृद्धीच असतांहि कफाचे पच्यमान अवस्थेमध्यें (कुजण्याच्या स्थितींत) एक प्रकारचा क्षार उत्पन्न होऊन (विदग्धः क्षारतां व्रजेत्) त्यामुळेंहि क्षत होऊन ' पित्तात् रक्तस्य चागमः ' रक्त पडूं लागणें (खोकल्यांतून) हा उपद्रव क्षयाचे लक्षणांत सामील होतो. अशा रीतीनें कफाचे विदग्धावस्थेमध्यें प्रथमतः एका कफानेंच उद्भवलेल्या क्षयाला पित्ताची मदत होते त्याचप्रमाणें धातूंचे पोषणाभावीं होणारा जो धातुक्षय त्यामुळेंही वायु दूषित होतो. (वायोर्धातुक्षयात् कोपः) आणि वायूचीं पार्श्वशूल इत्यादि लक्षणें या विकारांत मिळून क्षयाला त्रिदोषात्मक स्वरूप येतें. व तो सर्वांगपूर्ण होतो. तथापि उत्पादक दोष कफच असल्याकारणानें आणि त्याचेच विकृतीने धातूंचाहि क्षय होत असल्यामुळें याला कफक्षय हेंच नांव योग्य आहे. आणि यावरील उपचारहि कफप्राधान्याला अनुसरूनच असावयाचे. आनुवंशिक किंवा परंपरागत विकारांत याचा नंबर वर लागतो. मातापितरांना हा विकार असल्यास त्यांचें उरस्थान कफदूषित व कमताकद असतें. आणि अशा परिस्थितीमध्यें होणाऱ्या संततीलाही उरस्थानाचा अशक्तपणा जन्मतःच असतो. थोडयाहि अपथ्याचरणानें त्यावर परिणाम होऊन विकार उद्भवतो. या विकारामध्येंहि या उरस्थानांतील दुष्टीच मुख्य असते. वायुमुळें धातूंचा क्षय होतो. त्याला शोष हें नांव योग्य व तारतम्यभेदसूचक होऊं शकेल. व ग्रंथकारांनींही वायुप्राधान्य सांगत असतां शोष हाच शब्द योजला आहे. वायूचे प्राधान्यांत व कफाचे प्राधान्यांत स्पष्ट भेद असा आहे कीं, वायूमुळें एकेका धातूचा क्षय होतो. परंपरेनें तो सर्वांत व्यापूं शकेल. पण अनुक्रमानें उदा० अतिव्यायामुळें शुक्र क्षीण झाला तर तो क्षय या सदरांत येऊं शकेल. परंतु प्रथमतः त्या क्षयाची व्याप्ति शुक्रामध्येंच मर्यादित असेल व प्रतिकाराचे अभावीं, मज्जा, नंतर अस्थि अशा रीतीनें व्यापक रूप येऊं लागेल व तेंहि क्रमशः येईल. जखम वगैरेनीं रक्तक्षय होईल. पण धातूंचे पोषणाचा मार्ग त्यांत अबाधित असतो. व त्यामुळें सुखसाध्यताहि असते. आणि कफक्षयांत सर्व धातूंचे पोषणच बंद होतें. असा फरक या विकारांत उघड असतां दोहोंचाहि समावेश एकाच सद-

रांत कां केला हा एक प्रश्न राहतो. आणि धातूंचा क्षय हें सामान्य पर्यवसान दोहोंत एकच असल्यानें एका प्रकरणांतच त्यांचा समावेश केला असावा असें वाटतें. या विकाराचा विशेष असा बहुतेक उल्लेख आहे तो मागें सांगितल्याप्रमाणें त्यांत पित्त व वायु यांचा समावेश होतो म्हणून आहे. व तो प्रथम एक दोषी व नंतर त्यांत दोन व तीन या दोषांचा समावेश होतो असें सुचविणारें

' दोषैर्व्यस्तैर्भवेत् यक्ष्मा इति केचित् वदंति हि '

(सुश्रुत)

व्यस्त दोषांनींही राजयक्ष्मा होतो. असें कांहीं म्हणतात हें वाक्य आहे. आयुर्वेदांत कफक्षयाचें विस्तृत वर्णन असावें (आजच्या काळीं) तसें नाहीं याचें कारण कदाचित् हा रोग प्राचीनकाळीं फारसा फैलावला नव्हता कीं काय ? अशी शंका येते.

श्लेष्मा म्हणजे काय ?

मागील विवेचनावरून ध्यानांत येईल कीं आयुर्वेदामध्यें ज्या श्लेषक शक्तीचें वर्णन केलें आहे त्या शक्तीचें अधिष्ठानस्वरूप असा जो श्लेष्मा किंवा कफ हा सर्व शरीराचे लहान मोठया भागांत कमी अधिक प्रमाणानें असून त्यावर सर्व शक्तींचें अस्तित्व अवलंबून आहे. सृष्टींतील प्रत्येक पदार्थाची शक्ति किंवा इतिकर्तव्य ही कांहीं तरी विशिष्ट मर्यादेंत असते. मानवी शरीरही अर्थातच या नियमाला अपवाद नाहींच. बाल्य, तारुण्य आणि वार्धक्य या शरीराच्या अवस्थांकडे पाहिलें असतां सहज दिसून येतें कीं पोषक पदार्थांनीं बाल्यावस्थेमध्यें शरीराची ठराविक मर्यादेंत वाढ होते, तारुण्यामध्यें त्याच पदार्थांचा उपयोग चालू असतांहि वाढ न होतां टिकून राहतें; आणि वार्धक्यामध्यें कितीहि बृंहणोपाय केले तरी क्षीणता यते. या तीनहि अवस्थांमध्यें बाल्यांत वाढण्यासाठीं, तारुण्यांत राखण्यासाठीं आणि वार्धक्यांत एकदम ऱ्हास होऊं नये याकरतां पोषणाची–पोषणोपायांची अवश्यकता आहेच, कोणत्याहि अवस्थेमध्यें शरीराचे घटकद्रव्यांमध्यें त्यांशी समान धर्मी अशा पदार्थांची भर घालणें जरूर असतें. बाह्य सृष्टींतील पदार्थांमध्यें शरीरोपयोगी व त्यांशीं समानधर्मी अशा पदार्थांचा–घटकांचा–सांठा आहे. परंतु हे पदार्थ शरीरघटकांशीं भिन्नाकृति आहेत अर्थात् त्यांचा शरीराचे घटकांशीं संयोग होऊन त्यांतून स्वतःचे उपयोगीं पडणारें द्रव्य काढून घेणें हें काम शरीरांतर्गत अशा निसर्ग सामर्थ्यालाच करावें लागतें. विधात्यानें योजनाच अशी केली आहे कीं, पदार्थ तोंडांत टाकल्यापासून शरीरांतील निसर्ग त्याला आपलासा करण्याचे उद्योगाला लागतो.

अशा प्रकारचें सामर्थ्य कां व कसें आहे या प्रश्नाचें उत्तर बरेंच कठीण असून त्याची गरज आहेच असें नाहीं. वैद्यशास्त्र शरीराची दुरुस्ती करणारें आहे व म्हणून त्याला त्याचें स्वरूप कळलें म्हणजे भागतें. पोषण किंवा आहार्य पदार्थ शरीरांशीं आत्मसात् होत असतां पहिलें कार्य असें व्हावें लागतें कीं, तो पदार्थ शरीरांतील धातूमध्यें मिसळावा लागतो. जर बाहेरचा पदार्थ कांहीं काळ पावेतों शरीरघटकांशीं संलग्न झाला नाहीं तर त्याला शरीरोपयोगी बनविण्याचें कार्य कसें होणार ? हेंच पहिलें कार्य आहे. आणि हें कार्य म्हणजे शरीरांतील पदार्थांशीं समानधर्मी अशा पदार्थांचा संग्रह करणें होय. हा संग्रह जीमुळें होतो, ज्या शक्तीचे आकर्षतेनें बाह्य पदार्थ स्थिरत्व पावून भर पडते ती ही श्लेषकशक्ति म्हणजे कफ होय. या शक्तीचें कार्य आयुर्वेदीयांनीं विसर्ग म्हणजे संग्रह किंवा पुरवठा करणें हें मानिलें आहे. आणि ही शक्ति ज्या परमाणूंच्या किंवा सूक्ष्म अशा पिंडांच्या आश्रयानें शरीरांत वास करीत आहे. त्या पिंडांना किंवा परमाणूंना श्लेष्मा किंवा कफ असें नांव आहे. प्रस्तुत काळीं संस्कृत भाषेच्या प्रचाराभावीं हे शब्द जड किंवा दुर्बोध वाटण्याचा संभव करितां याला पूरक संयोजक–किंवा संघटना करणारे पिंड किंवा परमाणु या नांवानें संबोधल्यास अडचण दिसत नाहीं. मागें एके ठिकाणीं सांगितलें आहे कीं, हे पिंड पृथ्वी आणि अप् या महाभूतद्याचे आधिक्याचे असतात. आणि त्यामुळेंच यांत अशी आकर्षकता असते. हे पिंड शरीराच्या रचनाविशेषाला अनुसरून निरनिराळ्या भागांत कमी अधिक प्रमाणांत असतात. उर वगैरे जीं मुख्य स्थानें त्यांत त्यांची संख्या अधिक असते या स्थानांचा उल्लेख मागें आलाच आहे. आयुर्वेदामध्यें स्निग्ध, शीत, इत्यादि जें कफाचें वर्णन आहे तें या पिंडांचे समुदायाचें होय. आयुर्वेदामध्यें प्रत्येक विकाराची मीमांसा या दोषांना अनुसरून केली आहे. पैकीं कफाच्या विकारांमध्यें या पूरक पिंडांच्या न्यूनाधिक्याचाच विचार करावयाचा असतो.

मागें दोन तीन विकारांचीं उदाहरणें दिलीं आहेत त्यांवरून हे ध्यानीं येईल. या घटकांची आहार्य पदार्थ वगैरे कारणांनीं वाढ झाली असतां शरीरांतील पूरण किंवा संग्रह या कार्याची वाढ झालेली दृष्टोत्पत्तीस येते व अर्थातच शोषण कमी होतें. आयुर्वेदामध्यें श्लेष्मा:—

स्थिरत्वस्निग्धत्वसंधिबंधक्षमादिभिः ॥

(देहं अनुगृण्हाति.) शरीराचे सर्व भागांत स्थिरता, स्निग्धता, सांधे दृढपणें चिकटून राहणें आणि मनाचे क्षमा वगैरे सौम्य धर्म या योगें कफ हा शरीरोपकारक आहे, असें सांगितलें आहे. कफाचें स्वरूप हें अशा प्रकारचें आहे. शरीररूपी जो पार्थिवप्रधान असा पंचमहाभूतां-

चा एक विशिष्ट संघ बनला आहे तो घडण्यासाठीं, त्याची वाढ होण्यासाठीं आणि विकृतीमध्येंहि मुख्यतः या श्लेषकतेची आवश्यकता असते. याच प्रकारचें त्याचें आयुर्वेदामध्यें वर्णन आहे. प्रत्येक विकारांत याचा कसा उपयोग होतो हें समजणें जरी येवढयावरून कठीण पडेल, तथापि सर्व विवेचन ध्यानीं घेतलें असतां बराच खुलासा होईल अशी उमेद आहे. शिवाय पित्त आणि वायु यांचाहि विचार झाल्यावर बरीच स्पष्टता येईल. आतां तूर्त त्रिदोषांचे विवेचनांतील कफवर्णनानंतर पित्त ह्मणजे काय याचा विचार करूं.

--आयुर्वेदांतील त्रिदोष-पित्त--

पित्त म्हणजे काय ?

मागें लिहिल्याप्रमाणें कफाचें स्वरूप ध्यानीं घेतल्यावर सहज लक्षांत येईल कीं, कफाचें किंवा श्लेष्म्याचें जें विसर्ग या नांवानें संबोधलें गेलेलें कार्य ही शरिरांतील पहिली क्रिया होय. शरिराच्या घटकांची वाढ ज्या आहारवस्तूंतील घटकांनीं व्हावयाची त्यांचा संग्रह करणें एवढें कार्य सामान्यतः या कफरूपी शरीरांतर्गत श्लेषक शक्तीनें होतें. यापुढील कार्य ह्मणजे संग्रहित घटकांचें शोषण होऊन ते शरीरघटकांशीं एकरूप होणें हें आहे. ही एकरूपता आल्याशिवाय पोषण होत नाहीं. याच क्रियेला पचन या नांवानें ओळखलें जातें. पचन याचा तात्पर्यार्थहि असाच आहे कीं, शरिरांत येणारे बाह्यसृष्टींतील उपयोगी घटक पचविणें अर्थात् स्वकीय करून घेणें प्रत्येक पदार्थ स्वरूपतः भिन्न असतो, आणि त्यांतील सूक्ष्मतत्वें कमी अधिक प्रमाणांत एकच असतात. शरिरांत सप्तधातुस्वरूपांचीं जीं द्रव्यें आहेत, त्याच स्वरूपांचीं द्रव्यें सृष्टींतील अनेक पदार्थांत भिन्नप्रमाणानें आहेत. त्यांचें प्रमाण आणि रचनाविशेष अथवा मिश्रण यांना अनुसरून पदार्थांना आनंत्य आलें आहे. या अनंतपदार्थांमधून शरिरोपयोगी पदार्थ तेवढे घेऊन बाकी फेंकून देणें हें कार्य करणारी अशी एक शक्ति शरिरांत असते. शरिराच्या प्रत्येक भागांत हें कार्य व्हावयाचें असल्याकारणानें तिचें वास्तव्य सर्व शरीरव्यापी असावें लागतें. शरिरांत मुख्यतः ज्या क्रिया चालतात त्यांमध्यें भर पडल्यावर किंवा पोषकघटकांचा संग्रह झाल्यावर त्यांतून शरीरसदृश असे घटक काढून घेण्याचें दुसरें कार्य सुरू होतें. याकरितां आयुर्वेदियांनीं ही एक मुख्य क्रिया मानून तिचा, मुख्य तत्व म्हणून उल्लेख केला आहे. व अशा अर्थाला सुचविणारें असें तिला पित्त हें नांव दिलें. पित्त ह्मणजे शरिरामध्यें पाचनकार्य करणारी अशी एक

शक्ति होय. पचन ह्या शब्दांतच सारभाग आणि मलभाग यांचें पृथ-करण याचाहि अंतर्भाव होतो. आयुर्वेदांतील पित्त हें अशा रूपाचें आहे ही गोष्ट ध्यानीं घेतल्यावर असली पचनशक्ति ज्या पदार्थांचे आश्रयानें राहण्याची त्या शक्तिमय पदार्थांचें स्वरूपहि कळणें सोपें होतें. कोणतीहि शक्ति किंवा गुण हे पदार्थाशिवाय प्रत्ययाला येणारे नसतात. आणि यासाठीं शास्त्रीय व्यवहाराचे सोईकरितां नुसत्या शक्तींचें सात्विक वर्णन न करितां ज्या पदार्थांमध्यें त्या शक्तीचें किंवा गुणाचें प्रमाण पुष्कळ असतें आणि ज्यांचेवरून त्या शक्तीचा उपयोग होत असतो, अशा पदार्थांचें वर्णन केलें जातें. आयुर्वेदांतील पित्ताचें वर्णनही अशाच रीतीनें पाचक कार्य करणारी शक्ति ज्यांत विशेषें अनुभवास येते अशा पदार्थांचें आहे. शरीराश्रयी अशी ही शक्ति असल्यानें अर्थातच शरीरांतील ज्या जातीच्या पदार्थांमुळें या शक्तीचें कार्य घडतें त्याच पदार्थांचें वर्णन शरीरशास्त्रांत अर्थात् आयुर्वेदांत असणार हें उघड आहे.

पित्त या शब्दाचा अर्थ.

पित्त या शब्दाची व्युत्पत्ति आयुर्वेदामध्यें दिली आहे. तींत 'तप् या मूळधातूपासून व्याकरणाच्या विशिष्टनियमान्वयें पित्त हा शब्द तयार झाला आहे. तप् या धातुचा अर्थ तापणें अथवा तापविणें असा असून अर्थातच हें तत्व ह्मणजे उष्णताप्रधान आहे असा निर्देश केला आहे. आरंभीं दिलेल्या श्लोकांत या तत्वाचें सूर्याशीं साम्य दाखवून पंचमहाभूतांतील उष्णता किंवा तेज यावर या पाचनात्मक तत्वाची उभारणी असल्याचें सदर श्लोकानें दाखविलें आहे. सर्व सृष्टीचें स्थूल आणि सूक्ष्म असें वर्गीकरण मानल्यास त्यांतील या दोनहि वर्गांत उष्णता राहू शकते. परंतु शरीर हें पार्थिव अर्थात् स्थूल आहे व ह्मणूनच त्यांत वास्तव्य करणारी पाचनशक्ति ही स्थूल परमाणूंचा आश्रय करणारी आहे, ही गोष्ट उघड आहे. आयुर्वेदानें पित्ताचें वर्णन असें केलें आहे.

पित्तं सस्नेहतीक्ष्णोष्णं लघु विस्रं सरं द्रवम् ॥

ज्यांत थोडासा तेलकटपणा आहे, जें तीक्ष्ण ह्मणजे ज्यांत भपकारा आहे, स्पर्शानें ऊष्ण, वजनाला हलकें, ज्याला आंबुस घाण येते असें पातळ आणि अधोगामी असें शरिरांतील पित्त आहे. या वर्णनावरून आयुर्वेदांत वर्णिलेलें पित्त ह्मणजे केवळ ऊष्ण तत्व नसून उष्णता ज्यांत राहते असें एक प्रवाही होय असा सहज बोध होतो. मागें द्रव्याचें वर्णन करतांना कोणतेंहि द्रव्य अंबुयोनि आहे असा उल्लेख आहे. पार्थिव परमाणूंचा अप् किंवा आर्द्रता अथवा ओलेपणा--पातळपणा--यांशीं संयोग झाल्याशिवाय द्रव्याची उत्पत्ति होत नाहीं. या पातळ

होऊन एकत्रित झालेल्या परमाणुगणांतच पचनाचें कार्य सुरू होतें. अन्नाच्या पचनाला आमाशयांत सुरवात होण्यापूर्वी आमाशयाश्रयी अशा क्लेदक कफाची त्यावर क्रिया होऊन सर्व घनद्रव अशा स्वरूपाचें आहाराचें पातळ स्वरूपामध्यें मिश्रण होतें असें कफाच्या विवेचनांत आलेंच आहे. व असा पातळपणा आल्यावर (अन्न-संघातक्लेदनात्—क्लेदक अन्नाचें क्लेदन करणारा म्हणून त्याला क्लेदक असें नांव आहे.) पित्ताच्या क्रियेला सुरवात होते. यासाठीं पित्ताचें वर्णन उष्णताविशिष्ट किंवा उष्णतमय अशा पातळ पदार्थाचें वर्णन आहे असें सहजच ठरतें. तात्त्विक दृष्टीनें जरि उष्णता किंवा तेज हें तत्त्व प्रवाहीस्वरूपाचें नाहीं तरी शरिरांत जें त्याचें कार्य दृष्टोत्पत्तीला येतें तें केवळ तत्वात्मक नसून त्याच्या कमी अधिकपणावर ज्या शरीर—क्रियांची स्वास्थ्य अथवा विकृति अवलंबून आहे त्यांचें स्वरूप स्पष्ट दाखविण्यासाठीं त्या पदार्थाचेंच स्वरूप वर्णन केलें आहे. ज्याप्रमाणें श्लेष्मा हें तत्त्व अप्‌विशिष्ट आहे तथापि शरीरांतील श्लेषण कार्य हें केवळ अप् या तत्त्वाचे वास्तविक स्वरूपानें होणारें नाहीं, तर त्याच्या पार्थिव परमाणूंच्या विवक्षित मिश्रणामध्यें ही शक्ति उपयोगांत येते. त्याचप्रमाणें पित्त म्हणजे तत्त्वतः उष्णता असली तरि तिचा शरिराला जो उपयोग होतो, तोहि जलतत्व आणि कांहीं अल्प प्रमाणांत पार्थिव परमाणूंचाहि त्यांत समावेश होतो, पंचमहाभूतें हीं पृथग्भावानें उपलब्ध होणारीं नसून परस्पर संघटित असेंच त्यांचें स्वरूप उपलब्ध होणारें आहे. हा आशय ध्यानीं घेतला असतां पित्ताचें आयुर्वेदीय वर्णन यथार्थ असल्याचें प्रत्ययाला येईल. वर वर्णन केलेले पित्ताचे गुण ज्यांत पुष्कळ प्रमाणांत दृष्टोत्पत्तीला येतात असा पदार्थ पाहूं लागल्यास बहुतेक अम्लवर्गीतील पदार्थांमध्यें हे गुण संभवतात. आंबट पदार्थ हे स्वभावतः पाचक असल्याचें न सांगतां कळणारें आहे. यांमध्यें अप्तत्वाचा पातळपणा असतोच. पातळपदार्थ अधोभागीं म्हणजे खालीं वाहणारा हें अर्थात् उघड आहे. इतर पातळ पदार्थांपेक्षां यांत उष्णतेचें प्रमाण अधिक असल्यानें ज्या पार्थिव घटकांवर पदार्थांचें वजन अवलंबून असतें, त्यांची यांत न्यूनता असते म्हणून तें वजनाला हलकें असतें व त्यामुळें त्यांत स्निग्धतेचा गुणही अल्प राहतो. आम्लपदार्थाचा आंबुसपणा तर सहजच आहे. अशा रीतीनें पित्ताचें वरील वर्णन अगदीं यथार्थ आहे.

पचनाची अवश्यकता.

शरिराचे पोषणक्रियेला आमाशयापासून सुरवात होते, आणि जसजसे एकाहून एक शुद्ध स्वरूपाचे धातु बनत जातात त्या मानानें पच-

नाचें कार्यहि सूक्ष्म स्वरूपाचें होतें. अन्न, रस, धातु वगैरे मध्यें किट्ट भागाचें प्रमाण अधिक असतें व त्याचें पृथक्करण करणारी पचनशक्तिहि अधिक प्रमाणांत असते. अगदीं लहानांत लहान असा जरि शरिराचा सजीव परमाणु घेतला तरि त्यामध्यें त्याप्रमाणें श्लेषण व नंतर पाचन किंवा शोषण हें असतें. झिजलेल्या भागाची उणीव भरून काढणारा घटक त्याशीं संलग्न करण्याचें कार्य श्लेषक तत्वानें म्हणजे श्लेष्म्याचें झालें कीं लगेच तो घटक मूळ घटकामध्यें एकजीव करण्याचें काम अर्थात् पित्ताची क्रिया सुरू झालीच. झिजून निरुपयोगी झालेला भाग मलरूपानें बाहेर निघून जातच असतो. शरिराचा जिवंतपणा म्हणजेच ही क्रियात्मकता होय. आणि सतत सर्व शरिरामध्यें झिजलेला, निरुपयोगी झालेला भाग निघून जाणें; त्यामुळें कमी झालेल्याची भर पडणें आणि ती आत्मसात् करून घेणें याच व्यापाराला जिवंतपणा म्हणावयाचें. अशा रीतीनें सर्व शरिरामध्यें पित्ताचें पाचन कार्य होत असतें, म्हणून या शक्तीला आयुर्वेदानें व्यापी हें विशेषण दिलें आहे. तथापि अधिक प्रमाणामध्यें पित्ताचें कार्य ज्या ठिकाणीं होतें आणि तसें होणें शरीरव्यापाराला अवश्य आहे तेथें पित्ताचें वारतव्य अधिक प्रमाणांत असतें म्हणून तीं त्याचीं मुख्य स्थानें गणलीं आहेत. तीं स्थानें हीं:—

पित्ताचीं मुख्य स्थानें.

नाभिरामाशयः स्वेदो लसिका रुधिरं रसः ।
दृक् स्पर्शनं च पित्तस्य नाभिरत्र विशेषतः ॥ १ ॥

(अ. हृ. सू. अ. १२ श्लो. २)

नाभि (ग्रहणीकला), आमाशय, घाम, लस (शरिरांतील पाण्यासारखा एक पदार्थ) रक्त, डोळे, स्पर्शनेंद्रिय (त्वचा) हीं पित्ताचीं मुख्य स्थानें होत. यांतही विशेषतः नाभि हें मुख्य आहे.

या स्थानामध्यें पित्ताचें आधिक्य कां आणि कसें आहे. त्याचप्रमाणें त्यामुळें शरिरोपयोगी अशा कोणत्या क्रिया घडून येतात याचा विचार करूं. या पित्ताच्या मुख्य स्थानाविषयीं कांहीं मतभेद ग्रंथांतरीं दिसतात. नाभि आणि आमाशय हीं पित्ताचीं स्थानें म्हणजे काय ? या विषयींचा उहापोह थोडा संशयितच आहे. तथापि नाभि या स्थानाचा उल्लेख केला आहे. तो ग्रहणीला अनुलक्षून असावा असेंच अनुमान करणें चुकीचें होणार नाहीं, कारण ' पक्वामाशयमध्यगत् ' पक्वाशय आणि आमाशय यांचेमध्यें असें हें स्थान असल्याविषयीं एकवाक्यता आहे. आणि हें स्थान म्हणजे ग्रहणीकला होय. हें तिच्या

' भुक्तमामांगोलेवसा ॥ भुक्तमामाशयेरुध्वा सा विपाच्य नयत्यधः ' ग्रहणी ही आम आणि पक्वाशय यांमधील अडसरच होय योग्य वेळपर्यंत आहार आमाशयांत राखून ठेवून त्यावर पाचन संस्कार झाल्यावर पक्वाशयांत जाणें या गोष्टीमुळें तिला ग्रहणी असें नांव आहे, हें या वर्णनावरून उघड होतें. षड्रसयुक्त अशा चतुर्विध आहाराचें आमाशयांतील क्लेदक कफानें पातळ स्वरूपाचें मिश्रण झाल्यावर

आदौ षडरसमप्यान्नं मधुरीभूतमीरयेत् ।।
फेनीभूतं-कफं--याचप्रामणें
अन्नं कालेभ्यवहृतं कोष्ठं प्राणानिलाहृतं ॥
द्रवैर्विभिन्न संघातं नीतं स्नेहेन मार्दवम् ।। अ. हृ. शा. अ २

त्यांत पाचक पित्ताचें मिश्रण व्हावें लागतें. प्रवाही असें मिश्रण बनल्यावर पातळपणामुळें त्यांत जाण्याची त्याची प्रवृत्ति स्वाभाविकच असते. आणि खालीं पक्वाशयांत जात असतां पित्तानें पचन झालेला भाग खालीं जाणें हें एक अवश्य कार्य आहे. आणि तें पक्वाशय आणि आमाशय ह्यांच्या मध्यावरच व्हावें लागतें, नाहींपेक्षां सर्व आम अन्न तसेंच खालीं पडून जाईल. ज्यावेळीं या ठिकाणीं पित्ताचा कमीपणा होतो त्यावेळींच पचन न झाल्याकारणानें आमच गुदमार्गानें पडतो आणि आमाचे विकार होतात. अबलात्वन्नमाममेव विमुंचति (ग्रहणी) अबल झाली असतां आमास्थितींतच अन्नाला खालीं जाऊं देते. (अशा रीतिनें या ठिकाणीं पित्ताची अवश्यकता आहे. या पित्ताचें वर्णन करीत असतां ' त्यक्तद्रवत्वं पाकादि कर्मणाऽनलशब्दितम् ' पातळपणा नाहीं असें व त्याच्या पचन कार्यावरून जठराग्नि असें नांव दिलें आहे असा उल्लेख आहे. आणि पित्त तर ' द्रवम् ' म्हणजे पातळ असल्याचें वर्णन आरंभीं दिलें आहे. तरी यांचा उद्देश काय ? असा एक प्रश्न सहज उद्भवतो. आरंभीं सांगितलेंच आहे कीं, तात्विक दृष्ट्या पित्त हें पातळ नाहीं. तथापि शरिरांत तें तशा स्वरूपाच्या पदार्थांत उपलब्ध होतें. हें जें आमपक्वाशय यांचें मध्यवर्ति पाचक पित्त सांगण्यांत आलें असून त्याचें वर्णन ' त्यक्त द्रवत्वं ' असें केलें आहे याचा उद्देश असा कीं:— वास्तविक अन्नाचें आमाशयांत होणारें द्रवमिश्रण कफाचें कार्य आहे, स्थानाश्रयी अशी उष्णताच त्या द्रवस्वरूप अन्नाचें पाचन करते, सर्वत्र जरी पित्ताचें कार्य याच तत्वावर होतें तरी आमाशयांत द्रवांश वाढणें पचनाला विघातक आहे. द्रवादि पित्त असूं शकतें या समजुतीनें द्रवांशाची उपेक्षा होऊं नये, या चिकित्साविषयक दूरदर्शीपणाकरतांच पित्ताचा ' त्यक्तद्रवत्त्वं, असा उल्लेख केला असावा.

यदन्नं देहधात्वोजो बलवर्णादिपोषणं ॥

तत्राग्निर्हेतुराहारान्न ह्यपक्काद्रसादयः ॥ १ ॥

शरिरांतील सप्तधातु ओजशक्ति, वर्ण इत्यादिकांचें पोषण करणारें अन्न आहे तथापि त्याला अग्नीची अत्यंत अवश्यकता आहे. अपक्व आहारापासून रसादींची उत्पत्ति होत नाहीं. याच पित्तामुळें शरिरांतील सर्व ठिकाणीं पाचक तत्वाचा पुरवठा होतो, म्हणजे ज्या रसानें सर्व शरिरामध्यें पोषण व्हावयाचें त्या रसाचे द्वारेंच पित्ताचाहि सर्व शरीरभर योग्य प्रमाणांत पित्ताचाही प्रसार होतो, याला पाचक–पित्त असें नांव दिलें आहे. पित्त म्हणजे पाचक असें असतांहि मुख्य पचनाचें काम ज्या ठिकाणीं होतें तेथील पित्ताचा विशिष्ट शब्दानें शास्त्रीयव्यवहाराचे सोयीसाठीं पाचक या नांवानें निर्देश केला आहे, पाचकपित्ताची विकृति असा उल्लेख केला ह्मणजे जाठर विकृति ध्यानांत यावी हा त्याचा उद्देश आहे. **दुसरें पित्तस्थान आमाशय होय,** याचें कार्य अन्नरसाचें रक्त बनविणें हें आहे.

आमाशयाश्रयं पित्तं रंजकं रसरंजनात् ॥

आमाशयाचा (आश्रय करून राहणारें पित्त रसाला रंगवून त्याचें रक्त बनवितें ह्मणून त्याला रंजक या नांवानें ओळखलें जातें,) या रंजक पित्ताविषयींही ग्रंथांतरांत मतभेद आहे. वरील वाक्य **अष्टांगहृदयांतील आहे,** आणि त्यावरून या **पित्ताचें स्थान** आमाशय. रसावर रंजन संस्कार आमाशयांत होतो, असा बोध होतो. परंतु हें रसरंजनाचें कार्य वास्तविक आमाशयांत होत नाहीं. आमाशयांत अन्नरसहि पूर्णपणें तयार होत नाहीं हें मागील पाचकपित्ताचे वर्णनांत आलें आहे. आमाशय हा एक अन्नाचा सांठा असून तेथें पचनाचें पूर्वकार्य ह्मणजे अन्नाचें पातळ मिश्रण होतें व नाभिस्थान किंवा ग्रहणीच्या मदतीनें त्याचें सारभूत रस व मळ असें पृथक्करण होतें. असें असतां आमाशय हें रंजक पित्ताचें स्थान कसें ? अशी एक शंका अगदीं साहजिक रीत्याच उत्पन्न होतें. सुश्रुतामध्यें रंजक पित्ताचें स्थान यकृत् प्लीहाच सांगण्यांत आलें आहे. आणि एकंदर विचार करतां आमाशय हें स्थान रंजक पित्ताचें ठरत नाहीं. त्या अष्टांग हृदयामध्यें

' व्यानेव हसधातुर्हि विक्षेपोचितकर्मणा ।
युगपत्सर्वतोऽजस्रं देहे विक्षिपति सदा ॥ १ ॥

(हृदयाश्रयी अशा व्यान वायूकडून सर्व शरिरांत रस धातु फेंकला जातो.) असा उल्लेख आहे. अन्नाशयामध्यें सार आणि किट्ट असें वर्गीकरण झाल्यावर तो साररूपी रस यकृतांत येतो. आणि तेथें असलेलें पित्ताचे मिश्रणाचें कार्य त्यावर होऊन त्या रसामध्यें ग्य इतका पातळपणा, स्वच्छता आणि उष्णता, हीं उत्पन्न व्हावीं

लागतात. एरवीं स्रोतसांमध्यें त्याचा नीट प्रवेश होणार नाहीं व शरिराचें पोषण होणार नाहीं. आणि अशा स्वरूपाचा रस न झाला तर त्यामुळें स्रोतसांमध्यें चिकटपणा वाढेल, आणि विकार उत्पन्न होतील. या रसावर संस्कार होऊन त्यांतून जो मळ निघतो तोच उरस्थानांतील स्निग्ध, चिकट अशा स्वरूपाचा कफ असल्याचा उल्लेख मागें कफप्रकरणांत आला आहेच. या संस्काराशिवाय स्रोतसांत प्रवेशालायक असें त्याला स्वरूप देतां येत नाहीं. तें येण्यासाठीं हृदयामध्यें पित्ताची अवश्यकता आहे. याच पित्ताच्या क्रियेमुळें रसाला तांबडेपणा येतो व ह्मणून रसाला रंगविणाऱ्या या पित्ताला रंजक ह्मणजे रंजविणारें असें नांव दिलें आहे. या पित्ताची शरिरांत न्यूनता झाली असतां रस दूषित होऊन पोषणाचें कार्य नीट होत नाहीं व रसाश्रयी अशा दोषाच्या—कफाच्या—वृद्धीमुळें होणारे विकार उद्भवतात.

चतुर्विध आहारांतून पाचक पित्ताचा संस्कार झाल्यावर निघणारा रस हाच सर्व धातूंना पोषक असतो. व तो रस रक्तादि धातूंचे दृष्टीनें अपक्व किंवा आम असतो. याच उद्देशानें जर या रसाचें पचनस्थानरूपी यकृताला आमाशय नांव योजण्यांत आलें असेल तर मात्र आमाशय हें रंजक पित्ताचें स्थान ठरेल. परंतु अशा धात्वर्थावरून या स्थानाला आमाशय म्हणावयाचें तर प्रत्येक धातु हा त्यापुढील धातूचा आमाशयस्वरूप मानावा लागेल. करतां रंजक पित्ताचें आमाशय हें स्थान सांगण्यापेक्षां सरळ अर्थानें ‘ यकृत ’ हें जें सांगितलें आहे, तें सयुक्तिक आहे.

याशिवाय, आमाशय या शब्दानें लघ्वंत्रें—लहान आंतडीं—यांचाहि उल्लेख करण्यांत येतो. ज्वराचे संप्राप्तीमध्यें (दोषाह्यामाशयाश्रयाः । आमाशयस्थोहत्वाऽग्निं ।)या वाक्यांनीं निर्दिष्ट आमाशय म्हणजे लघ्वंत्रें होत. यांतहि सर्व प्रकारें अन्नाचें पचन झालेलें नसतें. यावरून आम—अपक्क अन्नाचा आशय—या दृष्टीनें आमाशय हें नांव देतां येईल. मात्र या भागाला यथार्थ नांव पच्यमानाशय हें द्यावयास पाहिजे. कारण येथें आहार पच्यमान अवस्थेमध्यें असतो. अन्नपचनाचे बाबतींत सारकिट्टांचें पृथक्करण ग्रहणीचे ठिकाणीं (लघ्वंत्राचें टोंक) होतें तथापि सर्व लघ्वंत्रांमध्यें त्यांत पित्ताचें मिश्रण होत असलें म्हणजे, शिजणें आणि पृथक्करण अशा पचनांतील दोन अवस्था अनुक्रमें लघ्वंत्रें व त्याचें शेवटचें टोंक यांत घडतात. अन्नांत पित्ताचें मिश्रण होणें अवश्य असतें व हें पित्त यकृतांतून पित्तवाहिनींतून आंतड्यांत उतरतें. याचे मिश्रणानें पच्यमान अवस्थेंतील अन्नाचाहि रंग पालटतो. हें ध्यानीं घेतां पच्यमानाशयांत कार्य करणारें पित्त अन्नाचें रंजन—रंगविणें—करणारें असें म्हणतां येईल, मात्र ‘ रसरंजनात् ’

रसाला रक्तत्व आणणें हें कार्य यकृतांतील पित्ताचेंच असतें. आणि हें पित्तहि ज्याचा आंतडयांत स्राव होतो तें नाहीं. त्याशिवाय यकृताचे मध्यभागीं स्रोतसांतून भरून राहणारें हें रंजक पित्त वेगळेंच आहे. व त्यालाच अनुसरून हें वर्णन आहे. रंजक पित्ताचें स्थान यकृत् हें निश्चित आणि म्हणून,

आमाशयाश्रयं पित्तं रंजकं रसरंजनात् ।

यांतील आमाशय याचा अर्थ आमरसाचा आशय–यकृत्–असाच स्वीकारला पाहिजे.

पित्ताचें तिसरें मुख्य स्थान रक्त आहे. रक्तामध्यें सर्व धातूंचे पोषणासाठीं त्या त्या धातूंमध्यें प्रवेश होण्यासारखा पातळपणा असावा लागतो. हा पातळपणा अर्थात् त्यांतील उष्णतेमुळेंच राहत असतो. व तो ज्या प्रमाणांत कमी होईल त्यामानानें रक्ताला घन स्वरूप येऊन सर्व शरिरामध्यें त्याचा सुखानें संचार होत नाहीं. रक्ताचा शरिराला जो उपयोग होतो. तो या पित्तावरच अवलंबून आहे. पित्ताचीं आणखीं सांगितलेलीं स्थानें:—स्वेद व लसिका हीं दोन पित्ताचीं स्थानें रक्ताश्रयी आहेत. रक्त पचनांतच हे दोन पदार्थ उत्पन्न होणारे आहेत. व ऊष्ण रक्तांतून जे हे दोन पदार्थ तयार होतात त्यांमध्यें रक्तांतील उष्णताहि येत असते. त्याचप्रमाणें त्वचा हें स्थानहि रक्ताचेंच निदर्शक आहे. कारण त्वचेंतील उष्णता म्हणजे रक्तांतील उष्णताच असते. अशा रितीनें हीं तीन पित्तस्थानें म्हणजे तत्वतः रक्ताची उष्णता दाखविणारींच होत. यावरून उष्णता प्रतीत होते. व त्यांत राहूं शकते. यामुळें त्यांचा पित्तस्थानत्वानें निर्देश केला आहे.

पित्ताचें आणखी स्थान रसधातु आहे. या स्थानाचे बाबतींतही सूक्ष्म विचार करतां दिसून येईल कीं, रसाला पित्तस्थान म्हणण्यांत फारसें तात्विक महत्व नाहीं. कारण पित्त जें रसांत असतें तें ' रंजकपित्त, ' होय. अन्नरसांत रंजकपित्त मिळून त्याला लाली आली म्हणजे तो रस धातु होतो. या रंजक पित्ताचे मिश्रणानेंच त्याचें ' आप्य, ' [सखलु आप्योरसः यकृत्प्लीहानौ प्राप्य रागपाकावु पैति] [सुश्रुत.] स्वरूप जाऊन त्यांत उष्णता आणि लाली येते. ही उष्णता रसांत असते, एवढयावरूनच त्याला पित्तस्थान म्हटलें— आहे. व स्तविक पित्ताचें कार्य असें रसांत होत नाहीं, कार्य रंजक पित्ताचें होतें व हणूनच कफाचेंहि स्थान रसधातु सांगितलें आहे. हृदय हें पित्ताचें स्थान आहे. हृदयांत आलेल्या रसधातुला ठरावीक उष्णता राखण्यासाठीं या स्थानांत असावी लागते. हृदयस्थानीं जी संकोच विकासात्मक गति असते तीमुळें अभिसरणाला योग्य असा पातळपणा राहतो. हृदयांत उष्णता असते. तरी ती एवढेंच कार्य करिते. येथें पचनाचें काम नाहीं. पित्ताचें

आणखी एक महत्वाचें स्थान ह्मणजे नयनेंद्रिय होय. या स्थानांतील उष्णता मात्र फक्त तेज या शुद्ध स्वरूपाची असते. हिचें वास्तव्य कसें असतें. आणि स्वरूप काय ? याचें उत्तर ती नेत्रांतील कनीनिकेचा आश्रय करून राहते. आणि रूपालोचन करते. याहून नाहीं. तो स्वभाव आहे. अशा रितीनें प्रामुख्यानें पित्ताचीं स्थानें ह्मणजे ग्रहणी किंवा पित्ताशय, यकृत् (प्लीहादि यांमध्यें येते.) घाम, लसिका, रक्त, रस, दृष्टि आणि त्वचा हीं आठ आहेत. या आठ स्थानांमध्यें ग्रहणी, यकृत्, (व प्लीहा) यांतील पित्ताचें कार्यकारी सामर्थ्य फार महत्वाचें आणि त्यांमध्येंहि पित्ताचे अधिकांत अधिक गुण यकृतामध्यें असून पूर्वोक्त पित्ताचें वर्णनहि येथेंच चांगल्या रीतीनें पहावयास मिळेल. येथील पित्त हें--

पित्तं सस्नेहतीक्ष्णोष्णं लघु विस्रं सरं द्रवम् ॥

या सर्व गुणांचें आहे. दृष्टी हें पित्तस्थानहि एक उत्कृष्ट कार्यकारी आहे. त्याचे अभावीं सर्व जग आंधळें.

दृष्टिश्चनष्टा विविधं जगच्च तमोमयं जायत एकरूपम् ।

डोळे गेले मग अनंतस्वरूपाचे जगाला फक्त एकटेंच अंधकारस्वरूप येतें. तथापि पित्तगुणाचा तेथें निवास व्यक्त प्रमाणांत आहे. हृदयाश्रयी पित्तालाहि एका मुख्य गुणाचें कर्तृत्व आहे. हा गुण ह्मणजे सर्वबुद्धिजन्य कार्यें करविणें हा होय. आर्य वैद्यकामध्यें हृदय हें बुद्धीचें, मनाचें, चेतनेचें,मुख्य स्थान मानलें आहे. व त्याला याच दृष्टीनें अत्यंत महत्व आहे.

हृदयं चेतनास्थानमुक्तं सुश्रुत देहिनाम् ।

व हें कार्य त्यांतील पित्तांचे उष्णता या गुणामुळें अव्याहतपणें घडतें. आणि यासाठीं पित्ताचे कार्यकारी ठिकाणांत तें एक आहे. मनाचें स्थान मेंदू मस्तिष्कपिंड मानण्यांत येऊन त्याबरोबर हृदय हें प्राणायतन मानणाऱ्या आयुर्वेदाला अतत्वज्ञ मानण्याचा कल दिसून येतो, सर्व ज्ञानतंतूंचा उगम मस्तिष्कापासून झालेला प्रत्यक्ष असल्यानें हें म्हणणें खरेंहि भासतें, तरि पण जर या ज्ञानतंतूंना उत्तेजित कोण करतें ? असा प्रश्न केला तर, हृदय हेंच उत्तर मिळेल. विधात्यानें हृदयप्रदेशच संकोचविकासात्मक ठेवला आहे, आणि सर्वत्र गति येथूनच मिळते. शरिराचे प्रत्येक लहानहि घटकाला श्वासाचे वेळीं विकास व उच्छ्वासाचे वेळीं संकोच याच स्थानांतून मिळतात, व म्हणून ज्ञानतंतूंचें उगमस्थान जरि मस्तिष्कपिंड असलें तथापि त्या उगमस्थानींहि चेतना पुरविण्याचें काम हृदय करतें, व या चेतनेचे प्रेरणेचे अथवा उत्तेजनेचे--जोरावर मग ज्ञानतंतु कार्य करतात, आणि ह्मणून हृदयच चेतनास्थान मानणें सयुक्तिक आहे. त्वचा किंवा स्पर्शनें-

द्रिय या पित्तस्थानामध्यें उष्णता कार्यकारीच आहे. हें कार्य त्वचेवरील तेजस्विता राखणें. मात्र हेंहि रक्ताश्रयी उष्णतेचेंच कार्य मागें सांगितलें आहे. ह्मणजे मुख्य कार्यकारी पित्ताचीं स्थानें, ग्रहणी यकृत् त्यांहून कमी दृष्टी, हृदय आणि त्वचा हीं व रस, लसिका, स्वेद हीं निवासस्थानें होत. प्रत्येक शरीराचे भागामध्यें लहान घटकामध्येंहि पित्त आहे आणि नवीन पोषक आत्मसात् करणें, त्यांतील सार, मलभाग वेगळा करणें हीं कामें चालताच असतात; आणि यालाच अनुसरून, जाठर अग्नी-बरोबर धात्वग्नीहि सांगितले आहेतच सर्व धातूंच्या मानानें रक्तांत हें कार्य अधिक प्रमाणांत होतें, कारण त्या धातूंत स्थूलता अर्थात् मल जास्त म्हणून येथें पित्ताचें कार्य जें पचन सारकिट्ट विवेचन तें बऱ्याच प्रमाणांत झालेलें दिसत असतां कार्यकारीस्थानांपैकीं रक्त कां मानूं नये असा प्रश्न उपस्थित होईल. परंतु धात्वग्नीची व्याख्या मानल्यवर त्यांत अधिक कार्यकारी रक्तस्थ धात्वाग्नि असें मानणें, व अर्थात् पित्ताचीं जीं धातूशिवाय इतर मुख्य स्थानें त्यांत या स्थानाचा समावेश न करणें परिभाषेच्या दृष्टीनें सा्हजिक आहे. दुसरी आणखी अशी शंका येण्याचा संभव आहे कीं, पित्ताचे सर्व गुण जर यकृतामध्यें स्पष्टप्रत्यय आहेत तर मग स्थाननिर्देशाच्या वेळीं ग्रहणीचा अग्रयत्वानें निर्देश कां केला ? (नाभिरत्र विशेषतः) ज्याप्रमाणें उरस्थानीय कफामध्यें सर्व गुण अधिक प्रमाणांत असल्यानें कफस्थानामध्यें (सुतरामुरः) ह्मणून उरस्थानाचा उल्लेख आहे त्याचप्रमाणें पित्तस्थानांमध्यें यकृताचा उल्लेखच करावयास पाहिजे होता. परंतु तो तर तसा केला नाहीं, आणि ‘ नाभिरत्र विशेषतः ’ या वाक्यानें पित्ताचें मुख्य स्थान नाभि अथवा ग्रहणी सांगितलें आहे. या ठिकाणचे पित्ताचें वर्णन करतांना मात्र

त्यक्तद्रवत्वं पाकादि कर्मणाऽनलशब्दितम्

ज्या ठिकाणीं पित्ताचें द्रवत्व अर्थात्— द्रवत्वावलंबी इतरहि, विस्रसर इत्यादि गुण नाहींत असें आणि केवळ पचनानें कार्यावरून अनुमेय असें याचें वर्णन केलें आहे. याचें कारण काय ? वास्तविक पाहतां पित्ताचे गुण सर्वतः येथें नाहींत हें जरि खरें आहे तथापि पित्ताचें जें पाचनकार्य तें या ठिकाणीं होतें. येथील सुव्यवस्थित आहारपचना-वरच सर्व शारीरिक पोषण अवलंबून आहे.

‘ अन्नस्थ पक्ता सर्वेषां पक्तृणां अधिको मतः ।
तन्मूलास्ते हि तद्वृद्धिक्षयवृद्धिभयात्मकाः ॥

सर्व अग्नींमध्यें अन्नाचें पचन करणारा जठराग्नि ह्मणजे पाचक पित्तच श्रेष्ठ होय.

(अन्नस्य पक्ता पित्तं तु पाचकाख्यं पुरेरितम्)

कारण त्यावर सर्व अग्नित्यांची वाढ व ऱ्हास अवलंबून आहेत व म्हणूनच पित्ताचें स्थान मुख्यत्वें नाभि सांगितलें आहे. मात्र ही उपपत्ति मानतांना श्लेष्मस्थानाचे दृष्टीनेहि असें म्हणतां येईल कीं, आमाशय हें कफाचें याचप्रमाणें स्थान आहे. जसें, उष्णताविरहित कार्य पित्ताचें, नाभीचे ठिकाणीं होतें, त्याचप्रमाणें शीत किंवा अब्विशिष्ट कार्य कफाचें आमाशयांत होतें. तेथें जर कफाची अर्थात् जलांशाची न्यूनता झाली तर सर्व शरिरामध्येंहि होईल. जर आमाशयांत कफाचें 'अन्नसंयात क्लेदन' अन्नांत पातळपणा उत्पन्न करणें हें कार्य नीट झालें नाहीं. तर पचनहि नीट होणार नाहीं आणि या उद्देशानें पाचकाग्निइतकेंच क्लेदक कफालाहि महत्व असतां कफाचे स्निग्धशीतादि सर्व गुण ज्या ठिकाणीं आधिक्यांत प्रतीत होतात, असें उरस्थान प्रामुख्यानें सांगण्यांत आलें आहे व (पुढील) वायूचेहि प्रकरणांत, अन्नप्रवेश त्याचप्रमाणें श्वासोच्छ्वासादि महत्वाच्या क्रिया करणाऱ्या प्राण व व्यान या वायूंना शरिरामध्यें इतकें महत्व कीं, ज्यावर प्राण राहणें अवलंबून, अशा प्राणाचें स्थान मुख्य न सांगतां वायूचे, सूक्ष्म–लघु इत्यादि गुण प्रतीत होणारा पक्वाशय मुख्य सांगितला आहे. त्याचप्रमाणें पित्ताचेंहि मुख्य स्थान यकृतच सांगावयास पाहिजे होतें. ही सहजच पटणारी कल्पना असतां पाचक पित्ताचें ग्रहणीस्थान मुख्यत्वें पित्तस्थान मानणाऱ्या आयुर्वेदीयांची ही भूल काय ? नाहीं ! याचें कारण असें कीं हें स्थान सांगून चिकित्सेमध्यें एक महत्वाची सूचना दिली आहे' चिकित्सेमध्यें शोधनाला फार महत्व आहे. आणि पित्तावर शोधन जें विरेचन त्याचें कार्य या स्थानावर घडणारें आहे. शिवाय दूषयंति इति दोषाः ही व्युत्पत्ति ध्यानीं घेतली म्हणजे अविकृत स्थितींतील पित्तापेक्षां विकृतावस्था जेथें प्रतीत होते, अशा ठिकाणाचा उल्लेख करणें चिकित्साशास्त्राला महत्वाचें वाटावें यांत नवल नाहीं. या दृष्टीनें अविकृत पित्ताचा विचार चिकित्सेला पाहिजे. तो त्याची विकृति समजण्यासाठीं यांत विकारावस्थेंत मुख्यत्वें अधिक पित्त कोठें व अधिक त्रास कोठें देतें. त्याचप्रमाणें ज्या ठिकाणचा आद्यसंचय इतर स्थानांत पित्ताची वाढ करतो व ज्यावर शोधनाचा उपयोग प्रथम होऊन इतर स्थानांतील दोषाच्या प्रसाराला आळा बसतो. अशा स्थानांचा सर्वांपूर्वी आणि महत्वाचा म्हणून उल्लेख करणें युक्तिग्राह्य वाटेल. पित्ताचे विकृतीला सुरवात या नाभिस्थानांत होते. येथूनच यकृत् वगैरेंत त्याचा पुरवठा होतो व शोधन जें विरेचन त्यानें हेंच स्थान दोषरहित करून इतर पित्तस्थानें सुरक्षित राखावयाचीं असतात, शिवाय ज्या वेळीं शोधनार्ह पित्तविकृति होते, त्यावेळीं या पित्ताचे

'त्यक्तद्रवत्वं' इत्यादि स्वरूप टिकत नाहीं तर या स्थानांतील पचनाचें कार्य कमी होऊन आहारांतील पदार्थ योग्य वेळीं आणि योग्य रीतीनें न पचतां ज्यावेळीं ते आंबतात व या विदग्ध स्थितींत हें पित्त वाढतें त्यावेळींच तें शोधनार्ह असतें केवळ पित्त–उष्णता वाढेल तर त्याला अत्यग्नीचें स्वरूप येऊन पचन लवकर होते व या अवस्थेमध्यें इतर पितस्थानांतहि तादृश विकृतीचा संभव कमी, या अवस्थेंत विरेचन नाहीं, व विकारहि फारसे नाहींत, आरंभाला पित्ताचें केवळ उष्णता हें स्वरूप नसून, तें प्रवाही आम्ल, असें सांगण्याचा हेतुहि हाच आहे कीं, हें वर्णन दोषांचें अर्थात् विकृती उत्पन्न करण्याचे स्थितींतलें, केवळ उष्णता कार्यकारी खरी, पण विकारकारी त्यावेळीं कीं, जेव्हां विस्रादि गुण तींत सामील होतात, आणि त्याच स्थितीला दोष म्हणावयाचें, हा उद्देश ध्यानीं घेतला म्हणजे, ज्या आंतड्यांतील विदग्धावस्थेमध्यें हे पित्ताचे गुण वाढून विकारकारी होतात, ती अवस्थाच दोषाचे दृष्टीनें अधिक महत्वाची आहे. चिकित्सा यावर आधीं आणि शोधनाचें कार्यहि त्याच अवस्थेंत होतें, म्हणून इतर स्थानांचा उल्लेख मुख्य म्हणून न देतां सदोष स्थितींत हेंच स्थान पहिलें सांगितलें आहे. अशा रितीनें विचार केल्यास विसंगति न दिसतां पूर्वीचें पित्ताचें लक्षण व हें स्थान यांची संगति लागते, व आयुर्वेदीय विवेचनाचें धोरणहि ध्यानीं येईल. दोषांचें आयुर्वेदीय वर्णन केवळ शक्ति किंवा गुण या स्वरूपाचें नसून गुणाश्रयी पदार्थ असें आहे, याचा यावरून खासा उलगडा होईल, चिकित्सेचें रहस्य ध्यानांत येण्याला ही गोष्ट विसरून भागणार नाहीं, दोषांना दोष हें नांव देऊनच ज्या अवस्थेंत बिघडविण्याचें असें त्याचें स्वरूप होतें, तीच अवस्था दोष नांवानें वर्णिलेली आहे, त्यापूर्वींची अविकृत स्थिति तत्वतः धातु नांवानें संबोधणें किंवा शक्ति अगर निसर्ग कांहीं म्हणून चालेल, मात्र दोष हें नांव दिल्यावरहि शक्ति आहेत म्हणणें सयुक्तिक नाहीं, शक्ति अम्ल, शक्ति पातळ घाणेरी, स्निग्ध वजनदार बुळबुळीत असलेली कशी असेल ? ती असल्या पदार्थांत असते, व यांची विकृति घडवून याच स्वरूपांत रोगोत्पादक होते, प्रत्येक ठिकाणीं जर हें त्याचें स्वरूप ध्यानीं घेऊन शक्तीचें कार्य आणि शक्तिमान् पदार्थदोषांची विकृति नीट विचारांत घेतली, तर आयुर्वेदांत सूत्रमय कां होईना पण अविकृत आणि विकृत या दोन अवस्थांतील इंद्रियविज्ञान किती उत्कृष्ट आहे याचा खुलासा होईल, व जरि इंद्रियविज्ञान नांव नाहीं तरी त्रिदोषविज्ञान चांगलें झालें कीं, इंद्रियविज्ञानाची उणीव पडणार नाहीं, पाचक पित्ताचे उदाहरणावरून ही गोष्ट कळण्यासारखी आहे.

पित्ताचें तात्त्विक व व्यापक स्वरूप.

व्यवहारिक भाषेंत पित्ताची स्पष्ट कल्पना यावयाची म्हणजे शरिरांतील प्रत्येक ठिकाणीं त्या त्या भागाचे स्वरूपानुरूप बाह्य पोषकाचा संग्रह झाल्यावर ज्या तैजस तत्वानें त्यांतील पोषक अंश आत्मसात् केला जातो, अशी ती पचन शक्ति होय. आंतडयांतील स्थूल पचनापासून तों अगदीं सूक्ष्म घटकापर्यंत हें काम झालेंच पाहिजे. त्यांतील उष्णता हें पित्त मात्र आर्द्र पदार्थाश्रयी होऊन कार्य करतें. पण आर्द्रावस्था ही तत्वतः कफ आहे. व तीमध्यें उष्णता सामील होते. हें तत्व ध्यानांत येण्याकरितां पाचक पित्ताला त्यक्तद्रवत्व, हें विशेषण योजलें आहे; व सर्वत्र तें व्यापी आहे. अष्टांग हृदयाचे शारीरामध्यें वर्णन करतांना, भात शिजण्याचे क्रियेला उदाहरणादाखल घेतली आहे. भांडयांतील पाणी व तांदूळ आर्द्र अर्थात् श्लेष्मस्वरूपाचे व भांडयाला दिली जाणारी आंच तैजस पित्तरूपी पण कार्य मात्र तिचा आंतील पाण्याशीं संयोग होऊन होतें. व कार्यकारी स्थिति वर्णन करतांना ही उष्णता मिश्रस्थितींत राहते. ती वेगळी राहिल्यास कार्यकारी नाहीं. शरीर हें नेहमीं पच्यमान अवस्थेंत राहणारें आहे, अर्थात् त्या अवस्थेंत तर त्या उष्णतेचें वर्णन करून भागणार नाहीं. व याकरतांच पित्ताचें प्रवाही असें वर्णन केलें आहे. त्याचे याथार्थ्य उघड आहे.अशा पित्ताला प्रचलित मराठी भाषेमध्यें सोपें असें नांव द्यावयाचें झाल्यास पाचकपिंड, परमाणु किंवा घटक म्हणण्यानें बाध येणार नाहीं सर्व विकारांमध्यें याच स्थितींतील या पाचक परमाणूंचा विचार करावयाचा असतो. व तो यथार्थ झाला म्हणजे विकाराचें स्वरूप ध्यानीं येईल. सुगमतेसाठीं आयुर्वेदामध्यें पित्ताचे जे चाळीस विकार किंवा लक्षणें सांगितलीं आहेत, तीं त्या त्या जागीं कशीं संभवतात, याचा विचार करूं; म्हणजे पित्ताचें स्वरूप स्पष्टपणें ध्यानीं घेण्याला अडचण पडणार नाहीं.

पित्तजन्य लक्षणें.

चत्वारिंशत् पित्तविकाराः—यथा—ओषश्च, प्लोषश्च दाहश्च, दवथुश्च, धूमकश्च, अम्लकश्च, विदाहश्च, अष्माधिक्यं च, अतिस्वेदश्चांगगंधश्च, अंगावयवदरणं च, शोणितक्लेदश्च, मांसक्लेदश्च, त्वग्दाहश्च, मांसदाहश्च, त्वङ्मांसदरणं च चर्मदरणं च, रक्तकोठश्च, रक्तपित्तं च, रक्तमंडलानि च, हरितत्वं च, हारिद्रत्वं च, नीलिका च, कक्षा च,कामला च, तिक्तास्यता च, पूतिमुखता च, तृष्णाया आधिक्यं च, अतृप्तिश्च, आस्यपाकश्च, गलपाकश्च, अक्षिपाकश्च, गुदपाकश्च, मेढ्रपाकश्च, जीवादानं च,

तमःप्रवेशश्च. हरितहारिद्रमूत्रनेत्रवर्चस्त्वं च इति चत्वारिंशत् पित्तविकाराः ॥ १ ॥
[चरक सू० स्था० अ० २०]

या लक्षणांचा खुलासा.

१ ओष, २ प्लोष, ३ दाह, व दवथु हे चार विकार म्हणजे दाहाचे प्रकार आहेत. ओष म्हणजे एकाद्या भागीं अत्यंत जळजळ होणें. प्लोष म्हणजे त्वचेवर एकाद्या ठिकाणीं भाजल्याप्रमाणें दाह होणें व डाग (म्हणजे भाजल्याप्रमाणेंच) पडणें, दाह म्हणजे सर्व शरिराचा आणि दवथु म्हणजे एकाद्या ठरावीक जागींच दाह होणें. असे हे चार प्रकार आहेत.

दाहाचे वरील चार प्रकार ज्याप्रमाणें एकाच स्थानाचे आणि स्वरूपाचे पित्तविकार आहेत त्याचप्रमाणें, धूमक, अम्लक आणि विदाह हे तीन पित्ताचे विकार किंवा लक्षणें हीं एकाच स्थानांतील आणि परस्पर सारख्याच स्वरूपाचीं आहेत. आणि या लक्षणांकडे विशेषतः तात्विक दृष्टया पाहिल्यास हीं केवळ पित्ताच्या आर्द्रावस्थेतीलच आहेत. किंबहुना या लक्षणांची उत्पादक विकृति कफ घडवून आणतो, असें निदर्शनास येईल. धूमक म्हणजे घशांतून अति उष्णतेमुळें धूर आल्यासारखा भासणें, अम्लक म्हणजे घशांत आणि आमाशयांत अम्लता वाढून ढेंकर वगैरे आंबट येणें आणि विदाह म्हणजे आमाशय व अन्नमार्ग यांत जळजळ उत्पन्न होणें; हे विकार कसे होतात ? ज्या वेळीं आहारामध्यें, तीक्ष्णोष्णादि पदार्थांचें प्रमाण वाढतें, त्या वेळीं आमाशयामध्यें जें अन्नाचे पचनाच्या प्रथमावस्थेमध्यें स्वाभाविक माधुर्य यावयास पाहिजे, तें न येतां अन्नविपाक तीक्ष्ण वगैरे गुणांचा होतो. व त्याचा परिणाम समीपचे कंठस्थानावरहि होतो. कित्येक वेळीं आहारामध्यें असे पदार्थ नसून उलट स्निग्ध, जड, स्थूल, पिठाचे, कोरडे असलेहि पदार्थ आहारांत आले, किंवा पाण्याचें अथवा द्रव पदार्थांचें प्रमाण आहारामध्यें कमी झाले तर त्यामुळें आमाशयांतील अन्नाचें कफामुळें होणारें आर्द्रीभवन ठराविक मुदतींत न होतां, अधिक वेळ अन्न आमाशयांत पडून राहिल्यानें तें आंबतें—नासतें आंबुसपणा आल्यावर केवळ अपचनानेंच त्यामध्यें तीक्ष्णता—अम्लता इत्यादि गुणांचा समावेश होतो, व आंबण्याच्या अगदीं प्रथमावस्थेंत अम्लक, यापुढील दुसरी अवस्था म्हणजे तीक्ष्णता उत्पन्न होणें. यांत विदाह म्हणजे जळजळ आणि तीक्ष्णतेचा अतिरेक झाला कीं, धूर आल्यासारखा वाटणें. या स्थितीमध्यें धूमक हे विकार उत्पन्न होतात, केवळ ऊष्ण-

गुणाचे वाढीनें दाह होईल, पण हीं लक्षणें होणारीं नाहींत, हीं सर्व लक्षणें अम्लपित्त या पित्तविकारांत संभवतात, आणि त्यांतच अपचनाचा उल्लेख प्रामुख्यानें आहे. आमाशयांतील नैसर्गिक अन्नाचें आर्द्रीभवन आणि माधुर्य न झाल्यानेंच अम्लपित्तविकार होतो, व त्यालाच अपचनाचा एक प्रकार मानण्यांत येईल, पचनाचें प्रत्यक्ष कार्य हें पित्तस्थान जो पच्यमानाशय किंवा लघ्वंत्र यांत होतें, तथापि चर्वण, आर्द्रीकरण हीं कार्यें पचन क्रियेला महत्वाचें सहाय करणारीं असल्यानें त्यांचाहि पचन या नांवानें संबोध केला जातो, या सर्व स्थानांत पूर्ण काम होऊन अन्नरस वेगळा होईपर्यंत जरि अन्नामध्यें अवस्थांतरें निराळीं असलीं तरि त्याला पक्वावस्था असत नाहीं, या साठीं कित्येक वेळीं आम पक्वाशयाचीं नांवें आणि कार्यें सामान्य रीत्या एकाच नांवानें ओळखण्यांत येतात, तरि हे पोटभेद लक्षांत घेऊन आमाशयांत अपचन म्हणजे काय व पच्यमानांत अपक्वता कोणत्या अवस्थेंत याचा विचार झाला पाहिजे, ज्वरामध्यें " आमाशयस्थोहत्वाग्निं, दोषाह्यामाशयाश्रयाः " इत्यादि वाक्यांनीं आमाशयाचा निर्देश केला आहे. तथापि ' निरस्य ' ज्वलनंबहिः सहतेनाभिसर्पंतः तपंतः सकलं वपुः ॥ ज्वरदास्य. रसानुगाः ॥

या सर्व वाक्यांचा समुच्चयार्थ लक्षांत घेतला म्हणजे पाचकाग्नीला बाहेर (लघ्वंत्राचे) घालवून रसाबरोबर सर्व शरिरांत पसरून ज्वर उत्पन्न करतात. ज्या प्रकरणांत निर्दिष्ट असलेला आमाशय म्हणजे पच्यमानाशय होय हें ध्यानांत येईल. व अम्लपित्त कीं, ज्यांत वांति होते आणि अम्लक वगैरे विकारांत अपचन ह्या विकारांतील अविपाक हा पच्यमानाशयांतील नसून आमाशयांतील आहे. असें सहज कळेल. अम्लपित्ताचे सामान्य लक्षणामध्यें--

अविपाकक्लमोत्क्लेशतिक्ताम्लोद्गारगौरवैः ॥
हृत्कंठदाहारुचिभिश्चाम्लपित्तं वदेत् भिषक् ॥ १ ॥ मा. नि.

(अपचन, ग्लानि, मळमळ, तिखट, आंबट असे ढेंकर, जडपणा, हृदय आणि कंठ यांचे ठिकाणीं दाह आणि अरुचि या लक्षणांवरून अम्लपित्त समजावें.) अशा विकारांचा उल्लेख आहे. त्यांत हीं तीनहि लक्षणें असून अविपाक आहे. अर्थात् हीं लक्षणें अविपाकामुळें होतात हें उघड आहे. आणि आमाशयांत अन्नावर जो पचनाविषयीं संस्कार होतो. तो आर्द्रिकरणाशिवाय नाहीं.

आदौ षड्रसंपन्नं मधुरीभूतमीरयेत् ।
फेनीभूतं कफं, यस्त्वामाशय संस्थितः ।
क्लेदकः सोन्नसंघातक्लेदनात् ॥

हीं वाक्यें पूर्वीं गेलीं आहेत. म्हणजे हीं तीनहि लक्षणें विदाहि तीक्ष्ण अशा पदार्थांचे प्रभावानें किंवा पचनाचे विकृतीमुळें आमाशयांत आर्द्रावस्थेंत असलेल्या अन्नामध्यें अर्थात् आर्द्रावस्थेंत असलेल्या पित्तानें उत्पन्न होतात. 'ऊष्णाधिक्यंच' म्हणजे उष्णता अधिक होणें. अर्थात् हा विकार सर्वांगीण आहे. ऊष्णवीर्य पदार्थांचे सहवासानें ऊष्ण प्रदेश किंवा काळ, अन्नास्तव धातुक्षीणता यांमुळें उष्णता वाढणें हा साधा विकार आहे. पित्ताचें आणखी लक्षण म्हणजे 'अतिस्वेदश्च' ह्मणजे घाम अधिक येणें हें रक्ताश्रयी पित्तानें होतें. रसाचें रक्त बनतें त्यावेळीं त्यांतील जलांश निरुपयोगी स्थितींत असलेला बाहेर त्वचेच्या मार्गानें टाकण्यांत येतो. उष्णता वाढल्यानें हें पचनाचें कार्य जलद होतें. इतकेंच नव्हे तर अधिक उष्णतेचें कार्य रक्त आणि रस यांमध्यें अधिक पातळपणा उत्पन्न करून सूक्ष्म रोमरंध्रांतून त्याचा स्राव होतो. या उष्णतेमुळें या दोन धातूंमधील वास्तविक पोषक अशा घटकांचेंहि विलयन होतें (जळतात) व असें झाल्यानें ते घामाबरोबर बाहेर जातात. अर्थात् अशा प्रकारें अति स्वेद झाल्यास धातुपोषणामध्यें व्यत्यय येतो. हा विकार ह्मणजे रक्ताश्रयी उष्णतेची वाढ होय. 'अंगगंधश्च' ह्मणजे आंगाला घाण येणें, ही घाण घाम आणि रसधातु यांचे अशुद्धतेमुळें येते. सामान्यतः स्निग्धाहारानें रसामध्यें अधिक स्निग्धपणा वाढला असतां तेथील पचनशक्तीनें त्याचें पचन नीट होत नाहीं. आणि अशा अविपक्व स्थितीमध्यें घामाला विदग्धावस्था (नासणें) येऊन त्यामुळें अंगाला घाण येते. अर्थात् हा विकार देखील पित्ताचे उष्णतेचा नसून त्यांतील आमगंधी अशा द्रव पित्ताचाच आहे. 'अंगावयवदरणंच' अंग किंवा शरिराचे अवयव फाटणें त्याचप्रमाणें, 'त्वङ्मांसदरणं च' ह्मणजे त्वचा आणि मांस यांचें विदारण, 'आस्यपाकश्च, गलपाकश्च, अक्षिपाकश्च, गुदपाकश्च, मेढ्रपाकश्च' तोंड येणें, घसा येणें, डोळे येणें, गुदद्वार पिकणें आणि मूत्रमार्गांत भेगा पडणें हे सर्व, सात विकार किंवा पित्ताचीं लक्षणें एकाच स्वरूपाचीं आहेत. पित्ताचे गुणामध्यें तीक्ष्ण आणि ऊष्ण असे दोन गुण आहेत. हे गुण ज्यावेळीं एकाद्या भागांत वाढतात त्यावेळीं तेथें या गुणांचे सहवासानें क्षारत्वाची वाढ होते; विशेषेंकरून पित्ताचें दूष्यस्थान जें रक्त त्यामध्यें हा गुण उत्पन्न होऊन अशा रक्तानें शरीरपोषण होत असतां क्षाराचे विदारक धर्माप्रमाणें, अंगावयव विदारण होतें, अर्थात् विकृतीचे सामर्थ्याला अनुसरून ह्या लक्षणांत कमी अधिक तीव्रता असेल. रक्त हें मांसाश्रयी आहे, त्यामुळें असें रक्त जर मांसांत राहील, तर मांसहि सडूं लागतें आणि त्याचेच सहवासानें त्वचाहि फाटते. डोळे, घसा, तोंड, गुदद्वार आणि जननेंद्रिय यांचे

अंतर्भाग मृदु नाजुक असतात, त्यामुळें या रक्ताचा परिणाम सर्वांआधीं या भागांवर होतो; आणि त्यांचे अंतर्भागांतील नाजुक त्वचेचा विदाह होतो व फाटते. अशा प्रकारें हीं लक्षणें पित्ताचे तीक्ष्ण गुणांचे वाढीनें होतात.

' शोणितक्लेदश्च, मांसक्लेदश्च '

म्हणजे रक्ताचा आणि मांसाचा अभिष्यंद—पाणी सुटणें, पित्तामध्यें तीक्ष्णोष्ण अशा गुणांची वाढ झाल्याकारणानें रक्तांत हे गुण वाढून त्यामुळें विदग्धावस्था किंवा कुजण्याची क्रिया सुरू होते, त्यामुळें रक्त आणि याच रक्ताचे संसर्गानें नंतर मांसामध्येंहि अशीच विकृति होते. रक्तांत तीक्ष्णोष्ण गुणांचे पित्ताची वाढ या लक्षणांचें कारण आहे. ' त्वग्दाहश्च, मांसदाहश्च ' त्वचेचा दाह आणि मांसाचा दाह हीं दोन लक्षणेंहि रक्तांत उष्ण गुणांची वाढ झाल्यामुळेंहोतात. रक्त अधिक उष्ण झालें म्हणजे त्वचेचे सान्निध्यामुळें प्रथम त्वचेचा दाह होतो आणि हीच विकृति वाढल्यास ह्या रक्तांतील उष्णता आश्रयभूत रक्ताचाहि दाह करते. ' रक्तकोठश्च, रक्त विस्फोटाश्च, रक्तमंडलानि च, म्हणजे त्वचेवर तांबडया गांधी, तांबडे फोड व तांबडया गांधींचीं मंडळें उठणें हीं तीन लक्षणें रसाचा विदाह आणि त्यामुळें अभिसरण नीट न होणें याचीं निदर्शक आहेत. रसाचें अपचन होऊन त्यामध्यें फार थोडया प्रमाणांत विदाह झाला म्हणजे गांधी उठतात. याचा अर्थ तेवढया भागांतील अभिसरण नीट होत नाहीं. याच गांधी अधिक विकृतीनें अधिक झाल्या कीं तें रक्तमंडळ आणि त्वचा किंवा लस यांमध्यें विकृति झाल्यानें म्हणजे रस विदग्ध झाल्यानें लाल फोड येतात. ही विकृति म्हणजे रसधातु आणि त्वचा यांमध्यें पित्ताची अम्लगुणविशिष्ट विदग्धावस्था होय. ' रक्तपित्तं च, रक्तामध्यें पित्ताची वाढ झाल्यामुळें पित्त आणि रक्त यांचा मिश्रस्राव. पित्ताची रक्तांत वाढ अर्थात् रक्ताशय म्हणजे यकृत, प्लीहा आणि शरीरांतर्गत लहानमोठया रक्तवाहिन्या यां। होते. यांत पित्ताची वाढ झाली कीं, अति तीक्ष्ण, अति ऊष्ण अशा रक्ताच्या स्पर्शानें ठिकठिकाणीं रक्ताशय आणि वाहिन्या यांमध्यें क्षत होऊन रक्तस्राव होतो. हा एक विदारणाचा परिणाम असतो. ज्या वेळीं रक्तामध्यें विदारक अशा क्षारत्वाची वाढ पित्ताचे तीक्ष्णोष्ण गुणांनीं होते, त्यावेळीं हा विकार होतो. ' हरितत्वं च, हारिद्रत्वं च, नीलिका च, त्वचेवर हिरवेपणा, पिवळेपणा आणि नीलसरपणा येणें किंवा नीलिका म्हणून सांगितलेला एक विकार (सदर विकार क्षुद्ररोगांमध्यें सांगितला आहे तथापि हें नीलिकालक्षण त्याचे जोडीचे दोन विकार पाहतां आणि हीं सर्व पित्ताचीं विकृतावस्थेंत उत्पन्न होणारीं लक्षणें आहेत ह्या गोष्टीचा विचार केला असतां,क्षुद्ररोगांतर्गत 'नीलिका

विकार हा नसून अंगावर नीलसर रंग असेंच हें लक्षण मानलें पाहिजे. शिवाय क्षुद्ररोगांतर्गत नीलिकालक्षण म्हणजे शरिराचे कोणत्याही भागावर आणि विशेषतः तोंडावर काळा निळा डाग हें आहे.

" कृष्णमेवंगुणं गात्रे मुखे वा नीलिकां विदुः "
(मा. नि. क्षु. रो. श्लोक ४०)

हा विकार बहुधा जन्मतः असणें अधिक संभवनीय असतें. याचेच जोडीचें न्यच्छ, व्यंग, हे विकारही नीरुज म्हणजे वेदनारहित असल्याचा उल्लेख असून न्यच्छ तर एक चिन्ह असल्याचें सांगितलें आहे. (न्यच्छं लांछनमुच्यते. मधुकोश) तात्पर्य, नीलिका हें पित्त लक्षण हिरवा, पिवळा या वर्णाप्रमाणेंच त्वचेवरील नीलिका मानणें अधिक सयुक्तिक आहे पित्तोत्पाद्य वर्णामध्यें नीलवर्णाचा उल्लेख आहे. (पित्तात् पीतं नीलिमा लोहितं वा, इत्यादि) व म्हणूनच नीलिमा शरीरव्यापि लक्षण मानावें. पित्तामुळें ते वर्ण कां व कसे उत्पन्न होतात? याचा विचार करूं लागलें असतां सहज ध्यानांत येईल कीं शरिरावर अर्थात् त्वचेवर वर्ण उत्पन्न करणें हें भ्राजक या नांवाचें त्वगाश्रयी पित्ताचें कार्य आहे. मात्र या पित्ताचें कार्य व शक्तीचा पुरवठा रक्ताश्रयी पित्तानेंच व्हावयाचा. अर्थात् रक्तामध्यें ज्या प्रकारच्या वर्णाचें आधिक्य होईल तो वर्ण त्वचेवर प्रतीत होतो. रंजक पित्ताचें कार्य नीट न होतां रसाला योग्य प्रमाणांत रक्तत्व न येईल तर तें रक्त पांडुरवर्णाचें होतें. ही पांडुरोगाची उत्पादक अवस्था असते. पण जर यकृत या रक्ताचे आणि पित्ताचे स्थानांत पित्ताची त्याचे कारणांनीं वाढ झाली तर अतिरिक्त पित्त रसांत मिळून सर्व शरीरभर पसरतें, पित्ताचा वर्ण पिवळा असून अशा पित्ताचें रक्तामध्यें पीतता वाढते व त्वचेवर दिसूं लागते. ही हारिद्रता होय. याच अवस्थेंत कामला होते. याहिपेक्षां वाढ झाली तर रक्ताचें शोषण-(करपणें) होऊं लागेल ही पहिली अवस्था थोडा काळेपणा अर्थात् हरितत्व किंवा हिरव्या वर्णाची उत्पादक असून ही अवस्था फार थोडा वेळ टिकून लवकरच रक्ताचें शोषण होऊन क्षीणावस्थेंत निळाकाळा असा रक्ताचा वर्ण त्वचेवर दिसतो. ही नीलिका होय. क्षीणावस्थेमुळें यावेळीं हा विकार निव्वळ पित्ताचा न राहतां वातपित्तांचा होऊं शकेल. याच उद्देशानें वायूचे विकारामध्येंहि वर्णाचे बाबतींत कृष्णत्वाचा उल्लेख केला आहे. कार्श्यकार्ष्ण्योंण्ण कामित्वं -वर्णः कृष्णोऽरुणोऽपि वा या अवस्थेमध्यें वातरक्त विकाराचा संभव होतो. अशा रीतीनें हीं तीन लक्षणें म्हणजे रक्तांतील पित्ताच्या वाढीचें प्रमाण दाखविणाऱ्या तीन अवस्था होत. " कामलाच " कावीळ हें लक्षण म्हणजे हारिद्रावस्थेची पूर्ण स्थिति होय. हारिद्रतेचा उल्लेख केलाच आहे.

" हरितहारिद्रसूत्रनेत्र वर्चस्त्वं च " मूत्र, नेत्र, आणि मळ यांवर हिरवेपणा, पिवळेपणा येणें या लक्षणाचे बाबतींत विशेष इतकाच कीं, नेत्रांचा वर्ण हा रक्तानें होणारा. नेत्र रक्ताचा आदर्श होय, आणि मूत्र आणि पुरीष यांचा वर्ण म्हणजे पच्यमानाशयांत होणाऱ्या पित्ताच्या मिश्रणाचा निदर्शक आहे. येथील पित्ताच्या निळेपणाचें आधिक्यानें हिरवा पीतत्वाचे आधिक्यानें पिवळा असा पुरीषरूपि घन आणि मूत्ररूपि द्रव मल व्हावा हें स्वाभाविकच आहे. "कक्षा च" हा विकार म्हणजे खाका, खांदे किंवा पार्श्व या भागीं होणारे वेदनायुक्त आणि कृष्णवर्णाचे फोड. मागें रक्तविस्फोट, म्हणून सांगितल्या प्रकारचीच ही विकृति आहे. मात्र क्षीणावस्थेंत रक्ताचा रंग ज्यावेळीं काळसर होतो, त्यावेळीं जे कृष्णवर्ण फोड उठतात त्यांना हें नांव आहे. यांतील पित्तविकृति रक्तांतील पण वातमिश्र अशी असते. तिक्तास्यता च, पूतिमुखता च, तोंड कडू होणें आणि तोंडाला घाण येणें; हीं लक्षणें यकृतांतील पित्तानें रसपचन न झाल्याचीं आणि आमाशयांतील अन्न न पचल्याचीं आहेत. या दोन्हीहि ठिकाणीं रसांत वा अन्नांत ज्यावेळीं पित्ताचे तीक्ष्ण, अम्लगुण वाढतात, अर्थात् आंबुसपणा येतो त्यावेळीं त्याचा जिभेवर झालेला हा परिणाम असतो. अन्नरस ज्यावेळीं फार अपक्व आणि मलमिश्र स्थितींत असेल त्यावेळीं तोंड आणि रसनेंद्रिय यांमध्यें—मळाचें प्रमाण वाढून त्याला नासकेपणाची घाण आणि याच अवस्थेंतील अधिक तीक्ष्णतेमुळें किंवा कुजण्याचे धर्मामुळें कडूपणा हे विकार उत्पन्न होतात. " तृष्णाया:आधिक्यं च " तहान अधिक लागणें. उष्णतेचें प्रमाण वाढल्यानें पचनेंद्रियें, रक्ताचीं स्थानें आणि रक्त या सर्वच ठिकाणीं शोषण अधिक होतें. स्वेद किंवा बाष्प या अवस्थेंत तयार होऊन शोषणाला सुरवात होते. अर्थात् कमी झालेल्या जलांशाची मागणी म्हणजे तहान हें लक्षण उष्णता या पित्तगुणानें संभवतें. यकृत् हें पित्ताचें स्थान असून त्या ठिकाणीं अन्नरस आल्यानंतर त्यांत या पित्ताचें (रंजकपित्ताचें) मिश्रण होऊन त्याला रक्तवर्णता येते. त्यावेळीं अन्नरसांतील स्निग्धता, पांढरेपणा आणि कांहीं जलांश हा यकृताचे अधोभागीं एका " सच्छिद्र पेशीमय " भागांत थोडा वेळ संचित होऊन त्या ठिकाणाहून जलवाहिनींतून शरिरांत पसरतो. रसांतून निघणाऱ्या अर्थातच सूक्ष्म प्रमाणांत असल्यानें, अन्नांतील जलांशाच्या बस्तिरूपी आशयाप्रमाणें त्याचा आशय नाहीं; तथापि तो ज्या भागीं प्रथम स्रावून संचित होतो, तो भाग यामुळें थोडा फुगीर व पाणी सांचल्यामुळें अधोभागीं रुंद, वरचा निरुंद, असा दिसणें स्वाभाविक आहे. याच यकृतांतील भागाला आयुर्वेदांत क्लोम, हें नांव असून त्याचा आकार तिळासारखा असल्याचें सांगितलें आहे.

तिळासारखा आकार म्हणजे खालीं रुंद व अरुंद होय. पातळ कातड्याचे पिशवींत थोडेंसें तळालाच राहील असें पाणी असतां असा हा आकार दिसतो. हीच कल्पना क्लोमाला तिळाचा आकार सांगण्यांत आहे. या स्थानांत थोडासा रसांतून स्रवणारा जलांश असतो. व यकृतांत पित्ताची उष्णता वाढतांच त्या भागांतील जलांशाचें शोषण आरंभीं होऊन त्याचे मार्फत होणारा पुरवठा कमी होतो. म्हणूनच हें पिपासास्थान मानण्यांत आलें आहे.

क्लोमाचें अस्तित्व नाहीं म्हणण्यापूर्वीं या वर्णनाचें अधिक सूक्ष्म दृष्टीनें अवलोकन केलें पाहिजे. " अतृप्तिश्च " जठरांतील पाचक पित्ताचे वाढीनें लवकर अन्न पचल्यानें हें लक्षण उत्पन्न होतें. यालाच तीक्ष्णाग्नि किंवा अत्यग्नि नांव आहे. "जीवादानं च " पित्ताचे तीक्ष्णादि गुणांची वाढ झाल्यानें रक्तपित्तविकार होतो. आणि अतिरिक्त स्राव झाल्यानें जीवनाधार रक्ताचे अभावीं जीवनाचा नाश होतो. या अतिरक्तस्रावाला कारण पित्त ह्मणून जीवादान ह्मणजे जीवनाचा शोष पित्ताचे विकारांत घालण्यांत आला आहे. अर्थात् जखमेमुळें होणाऱ्या रक्तस्रावाला हें नांव नसून अंतर्गत पित्तविकृतीपासून होणाऱ्या रक्तस्रावाचें हें नांव आहे " तमःप्रवेशश्च " पित्ताचा ऊष्ण गुण वाढून तैजस इंद्रिय जें नेत्र त्यांमध्यें हें सहन न होण्यासारखें तेज वाढल्यामुळें हा विकार होतो. आलोचक या पित्ताचा हा विकार डोळ्यापुढें आंधेरी येणें या नांवानें ओळखण्यांत येतो. नेत्र तैजस आहे; तथापि तेजाच्या फाजील वाढीनें त्याचा नाश होतो.

अश्मनो जन्म लोहस्य तत एव च तीक्ष्णता ॥
उपधातोपितेनैव तथा नेत्रस्य तेजसः ॥ १ ॥ अ० हृ०

याप्रमाणें पित्ताचीं अनेक विकारांतर्गत हीं चाळीस लक्षणें किंवा विकार होत. आशय आणि इंद्रियें यांची रचना आणि कार्य यांना अनुसरून अनेक रोगांत यांचा समावेश असतो. अर्थात् व्यस्त अथवा समस्तप्रमाणानें असतो. आतां पित्तामुळें रोग कसे उत्पन्न होतात ? याविषयीं विचार करावयाचा. लक्षणें आणि रोग याविषयीं पूर्वीं कफाचे प्रकरणामध्यें खुलासा केला आहे. पित्ताच्या शरीराला अवश्यच ज्या क्रिया त्यांचे विकृतीमुळें होणाऱ्या रोगांचे उदाहरणांनीं त्याचा खुलासा करावयाचा. पित्ताचीं सर्वसामान्य लक्षणें कोठें व कशीं होतात याचा विचार केल्यानंतर पित्तामुळें होणारे रोग कसे होतात याचा विचार करूं.

पित्ताचे रोग.

आरंभीं सांगितलेंच आहे कीं, विकार म्हणजे केवळ वाढ नव्हे;

आणि पित्ताचे विकार म्हणजे केवळ उष्णता नव्हे. अर्थात् पित्ताचे द्रवत्व, विस्तृत्व इत्यादि गुण वाढून त्यामुळें एकाद्या इंद्रियाचे क्रियेमध्यें व्यत्यय येणें हें या विकारांचें सामान्य स्वरूप आहे. याचे खुलाशासाठीं पित्ताचें मुख्य स्थान जें जठर त्या स्थानांतील एका विकाराचा विचार करूं.

पित्तविकारांपैकीं ज्वर.

या पित्तस्थानापासून ज्वर हा विकार संभवतो. ज्वर हा विकार अजीर्णामुळें किंवा अव्यवस्थित पचनामुळें होणारा आहे. हवा वगैरे कारणांनीं होणारा आगंतु स्वरूपाचा त्याचप्रमाणें विषम वगैरे पोटभेद सोडून दिले म्हणजे जें ज्वराचें वर्णन आहे, त्यामध्यें आमाशयांत पचन न झाल्यानें किंवा अग्नि मंद झाल्यानें ज्वर उत्पन्न होतो, असा उल्लेख आहे. " मिथ्याऽहारविहाराभ्यां दोषा ह्यामाशयाश्रयाः बहिर्निरस्य कोष्ठाग्निं ज्वरदाः स्यू रसानुगाः ॥ १ ॥ (मा० नि०), ' आमाशयं प्रविश्यामममनुगम्य पिधाय च स्रोतांसि पक्तिस्थानाच्च निरस्य ज्वलनं बहिः ॥ १ ॥ (अ० हृ०), अशा रीतीनें ज्वर हा विकार आमसंभवनीय असल्याचा उल्लेख असतां पित्ताचा त्याशीं काय संबंध ? असा प्रश्न उपस्थित होईल. तरी ज्वर पित्ताशिवाय होतच नाहीं असाही आधार आहे. ' उष्णपित्तदृते नास्ति ज्वरो नास्त्यूष्मणा विना ॥ (अ० हृ०) ' ज्वर अर्थात् त्वचेवर भासणारी अनैसर्गिक अधिक उष्णता ही पित्ताशिवाय नाहीं असा सिद्धांत आहे. व म्हणून हा विचार करण्यासारखा प्रश्न आहे. पित्ताची वाढ म्हणावी तर आमाशयांत पित्त कमी ह्मणून अपचन आहे, आणि पित्त कमी ह्मणावें तर ताप आहे. तापणें किंवा उष्णता हा गुण पित्ताशिवाय दुसऱ्या कोणत्याहि दोषाचा नाहीं. ' तप् ' धातूपासून झालेला पित्त शब्द हेंच सांगत आहे. त्वचेंत उष्णता अथवा पित्त वाढलें पण इतरत्र नाहीं. मग पित्त येतें कोठून व वाढतें कसें ? ज्या वेळीं आहारामध्यें जड व स्निग्ध असल्या पदार्थांचा अधिक उपयोग होतो, त्या वेळीं असल्या पदार्थांमुळें आमाशय (या प्रकरणीं आमाशय हा शब्द पच्यमानाशय अथवा लध्वंत्र याला उद्देशून आहे. हें पुढील विवेचनावरून ध्यानीं येईल.) ह्मणजे सर्व लहान आंतडीं या असल्या अन्नानें भरल्यामुळें त्यांतील सूक्ष्म अशीं स्रोतसें–छिद्रें असल्या अन्नानें भरतात–बंद होतात, व त्यामुळें त्या स्रोतसांतून अन्नपचनाला उपयोगी असा पाचक पित्ताचा स्राव होत नाहीं. अर्थात् अन्नस्पर्शानें जरी या सर्व अन्न ला संवेदना आणि चलन प्राप्त होतें व त्यामुळें सर्व स्रोतसांचे अंतर्गत असा रस किंवा पित्त स्रवतें तथापि स्रोतसें बंद झाल्यामुळें त्याचा अन्नांत प्रवेश

व मिश्रण होऊं शकत नाहीं, आणि असें झाल्यानें कोठ्यांतील अन्न पचत नाहीं. परंतु स्रवणारा रस हा याच अन्नाचे बहिर्मुख अशा रसवाहि स्रोतसांचे सान्निध्यामुळें त्यांचेमधून रसांत मिश्र होऊन रस-पचनाचें स्थान जें यकृत त्यामध्यें येतो. अन्नाचे स्रोतसांमध्यें अंतर्मुख व बहिर्मुख असा भेद कदाचित् आयुर्वेदीय दृष्टीला अपरिचित असा वाटण्याचा संभव आहे तरी आमाशयं प्रविश्य, स्रोतांसि पिधाय, पक्तिस्थानात् ज्वलनं बहिर्निरस्य, सहते नाभिसर्पतः, रसानुगा या सर्व वाक्यांचा सुसंगत अर्थ असाच होतो. अंतर्मुख स्रोतसें बंद झालीं म्हणूनच अग्नि किंवा पित्त बाहेर येऊन रसानुगामी होतें. व ज्याअर्थी तें रसानुगामी होतें असा उल्लेख आहे, त्याअर्थी बाहेर पडणारीं स्रोतसें असून तीं रुद्ध नसतात ही गोष्ट उघड होते. सर्व शरीर स्रोतोमय असल्याचा उल्लेख आहे (स्रोतसामेव समुदायं पुरुष मिच्छंति । चरक) आतां हीं प्रत्येक भागांत जीं स्रोतसें असतात त्यांत प्रामुख्यानें पोषक देणें व मलोत्सर्जन करणें हीं कामें करणारे दोन भाग असलेच पाहिजेत. नाहींपेक्षां आदान आणि विसर्ग होणार नाहीं. रसविक्षेपाचें वर्णन करीत असतां व्यानवायूचें ' विक्षेपोचितकर्मणा ' हें विशेषण योजून सर्व शरीरांत विक्षेप होतो. अर्थात् विक्षिप्त पदार्थांचा संग्रह करून पुनश्च विक्षेपासाठीं संकोच पाहिजे हें उघड आहे. व म्हणूनच ' सम्यग्गत्या च धातूनां ' ह्मणजे धातूमध्यें व्यवस्थित गति अर्थात् साहचर्य हें वायूचें कार्य सांगितलें आहे. संकोचविकासात्मक क्रियेमध्यें मलस्वरूप धातूचें पुनरागमन होत असतें. याच क्रियेला वायूमुळें होणारा निग्रह असें नांव आहे, शरीरभर पसरलेले दोष यामुळें परत येतात; व तसें घडल्यावर शोधन घ्यावें असा जो शोधनप्रकरणीं उल्लेख आहे, त्याचाहि आशय हाच आहे.

वृध्याभिष्यंदनात् पाकात् कोष्ठं वायोश्च निग्रहात् ।
सर्वदेहप्रविस्टतान् सामान् दोषान्न निर्हरेत् ।
दीपनैः पाचनैः स्नेहैस्तान् स्वेदैश्च पारष्कृतान् ।

स्नेहक्लिन्नाः कोष्ठगा धातुगा वा स्रोतोलीना ये च शाखास्थिसंस्थाः दोषाः स्वेदैः सेद्रवीकृत्य कोष्ठं नीताः सम्यक् शुद्धिभिर्निर्ह्रियंते॥१॥

अशा रितीनें पुनरागमन सुचविणारीं प्रमुख वाक्यें आयुर्वेदांत आहेत; त्यावरून हीं छिद्रें दोन प्रकारचीं असतात, हें उघड ठरतें. म्हणजे शरिराचा प्रत्येक भाग अंतर्मुख आणि बहिर्मुख असा छिद्रमय आहे, असें म्हणणेंच सयुक्तिक आहे.त्यामुळें ज्यावेळीं लध्वंत्र किंवा पच्यमानाशयांतील अंतर्मुख स्रोतसांचे अवरोधामुळें आंत स्रवणाऱ्या पाचक-

पित्ताला अडथळा येतो, त्यावेळीं बाहेरील रसानिसर्गमनाचीं जीं स्रोतसें, त्यांतून तें रसाबरोबर यकृताकडे जातें. याच अवस्थेमध्यें दुसरा आणखी एक असा दोष उत्पन्न होतो कीं, अन्नाचें पचन नीट न झाल्याकारणानें त्यांत आंबुसपणा येतो. आणि त्यांतून जो थोडाफार अन्नरस निघतो, (स्रोतोरोध झाला तर अगदींच अन्नरस त्यांतून निघत नाहीं.) अशी व्यवस्था सर्व ज्वरांत होत नाहीं. पूर्ण जर स्रोतोरोध होईल तर त्यापासून इंद्रियनाश होऊन विकाराला असाध्यता येईल, संनिपात व त्यांतहि अभिन्यास या प्रकारामध्यें अशी स्थिति प्राप्त होते. व म्हणूनच तो असाध्य सांगितला आहे.

(प्रत्याख्यात समूयिष्ठः कश्चिदेवान्न सिध्यति) तोहि विकृत व आमविकृतीमुळें–विदग्धतेमुळें किंवा आंबुसपणामुळें पित्तालाच वाढविणारा असतो. अशाप्रकारें उन्मार्गगामी पित्त आणि अन्नाचे विकृतीमुळें उत्पन्न होणारें पित्त अशी पित्ताचे उभय स्वरूपाची वाढ रसांत होऊन असा रस सर्व शरिरांत पसरल्यावर रसरक्ताश्रयी अशा उष्णतेमध्यें ही अधिक आणि अनैसर्गिक व अपरिचित भर पडते, व ही उष्णता म्हणजे ताप होय; अर्थात् तापांतील उष्णता पित्ताची असते म्हणून पित्ताशिवाय ज्वर नाहीं हा अभिप्राय आहे. मात्र ही पित्तविकृति म्हणजे तत्वतः शरिरांत पित्ताची वाढ नसून एका भागांत उणीव व दुसऱ्या भागांत अधिक भर अशी स्थिति असते. ज्या पचनेंद्रियांमध्यें पित्तचें योग्यकार्य झाल्यानें शरीरपोषण व्हावयाचें त्यांतील हें पित्त नको त्या भागीं जातें. अर्थात् कमी झालें त्या ठिकाणीं कमीपणामुळें, आणि नको त्या जागीं अधिकपणामुळें असे उभय स्वरूपाचे विकार ही पित्तविकृति कोठ्यांतील अजीर्णलक्षणें आणि रक्तादि धातूंतील ताप वगैरे लक्षणांनीं उत्पन्न करते. अशाप्रकारें पित्त हें भलत्यामार्गानें जाऊन रोग उत्पन्न करतें, त्यामार्गभ्रष्टतेलाच आयुर्वेदानें उन्मार्गगामिता किंवा कोप हीं नांवें दिलीं असून रोगगणनेमध्यें अशा प्रकारचे उत्पादक विकृतीचा समावेश केला आहे. आणि निदान ठरवितांना विशेषतः याच विकृतीचें स्वरूप ध्यानीं ध्यावयास पाहिजे, केवळ न्यूनता अथवा वृद्धि सामान्यत्वें त्या त्या भागांतील कार्यांवर न्यूनता किंवा आधिक्य उत्पन्न करील. पण रोगोत्पादक नाहीं यासाठीं ज्या ठिकाणीं ही उन्मार्गगामिता सुरू झाली तेथपासून उन्मार्गप्रवृत्त असा हा विकृत दोष ज्या ठिकाणीं थांबून विकार उत्पन्न करतो, तेथपर्यंतचें ज्ञान म्हणजे रोगसंप्राप्तीच्या प्रदेशाचें ज्ञान होय. एकाद्या भागीं ज्यावेळीं उन्मार्गप्रवृत्त दोषापासून विकार सुरू होतो, त्या ठिकाणीं दोषाचा स्थानसंश्रय मानण्यांत येतो. व येथें रोग उत्पन्न करणारा दोष कोठपासून विकृत झाला हें पाहाणें अवश्य असतें. अशा रितीनें ज्वर पित्तानें येतो, याचा अर्थ विमार्ग-

प्रवृत्त पित्तानें येतो असा आहे. क्वचित् पित्तज्वरामध्यें, पच्यमानाशयांत पित्ताचें आधिक्य असतें. कारण पित्तल आहारापासून या ठिकाणींहि स्वाभाविकच पित्ताची वाढ होत असते. तथापि जर पित्ताची केवळ वाढच असेल तर त्यामुळें अंतर्दाह वगैरे स्थानिक लक्षणें होतील; परंतु ज्वर यावयाचा म्हणजे पूर्वीप्रमाणेंच स्रोतोरोध होऊन पित्ताची उन्मार्गगामिता झाली पाहिजे. यामध्यें विशेष इतकाच असतो कीं, जो थोडा फार अन्नरस तयार होतो तो इतर ज्वरांपेक्षां अधिक पित्तप्रधान असल्यामुळें रसामध्यें पित्ताचें प्रमाण फार होतें व त्यामुळें ज्वराची तीव्रता असते. पित्तज्वरामध्यें ' वेगस्तीक्ष्णः ' म्हणून सांगितलेलें लक्षण याच कारणामुळें होतें. तरी ज्वर हा ' निज ' विकार पित्ताचे उन्मार्गगामितेशिवाय होत नाहीं हें निर्विवाद आहे. ' पित्तानें ज्वर ' याचा अर्थ असा आहे. दुसरा पित्ताचा विकार रक्तपित्त हाहि विकार असाच पित्ताचे उन्मार्गावस्थेंत होणारा आहे. पित्तयुक्त आणि आम असा अन्नरस यकृत्प्लीहेमध्यें जाऊन तेथें न थांबतां शरीरभर पसरतो. त्या वेळीं ज्वर उत्पन्न होतो. परंतु असा रस जर यकृत्प्लीहेमध्येंच विकृति करील तर रक्तपित्त होतें. लघ्वंत्राप्रमाणेंच येथेंहि अन्नरसावर रंजकपित्ताचें पचनकार्य व्हावें लागतें. हें कार्य न होतां जर अतिरिक्त पित्त या भागांत संचित होईल तर त्यामुळें पित्ताचे अतितीक्ष्णतेमुळें मृदुमांसमय अशा यकृत्प्लीहेच्या स्रोतसांना तें सहन न होऊन त्यामुळें तीं क्षतयुक्त होतात. व त्यांतून रक्त आणि पित्त यांचा स्राव मुखावाटे होतो. किंवा असेंच पित्त पच्यमानाशय वृक्क (मूत्रपिंड) यांमध्यें वाढून तेथील स्रोतसांत छिद्रें होतील तर रक्तासहवर्तमान गुदद्वार किंवा मूत्रमार्ग यांतून पडतें. आणि बेसुमार वाढ झाल्यास ह्या विकृतीला पुरूनहि सर्व शरिरांत व्यापून रसरक्तवह स्रोतसांत विदाह व क्षतोत्पत्ति करून रोमरंध्रांतून बाहेर पडतें. ही अत्यंत वाढीची विकृति आहे. रक्तपित्त म्हणजे केवळ रक्त नव्हे. तर रक्तमिश्र पित्त असतें. आणि जें पित्त पडतें तें अर्थातच् अस्वाभाविक मार्गानें पडतें. म्हणजे हीहि उन्मार्गावस्थाच होय. याला कारण ज्वरारंभक विकृति असते. याच विकृतीचे आधिक्याचा परिणाम रक्तपित्त असतें. व म्हणूनच ' ज्वरसंतापाद्रक्तपित्तमुदीर्यते ' ज्वरसंतापामुळें रक्तपित्त होतें. असा उल्लेख आहे. एकादेवेळीं ज्वरोत्पादक विकृति आमाशयांत झाली, अशा अवस्थेंत जर रोग्याचीं यकृत प्लीहा इत्यादि स्थानें पूर्वविकृतीमुळें दूषित अगर अशक्त असतील तर उन्मार्गगामीपित्त, व दूषित अन्नरस यांची व्याप्ति सर्व शरीरभर होऊन ज्वर येण्यापूर्वीच रक्तपित्त होईल. व पडून संपण्याइतकेंच पित्त असल्यास ज्वर येणार नाहीं. पण जर रक्तपित्त होऊन त्यायोगें पित्तदोषाचा त्रास झाला नाहीं

तर पुन्हां रक्तपित्त होऊनहि ज्वर होऊं शकेल. अशा रितीनें ज्वराचे आधीं, मागाहून किंवा ज्वरांतहि रक्तपित्त असण्याचा संभव आहे. मात्र रक्तपित्त स्वतंत्र विकार असो वा एकाद्या विकारांत उपद्रव, तीव्र उपद्रव—म्हणून असो, त्यामुळें रक्तस्थानांतून छिद्रोत्पादन करून पित्ताची उन्मार्गप्रवृत्ति हेंच स्वरूप असावयाचें अर्थात् केवळ उष्णता एवढेंच याचें स्वरूप नसून प्रवाही अवस्थेंत तीक्ष्ण गुणाची अत्यंत वाढ हें कारण असतें. असलें पित्त रक्तांत राहिल्यानें (रक्त, पित्ताचें स्थान आहे.) ही तीक्ष्णता रक्तवाहिन्यांना सहन न होऊन त्या फाटतात. व रक्तपित्ताचा मिश्रस्राव होतो, यालाच रक्तपित्त नांव आहे. आगंतुक जखमेमुळें होणाऱ्या रक्तस्रावाला अर्थातच रक्तपित्त नांव नाहीं. रक्त-पित्त म्हणजे वाढलेल्या पित्ताचा रक्तमिश्र स्राव होय. केव्हां केव्हां राजयक्ष्म्यांत ऊर्ध्वगामी, प्रमेहांत अधोगामी असें रक्तपित्त उपद्रवरूपानें असतें. राजयक्ष्म्यामध्यें तर अकरालक्षणांत त्याचा प्रामुख्यानें उल्लेख आहे. परंतु या विकारांत जें रक्तपित्त सांगितलें आहे त्याचें आणि रक्तपित्त या विकाराचें स्वरूप वेगळें असतें. पूर्वींचें स्वरूप ध्यानीं घेतां त्यांत अन्नरसाची विकृति आद्य आहे परंतु राजयक्ष्म्यामध्यें अन्नरस विकृत नसतो. याचा उल्लेख मागें आलाच आहे. अर्थात्च कफाचे संसर्गानें त्याचे विदग्धावस्थेंत होणारें रक्तपित्तस्थानीं लक्षण असतें. (याचा खुलासा मागें कफक्षयांत आला आहे) त्याचप्रमाणें प्रमेहोत्पादक विकृति ज्यावेळीं वृक्कांत होते त्यावेळीं तीक्ष्णोष्णादि अशा कारणांनीं वृक्कामध्यें जर पित्तविदाहामुळें व्रण होईल तर मूत्राबरोबर रक्त-पित्त पडेल हेंहि लक्षण अर्थात् स्थानीं असेलच, तथापि सर्वांमध्यें पित्ताची उन्मार्गगामिता मात्र असावयास पाहिजे. पहिल्यांत पच्यमानाशय आणि रक्तस्थानें व रक्तवाहिनी इतकीं स्थानें पित्तदूषित होतात, तर दुसऱ्यामध्यें पच्यमानाशय दूषित असलाच पाहिजे असें नाहीं. ज्या भागांत हा विकार तेवढेंच स्थान उर, वृक्क इत्यादि दूषित असतें. तिसरा पित्ताचा विकार—आम्लपित्त—हा विकार पित्ताचा म्हणून सांगण्यांत आला आहे. वांती होणें आणि ती आंबट,तिखट,कडु, हें या विकाराचें सामान्य आणि मुख्य लक्षण आहे.वांती हा विकार कफस्थान जें आमाशय त्याचा आहे.आमाशय हें पित्त आणि कफ यांचें स्थान आहे. असा त्याचा स्थाननिर्देशामध्यें उल्लेख येऊन गेला आहे,तथापि आमाशय हें जें पित्ताचें स्थान म्हणून सांगितलें आहे, तें पच्यमानाशयाला अनुसरून आहे. ज्वराचे संप्राप्तींत आमाशयाचा उल्लेख आहे. त्यावरून कफ-स्थान आणि पित्तस्थान एक असणार नाहीं, कारण एक उष्ण आणि दुसरा शीत असे हे दोन परस्परविरोधि गुण एकत्र कसे नांदावे ? शिवाय, अन्नपचनाचे विवेचनामध्यें आमाशय हें कफस्थान असून त्या

जागीं अन्नाला माधुर्य येऊन कफ वाढतो असा उल्लेख आहे. त्यावरून (आदौ षड्रसमप्यन्नं मधुरीभूतमीरयेत्, फेनीभूतं कफं) नाभिरामाशयः इत्यादि पित्तस्थानांतील आमाशय म्हणजे पच्यमानाशय होय. कफामुळेंच अन्नाचें आर्द्रीभवन होऊन पचन होतें. तरी आमाशयापासून वांती होते. मग वांती ज्या स्थानांतून होते अशा कफाचे स्थानरूपि आमाशयापासून होणारा विकार पित्ताचा कसा ? त्याचा तर स्पष्टपणें अम्लपित्त असा उल्लेख असून पित्तविकारामध्यें त्याची गणना आहे. मग अम्लपित्त ह्मणजे काय ? अम्लपित्त या नांवावरूनच अम्ल असें पित्त असा उघड अर्थ होत आहे. आमाशयाचें अविकृत कार्य ह्मणजे त्यांत आलेल्या चतुर्विध आणि षड्रस अशा विधियुक्त आहाराला पातळपणा, माधुर्य, आणि फेंसाळपणा उत्पन्न करून खालीं पच्यमानाशयांत जाण्याला लायक बनविणें हें आहे. ज्या वेळीं स्वभावतः विदाहि अशा तीक्ष्णोष्णाम्ल इत्यादि पदार्थांचा आहारांत अधिक उपयोग होतो त्यावेळीं असल्या आहारामुळें आमाशयांतील हें कार्य नीट न होतां तेथें आंबटपणा उत्पन्न होतो, आणि पुष्कळ संवयीनें आमाशयाला अशी खोड लागते कीं, तेथें गेलेला कोणताहि पदार्थ अम्ल व्हावा अशा रीतीनें अनैसर्गिक क्रिया चालू झाली ह्मणजे असलें आंबलेलें व अम्लविशिष्ट अशा तीक्ष्णोष्ण गुणांचें अन्न सहन करण्याची स्वभावतः मृदु अंतर्भागाचे आमाशयाला शक्ति नसते, व त्यामुळें अन्नाचा या गुणानें क्षोभ होऊन विकृत अन्न मुखावाटें बाहेर फेकलें जातें, हीच वांती आणि असली विकृति म्हणजे अम्लपित्त होय. असल्या अन्नांत अम्ल तीक्ष्ण असे गुण येतात व ते पित्ताचे असतात. पण कारण पित्ताची उष्णता नसून अपक्वपणा असतो. म्हणूनच याला अम्लपित्त नांव आहे. म्हणजे पित्ताची वाढ ही विकारोत्पादक दृष्टि नसून पित्ताचा अस्वाभाविक कोप ही असते. या विकारावर उपायहि असे असतात कीं जे ही आंबण्याची क्रिया आपल्या प्रभावानें थांबवून पचनाला मदत करतील; अर्थात् उष्ण असे असतात. जर उष्णत्वानें हा विकार पित्तापासून होईल तर उपाय उष्ण न करितां पित्ताचें उष्णत्व विरोधी शीत करावे लागतील, तसे न करतां उष्ण व अम्लविरुद्ध असे उपचार करावे लागतात. अम्लपित्त या विकारावर सूतशेखर हें आयुर्वेदीय औषध प्रसिद्ध आहे. यामध्यें पारा, गंधक, ताम्र, बचनाग, त्रिकटु इत्यादि पदार्थ शीत नाहींत तर ते उष्णवीर्य आहेत. यांमध्यें पचनशक्ति वाढविण्याचें सामर्थ्य असून शिवाय ते प्रभावानें अम्लत्व विरोधी ह्मणजे आंबण्याच्या क्रियेला घालविणारे आहेत ह्मणूनच अम्लपित्तावर गुणकारी होतात. सूतशेखर हें औषध पित्तावर आहे याचा अर्थ तें

उष्णतेवर आहे, असा केल्यास चूक होईल. या औषधाची आयुर्वेदीय ग्रंथांत योजना अम्लपित्त या प्रकरणांतच आहे ही गोष्ट लक्षांत घेतां त्याचे उपयोगाचें धोरण ध्यानीं येईल.

केवळ उष्णस्वरूपी पित्ताचे विकार ह्मणजे धातुशोष, दाह, तहान, भूक, डोळ्यांची आग, अल्पनिद्रा अशा स्वरूपाचें, केवळ उष्णतेची वाढ दाखविणारे असेच आहेत. बाकी विकार ह्मणजे प्रवाही पित्ताचे आहेत. कुष्ठ, व्रण, विसर्प इत्यादि विकार आणखी आहेत परंतु ते धात्वाश्रयी प्रवाही पित्ताच्या विदग्धावस्थेमुळें होणारें असून कोठें. अम्लतेमुळें कुजणें तर कोठें तीक्ष्णतेमुळें विदारण अशा स्वरूपाचे आहेत. या एकंदर विवेचनावरून पित्ताचें स्वरूप ध्यानीं येईल. आयुर्वेदामध्यें शरीराच्या मुख्य अशा ज्या तीन क्रिया त्यांपैकीं दुसरी पचनाची क्रिया करणारें असे सामर्थ्यसंपन्न जे धात्वाश्रयी परमाणु त्यांना पित्त हें नांव दिलें आहे. अन्नपचनाचेविषयीं फारशी शंकेला जागाच असत नाहीं. परंतु सर्व शरीरांतील सर्व पदार्थांचें सदैव पोषण व्हावें लागतें, व तसें तें होतहि असतें. ज्याप्रमाणें अन्न हें सर्व शरीराचें पोषक आहे त्याचप्रमाणें पहिला धातु हा दुसऱ्याचा पोषक असतो. म्हणजे रसरक्तादि क्रमानें सात धातु, आपल्या पुढील धातूमध्यें रूपांतरित होत असतात, आणि हें रूपांतर होणें रक्तापासून मांस, मांसापासून मेद, हें काम त्या त्या भागांत जी नैसर्गिक पचनशक्ति असते तीमुळें होतें व याच पचनशक्तीला पित्त हें यथार्थ नांव आहे. धातुपोषणाचे बाबतींत आयुर्वेदामध्यें प्रामुख्यानें तीन मतें किंवा प्रकार वर्णन केले आहेत. त्यालाच तीन प्रकारचें रुधिराभिसरण असेंहि व्यावहारिक भाषेंत म्हणतां येईल.

पैकीं एक प्रकार असा कीं अन्नरस हृदयांत आल्यावर तो हृदय आणि उरस्थान यांना गति देणाऱ्या वायूकडून सर्व शरीरभर एकदम फेंकला जाणें आणि अशा प्रकारची निरंतर आणि निरोगी शरीरांत अव्याहत चालणारी पोषणक्रिया, अर्थात् जर रसधातु (आधुनिक भाषेंत रक्त) हाच सर्वत्र आणि सर्वकाळ शरिरांत पसरतो, तर शरीरपोषणाचा मुख्य क्रम म्हणजे रसविक्षेपच मानावा लागेल. व मग दुसरा प्रकार संभवणार नाहीं.

व्यानेन रसधातुर्हि विक्षेपोचितकर्मणा ।
युगपत्सर्वतोऽजस्रं देहे विक्षिप्यते सदा ॥ १ ॥

अ. हृ.

' रसगतौ, अहरहर्गच्छति इति रसः ॥

(सुश्रुत ॥)

दुसरा प्रकार म्हणजे, रसापासून रक्त, रक्तापासून मांस याप्रमाणें

क्रमशः एका धातूहून दुसऱ्या धातूचें पोषण, अशा प्रकारचा. याचा क्रमः—

रसाद्रक्तं ततो मांसं मांसान्मेदस्ततोऽस्थि च ।
अस्थ्नो मज्जा ततः शुक्रं ॥

(अ. हृ.)

असा सांगितला आहे. हे दोन नियम व तदर्थसूचक वाक्यें स्पष्टपणें विरोधी भासतात. पहिल्यामध्यें अन्नरसच सर्व शरिरामध्यें अर्थात् सर्व धातूंमध्यें फेंकला जातो असा अर्थ असून दुसऱ्यांत धातु–परंपरेचा विशिष्टक्रम सांगितला आहे. याचा अर्थ काय ? असा साहजिक प्रश्न उपस्थित होतो. करतां या विरोधाभासाचा प्रथम विचार केला पाहिजे. अगदीं उघड दिसणारी व पटणारी गोष्ट म्हणजे, विविध अन्नाचें पचन होऊन त्याला पातळ रसाचें स्वरूप येतें. व अर्थात् हें स्वरूप असें असतें कीं त्याचा सर्व लहानमोठ्या शरीरविभागांमध्यें प्रवेश व्हावा. शरिराचे सर्व भागांत रक्तवाहिन्या आहेत, व त्यांच्या अतिसूक्ष्म अशा सर्वत्र पसरलेल्या जाळ्यांतून हा रसधातु शरिराचें पोषण करितो. व तसाच उल्लेखहि आहे.

याभिरिदं शरीरमाराम इव जलहारिणीभिः केदार इव कुल्याभिरुपस्निह्यते अनुगृह्यते च। (सु. शा.)

सर्व शरीरभर पसरलेल्या या रसवाहिनींचे द्वारें बगीचा अथवा शेत पाण्यानें भिजतें त्याप्रमाणें सर्व शरीर रसयुक्त होतें. म्हणजे पहिला प्रकारच अनिर्वाद ठरतो. व रुधिराभिसरणाचे बाबतींत सामान्य समजूतहि अशीच आहे. अर्थात् मग दुसरा नियम फोल ठरतो. परंतु वस्तुस्थिति अशी आहे कीं, वरील नियमान्वयें एकदां सर्व शरिरामध्यें अर्थात् धातूमध्यें रसप्रवेश होऊन दैनंदिन विधी चालू झाला कीं, प्रत्येक धातूचें रूपांतर अथवा पर्यवसान कशांत होतें ? हा प्रश्न कायमच राहतो. शरीर हा पदार्थ प्रतिक्षणीं उत्क्रांतावस्था भोगीत राहणारा आहे. व शरीर म्हणजे त्यांतील प्रत्येक धातु पच्यमान अवस्थेंतील किंवा उत्क्रांतीचे अवस्थेंतील या धातूंचें कोणत्या तरि उच्च प्रतीच्या पदार्थामध्यें (धातु) संक्रमण अथवा रूपांतर झालें पाहिजे, व हें जें रूपांतर होतें याचाच अर्थ एका धातूपासून दुसरा धातु बनणें होय. व याला अनुसरून हा दुसरा नियम आहे. शरिराच्या धातूंकडे पाहिलें असतां, प्रत्येक धातु एकापेक्षां अधिक स्वच्छ व त्या मानानें अधिक टिकाऊ आहे. व असें स्वरूप त्या त्या भागांतील नैसर्गिक पचनशक्तीनें प्रत्येक धातूमध्यें निर्माण होतें. (या दुसऱ्या प्रकाराला केवळ रुधिराभिसरण असें संबोधणे अर्थशः विसंगत असून त्याला धातूचें अभिसरण असें नांव अधिक शोभेल. परंतु व्यवहारांत रूढ म्हणूनच रक्ताभिसरण हा शब्द योजला आहे.)

अन्नरस हा अशाप्रकारें एक महिन्यानें शुक्र धातूचे अवस्थेला पोहोंचतो. आणि पोषक पदार्थांचें इतिवृत्त म्हणजे शुक्रावस्था प्राप्त होणें हेंच आहे ही शुक्रावस्था यावयाची म्हणजे अन्नरसावर रंजक पित्ताचा संस्कार होऊन तो सर्व धातूंमध्यें फेंकला जातो. व त्या धातूंमध्यें त्याचें धात्वाश्रयी पित्तानें अथवा पाचकशक्तीनें पचन होऊन उत्तरोत्तर धातूंची उत्पत्ति होते. व यासाठीं त्या जागीं धातूंमध्यें म्हणजे सर्व शरिरांत पित्ताची अवश्यकता असतेच. शरिरांतील पचनाक्रियेचें वर्णन करतांना जो धात्वग्नि म्हणून सांगितला आहे, तो याच उद्देशानें होय.

अन्न भौतिकधात्वाग्निकर्मेति परिभाषितम् ॥ अ. हृ. ॥
सारस्तु सप्तभिर्भूयो यथास्वं पच्यतेऽग्निभिः ॥ अ.हृ. ॥
स्वस्थानस्थस्य कायाग्नेरंशा धातुषु संश्रिताः ।
तेषां सादातिदीप्तिभ्यां धातुवृद्धिक्षयोद्भवः ॥ अ. हृ. ॥

धात्वंतर्गत अशी जी ही पचनशक्ति तीच आयुर्वेदीयांचें सर्व शरीरव्यापी असें पित्त होय. पोषक पदार्थ त्या त्या धातूमध्यें गेल्यावर त्यांचें पचन होऊन प्रत्येक ठिकाणीं सारभाग व मलभाग व त्याबरोबर त्या त्या धातूचें वास्तविक स्वरूप असे तीन प्रकार होतात. व अशा रितीनें प्रत्येक धातु हा ह्या तीन अवस्थांमध्यें असतो असा उल्लेख आहे.

स्थूलसूक्ष्ममलैः सर्वे भिद्यंते धातवस्त्रिधा ॥
स्वःस्थूलोंशः परं सूक्ष्मस्तन्मलं याति तन्मलः ॥ डल्हणाचार्य ॥

प्रत्येक धातूचें स्वरूप स्थूल, त्यापुढील धातु सूक्ष्म व या पचनक्रियेमध्यें निघणारा मळ, त्याचा मळ याप्रमाणें हें पचनाचें कार्य अविरत चालू असतें. कोणत्या धातूचा मळ कोणत्या याची यादी अशी आहेः—

कफः पित्तं मलः खेषु प्रस्वेदो नखरोमच ।
स्नेहोऽक्षित्वग्वेशामोजो धातूनां क्रमशो मलाः ॥ अ. हृ. ॥

१ कफ, २ पित्त, ३ कान, नाक, इत्यादि स्रोतसांतील मळ, ४ घाम, ५ नखें आणि केंस, ६ त्वचा, नेत्र वगैरे. वरील ६ स्निग्धता आणि ७ ओज, हे क्रमानें, रस, रक्त, मांस, मेद, अस्थि, मज्जा आणि शुक्र या धातूंचे सात मळ होत. (मलाविषयीं खुलासा मागें कफाचे प्रकरणांत केला आहे.) या धातु परंपरेचें निवर्तक पित्त असून अशा प्रकारें धातुपरंपरा अखंड चालू राहिल्याशिवाय जीवित आणि शरिराचे नित्य व्यापार यांचें अस्तित्व राहणार नाहीं. व ही परंपरा ज्या पचनात्मक पित्तामुळें अप्रतिहतपणें राहते तें पित्त, त्रिदोष वर्णनांतील ' ते व्यापिनः, या वचनाप्रमाणें सर्व शरीरव्यापी असावें हें सहज आहे.

अभिसरणाचा तिसरा प्रकार म्हणजे ताबडतोब शरिराच्या कोण-

त्याही विशिष्ट विभागामध्यें एकाद्या धातूची वाढ अथवा ऱ्हास किंवा वैषम्य हा होय. शरीरोपयोगी पदार्थामध्यें कांहीं पदार्थच असे आहेत. कीं ते खाल्याबरोबर कोणत्या तरी एका विशिष्ट भागांत, सामान्य नियमाला सोडून कार्य करतात. हें कार्य क्वचित् रोगोत्पादक अर्थात् अनिष्ट किंवा रोगविनाशक म्हणज इष्टहि असेल सद्यःफलदायी औषधांची अथवा व्याधिप्रत्यनीक चिकित्सेची उभारणी याच पदार्थांच्या गुणांना अनुसरून केलेली आहे. या गुणांना ‘ प्रभाव, हें आयुर्वेदीय नांव आहे. हा तिसरा प्रकार प्रभावात्मक असल्याकारणानें विशेष वर्णनीय नाहीं. तथापि द्रव्यांतर्गत अशा या प्रभावानें जरि त्या द्रव्याचें कार्य ‘ वृष्यादीनि प्रभावेण सद्यः शुक्रादि कुर्वते ’ (शुक्रवर्धक वगैरे पदार्थ केवळ प्रभावानेंच तत्काळ शुक्रादि धातूंचीं वर्धक होतात अ. हृ.) या नियमान्वयें निरनिराळया धातूंमध्यें होत असलें तरी असल्या द्रव्याचा प्रवेश धातूंमध्यें झाल्यावर तें आत्मसात् करून घेण्यासाठीं पुन्हां धात्वाश्रयी पित्ताची आवश्यकता आहेच एरवीं कितीही शीघ्रकारी द्रव्य असलें तरी त्याचा प्रभाव ताबडतोब धातुप्रवेशाला उपयोगी झाला पण आत्मीकरणाला पित्ताची अगर स्थानीपाचक परमाणूची गरज आहे म्हणजे रसविक्षेपापासुन होणाऱ्या धातुपोषणाला, पूर्वधातूपासून उत्पन्न होणाऱ्या धात्वंतराला किंवा प्रभावजन्य कार्याला एकूण या तीनहि प्रकारामध्यें पित्ताची आवश्यकता अनिर्बंध असते. या तीन अवस्थांमध्यें पित्ताची क्रिया कमी झाल्यानें होणाऱ्या विकारांचीं ठळक उदाहरणें ह्मणजे पहिल्या प्रकारामध्यें राजयक्ष्मा किंवा कफक्षय; दुसऱ्यांत मेदोवृद्धि आणि तिसऱ्यामध्यें रोगाची असाध्यता व सुजेची पक्वावस्था हीं होत. रसधातूंमध्यें पित्ताची उणीव ह्मणून योग्य पचन किंवा सारकिट्टांचें विभाजन न झाल्यानें स्त्रोतोरोध

‘ रसोऽप्यस्य न रक्ताय मांसाय कुत एवतु । ’

या (राजयक्ष्मा) च्या रसापासून रक्तच होत नाहीं मग मांस कोठून होणार ? अ हृ. याप्रमाणें धातूंची उत्पत्ति होत नाहीं. दुसऱ्या प्रकारांमध्यें स्निग्धाहारी व अव्यायामशील मनुष्याचे भेदामध्यें पाचक तत्वाचा अभाव झाल्यानें भेदाचें सारकिट्ट विभाजक न होतां एकाच धातूची अनैसर्गिक वाढ झालेली दिसून येते व अर्थात् पुढील धातूमध्यें कमतरता येते. तिसऱ्या प्रकारामध्यें—ज्यावेळीं कितीहि प्रभावशाली औषध उपयोगांत आणिलें, त्याचे प्रभावानें त्या भागांत तें पोंचावें तेथें पोंचलेंहि पण जर तेथील सात्मीकरणाचें तत्त्व क्षीण झालेंतर त्या औषधांचा कांहींच उपयोग न होतां एकाला उत्तम गुणकारी असणारा पदार्थ दुसऱ्याला निर्गुणी होतो व म्हणूनच, रोगाच्या असाध्य अवस्थेमध्यें ‘ अक्षनाशन ’ ह्मणजे इंद्रियनाश करणारा असाध्य असा उल्लेख

आहे. आणि चिकित्सा करतांना, साध्यासाध्यता, रोगाची वाढ, स्थैर्य किंवा कमी होण्याची प्रवृत्ति यांपैकीं ह्मणजे शास्त्रीय भाषेंत आम, पच्यमान व पक्वावस्था हीं अवस्थांतरें, उत्पत्ति आणि प्रगति याचा वेग इत्यादि गोष्टी समजून ध्यावयाच्या ह्मणजे इंद्रियांच्या शक्तीचें व कार्याचेंच सूक्ष्मावलोकन करावयास पाहिजे. निरोगी शरिराची 'स्वस्थहित' ह्मणजे पथ्य पदार्थांनीं वाढ होण्यासाठीं त्याचप्रमाणें रोगी शरिरांतील विकृति घालविणाऱ्या शमन द्रव्यांचें रोगविनाशक कार्य घडवून आणण्याकरितां, त्याचप्रमाणें रोगोत्पादक पदार्थांचे शरिराचे त्या त्या भागावरील कोपन कार्य घडत असतां या तत्स्थानीय पित्ताची ह्मणजे पाचक परमाणूंची किंवा पाचक पिंडांची इतकी अवश्यकता ध्यानीं घेतल्यावर 'विकृता घ्नंति आणि अविकृता वर्तयंति ' हें सत्य असल्याची खात्री होईल. उत्तम पोषक असा पदार्थ आरंभीं ज्या भागाचा पोषक त्या भागापर्यंत जाऊन त्याला चिकटल्याशिवाय ज्याप्रमाणें तो निरुपयोगी आणि हें चिकटविण्याचें, भर घालण्याचें व आयुर्वेदानें विसर्ग नांव दिलेलें पोषक कार्य श्लेषणात्मक परमाणु समुदायरूपि कफानें केलें जातें, त्याचप्रमाणें अशा संग्राहत पदार्थांचें शारीरिक पदार्थांशीं पूर्ण तादात्म्य करून त्यांचें सारकिट्ट विवेचन करण्याचें कार्य झाल्याशिवाय हा संग्रह निरुपयोगी होऊन शारीरस्वाध्य राहणार नाहीं. शरिराच्या प्रत्येक लहान मोठ्या भागामध्यें ही क्रिया सुव्यवस्थित चालून आरोग्ययुक्त असें त्याचें संवर्धन होतें. अव्यवस्थित झाल्यास व्याधिसंभव, आणि व्याधिविनाशक पदार्थांचा उपयोग करून पुनरारोग्य अशा क्रिया करणारें हें पित्त ह्मणजे पाचक तत्व होय. आणि तें ज्या जातीच्या पदार्थांचे आश्रयानें राहतें, त्या पदार्थांचें ' सस्नेहतीक्ष्णोष्णं ' हें वर्णन आहे. वांतींतून पडणाऱ्या पित्तालाच आयुर्वेदीय पित्तदोष मानून समजुतीचा विपर्यास करणारांनीं या गोष्टीकडे आधीं लक्ष द्यावें. वांतींतून पडणाऱ्या पित्ताचा खुलासा ' अम्लपित्त ' या विकाराचे स्पष्टीकरणांत केला आहे. आयुर्वेदांतील पित्ताची यथार्थता ध्यानीं येण्याला या सर्व गोष्टी ध्यानीं घेऊन हें **पित्त म्हणजे शरिराच्या विविध विभागांच्या विचित्र रचनेनुसार कमी अधिक प्रमाणानें सर्वत्र व्यापून राहिलेल्या पचनसामर्थ्यसंपन्न परमाणूंचा समुदाय होय.** सोयीसाठीं याला पाचकतत्व नांव द्यावें. याचें मुख्य कार्य आरंभींचे श्लोकांत सांगितलें आहे. तें आदान होय. आदान ह्मणजेच विसर्ग किंवा पोषणानंतर त्या पदार्थांचें पाचन, शोषण अथवा विभाजन होय, व हें कार्य सर्वत्र होतें. तें ज्यानें केलें जातें त्याचें यथार्थ नांव आयुर्वेदियांनीं पित्त ठेविलें आहे. पित्त ह्मणजे वांतींतून पडणारा मळहि नव्हे आणि केवळ कल्पनागम्य शक्तिहि नव्हे तर शक्तिसंपन्न

असे शरिरांतील सूक्ष्म परमाणु होत. शरिरामध्यें हे परमाणु केव्हांहि अन्योन्याश्रयीच राहतात. अशा पित्ताला वर्णनाचे आणि शरिरांतील अनेकविध क्रियांचे स्पष्टीकरणासाठीं शोषक पिंड पाचक पिंड किंवा विभाजक पिंड अथवा परमाणु नांव दिल्यास चालेल.

वायु.

आयुर्वेदाचे मूल तत्वांपैकीं तिसरें व मुख्यतत्व वायु हें होय. या शब्दाचा अर्थ गतिमान पदार्थ असा आहे. ' वा ' या गत्यर्थक धातूपासून हा शब्द तयार झाला आहे. शरिराची उत्पत्ति आणि वाढ मागें सांगितल्याप्रमाणें पंचभौतिक परमाणूंचा संग्रह किंवा विसर्ग आणि आदान किंवा शोषण अथवा पचन या अनुक्रमें कफ आणि पित्त या दोन दोषांनीं झाल्यावर त्याच परमाणूंना गतीची अवश्यकता असते. अशासाठीं कीं, स्वीकृत असे परमाणु हे शरिराच्या अनेकविध आणि परस्पर विसदृश अशा भागांमध्यें पोंचवावे लागतात. अर्थात् हें ह्या परमाणूंचें स्थलांतर होण्याला गतीची आवश्यकता असते. आहार्य पदार्थ जिभेवर ठेवल्यापासून त्याचा अंतःप्रवेश होऊन निरनिराळ्या घटकांत रूपांतर होईपर्यंत हे पोषक परमाणु फिरत्या स्थितीमध्यें असतात. व ही जी फिरण्याची शक्ति ही अर्थातच वायूची असते. अनेकविध आहाराचें रस धातूमध्यें रूपांतर झाल्यावर तो रस सर्व शरीरभर पसरविणें, किंवा फेंकणें, त्याचप्रमाणें एका धातूंतून दुसऱ्या धातूमध्यें पोषकांचे गमन हें वायूनें ह्मणजे गतिविशिष्ट अशा सामर्थ्यसंपन्न व सूक्ष्म अशा अनंत परमाणूंनीं होतें. हें एक प्रधान कार्य असून त्यावरोबरच शरिरांत कार्य करून निःसत्व अर्थात् मळरूपी जे निरुपयोगी पदार्थ असतात, त्यांना शरिराबाहेर फेंकून देणें हेंहि तितक्याच महत्त्वाचें गतीचें कार्य आहे. त्याचप्रमाणें शरीरव्यापार जें चलनवलन श्वासोच्छ्वास चालणें, बोलणें इत्यादि स्थूल व स्पर्श आणि संवेदना असे सूक्ष्म त्यांचेंहि कर्तृत्व गतिमान् पदार्थाकडेच असतें. व या त्रिविध अशा महत्वाचे आणि शरिराचे अस्तित्वाला आधारभूत क्रियांचें कर्तृत्व ज्या गतिसामर्थ्यसंपन्न तत्वाकडे आहे त्याला अन्वर्थक असें गतिवैशिष्ट्याचें निदर्शक वायु हें नांव देऊन त्याचा मुख्य तत्वांमध्येंहि प्रामुख्यानें उल्लेख करणें आयुर्वेदीय शारीरशास्त्राला अवश्य वाटणें अस्वाभाविक नाहीं. गतीशिवाय–मग ती स्थूल दृष्टीला गम्य असो वा सूक्ष्म दृष्टीचा विषय असो–अस्तित्व नाहीं, हें उघड होतें. शरीरामध्यें या गतितत्वाचा कार्यभाग कसा आणि कोणत्या स्वरूपानें होतो याविषयीं स्पष्ट बोध होण्यासाठीं वायूचें स्वरूप व त्याबरोबरच शारीरिक परमाणूंचें सामान्यस्वरूपहि ध्यानीं ध्यावयास पाहिजे.

वायु म्हणजे काय ?

' वायु, म्हणजे दृष्टीला अगम्य असे स्पर्शानुमेय सूक्ष्म परमाणु होत. याविषयीं कोणाचाच वाद नाहीं. ' रूपरहित स्पर्शवान वायुः, ह्मणजे ज्याला रूप नाहीं व ज्याचें अस्तित्व स्पर्शानुमेय आहे, असा वायु असतो. हा नैय्यायिकांचा सिद्धांत आहे, एक गोष्ट लक्षांत ठेवणें अवश्य आहे ती ही कीं, पंचमहाभूतांचें तात्विक शुद्ध स्वरूप हें इंद्रियगोचर असत नाहीं. तर ' व्यपदेशस्तु भूयसा ' या न्यायानें गुणांचे आधिक्यावरून तत्तद्विशिष्टपदार्थ ओळखले जातात. पृथ्वी, आप, तेज हीं महाभूतें अनुक्रमें गुरुत्व, आर्द्रत्व, व प्रकाशित्व या गुणांचीं खरीं पण तीं पृथक्तया उपलब्ध नसून अन्योन्याश्रयी असतात. व त्याप्रमाणें वायूचा मुख्य धर्म जरि ' गति ' हा आहे, तथापि ही गति अतिसूक्ष्म कां होईना पण परमाणूचे आश्रयानेंच राहते. या गतीचे आश्रयीभूत जे सूक्ष्म परमाणु त्यांना वायु हें नांव आहे. हे परमाणु अर्थातच आकाश अथवा पोकळी यांमध्यें राहतात. व ' आकाशात् वायु ', हा सिद्धांत याच तत्त्वाचें प्रतिपादन करीत आहे. त्यांतहि अगदीं शुद्ध शास्त्रीय विवेचनामध्यें जरि अमिश्रस्थितींतील पंचमहाभूतें वर्णनासाठीं विवक्षित असलीं तरि–'पंचमहाभूतशरीरिसमवाय स्वरूपि' अर्थात् विशिष्टप्रतीचें पांचभौतिक मिश्रस्वरूप असलें जें शरीर त्यांमध्यें असणारीं जीं पंचतत्वें त्यांचें शरीरस्थिति–निवर्तक वर्णन हें अमिश्र नसून मिश्रस्थितींतील व आधिक्यावरूनच निर्दिष्ट असावयाचें. या तात्विक दृष्टीनें विचार केला म्हणजे शरीरांतर्गत वायु हा सूक्ष्म परमाणूंचा आश्रित व तदाकार पदार्थ आहे, हें सहज ध्यानीं येईल. सामान्य नियमाप्रमाणें असल्या वायूचे अस्तित्वालाहि त्याचे प्रमाणानुरूप आकाशाची–अवकाशाची–आवश्यकता आहेच व शरिरांत जें कोटिशः विभक्त आकाश म्हणजे लहान मोठीं अनंत स्रोतसें हें वायूचें निवासस्थान होय. शरीर हें सर्वथा स्रोतोमय आहे. अन्नमार्ग, मलमार्ग, श्वासमार्ग वगैरे जसे स्थूल स्रोतोमार्ग आहेत, त्याचप्रमाणें प्रत्येक परमाणूंमध्येंहि मार्ग पाहिजे. शरीरपोषक असें शुद्ध रक्त आंत येण्यासाठीं आणि पचनानंतर मलरूपि पदार्थ बाहेर टाकण्यासाठीं हा शरीरघटकांचा समुदाय स्रोतोमयच असणें अवश्य आहे. आणि तसा तो आहे. म्हणूनच चरकामध्यें ' स्रोतसामेव समुदायं पुरुषमिच्छंति ' असें शरीराचें वर्णन आहे. हीं स्रोतसें इतकीं आहेत कीं, त्यांमुळें स्रोतःसमुदाय म्हणचे शरीर अशी शरिराची व्याख्या केली. अगदीं व्यावहारिक भाषेत बोलावयाचें तर शरीर म्हणजे एक सच्छिद्र परमाणूंचा समुदाय असें म्हणतां येईल. हीं स्रोतसें किंवा सच्छिद्रें वायूनेंच भरून राहिलेलीं असतात. यांमध्यें जर

वायु नसेल तर सच्छिद्रता अबाधित राहणारच नाहीं. वर सांगितल्याप्रमाणें गतिसामर्थ्यसंपन्न असे वायूचे विरळ परमाणु यांमध्यें भरून राहिलेले असतात व ते अर्थातच गतियुक्त असल्याकारणानें सदैव त्यांची हालचाल चालू असते. व तिचा परिणाम आश्रयभूत स्रोतसांवर होऊन परस्पर संनिकर्षामुळें ही हालचाल सर्व शरीरभर अतिअल्प काळांतच पसरते. आणि शरिराचे मांस पेशीसारखे स्थूल अवयव जरि सक्रिय दिसतात, तरि त्यांच्या क्रिया निवर्तक अशा गतीचा पुरवठा अंतर्गत जीं सूक्ष्म स्रोतसें तदाश्रयी वायूकडूनच होत असतो, ही सहज पटणारी गोष्ट आहे. सूक्ष्मतया सृष्टपदार्थांचें निरीक्षण केल्यास असें दिसून येईल कीं, परस्परविरोधी असेच पदार्थ कांहीं विशिष्ट मर्यादेमध्यें साहचर्यानें राहात असतात. आणि त्यांचें हें साहचर्यच परस्पर अस्तित्वाला साधक असतें पंचभौतिक विवेचनामध्यें ' आकाशाचें ' स्वरूप ' पोकळी ' अर्थात् परमाणुरहित असें वर्णिलें जातें. पण पोकळी दाखविण्याला आवरण असतें, तें अगदीं विपरीत गुणाचें म्हणजे स्थूलस्वरूपि पार्थिव असेंच असतें. शरिरामध्येंहि स्रोतोरुपि जें आकाश त्याचें आवरण मांसमय अर्थात् स्थूलाश्रयी असतें. हे जे परस्परविरोधी पदार्थ ते एकत्र राहून एकमेकांचे सामर्थ्यानें परस्परांना जणुं पराजित करण्याचे प्रयत्नांत असतात. व या प्रयत्नांमध्येंच जी शरिराची हालचाल स्वाभाविक घडून येते, तीमुळें त्यांच्या नित्य व्यापारांची उत्पत्ति होते. दैववशात् किंवा आहाराचारवशात् ज्या प्रकारच्या पदार्थाला बाह्यतः मदत होते त्याचें सामर्थ्य वाढून विरुद्ध गुणांचे पदार्थांची किंवा तदाश्रयी गुणाची क्षीणता होऊन नेहमींच्या सम प्रमाणावस्थेंतील स्वाभाविक क्रियांमध्यें अव्यवस्थितपणा येतो. व या अपरिचित वैधर्म्याला चिकित्साशास्त्रामध्यें रोग हें नांव देण्यांत येतें.

अशा प्रकारें यांचें हें साहचर्यच एकमेकांना मर्यादित ठेवण्याचें उत्कृष्ट साधन होतें. पार्थिव असें जें शरीर त्यामध्यें स्वाभाविकतयाच पार्थिवांश किंवा स्थूलता अधिक ही गोष्ट खरी असली तरि पार्थिव परमाणूंची देवघेव, आयात, निर्गत किंवा आयव्यय व त्या व्यवहारांतील सहज व्यापारांनीं घडून येणारा दैनंदिन कार्यक्रम या सर्वांचें कर्तृत्व स्थूलत्वरहित व गतिशील अशाच पदार्थांकडे असावयाचें. या क्रिया नाहींशा झाल्यावर क्रियाशून्य झालेलें जड शरीर थोडावेळ सुद्धां टिकूं शकत नाहीं. व म्हणून शरिराचें अधिष्ठानभूत जें पार्थिव व आप्य द्रव्य किंवा आर्द्र परमाणुगण त्याच्या क्रिया निवर्तक अशा ज्या दोन तत्वांचा कफ व पित्त या नांवानें उल्लेख केला. त्यांचें संग्रहात्मक व पचनात्मक कार्य होण्याला संक्रमण घडविणाऱ्या गतीची अत्यंत आवश्यकता व ती ज्या अणूंच्या आश्रयानें उपयोगी पडते, तो शरीरां-

तर्गत पदार्थ वायु होय. गतिमत्व मानतांच तो पदार्थ 'हलका' आहे ही गोष्ट उघड होते. जडाला गति नाहीं. पदार्थ हलका असणें याचें सहजगम्य कारण ह्मणजे त्यामध्यें घनता नसणें, विरलता असणें हें सहज ध्यानीं येतें. विरळ असण्याचें कारण चिकटविण्याला किंवा परमाणूंचे परस्पर सन्निकर्षाला साधनीभूत अशा स्निग्धतेचा अभाव व या स्निग्धतेच्या अभावीं कोणताहि पदार्थ खरखरीत असणार न चिकट त्यामुळें विरळ अर्थात् सूक्ष्म असणें अणुभूत पदार्थाचें स्वरूप राहून त्याला सूक्ष्म मार्गांतून प्रवेश सुलभ होतो. गति हें तत्व व तदाश्रयीभूत पदार्थांचें हें स्वरूप विशद करण्यासाठींच आयुर्वेदानें वायूचें वर्णन–

'तत्र रूक्षो लघुः शीतः स्वरः सूक्ष्मश्चलोऽनिलः ॥'

वायु रुक्ष, हलका, खरखरीत, सूक्ष्म चंचल व शीत असें केलें आहे. हें वर्णन गतीचें नसून गतिमान् पदार्थाचें आहे. गति हा धर्म किंवा गुण आहे. व गुणावर गुणाचा आरोप करतां येत नाहीं. गुण हे गुणयुक्त नसून पदार्थ गुणी असतात, हें तत्व अबाधित आहे. कफ आणि पित्त याप्रमाणेंच वायु हाहि सूक्ष्म कां होईना पण पदार्थच आहे. तसें न मानल्यास 'गति' सूक्ष्म खररूक्ष मानावी लागेल. आणि तसें मानणें हास्यास्पद होईल शिवाय वैद्यशास्त्रामध्यें हे पदार्थ अशा प्रकारें मानले आहेत कीं त्यांची न्यूनाधिकता बाह्य सृष्टींतील पदार्थांनीं करून आरोग्यविघातक असे वैषम्योत्पन्न व्याधि दूर करावयाचे असतात. वायु कमी झाला असतां वातकारक पदार्थांची भर घालावयाची. आणि कमी करावयाचा म्हणजे प्रत्यक्ष वायु काढून टाकणें, अर्थात् पदार्थ काढून टाकणें, शोधन बस्तीनें पक्वाशयामध्यें असलेला अतिरिक्त व विकारकारी वायु काढून टाकावयाचा असतो. यासाठीं दोषांना पदार्थच मानणें भाग आहे. शेकणें वगैरे उपायांनीं वायूचें शमन होतें. आणि अशा वेळीं वायूचें, पदार्थ ह्मणून उत्सर्जन होत नाहीं. परंतु ही क्रियाच वातनाशक नव्हे. शेकण्यानें वायूचें केवल स्थलांतर होतें. तत्त्वतः न्यूनाधिक्य होत नाहीं. आणि ह्मणूनच त्याचे पदार्थत्वाला बाध येत नाहीं.

शरीरांतील हालचालीचें प्राधान्य व क्रम.

शरीर हा पदार्थ पार्थिव असल्याचा मागें कफाचे वर्णनांत उल्लेख केलाच आहे व असल्या पार्थिव ह्मणजे जडस्वरूपी पदार्थाची वाढ व क्रियाकारिता याला सर्वस्वी गति हें मुख्य कारण आहे. जरि शरीर हें पार्थिव आहे; तरी त्याच्या वृद्धिक्षयात्मक स्वरूपाच्या आणि नित्यप्रवर्तित अशा कार्यकारितेला अवश्य इतका त्यामध्यें आकाशाचा भाग अथवा अवकाश असून हा अवकाश ह्मणजे केवळ पोकळी नाहीं तर त्यामध्यें विरल परमाणुसमुदायस्वरूपी वायु भरलेला आहे. पार्थि-

वांशाचे आधिक्यानें निर्माण झालेल्या पंचभौतिक शरीरांत सच्छिद्रता आहे व ह्मणूनच

" क्ष्मामधिष्ठाय जायते "

अंबुयोन्यग्निपवननभसां समवायतः ॥

तन्निर्वृत्तिर्विशेषश्च व्यपदेशस्तु भूयसा ॥ १ ॥ "

(कोणतेंहि द्रव्य पृथ्वीचे आधारें, पाण्याचे मुख्य साधनानें व तेज, वायु, आणि आकाश यांचे सामुदायिक अंशांनीं उत्पन्न होतें. त्याचा उल्लेख मात्र अधिक अंशानें असलेल्या महाभूतांचे नांवानुसार करण्यांत येतो.)

अशा प्रकारें कोणत्याही द्रव्यासंबंधीं खुलासा मागें केला आहेच. सर्व शरीर हा एक सच्छिद्र घटकांचा समुदाय आहे. हें तत्त्वहि, या गतितत्वाचेंच बोधक आहे. सूक्ष्म स्रोतसांत असलेल्या या सूक्ष्मस्त्ररूपी गतिमान परमाणूंची जी सदैव हालचाल चालू असते, तिचा परिणाम प्रथम या स्रोतसांवर ह्मणजे त्यांतीलहि सूक्ष्म भागावर होतो, त्यानंतर असल्या स्रोतस्समुदायाचा बनलेला जो भाग ह्मणजे शरिराचा एकादा अवयव त्यावर, त्यानंतर त्याचे समीपवर्ति अशा दुसऱ्या भागावर आणि अशा परंपरेनें सर्व शरिरावर होतो. व या क्रमानें सर्व शरिराच्या हालचाली घडतात. बाहेरून—स्पर्शाघातादिकांनीं ज्यावेळीं एकाद्या भागाला गति दिली जाते, त्यावेळीं स्वाभाविकपणेंच तो एकच भाग अधिक कार्यकारी होतो. शिवाय या त्रिदोषांशिवाय शरिरांत मनाचा एक प्रभाव मानावा लागतो. मन जरि इंद्रियगोचर नाहीं, तरि त्याचें अस्तित्वच काय पण कार्यकारित्वहि मानल्याशिवाय भागत नाहीं. इतकेंच नव्हे तर कोणत्याहि क्रियेचें प्रवर्तक मन आहे, असाच सिद्धांत सूक्ष्म विचाराअंतीं पटण्यासारखा आहे. विविध मनोभावना या शरिराच्या विवक्षित भागावरच कार्यकारी होतात, हें सहज कळण्यारखें आहे. शरीर व मन ह्यांचा अन्योन्यसंबंध, मनाची श्रेष्ठता, हा विषय सूक्ष्म आणि सध्या त्याचा विचार मुख्य नसल्यानें सर्वेंद्रियांचें मुख्य प्रेरक मन आहे ही सिद्ध गोष्ट गृहीत धरून त्याचा प्रस्तुत त्रिदोषांशीं काय व कसा संबंध आहे याचाच विचार करावयाचा आहे. आनंद किंवा शोक यांमध्यें उत्तेजित झालेल्या भावनांचा परिणाम विशेष प्रकारें अश्रुवाहिनींवर होतो. भीतीचा परिणाम आंतड्यांवर होऊन जुलाब होतात तिरस्कारानें ललाटत्वचा संकुचित होते, तर आश्चर्यानें नेत्र विस्फारित होतात, विचारांत गढलेला माणूस, कोणी ऐनैच्छिक रीत्याच डोकें खांजवूं लागतो तर कोणाच्या डोळ्यांचे ऊर्ध्वप्रांत संकुचित किंवा डोळे अर्धवट मिटून अंतर्मुख दृष्टीचें सहज अनुमान करतां

येतें. विचारांचा अतिरेक होऊन सर्व इंद्रियांत जोराची चळवळ चालू झाली म्हणजे एके जागीं बसणें अशक्य होऊन माणूस येरझारा घालूं लागतो. प्रश्नात्मक भावना उत्पन्न होतात. मान व चेहरा यांमध्यें प्रश्न-चिन्हाकृति लंबगोल आकार सहज येतो. रागावतांच मुठी वळणें, पाय आपटणें, आदरभावनेंत छातीवर हात ठेवणें, इत्यादि हालचालींचे मुळाशीं मनोभावात्मकता असते व यावरून सिद्ध होतें कीं, मनाच्या भावना निरनिराळ्या शरीरभागांवर परिणामकारक होतात. याहूनहि सूक्ष्म पण सर्व शरीरव्यापी असा मनाचा शरीरावरील परिणाम म्हणजे रसाभिसरणावर होणारा होय. शीतस्पर्शाचे अभावीं भेसुर कल्पना, विचार स्मरण,यांनीं शरीर रोमांचित होणें,याचें कारण मनाशिवाय दुसरें कोणतें? खाद्य पदार्थांच्या दर्शनानें, स्मरणानें तोंडाला पाणी सुटणें, हा प्रभाव मनाशिवाय दुसऱ्याचा नाहीं. सात्विक आनदानें सर्व शरीरांतील सूक्ष्म घटक ज्यावेळीं प्रसन्न झालेले असतात,त्यावेळीं स्वाभाविकपणेंच विकास पावलेल्या स्रोतसांतून शांतपणें आणि उत्तम रितीनें रक्ताचें अभिसरण होतें.आणि त्याचा परिणाम प्रसन्न आणि स्निग्ध मुद्रा दिसते. याच आनंदांत विशिष्ट भावनांचें प्राबल्य असतां, वैषयिक प्रेमाचा संबंध असतां, किंचित् उत्तेजनाचा परिणाम रसरक्तांची गति वाढवितो. त्यामुळें या प्रसन्नतेमध्यें कांहीं तरि मोहक कां होईना पण अस्वाभाविकता येतेच. यावेळीं प्रसन्नता (चेहऱ्याची) निर्विकार असत नाहीं. तीमध्यें कांहींशी आरक्तता असते. आणि ज्यावेळीं क्रोध येतो त्यावेळीं इतकें उत्तेजन मिळतें कीं, जोरानें फेकल्या जाणाऱ्या रक्ताची स्पष्ट रक्तिमा त्वचेच्या पृष्ठभागावर दिसते. या मनोभावनांनीं घडून येणाऱ्या परिणामांचा शरिराचे व्यापारांवर फार परिणाम होतो. विमनस्क स्थितींत अनुत्तेजित व संकुचित स्रोतसांतून पचनेंद्रियांत पाचक रसांचा स्राव होत नाहीं. सर्व शरिराच्या पोषणाचा मुख्य आधार जें रक्त त्याचें अभिसरणांत विघ्न आल्यानें पोषणांत व्यत्यय येतो. अशा रितीनें मन हें इंद्रियांचें प्रवर्तक असल्याचें उघड होतें. तथापि मनाचा शरिरावर जो परिणाम घडतो, त्याचा क्रम मात्र पूर्वीप्रमाणेंच ह्मणजे प्रथम विरलाणुस्वरूपी वायु, त्यानंतर त्याचा आश्रय असा स्रोतःसमुदाय व त्यानंतर या समुदायाचा बनलेला अवयव व मग दुसरा अवयव याप्रमाणें या मनःप्रेरणेचाहि परिणाम शरिरावर घडत असतो. या स्रोतःसमुदायस्वरूपी अवयवाचा जो संकोचविकासात्मक व्यापार त्याचें स्पष्ट व दृश्य स्वरूप ह्मणजेच त्या त्या शरीरावयवांचें कार्य समजावयाचें व ह्मणूनच शरिरांतील सर्व क्रियामात्रांचा आद्य प्रवर्तक सूक्ष्माणुस्वरूपी आणि गतिमान् वायु होय. अगदीं स्वस्थ बसलेल्या मनुष्याचे शरिरांतहि निरतर उलाढाल, घडामोड चालू असते. प्रत्येक

धातु नवीन सजातीय घेतो. तेथें त्याचें पृथक्करण होतें. निरुपयोगी झिजकट भाग टाकून दिला जातो. पुन्हां या व्यापारांत मिळविलेला पदार्थ त्याहून स्वच्छ होण्यासाठीं दुसऱ्या धातूंत टाकिला जातो; अशी सारखी प्रणाली चालू असून या सर्वांत हालचाल, संकोचविकास हें आद्य कारण आहे आणि हालचाल स्रोतोनिष्ठ वायूची. विधात्यानें शरीरांत एकदां किल्ली देऊन आयुर्मर्यादिकृत्य पुरेल अशी श्वासोच्छ्वासरूपी गति निर्माण करून ठेविली आहे. या क्रियेनें शरिरांतर्गत सर्व स्रोतसांचा संकोच आणि विकास होऊन त्यांची गतिपरंपरा कायम राहते, व शरीराचे सर्व व्यापार सुरळीतपणें चालतात. अशा प्रकारें गति उत्पन्न व्हावयाची ह्मणजे या वायूचे अणूंचा आघात प्रत्याघात अव्याहत चालावा लागतो. एक भाग संकुचित झाला कीं, त्यांतील परमाणूंचा दुसऱ्या टोंकांतील परमाणूंवर आघात होऊन हें सातत्य (अखंडितता) कायम राहतें. आणि या क्रियासातत्यामध्यें ज्या मानानें न्यूनाधिक्य उत्पन्न होईल त्यामानानें शरीरामध्यें विकृति उत्पन्न होते. ह्या कारणामुळें शारीरिक क्रियांचे सुस्थितीला व शरिराचे स्थैर्याला गति साम्य मुख्य साधन आहे, असा प्राचीन शारीरशास्त्रवेत्त्यांनीं सिद्धांत प्रस्थापित केला आहे. गतिसाम्य ह्मणजेच वायूचें साम्य व यामुळें आयुर्वेदीयांनीं वायूचे अविकृतपणावर शरीरारोग्याची सर्व इमारत उभारली आहे.

वायूचें महत्वाचें वर्णन.

अव्याहतगतिर्यस्य स्थानस्थः प्रकृतिस्थितः ।
वायुः स्यात्सोऽधिकं जीवेद्वीतरोगः समाः शतम् ॥ १ ॥

(मा. नि.)

(ज्याचा वायु हा दोष स्वस्थानीं स्वप्रमाणांत व अनिरुद्धगति असा असेल तो निरोगी राहून पूर्ण शंभर वर्षें वांचेल.)

कुपितानां हि दोषाणां शरीरे परिधावताम् ।
यत्र संगः स्ववैगुण्यात् व्याधिस्तत्रोपजायते ॥ १ ॥

(चरक)

(दोष कुपित होऊन ते सर्व शरीरभर पसरत असले तरी शरीराच्या ज्या एकाद्या विकृत अशक्त—भागांत त्यांना अडथळा होईल तेथें रोग होतो.)

क्षिप्यमाणः स्ववैगुण्याद्रसः सज्जति यत्र सः।
तस्मिन् विकारं कुरुते खेवर्षमिव तोयदः ॥ १ ॥ (अ. हृ.)

(नेहमीं फिरणारा रसधातु ज्या विकृत भागांत अडेल त्या ठिकाणीं विकार उत्पन्न करितो. आकाशांत फिरणारा मेघ अडल्या ठिकाणीं वर्षाव करितो त्याप्रमाणें.)

शाखागताः कोष्ठगताश्च रोगा मर्मोर्ध्वसर्वावयवांगजाश्च ।
ये संति तेषां नतु कश्चिदन्यो वायोः परं जन्मनि हेतुरस्ति १
विट्श्लेष्मपित्तादिमलाचयानां विक्षेपसंहारकरः स यस्मात्

(अ. हृ.)

(शाखा, कोठा, मर्म, त्याचप्रमाणें ऊर्ध्वभाग (जत्रूचे वरचा) आणि इतर सर्व अवयव यांचे जे विकार त्यांचे उत्पत्तीला वायूशिवाय दुसरें कारण नाहीं. कारण वायु हा मल, श्लेष्मा (कफ) इत्यादि मलांचा विक्षेप (उत्सर्जन) व नाश करणारा आहे.)

विभुत्वादाशुकारित्वाद्बलित्वादन्यकोपनात् ।
स्वातंत्र्याद्बहुरोगत्वाद्दोषाणांप्रबलोऽनिलः ॥ १ ॥

(अ. हृ.)

सामर्थ्य, शीघ्रकारिता, बलिष्ठपणा, अन्यदूषकत्व, स्वातंत्र्य आणि बहुरोगकारिता, यांमुळें सर्व दोषांत वायु हा प्रबल आहे.

पित्तं पंगुः कफः पंगुः पंगवो मलधातवः ॥
वायुना यत्र नीयंते तत्र गच्छंति मेघवत् ॥ १ ॥ (चरक.)

पित्त पंगु आहे, कफहि पंगु आहे आणि इतर धातु व मलहि पंगु आहेत. हे सर्व वायु नेईल त्या ठिकाणीं, मेघाप्रमाणें जातात. (सामर्थ्य वायूंत आहे.)

त्याचप्रमाणें:--**वायुस्तंत्रयंत्रधरः प्रवर्तकश्चेष्टानामुच्चावचनां, सर्वेंद्रियाणामुद्योगकरः इत्यादि.** (चरक.)

वायु हा शरीराच्या सर्व लहानमोठया व्यापारांचा प्रवर्तक व सर्व इंद्रियांचा प्रवर्तक वगैरे वर्णन आहे. वरील वायूचे गुणवर्णनाचीं वाक्यें ध्यानीं घेतलीं असतां, आयुर्वेदीयांनीं वायूला इतकें महत्त्व कां द्यावें याचा उलगडा होतो. शरीराचा जिवंतपणा, त्याचें स्थित्यंतर व यांमध्यें घडणाऱ्या सर्व प्रकारच्या क्रिया, कोणत्याहि शरीरविभागांत व कितीहि लहानमोठया प्रमाणानें झाल्या तरी त्या, त्या भागांतील गतिमान् पदार्थांच्या सहाय्याशिवाय होत नाहींत व हाच पदार्थ म्हणजे आयुर्वेदांतील अन्वर्थक नामधारी वायु होय. आणि याच हेतूनें त्याला इतकें महत्व असून आरंभींचे श्लोकांत विक्षेप—फेकणें—हें त्याचें मुख्य काम याच उद्देशानें सांगितलें आहे. शरीराचे सर्व भागांत ही विक्षेपणाची क्रिया लहानमोठया प्रमाणानें होणारी असल्यानें ' ते व्यापिनः ' या सामान्य नियमान्वयें वायु हा सर्व शरीरव्यापी असल्याचें सिद्ध होतें.

सर्व शरीराचें पदार्थशः वर्गीकरण करूं लागल्यास, रस, रक्त, मेद, मज्जा, शुक्र इत्यादि द्रव पदार्थ, कठीण अस्थि, मांस, स्नायु हे घनस्वरूपी आणि सर्वव्यापी सूक्ष्म तंतु असें करतां येईल. आणि या सूक्ष्म तंतुमय भागावरच प्रथम परिणाम होतो. गतिमत्ता ही विशेषतः या भागांत असते. तरी वायु हा शरीरांतील सूक्ष्म छिद्रांमध्यें असतो. शरीरांत मुख्य कार्यें दोन. एक अभिसरण व दुसरें गति. अभिसरण द्रव पदार्थांचें,आणि वायूची गति. हीं दोनहि कार्यें शरीरांतील स्रोतसांचे सहाय्यानें घडतात. अशा या स्रोतसांतील गति ही त्यांतीलच एका भागांत असणाऱ्या संवेदनावाहक तंतूंचे आणि वायूचे सहाय्यानें उत्पन्न होऊन तीमुळें शरिराच्या क्रिया घडतात. अशा रीतीनें गतिमान शरिरांत वायूची सर्वव्याप्ति उघड होते. वायूचे वास्तव्याला स्रोतसें—छिद्रें—पाहिजेत. मग तीं अस्थींच्या कठीण भागांतील असोत किंवा मृदुपेशीमय भागांतील असोत. पोकळी अगर सच्छिद्रता पाहिजे मात्र खास. (आकाशात् वायुः) वायूचे वास्तव्याला पोकळीची अवश्यकता आहे; असें ठरल्यावर मग ज्या ज्या भागांत पोकळी अधिक तेथें वायूचें वास्तव्य अधिक प्रमाणांत असा सहजच नियम ठरतो. आणि याच तत्वाला अनुसरून वायूचीं मुख्य स्थानें सांगितलीं आहेतः—तीं येणेप्रमाणेः—

वायूचीं मुख्य स्थानें.

पक्वाशयकटीसक्थिश्रोत्रास्थिस्पर्शनेंद्रियम् ॥
स्थानं वातस्य तत्रापि पक्वाधानं विशेषतः ॥ १ ॥ (अ. हृ.)

(१) पक्वाशय म्हणजे स्थूलांत्र किंवा मोठें आंतडें, (२) कटी म्हणजे श्रोणिमंडल किंवा नितंबास्थि, भगास्थि, त्रिकास्थि यांनीं तयार झालेली गुहा, (३) सक्थि म्हणजे तंगडी—यांतील स्नायु—यांत हाताचाहि समावेश होतो. (तात्पर्य, हात व पाय यांतील स्नायु.), (४) श्रोत्रेंद्रिय म्हणजे कर्णकुहर-गुहा.) (५) अस्थि—हाडांतील पोकळी—सच्छिद्रता. (६) त्वचा—स्पर्शेंद्रिय—त्वचेंतील सूक्ष्म स्रोतसें. हीं शरिरांत वायूचीं मुख्य स्थानें असून या मुख्य स्थानांतहि पक्वाशय मुख्य आहे. कारण या भागांत सर्वांहून पोकळी अधिक आहे. या सहा स्थानांशिवाय वायूचीं आणखी विशिष्ट क्रिया ज्यांपासून होतात अशीं स्थानें आहेत तींः—

(१) मेंदु (२) ऊर म्हणजे फुप्फुसें (३) हृदय (४) पच्यमानाशय म्हणजे लघ्वंत्रें आणि (५) अपान म्हणजे गुदमार्ग वगैरे अधोभागांतील उत्सर्जनेंद्रियांचें मूलस्थान. याप्रमाणें वायूचीं मुख्य

अशीं एकंदर अकरा स्थानें शरीरांत सांगितलीं आहेत. पैकीं पहिल्या सहा स्थानांतील वायूच्या क्रिया स्थूल व गतिमूलक असून दुसऱ्या पांच स्थानांतील संवेदनामूलक आहेत.

या सर्व अकराहि स्थानांतील वायूचीं कार्यें जरी अनेक प्रकारचीं सांगितलीं आहेत, तरी त्यांतील सर्वव्यापी मुख्य तत्त्व गति हेंच आहे. प्रत्येक स्थानाची रचना, आणि कार्य यांना अनुसरून या गतीमध्यें विविधता झालेली असते. आयुर्वेदानें शरीराचे क्रियांशीं वायूचा संबंध सांगत असतांना अप्रत्यक्षपणें असा खुलासा केला आहे:—

दोषधातुमला मूलं सदा देहस्य तं चलः ॥
उत्साहोच्छ्वासनिश्वासचेष्टावेगप्रवर्तनैः ॥
सम्यग्गत्या च धातूनामक्षाणां पाटवेन च ॥
अनुगृण्हात्यविकृतः ॥ (अ. हृ.)

दोष, धातु आणि मळ हे शरीराला मूलभूत आहेत. त्यांपैकीं वायु अविकृत असतां, सर्व इंद्रियांचे ठिकाणीं उत्साह ह्मणजे कार्योन्मुखता श्वासोच्छ्वास, कर्मेंद्रियांचे व्यापार, मलमूत्रादींचें वेगोत्सर्जन, शरीरधातूंचें व्यवस्थित आदान विसर्जन (घेणें देणें.) आणि इंद्रियांमध्यें तरतरी-लाघव, या क्रियांनीं देहाला उपकारक होतो असें सामान्यत्वें वायूचें कर्तृत्व वर सांगितलें आहे. या वायूच्या देहोपकारक ज्या क्रिया सांगितल्या आहेत, त्यांमध्यें जरि विविध प्रकार स्थूलतया दिसत असले तरि या क्रियांचें संपादकत्व मुख्य जो वायूचा गतिधर्म त्याकडेच आहे, ही गोष्ट थोडयाशा विचारानें ध्यानांत येण्यासारखी आहे. अशा प्रकारें आयुर्वेदांतील वायु ह्मणजे शरीराच्या सर्व लहानमोठया भागांत हाल-चाल, गति, ज्यामुळें उत्पन्न होते, असे सर्वव्यापी विरल अणु होत. व्यावहारिक भाषेंत या अणूंना उत्सर्जक अणु असें नांव देण्यास हर-कत नाहीं. श्लेषक किंवा पूरक पिंड अथवा घटक ह्मणजे श्लेष्मा किंवा कफ, पाचक किंवा विभाजक पिंड अथवा घटक ह्मणजे पित्त व प्रेरक किंवा उत्सर्जक असे अणु ह्मणजे आयुर्वेदांतील वायु सम-जावयाचा.

वायूला पिंड नांव योग्य नाहीं.

कफ व पित्त यांप्रमाणें वायूचे अणूंना घटक हें नांव देणें सयुक्तिक नाहीं. कारण पिंड या शब्दानें अनेक अणूंच्या सामुदायिक स्वरूपाचा बोध होतो. व या शब्दानें श्लेषण किंवा चिकटणें या अर्थाचा बोध अभिप्रेत असतो. वायूचें स्वरूप याचे उलट. त्यांत संश्लेष, संयोग तर नाहींच. पण विश्लेषण किंवा उत्सर्जन-वियोग-हेंच मुख्य वायूचें

कार्य आहे. असें असल्यानें संयुक्तार्थबोधक पिंड हा शब्द वायूला योजणें चुकीचें होईल. ह्मणून वायू म्हणजे विरल व अखंडगतिमान् असे अणु होत असेंच त्याचें वर्णन युक्तियुक्त होईल. यापुढें निरनिराळया स्थानांतील वायूच्या क्रियांचा विचार करावयाचाः—

वायूचीं विशिष्ट स्थानांतील कार्यें.

पक्काशयः—पक्काशय ही एक लवचीक कातडयाची पिशवी आहे. मोठें आंतडें या नांवानें त्याचा उल्लेख केला जातो. याचा अंतर्बाह्य असा सर्व भाग वातवाहक सूक्ष्मस्रोतसें आणि ज्ञानतंतु यांनीं व्यापलेला असतो. शिवाय या आंतडयाचे मोठया पोकळींतही वायु भरलेला असतोच. या आंतडयामध्यें अशाप्रकारचा एक रचनाविशेष आहे कीं, अन्नपचनाचे कांहीं विशिष्ट संस्कार लहान आंतडयांत अन्नावर घडून मलरूप पावणारें अन्न या आतडयांत उतरतें. लहान आंतडयाचे शेवटच्या (पोटाचे उजवे बाजूस असलेल्या) टोंकाला या मोठया आंतडयाचें टोंक मिळालेलें असून तथून वरचे बाजूनें वळून पोटाचे डाव्या बाजूनें हें आंतडें खालीं वळून गुदद्वाराकडे जातें. या रचनेमुळें या आंतडयांत जो मलरूप अन्नाचा अंश पडतो, तो वरचे बाजूला आकर्षिला जाणें अवश्य असतें. सरळ मार्गानें गुदद्वाराकडे जाण्याला गति असत नाहीं. मळाचें वजन सर्व जठरावर सारख्या प्रमाणांत पडावें अशा प्रकारची ही योजना आहे. पण ह्या सोईमुळेंच मळाचें ऊर्ध्वगमन होईल अशी ह्या आंतडयांची आकुंचनशक्ति किंवा संकोचशक्ति अवश्य ठरते. आणि पक्वाशयामध्यें अशाप्रकारची शक्ति आहे म्हणूनच त्याचें कार्य व्यवस्थित चालतें; पच्यमानाशय किंवा लघ्वंत्र यांतून मळाचें उत्सर्जन पक्वाशयांत झालें कीं, ह्या मळाचे स्पर्शानें तेथील ज्ञानवाहक अथवा संवेदनावाहक स्रोतसांवर त्याचा परिणाम होतो. व त्यांची हालचाल वातवाही स्रोतसांना गति देते. या स्रोतसांत गति उत्पन्न झाली कीं, असल्याच स्रोतसांचा ज्यामध्यें समावेश झालेला आहे अशा पक्काशयाची हालचाल सुरू होते. पक्वाशय ही सरळ पिशवी नसून अनेक वळकटया—आंठया—असलेला असा आहे. मलाचे आघातानें प्रथम एका वळकटीवर परिणाम होऊन ती दुसरीला उत्तेजित करते. पहिलीमध्यें आलेला मळ तिचे संकोचानें पुढें ढकलला जातो; पुन्हां तेथें अशीच क्रिया घडते व अशा रीतीनें पक्वाशयाच्या शेवटच्या टोंकाला सर्व मळाचा संचय होतो. हें टोंक इतर भागांहून कमी संवेदनेचें असतें. ह्यामुळें इतर भागांमध्यें थोडयाशा मळाच्या वजनानें—आघातानें—जी संवेदना उत्पन्न होते, ती या भागांत

होत नाहीं. या ठिकाणीं बराच मळ संचित झाला (एक दिवसाचे आहाराचा मळ सांठवावा इतकी शक्ति, यामध्यें निरोगी अवस्थेंत असावी अशी निसर्गाची योजना आहे.) कीं, त्याचें वजन यामध्यें संवेदना उत्पन्न करतें. शिवाय याच वेळीं पक्वाशयाचे पोकळींत जो नेहमीं भरून राहणारा वायु त्याचे संचारांत या मळानें त्याची जागा अडविल्यामुळें व्यत्यय येऊन असल्या अडणाऱ्या पक्वाशयांतील वायूचाही या मळावर एक प्रकारें उत्सर्जक दाब पडतो. व अशा रीतीनें या संचित मळाचे उत्सर्जनाचा कार्यक्रम सुरू होतो. पक्वाशयाचें जें हें चलन-वलन व कार्य, त्याचें कर्तृत्व वायूकडे अशा प्रकारें असतें. पक्वाशयाचे त्वचेंत असणाऱ्या संवेदनावाहक स्रोतसांना मळाचे आघातानें गति मिळाली तरि त्याच पक्वाशयाचे त्वचेंत असणाऱ्या वातवाहक स्रोतसांतील हवेची हालचाल न होईल तर प्रथम आरंभींचे टोंकानें संकोचमूलक मलसंग्रह आणि शेवटचे टोंकानें विकासमूलक मलोत्सर्जन व्हावयाचें नाहीं. सर्व शरीरांत अधिक मळ सांठविण्याचें स्थान मलाशय असतें. व इतका मळ बाहेर फेंकून देण्याला उत्सर्जक सामर्थ्यहि तितकेंच असावयास पाहिजे. व या आधिक्यावरूनच वातस्थानांमध्यें पक्वाशयाला मुख्य मानलें आहे.

२ कटी-श्रोणिमंडल.

कटी—कमर किंवा श्रोणिमंडळ—हें वायूचें दुसरें स्थान आहे. नितंबास्थि, (व त्यांचाच भाग जघनास्थि) व त्रिकास्थि यांच्या संधीनें श्रोणिमंडळ तयार झालेलें असून पोटांतील अनेक अवयव याचे आधारें राहतात. श्रोणिमंडळामध्यें जी पोकळी असते, तींत वायू असून त्याचे हालचालीनें, बस्ति, (मूत्राशय, गर्भाशय, मूत्रपिंड, शुक्रवाहिनी यांवर परिणाम होतो. आणि त्यांचीं कार्यें घडून येतात. शिवाय ह्याच भागांतील वायूचा खालील पायांचे स्नायूंवरहि थोडा फार परिणाम होतो.

अपान वायू म्हणून ज्याचा उल्लेख केला आहे, तो हाच वायु होय. याचें थोडक्यांत वर्णन करावयाचें म्हणजे, श्रोणिमंडळांतील हालचाल करणारा, इतकेंच करतां येईल. याचे विकृतीनें अधोभागांतील मल, मूत्र, शुक्र, गर्भ, आर्तव यांचे उत्सर्जनामध्यें विकृति उत्पन्न होते. पक्वाशयांतील वायु फक्त मळाचें एका टोंकानें आकर्षण करून दुसऱ्या शेवटच्या टोंकांत त्याचा संग्रह करतो. उत्सर्जनाचें कार्य कटीमधील असल्या प्रकारच्या वायूनें होतें.

३ तिसरें वातस्थानः—सक्थि दोनहि पाय व हात, अर्थात् यांतील स्नायु हे होत. स्नायु जरी जाड दोरे असले तरी त्यांमध्येंहि असंख्य छिद्रें आहेत. व ह्या छिद्रांत हवा किंवा वायु आहे. स्नायूंचे मदतीनें हातपायांच्या क्रिया घडतात म्हणजे त्यांतील वायूमुळें घडतात.

हवेनेंच या स्नायूंचीं स्रोतसें भरलेलीं आहेत. त्यांत आर्द्रता–स्निग्धता कमी. यामुळेंच त्यांना हालचाल करण्याचें सामर्थ्य अधिक आहे यांमध्यें कांहीं कारणानें अभिष्यंद–ओलसरपणा–सूज आली म्हणजे त्यांचीं कार्यें विकृत होतात.

४ चवथें वातस्थान–श्रोत्रेंद्रिय–कान हें होय. कानांतील हवेमुळेंच बाहेरील अत्यंत सूक्ष्म शब्दलहरींचा परिणाम श्रोत्रेंद्रियावर होतो. कानांतील शब्दग्राहक असा इंद्रियाचा भाग जोंपर्यंत सूक्ष्म असतो तोंपर्यंत त्यावर शब्दाचा आघात होतो. ही विरलता वायूमुळें राहते. म्हणून हें वातस्थान सांगितलें आहे.

५ अस्थि—हाडें:—हें पांचवें वातस्थान होय. अस्थि कठीण आणि छिद्रमय असल्यानें तें वायूचें स्थान सांगितलें आहे. अस्थींमध्यें विशिष्ट प्रकारचें काठिन्य असल्यामुळेंच त्या देहधारणाला समर्थ असतात, त्यांत मार्दव किंवा स्निग्धता येईल तर शरीराचें वजन त्यांना सहन होणार नाहीं हें काठिन्य वायूचे रुक्ष–शोषणात्मक–गुणानें येतें. हें काठिन्यहि अर्थातच मर्यादित प्रमाणांतच असावयास पाहिजे हें उघड आहे. पण तें राखण्याचें कार्य वायूचे नित्य साहचर्यानें होतें हेंहि तितकेंच खरें आहे. शरीरांतील हाडें घन आणि स्थूल आहेत. त्यांमध्यें जर योग्य प्रमाणांत छिद्रें नसतील तर त्यांची वृद्धिक्षयात्मक क्रिया, व संवेदना होण्याला साधन न राहतां त्यांत जिवंतपणाचें कार्य जें, वृद्धिक्षयाचें सातत्य तें चाललें नसतें. अशासाठीं स्थूल स्वरूपाच्या अस्थींमध्यें तितक्याच प्रमाणांत सूक्ष्म वायूची योजना केलेली आहे. अस्थींची रचनाच अशी नमुनेदार आहे. त्यांचा आंतील भाग मज्जेनें भरलेला वरील–बाहेरील भाग मांसपेशींनीं आच्छादलेला व मेदानें लपेटलेला असा आहे. म्हणजे अस्थि जितक्या स्निग्ध तितक्याच कठीण व जितक्या जड, स्थूल तितक्याच सूक्ष्म च्छिद्रांनीं व्याप्त आहेत. ही सच्छिद्रता कमी झाली असतां अत्यंत जड असा शरीरांतील हा हाडांचा सांगाडा शरीराला भारभूत होईल. तसें न होतां उलट शरीराचा भार वाहण्याइतकें लाघव त्यांत छिद्रें व या छिद्रांत वायूची योजना करून विधात्यानें ठेवलें आहे. अस्थींत वायु असतो हें विधान प्रथमारंभीं कसेंसेंच वाटण्याचा संभव आहे. पण वरील गोष्टी ध्यानीं घेतां त्याची यथार्थता पटेल. आरंभींच सांगितलें आहे कीं, परस्पर विरोधि पदार्थांच्या साहचर्यावरच सृष्ट पदार्थांची योजना आहे.

एकमेकांना मर्यादित करीत योग्य तें उपयुक्त कार्य या साहचर्यांत घडतें. अस्थींमध्यें याचा अनुभव येतो. अस्थि कठीण आहेत, पण त्यांतहि वाढ व क्षय होतच असतात. अर्थातच ह्यासाठींहि त्यामध्यें एक प्रकारची संवेदना व सच्छिद्रता पाहिजे हें उघड होतें. हीं कार्यें

वायूचीं. व घन जड अस्थींमध्यें त्याचें विशेष वास्तव्य असल्याशिवाय हीं कार्यें होणारीं नाहींत. ही वायूची, अस्थींतील अवश्यकता दाखविण्यासाठीं अस्थींचा वातस्थानांत समावेश केला आहे. दृश्य अशीं वायूचीं कार्यें येथें घडत नाहींत. अस्थींमध्येंहि सर्वांत वायूचें प्रमाण सारखें असतें असें नाहीं. नलकास्थि—नळ्यांचीं हाडें यांत हें प्रमाण अधिक असून कपालास्थींमध्यें तें कमी असतें. तथापि सर्वत्र तें असतें, ही गोष्ट खरी आहे, शरीरामध्यें वायूचें प्रमाण वाढलें असतां, अस्थींवर प्रथम परिणाम होतो. त्यांतहि नलकास्थींवर आधीं होतो. अस्थि कठीण असल्यानें त्यांताल छिद्रांमध्यें वायूचें स्वतंत्र वास्तव्य असतें. याच उद्देशानें शरीराचे धातूंपैकीं अस्थि वायूचें दूष्य म्हणून सांगितलें आहे.

तत्रास्थानि स्थितो वायुः

६ वायूचें सहावें स्थान स्पर्शनेंद्रिय किंवा त्वचा हें होय. त्वचेमध्यें असणाऱ्या वातवहक अशा सूक्ष्म स्रोतसांवर बाह्य आघाताचा परिणाम होतो. आणि याच्या निकट असलेल्या ज्ञानवाहिनींवर मागून परिणाम होतो. हीं सूक्ष्म स्रोतसें, सूज किंवा अशाच एकाद्या कारणानें संकुचित झालीं कीं, त्या मानानें स्पर्शज्ञान कमी होतें. ही अनुभवाची गोष्ट आहे. शरीराच्या सर्व अवयवांमध्यें, असलेल्या स्रोतसांत स्थूलपणें जर भेद पाडावयाचे झाले, तर एक प्रवाही पदार्थ वाहणारीं व दुसरीं विरलाणूंचे मार्ग असे पडतील व हा दुसरा वर्ग म्हणजेच वातवाहक स्रोतसें होत. प्रत्येक शरीरभागामध्यें धमनी आणि शिरा किंवा शुद्ध रक्तवाहिन्या व अशुद्ध रक्तवाहिन्या यांचें अस्तित्व जितकें अवश्य तितकेंच वातवाहिन्यांचें अवश्य आहे. शेवटीं शेवटीं या इतक्या सूक्ष्म झालेल्या असतात कीं साध्या डोळ्यांनीं त्यांचें स्पष्ट स्वरूप समजणें अशक्य असतें. परंतु सर्व शरीराच्या कोणत्याहि भागाला निरंतर अभिसरण आणि संवेदना यांची अवश्यकता असते. वातवाहिनी म्हणजे संवेदनावाहक आणि रक्तादि द्रव पदार्थ वाहणाऱ्या स्रोतसांना रसायनी अशीं नांवें अनुक्रमें या स्रोतसांना शास्त्रीय व्यवहाराचे सोईसाठीं देतां देतील. त्वचेमध्येंहि हीं स्रोतसें अशींच अतिसूक्ष्म स्वरूपाचीं आहेत. स्पर्शेंद्रिय हें पित्ताचें स्थान असल्याचाहि उल्लेख आहे. स्वेद किंवा बाष्प वाहणारीं स्रोतसें म्हणजे पित्तस्थान व संवेदनावाहक स्रोतसें वातस्थान होय.

संवेदनात्मक वातस्थानें

याशिवाय वायूच्या विशेष क्रिया ज्या ठिकाणीं अधिक प्रमाणांत घडतात अशीं ठिकाणें म्हणजे मस्तक, (ज्ञानवाहिनीचें उगमस्थान.) उरःप्रदेश, (फुप्फुसें) हृदय, लहान आंतडीं आणि मलमार्ग हीं होत. पैकीं मस्तकांतून ज्ञानतंतूंचें कार्य वायूचे केवळ संवेदनात्मक शक्तीनें घडत असतें. स्पर्श किंवा आघात यांनीं उत्पन्न झालेल्या अथवा ऐच्छिक किंवा अनैच्छिकरीत्या निर्माण झालेल्या संवेदनेची, शरीराचे निरनिराळ्या भागांत व ज्ञानवाहिनींचें मुख्य केंद्र व आरंभस्थान जो मेंदु यांमध्यें देवघेव करण्यासाठीं जी एकप्रकारची सूक्ष्म हालचाल व्हावी लागते ती हालचाल–गति अर्थातच असल्या विरलाणूंच्या स्वाधीन असल्यानें ह्या क्रियेचें कर्तृत्व वायूकडे सांगण्यांत आलें आहे. मेंदूचे निरनिराळ्या विभागांत निरानिराळ्या भावनांचें उत्पादकत्व असून भावनोत्पादन असें मन केवळ तर्कानुमेय किंवा कर्मानुमेय हें खरें असलें तरी ही भावना उत्पन्न होते मेंदूचे त्या त्या विभागांतील होणाऱ्या हालचालीचा परिणाम ह्या भागाशीं केंद्रीभूत झालेल्या ज्ञानवाहिन्यांवर होतो. ही हालचाल गतिविशिष्ट अर्थात् वायूची असल्यानें मस्तक किंवा मेंदु हें एक वातस्थान सांगितलें आहे. याला प्राणवायु हें नांव आहे.

या वायूचें हें स्वरूप स्पष्ट होण्यासाटीं त्याचें वर्णन करीत असतां.

'बुद्धिहृदयेंद्रियचित्तधृक् ।
ष्ठीवनक्षवथूद्गारनिश्वासान्नप्रवेशकृत् ॥ (अ. हृ)

हा वायु, बुद्धि, हृदय, सर्व इंद्रियें, चित्त यांना धारण करणारा (आधार) व थुंकणें, शिंकणें, ढेकरा देणें, श्वासोच्छ्वास आणि अन्नप्रवेश ह्मणजे घशांतून अन्न उतरविण्याची क्रिया करणें या गोष्टी करतो, असा खुलासा केला आहे. मेंदु व हृदय यांचा अन्योन्यसंबंध आहे. या संबंधाचा नीटसा खुलासा करतां येत नसला तरी तो आहे ही गोष्ट खास. आयुर्वेदामध्यें चेतना किंवा आद्यप्रेरणा ही हृदयापासून उत्पन्न होते असें वर्णन आहे. सुश्रुतामध्यें:—

हृदयं चेतनास्थानमुक्तं सुश्रुत देहिनाम् ।

हृदय हें प्राण्याचें चेतनास्थान आहे; असें वर्णन केलें आहे. अव्याहतपणें चालणाऱ्या हृदयापासून मेंदूचे ठिकाणीं प्रेरणा उत्पन्न होते. हृदयाचें स्पंदन कमी, अव्यवस्थित होईल त्यामानानें शरीरांतील इंद्रियांच्या संवेदना व प्रेरणा कमी किंवा अव्यवस्थित होतात ही गोष्ट अनुभवाची आहे. व यावरून हृदय हेंच प्रेरणेचें उगमस्थान ठरतें. यापासून उत्पन्न झालेली प्रेरणा प्रथम मेंदूकडे पोचती होते. व तेथून निघणाऱ्या आणि सर्व शरीरभर पसरणाऱ्या अनेक ज्ञानवाहिनींचे द्वारें

तिचा सर्व शरीरभर पुरवठा होतो. हृदय आणि मेंदु यांचा हा अन्योन्य संबंध सूक्ष्म अशा वाहिनींचे साहाय्यानें जडलेला आहे. उरःस्थानांतील हृदय व मेंदु यांचा मध्यवर्ति प्रांतहि या वायूचे कार्यस्थानांत समाविष्ट होतो. यासाठींच प्राणवायूचे वर्णनांत 'उरः कंठचरः' (अ. हृ.) ऊर आणि कंठ यांमध्यें ज्याचा संचार आहे असा उल्लेख केला आहे.

प्राणवायूचा स्थाननिर्देश करीत असतां आणखी एक शंका येण्यासारखी आहे; ती अशी कीं, ऊर व हृदय हीं स्थानें अनुक्रमें उदान आणि व्यान या वायूचे भेदांचीं म्हणून सांगण्यांत आलीं आहेत. मग हींच स्थानें पुन्हां प्राणवायूचीं कशीं असावीं? (उरःस्थानमुदानस्य, व्यानोहृदिस्थितः) त्याचें उत्तर असें आहे कीं, प्राणवायूचें खरें कर्तृत्व मेंदू किंवा मस्तक यामध्यें असून त्याचा परिणाम कांहीं अंशाचें—दुय्यम दर्जाचा—हृदय आणि ऊर त्याचप्रमाणें कंठ यांवरहि होतो. हृदयाचें स्पंदन, फुफ्फुसांचे संकोचविकास, त्यामुळें होणारा श्वासोच्छ्वास, यांचा मेंदूवर घडणारा परिणाम या सर्व क्रिया परस्परांशीं एक प्रकारें मिश्र झालेल्या किंवा अन्योन्याश्रयी आहेत आणि यामुळेंच यांतील कोणत्याहि क्रियेच्या प्रवर्तकाचा इतरांशीं थोडाफार संबंध आल्याविना राहत नाहीं. तथापि स्थानी कार्यें घडविणाऱ्या वायूचा स्थानाश्रयी म्हणून मुख्यत्वें निर्देश केला जातो.

दुसरा उदानवायु. याचें स्थान ऊर ह्मणजे फुफ्फुसें असून त्याचा परिणाम कंठ, नासिका यांमध्यें ह्मणजे श्वासोच्छ्वासाचे साधनीभूत अवयवांवर व खालीं उदरांत नाभीपर्यंत होतो. फुफ्फुसांचे संकोचविकास हें ह्या वायूचें मुख्य कार्य. फुफ्फुसें हालतात याचें कारण त्यांत असलेला हा वायु होय. या वायूमुळें फुफ्फुसांत गति उत्पन्न होते व त्यामुळें श्वासोच्छ्वासाची क्रिया सुरू होते. फुफ्फुसांचे हालचालीमुळें जी गति उत्पन्न होते तिचा परिणाम कंठ आणि नासिका येथपर्यंत होणें हें उघड दिसणारेंच आहे. पण या गतीनें छातींतील अवयव व उदराचा भागहि हालतो, हें सुचविण्यासाठीं या वायूचे संचारक्षेत्रांत नाभीचा समावेश केला आहे. या वायूचीं स्थानें व कार्यें सांगतांनाः—

उरस्थानमुदानस्य नासानाभिगलांश्चरेत् ।
वाक्प्रवृत्तिप्रयत्नोर्जाबलवर्णस्मृतिक्रियः ॥१॥ (अ. हृ.)

उदानवायूचें स्थान ऊर असून त्याचा नासिका, नाभि आणि कंठ यांमध्यें संचार असून, बोलणें, उत्साह, शक्ति, वर्ण आणि स्मृति हीं कार्यें हा वायू करतो. सर्वच शरीराची गति फुफ्फुसांच्या गतीपासून उत्पन्न होते. यामुळें उत्साह व प्रयत्न यांचें आद्यप्रवर्तकत्व या वायूकडे येतें याचे क्रियांतील स्मृति किंवा स्मरण ही क्रिया कां व कशी होते याविषयीं खुलासा करतां येणार नाहीं. या वायूचे क्रियांमध्यें विशे-

षतः ध्यानात ठेवण्यासारखी गोष्ट अशी आहे कीं, उदानवायूनें फुप्फुसांची गति सुरू झाली तरी श्वासोच्छ्वासाची क्रिया मात्र प्राणवायूचे सहाय्यानें होते. प्राण आणि उदान या वायूंच्या क्रिया ध्यानीं घेतां श्वासोच्छ्वासाचें कार्य या उभयवायूंचे सहाय्यानें घडतें; किंबहुना फुप्फुसांमध्यें गति उत्पन्न झाली तरी देखील कंठ आणि नासिका यांमधील विशिष्ट ज्ञानवाहकांच्या सहाय्यानें हें कार्य घडतें. हें ह्या वर्णनांत स्पष्टपणें सुचविलें आहे. आणि म्हणूनच उदान वायूचे क्रियांमध्यें श्वासोच्छ्वासाचा समावेश न करितां प्राणवायूचे क्रियांमध्यें केला आहे.

(ष्ठीवनक्षवथूद्गारनिश्वासान्नप्रवेशकृत् ।)

तिसरा व्यानवायु याचें स्थान हृदय सांगितलें आहे. त्याचें वर्णनः—

व्यानो हृदि स्थितः कृत्स्नदेहचारी महाजवः ॥
गत्यपक्षेपणोत्क्षेपनिमेषोन्मेषणादिकाः ॥ १ ॥
प्रायः सर्वाः क्रियास्तस्मिन् प्रतिबद्धाः शरीरिणाम् ॥

व्यान वायूचें स्थान हृदय असून हा वायु शरीरांत सर्वत्र संचार करणारा, महावेगवान् असून चालणें, उठणें, बसणें, निमेषोन्मेष इत्यादि शरीराच्या बहुतेक सर्व क्रिया या वायूनेंच घडतात. (अष्टांग हृदय)

सर्व शरीरामध्यें हृदयाचें महत्व किती आहे, याचें वर्णन करण्याची अवश्यकताच नाहीं. हृदयामध्यें जी गति निसर्गानें ठेविलेली आहे तीमुळें त्याचें निरंतर स्पंदन चालतें व या सर्व स्पंदनापासून सर्व शरीरभर मुख्य अशा दोन तत्वांचा पुरवठा होतो, तीं तत्वें ह्मणजे रक्त आणि चैतन्य हीं होत. या दोन वस्तूंशिवाय शरीर निरुपयोगी असतें. ज्या वेळीं या दोन जीवनाधार तत्वांचा हृदयाकडून शरीराचे एकाद्या भागाला अथवा सर्व शरीराला पुरवठा कमी होईल. तेव्हां त्या त्या भागांत अनेक विकारांचा प्रादुर्भाव होतो. शरीराच्या कोणत्याहि भागांत ज्या अनेक क्रिया घडतात त्यांना मुख्य साधन रक्त—रसधातु—आणि चैतन्य हेंच आहे. व म्हणून हृदयामध्यें गति उत्पन्न करून त्यांचा शरीरभर पुरवठा करणारा जो व्यानवायु त्यावर सर्व शारीरिक क्रियांचें कर्तृत्व अवलंबून असल्याचें सांगितलें आहे. प्राण, उदान आणि व्यान ह्या वायूंच्या क्रिया अन्योन्यसंवर्धक आहेत हें नेहमींच ध्यानीं असावयास पाहिजे.

चौथा समान वायु याचें स्थान पच्यमानाशय कोठा किंवा लहान आंतडीं हें होयः—

समानोऽग्निसमीपस्थः कोष्ठे चरति सर्वतः ॥
अन्नं गृण्हाति पचति विवेचयति मुंचति ॥ १ ॥

समानवायु हा कोठयांत जठराग्नीचे सन्निध असून तो सर्व कोठयांत

—सर्व लघ्वंत्रांमध्यें संचार करतो व अन्नाचें ग्रहण करितो, पचवितो, सारकिट्टांचें विवेचन—पृथक्करण—करतो. आणि त्यांचें उत्सर्जन करतो. (अ० हृ०) आमाशय किंवा अन्नाशय यांतून आंतडयांत अन्न उतरल्यावर त्यांमध्यें एक प्रकारची हालचाल उत्पन्न होऊन तीमुळें ह्या आंतडयांतील पित्ताचा—पाचक रसाचा स्राव अन्नांत होतो. व अन्नाचें पचन होऊन त्यांतील सारभाग व मलभाग यांचें पृथक्करण होऊन त्यांचें योग्य मार्गानें उत्सर्जन होतें. या क्रिया स्वाभाविक क्रियेनें आंतडयांत घडत असतात. तथापि या सर्व क्रियांनां आद्यप्रवर्तक अन्नांतील गति—हालचाल—हेंच मुख्य साधन असतें. कोणत्याहि शरीरभागांतील गति ही वायूमुळें असते याचा खुलासा आरंभींच केला आहे. अर्थातच आंतडयांतील ही गति वायूची आहे हें उघड होतें. जर आंतडयांचें चलन—वलन कमी झालें तर पाचक पित्ताचा पुरेसा स्राव होणार नाहीं. आणि सार ह्मणजे अन्नरस आणि किट्ट ह्मणजे मलमूत्र यांचें वियोजनहि नीट होणार नाहीं. अशा प्रकारचें या स्थानांतील वायूचें प्राधान्य आहे.

पांचवा अपान वायु याचा उल्लेख मागें कटी किंवा श्रोणिमंडळ या स्थानांतील वायूचे वर्णनांत केला आहेच.

अशा प्रकारें सर्व शरीरांतील वायूचीं मुख्य स्थानें आणि कार्यें आहेत. कोणत्याहि शरीरविभागांतील लहान मोठ्या हालचालींचें कर्तृत्व या वायूकडे आहे असा स्वाभाविकपणेंच या वर्णनावरून निष्कर्ष निघतो. कोणत्याहि शरीरव्यापाराचें वर्णन करावयाचें असतां त्याचे स्वरूपानुसार कांहीं तरि गति अथवा चलनवलनात्मक व्यापारापासूनच सुरवात होते. गतिरहित असा शरीराचा भाग निष्क्रिय इतकेंच नाहीं पण निर्जीव असला पाहिजे. त्या भागांत ही गति कोठून उत्पन्न होते ? याचें उत्तर त्या भागांतील सूक्ष्म अशा छिद्रांचे आश्रयानें राहणारी जी विरलता, वायु अथवा हवा तीपासून उत्पन्न होते असेंच मिळणार. शरीराच्या घटनेमध्यें अशाच प्रकारची योजना निसर्गानें केली आहे कीं कोणत्याहि ठिकाणीं या वायूचें वास्तव्य असावेंच. शरीरोत्पत्तीबरोबर असून नित्याचे पोषकांतून स्वसंवर्धक असे सजातीय पदार्थ घेऊन हा वायु आपलें कार्य करीत असतो. आयुर्वेदीयांनीं या असल्या शरीरांतील मुख्य तत्वाला गत्यर्थक ' वा ' धातूपासून अन्वर्थक ' वायु ' हें नांव दिलें. आणि ह्या नांवानें त्याचा बोध ज्यानें नीट होऊं शकेल अशा प्रकारचें:—

' तत्र रूक्षो लघुः शीतः खरः सूक्ष्मश्चलोऽनिलः । '

असें वर्णन केलें आहे. त्यांत अयथार्थता कोठें दिसते ? ज्याप्रमाणें एकाद्या कौशल्यपूर्ण यंत्रामध्यें कांहीं पदार्थांच्या रासायनिक मिश्रणापासून

उष्णता व गति उत्पन्न होते. व मग सर्व लहान मोठ्या विभागांत क्रिया चालू होतात, तसाच कांहींसा हा प्रकार आहे. मात्र कृत्रिम यंत्रांमध्यें ही गति देणारा कोणी तरि पाहिजे मग तो प्रत्यक्ष असो अथवा अप्रत्यक्ष असो. तशी शरीरयंत्राची स्थिति नाहीं. या यंत्रामध्यें निसर्गाच्या अलौकिक चातुर्यानें स्वाभाविक संवेदना किंवा इच्छासामर्थ्याची योजना झालेली असून ती सर्व शरीरांत प्रथम गति उत्पन्न करते. या संवेदनेचा प्रथम संयोग वायूवर किंवा गतिशील विरलाणूंवर होतो. वायु सूक्ष्म आणि इच्छाशक्ति अतिसूक्ष्म. अतिसूक्ष्म संवेदनेचा स्थूल शरिरावर परिणाम घडविण्याला वायूसारख्या सूक्ष्म मध्यस्थाची अवश्यकता सहजीं पटण्यासारखी आहे. यापुढें वायूचीं आयुर्वेदांत वर्णन केलेलीं विकृतावस्थेंतील कार्ये-लक्षणें कशीं घडतात, याचा विचार करूं. चरकामध्यें एकंदर ऐशीं वातविकार-लक्षणें सांगितलीं आहेत; तीं येणें प्रमाणें:—

ऐशीं वातविकार

तत्रादौ वातविकाराननुव्याख्यास्यामः—तद्यथाः—

" नखभेदश्च, विपादिका च, पादशूलश्च, पादभ्रंशश्च, सुप्तपादता च वातखुड्डता च, गुल्फग्रंथिश्च,पिंडिकोद्वेष्टनं च,गृध्रसी च, जानुभेदश्च, जानुविश्लेषश्च, ऊरुस्तंभश्च, ऊरुसादश्च, पांगुल्यं च, गुदभ्रंशश्च, गुदार्तिश्च, वृषणोत्क्षेपश्च, शेफस्तंभश्च, वंक्षणानाहश्च, श्रोणिभेदश्च, उदावर्तश्च, खंजत्वंच, कुब्जत्वं च, वामनत्वं च, त्रिकग्रहश्च, पृष्ठग्रहश्च, पार्श्वावमर्दश्च, उदरोवेष्टश्च, हृन्मोहश्च, हृद्द्रावश्च, वक्षउद्धर्षश्च, वक्षउपरोधश्च, बाहुशोषश्च, ग्रीवास्तंभश्च, मन्यास्तंभश्च, कंठोध्वंसश्च, हनुताडश्च, ओष्ठभेदश्च, दंतभेदश्च, दंतशैथिल्यं च, मूकत्वं च वाक्संगश्च, कषायास्यताच, मुखशोषश्च, अरसज्ञताच, अगंधज्ञता च, घ्राणनाशश्च, कर्णशूलश्च, अशब्दश्रवणं च, उच्चैःश्रुतिश्च, बाधिर्यं च, वर्त्मस्तंभश्च, वर्त्मसंकोचश्च, तिमिरश्च, अक्षिशूलश्च, अक्षिव्युदासश्च, भ्रूव्युदासश्च, शंखभेदश्च, ललाटभेदश्च, शिरोरुक्च, केशभूमिस्फूटनं च अर्दितं च, एकांगरोगश्च, सर्वांगरोगश्च, पक्षवधश्च, आक्षेपकश्च, दंडकश्च श्रमश्च, भ्रमश्च, वेपथुश्च, जृंभा च, विषादश्च, अतिप्रलापश्च, ग्लानिश्च रौक्ष्यं च पारुष्यं च श्यावारुणावभासताच, अस्वप्नश्चं, अनवस्थितत्वंच इत्यशीतिर्वातविकाराः ॥ (चरकसंहिता. सूत्रस्थान अध्याय २०.) अनेक वात विकारांपैकीं ठळक अशीं हीं लक्षणें सांगितलीं आहेत. पैकीं १ नखभेद म्हणजे नखें फाटणें फुटणें हें लक्षण नखांमध्यें रुक्षता आल्यानें होणारें. २ विपादिका म्हणजे तळहात व तळपाय यांतील स्निग्धता कमी झाल्यानें त्यांची त्वचा रुक्ष होऊन ती फाटते. ३ पादशूल—पायांना ठणका-लागणें,

तळपायांना, स्नायुसंकोचनामुळें ठणका लागतो. ४ पादभ्रंश-पाऊल योग्य ठिकाणीं न पडतां भलत्या ठिकाणीं पडणें, हा विकार पावलाचा नसून पायांचे-तंगडीचे-स्नायूंचा आहे, ज्यावेळीं ह्या स्नायूंमध्यें अशक्तपणा-विकृति-उत्पन्न होते त्यावेळीं पाऊल ताब्यांत राहात नाहीं. ५ सुप्तपादता पायांतील त्वचेमध्यें पुरेसें रक्ताभिसरण नसतां किंवा कोणत्या तरी कारणानें पायांत अशुद्ध रक्ताचा संचय झाला असतां स्पर्शेंद्रियाचे त्या भागांतील कार्यांत व्यत्यय येऊन हें लक्षण उद्भवतें. ६ वातखुड्डता म्हणजे पायाची-तळव्याची-त्वचा सडून जाणें. ज्याप्रमाणें थंडीचे दिवसांत शरीरावरील त्वचा रक्ताचे अभावीं कोरडी होऊन फाटते व निघून जाते त्याप्रमाणें पायांचे तळव्यांना रक्ताचा पुरवठा त्यांचे जाड कातडींत कमी झाला असतां ती कोरडी आणि निर्जीव कातडी सडूं लागते. व त्यामुळें लहान लहान अनेक भोंकें दिसतात. (चाळणीप्रमाणें.) पायांनीं प्रवास करणारांमध्यें ही विकृति फार दिसून येते. चालून चालून चामडी रांठ होते. व त्यामुळें तींत रक्त नीट पसरत नाहीं. ७ गुल्फग्रंथि घोटयांना गांठीळ सूज येणें, कोणत्याहि ठिकाणीं स्नायूंची सूज गांठीळ असते. व अनेक स्नायु जेथें एकत्र असतात तेथें ही अधिक संभवनीय. पायाचा घोटा हें असें एक स्थान आहे. ८ पिंडिकोद्वेष्टनं पायांच्या पोटऱ्या वळणें, पोटऱ्यांचे मांसल भागांतील स्निग्धता-मेदस्वीभाग-कमी झाला ह्मणजे त्यांतील स्नायूंचे संकुचितपणामुळें एकप्रकारची ओढ लागते. ९ गृध्रसी तंगडीच्या स्नायूचा संकोच, १० जानुभेद-गुडघ्याला फूट लागणें गुडघ्यामध्यें त्या संधीचे सुव्यवस्थित संचारासाठीं ज्या चिकट पदार्थाची—श्लेष्म्याची-योजना असते. त्यांत कमतरता झाली म्हणजे ह्या सांध्यांतील श्लेष्मधरा कला-श्लेष्मलत्वचा आकर्षण पावते. व हाडांचेंहि घर्षण होतें. श्लेष्मलता कमी झाली कीं, स्वाभाविकपणेंच आकुंचन-आकर्षण होतें. आणि ठणका लागतो, ११ जानुविश्लेष गुडघ्याचा सांधा निखळणें वरील लक्षणाचीच ही एक अवस्था आहे.संधि हा आंतील चिकट श्लेष्मा आणि त्यावरील आच्छादक पेशी आणि स्नायु यांनीं झालेला आहे. त्यामुळें श्लेष्मा कमी झाला कीं, संधीमध्यें स्वाभाविकपणेंच ढिलेपणा येतो. ज्यावेळीं या संधींतील कफाची वाढ होते त्यावेळींहि संधीमध्यें ढिलेपणा येतो. परंतु त्यावेळीं ठणका असत नाहीं. १२ उरुस्तंभ हा विकार प्रसिद्ध आहे. मांडयांतील स्नायूंमध्यें स्तंभ उत्पन्न झाल्यानें होणारा हा विकार आहे. या स्तंभामुळें मांडयामध्यें जडत्व येतें. इतकें कीं, याचें वर्णन करतांना मांडया दुसऱ्याच्या असल्याप्रमाणें भासतात. (परकीयाविव गुरूस्यातां.) असें केलें आहे. १३ ऊरुसाद-मांडया सुंद होणें. ऊरुस्तंभाची ही प्राथमिक अवस्था किंवा अल्प विकृतीचें

लक्षण. १४ पांगुल्य—पांगळेपणा. सर्व पायांतील स्नायु निष्क्रिय होणें. याचे दोन प्रकार संभवणार असतात. एक पायांत रक्ताचें अभिसरण न झाल्यानें कोरडेपणा येऊन, व दुसरा प्रकार म्हणजे या स्नायूंची संवेदनशक्तीच नाश पावणें. १५ गुदभ्रंश—गुदद्वारामध्यें मळाचें विसर्जन झाल्यावर गुदद्वाराचें आकुंचन स्वाभाविकपणेंच ज्या स्नायूंमुळें होतें. त्यांमध्यें अशक्तपणा येऊन गुदवली—गुदद्वारांतील मृदुत्वचेच्या वळकट्या ढिल्या होऊन त्या गुदद्वाराबाहेर पडतात. व त्यांचें आकर्षण करणारे स्नायु ढिले झाले असल्यानें त्या आंत खेंचल्या जात नाहींत. पुष्कळ जुलाब होणें किंवा कुंथणें यांमुळें या स्नायूंची शक्ति अव्यवस्थित रीतीनें खर्च होऊन ती नाश पावते. १६ गुदार्ति—गुदद्वाराला ठणक लागणें. गुदद्वाराचे त्वचेंत कोरडेपणा आल्यानें ठणका लागतो. १७ वृषणोत्क्षेप—वृषणग्रंथि—वर म्हणजे जघनास्थीं किंवा भगास्थीकडे ओढल्या जाणें. यालाहि स्नायुसंकोच हेंच कारण असतें. वृषणग्रंथी व तेथील स्नायु यांमध्यें मेदाचें एक विशिष्ट प्रमाण असून त्यामुळें या ग्रंथींचें चलन, खालीं वर होणें, होत असतें. त्या मेदाचें क्षीणतमुळें वृषणाचें ऊर्ध्वाकर्षण होतें. १८ शेफस्तंभ——शिस्न स्तब्ध होणें—चेतनारहित होणें—येथील ज्ञानतंतूंमध्यें विशिष्ट प्रकारची उत्तेजक संवेदना असते. आणि या पेशीमय अवयवामध्यें पेशींची स्निग्धता राखणाऱ्या मेदाच्या योग्य मर्यादेंतच चेतनेचें अस्तित्व कायम राहतें. फाजील व अव्यवस्थितपणें चेतनेचा व्यय झाला असतां ती नाश पावावी हें स्वाभाविक आहे. १९ वंक्षणानाह——वंक्षण ह्मणजे ओटीपोट किंवा अंडसंधि या नांवांनीं संबोधला जाणारा भाग होय. श्रोणिमंडलाचा पुढील भाग कांहीं प्रमाणांत पोकळ असून अपानवायूच्या क्रिया किंवा अधोभागांतील उत्सर्जनेंद्रियांचीं कामें या पोकळींतील वायूमुळें होतात याचा उल्लेख मागें केला आहेच.ज्यावेळीं ह्या वायूचें प्रमाण वाढतें,त्यावेळीं तो या पोकळींत वाढून वरील त्वचेला ताण बसतो व आंतील उत्सर्जक इंद्रियांचे क्रियांमध्यें विकृति उत्पन्न होते. २० श्रोणिभेद——व्यावहारिक भाषेंत कमरेला फूट लागणें किंवा कमर फुटणें या नांवानें या लक्षणाचा उल्लेख करितात. जानुभेदाप्रमाणें यांतहि श्लेषक कफाची क्षीणता हें कारण असतें शिवाय अस्थींतील मज्जा धातूंत क्षीणता उत्पन्न झाली असतां अस्थींमध्यें रुक्षता आणि काठिन्य उत्पन्न होऊन ठणकणें हें कोणत्याहि हाडांचे ठणक्याचें सामान्य कारण असतें. २१ विड्भेद——म्हणजे मळ पातळ होणें. मळ पातळ होणें या लक्षणाचा वातविकारांत समावेश होऊं शकत नाहीं. वायूमध्यें असा कोणताहि गुण नाहीं कीं त्यामुळें अगदीं अल्प प्रमाणांत कां होईना, पण मळांत पातळपणा उत्पन्न व्हावा! उलट मळांत घट्टपणा आणणें हें मात्र वायूचें प्रमुख

लक्षण आहे. कोणत्याहि वातजन्य विकारांत मलबद्धतेच्या लक्षणाचा समावेश असावयाचाच. असें असतां वातविकारांत—आणि मुख्य वातविकारांत (वातविकाराणामपरिसंख्येयानामाविष्कृततमा व्याख्याताः असंख्यात वातविकारांपैकीं हे ठळक असे ऐशीं सांगितले. च. सू. स्था. अ. २०) या असंभाव्य लक्षणाचा समावेश कसा केला ? चरकाचे चक्रदत्तकृत व्याख्येमध्यें

वातजातीसारेपि विड्भेदो वातजः ।

(वातजन्य अतीसारांतहि विड्भेद वातजन्य असतो.) असा या लक्षणाविषयीं खुलासा केला आहे. (चरकसंहिता चक्रदत्त व्याख्यासंवलिता निर्णयसागर १९२२) हा खुलासा वाचून खुलासा तर होत नाहींच पण व्याख्याकारांचें आश्चर्य मात्र वाटतें. कारण अतीसारामध्यें प्रथमतः जठरांतील जलांशाची वाढ आणि अग्निमांद्य या गोष्टी गृहीत असतात.

संशम्यापां धातुरग्निं प्रवृद्धः ।

(माधवनिदान अतीसार संप्राप्ति.) आणि ह्या असल्या अवस्थेंतील वायूचा संबंध अतीसाराचे वातिक पोटभेदामध्यें दाखवावयाचा असतो व त्याचा अर्थ जलांश वाढला खरा पण वातिक अवस्थेंत म्हणजे यावरून कफ आणि पित्त यांहून वायूमुळें अतिसारांतहि जलांश सापेक्षतया कमी असतो हें सुचविलें आहे. आणि ' वातातिसाराचे लक्षणांतहि' जुलाब थोडे थोडे—लहान लहान होतात. असा उल्लेख आहे.

अरुणं फेनिलं रूक्षमल्पमल्पं मुहुर्मुहुः ।
शकृदामं सरुक्शब्दं मारुतेनातिसार्यते ॥ १ ॥

(माधवनिदान अतिसारनि.)

यावरून वायूमध्यें मळांत पातळपणा आणण्याचा गुण नसून मळांत घट्टपणा आणणें हेंच वायूचें कार्य असल्याचें उघड होत आहे. असें असतां ' या टीकाकारांनीं वातजातिसाराचा पुरावा घेऊन वायूमुळें मळ पातळ होणें या लक्षणाची सिद्धि करण्याचा उपक्रम केला आहे. सर्वच वाक्य लेखकाचा प्रमाद या सदरांत घालतां येत नाहीं. एक गोष्ट खरी कीं जरि टीकाकारांनीं अशा प्रकारचा खुलासा केला असला तरि वाताचे मुख्यच काय पण कोणत्याहि स्वरूपाचे लक्षणांत विड्भेद हें लक्षण संभवनीय नाहीं. मग विड्भेद याचा अर्थ काय ? याचा अर्थ या लक्षणाचे मागील श्रोणिभेद यांतील शब्दसाम्यावरून लेखनाचे भरांत लेखकाचे हातून सहज घडलेला प्रमाद याहून दुसरा नाहीं. या जागीं विड्भेद असा शब्द नसून ' विड्ग्रह ' असा असावयास

पाहिजे. वायूची वाढ झाली, आंतडयांत–पच्यमानाशयांत रूक्षता व शोषण वाढलें, म्हणजे स्वाभाविकपणें मळाचें अधिक शोषण होऊन त्यांत अधिक घट्टपणा–कोरडेपणा–येतो. याला मळाचे खडे होणें असें म्हणतात. असले खडे झाले कीं, त्यांचें उत्सर्जनही नीट होत नाहीं. २२ उदावर्त––पक्काशयांत वाढलेल्या वायूचा अव्यवस्थित इतस्ततः त्रासदायक संचार. वायु वाढला तर त्यानें गुदमार्गें निघून जावें पण वाढलेल्या वायूनें गुदमार्गालाहि रूक्षता येते व ज्या मार्दवामुळें गुदमार्ग प्रसरण पावतो ती मृदुता कमी झाली कीं, या मार्गाचें आकुंचन होऊन वाढलेल्या वायूचें उत्सर्जन न होतां त्याला प्रतिलोम गति मिळन त्या वायूचा पक्काशयांत स्वैर संचार चालू होतो. २३ खंजत्व म्हणजे एक पाय लंगडा होणें. पांगुल्यांतील विकृति एकाच पायापुरती होणें. (विकृति एका, अनेक अगर सर्व शरीर–भागावर होणें हें उत्पादक कारणें आणि शरीराच्या निरनिराळ्या अवयवांतील सामर्थ्य यांवर अवलंबून असतें.) २४कुब्जत्व कुबडेपणा पृष्ठगत स्नायु व शिरा यांचे संकोचामुळें होणारा. २५ वामनत्व खुज्जेपणा हा विकार जन्मादारभ्य असावयाचा; एखादा माणूस फार उंच, ठेंगणा अथवा खुजा जन्माला येणें याला कारण वायु असला तरी तो गर्भांतील दोष. वातविकारांत याचा समावेश कां असावा कळत नाहीं. २६ त्रिकग्रह–माकडहाड जखडणें. तेथील स्नायूंचे संकोचामुळें होणारें लक्षण. २७ पृष्ठग्रह पाठ जखडणें त्रिकग्रहाप्रमाणेंच पृष्ठाचे स्नायु–संकोचामुळें हा विकार होतो. २८पार्श्वावमर्द–बरगडया जखडल्या–आंवळल्या–सारखें होणें. याचें कारण छातीचे भागांतील स्निग्ध पदार्थांचा आणि बरगडयांत भरून असलेल्या मज्जाधातूचा क्षय होणें हें आहे. २९उदरावेष्ट पोट जखडल्याप्रमाणें वाटणें. पोटाचे आंतील आंतडीं वृक्क इत्यादि अवयव व आशय यांवर मेदोधरा कलेचें आच्छादन असतें आणि त्या कलेंतील मृदुता व स्निग्धता यांमुळें पोटांतील अवयवांच्या हालचाली सुरळीत चालतात. यांतील मेद–चर्बी स्निग्ध आहाराचे अभावीं कमी झाल्यानें कलेमध्यें रूक्षता येऊन हें लक्षण होईल किंवा आकस्मिक कारणानें नाभिस्थ शिरांचा संकोच झाल्यानेंहि हें लक्षण उत्पन्न होणारें आहे. मात्र पहिलें दीर्घ काल राहणारें व दुसरें तात्कालिक इतकाच फरक. ३० हृन्मोह–हृदयाचे चेतनेमध्यें कमीपणा. ३१ हृद्द्रव हृदयाचें स्पंदन ज्या स्नायूमुळें होतें त्यांचे शैथिल्य हृदयांत शैथिल्य आणतें. व्यान वायूचें हृदयाचें संकोचन करण्याचें काम कमी होणें. ३२ वक्षउपरोध छाती भरून येणें. श्वासपथांतील अभिष्यंदामुळें श्वासाचा अवरोध, श्वासोच्छ्वास मोकळेपणानें न होतां अधिक वायूनें फुफ्फुसें

भरल्यासारखीं वाटतात. ३३ वक्षउपरोध छातीला ओढ लागणें. फुफ्फुसांत रूक्षता व त्यामुळें संकोच होणें. ३४ बाहुशोष बाहूंचे संधींतील कफाची क्षीणता झाली म्हणजे यासंधींचें चलन सुखानें होत नाहीं. ३५ ग्रीवास्तंभ मान ताठणें मानेचे स्नायु अभिष्यंद-सूज अथवा कोरडेपणा या कारणांनीं ताठतात, संकोच पावतात, किंवा संवेदना कमी होते व मानेची हालचाल करीत नाहींत ३६मन्यास्तंभ मानेच्या शिरा स्नायु ताठणें. कारण वरीलप्रमाणेंच. फरक इतकाच कीं, मन्यास्तंभामध्यें मन्या ह्मणजे मानेच्या स्नायूंचा स्तंभ होऊन त्यामुळें मस्तकाचे चलनांत व्यत्यय येतो. ३७ कंठोध्वंस. घसा खवखवणें. श्वासमार्गांत कोरडेपणा उत्पन्न झाला असतां श्वासोच्छ्वासाच्या वायूचें घर्षण सहन होत नाहीं व घसा खवखवतो. हें खोकल्याचें पूर्वरूप आहे. ३८ हनुताड याचा नीटसा अर्थ कळत नाहीं. हें लक्षण ह्मणजे हनुस्तंभ असावा. हनुमूलाचे स्नायूंचा संकोच झाला असतां होणारें. ३९ ओष्ठभेद ओंठ फुटणें. ओंठांतील मृदुता कमी झाल्यानें ओंठ फाटतात. ४० दंतभेद, दांत फुटणें दांतामध्येंहि भरून असणाऱ्या मज्जा व रक्ताच्या क्षीणतेमुळें त्यांत रुक्षता येते. व दांतांचे कळपे ढलपे सुटतात. ४१ दंतशैथिल्य. दांत हालणें. दंतमांस किंवा हिरड्या यांतील स्नायूंचे शैथिल्यामुळें होणारा विकार. ४२ मूकत्व-मुकेपणा. शब्दवाहक स्रोतसांमध्यें वायूची विकृति स्रोतसांचा संकोच करणारी झाल्यानें हें लक्षण होतें. ४३ वाक्संग शब्द अडखळणें. शब्दोच्चाराचे वेळीं कंठ आणि मुख यांतील स्नायूंची विशिष्ट हालचाल व्हावी लागते. या स्नायूंचा संकोच झाला असतां उत्पन्न झालेला शब्दहि बाहेर निघत नाहीं. ४४ कषायास्यता तोंड तुरट होणें. रसनेंद्रियांत एक प्रकारचा कांहींसा मधुर असा स्राव होत असतो. त्याचे अभावीं तोंडाला तुरटपणा वाटतो. माधूर्याचें अविकृत कमीपणांत तुरट रसच शिल्लक राहतो. ४५ मुखशोष तोंडाला कोरड पडणें. वायूमुळें कोरडेपणा येतो, जलांश कमी होतो, व असलेल्याचा स्रावहि होत नाहीं. ४६ अरसज्ञता. रुचि न कळणें. जिभेवर टाकलेल्या पदार्थांत जिभेतील द्रवांचे मिश्रण होऊन त्याचे संयोगामुळें रसाचें रसनेंद्रियाला ज्ञान होतें. तोंडाला कोरड पडली असतां तोंडांतील रसाचें मिश्रण पदार्थांत होत नाहीं व त्यामुळें रसाचें ज्ञान होत नाहीं. ४७ अगंधज्ञता वास कोणता हें न कळणें. घ्राणेंद्रियामध्यें ज्यांना गंधज्ञान होतें असे ज्ञानतंतु नासिकेचे अग्रभागीं श्लेष्मळ त्वचेमध्यें असून त्या भागांतील विशिष्ट आर्द्रतेनें या त्वचेंतील सूक्ष्मरंध्रांत त्यांचीं टोकें पसरलेलीं असतात. व त्यांचे मार्फत वायूचे अणूंतून येणारा गंध त्यांना पोंहोंचतो. वायूची वाढ झाली म्हणजे नाकांतील त्वचेंत

कलेंत–कोरडेपणा येऊन तिचा संकोच होतो. ती संकुचित झाली असतां आंतील रंध्रें संकुचित होतात व गंधग्राहक वायूचा गंधज्ञानवान् अशा ज्ञानतंतूपर्यंत प्रवेश होत नाहीं. गंधज्ञान नाहीसे होतें. ४८ घ्राणनाश घ्राणेंद्रिय नाश पावणें वरीलसारख्या विकारानें घ्राणेंद्रियांतील ज्ञानवाहक तंतूची शक्ति नष्ट होते व त्यामुळें वास न येणें ही विकृति टिकाऊ होते. ४९ कर्णशूळ. कान ठणकणें कानांत कोरडेपणा आल्यामुळें. ५० अशब्दश्रवणं बहिरेपणा. नाकाच्या वास न येण्याचे अवस्थेशीं ही विकृतिसारखी आंतील भागांमध्यें हवेच्या लहरी जाऊन आदळल्या पण अंतरिंद्रियांतील सूक्ष्म च्छिद्रांमार्फत त्यांचा स्थानी आणि शब्दग्राहक वायूशीं संयोग व्हावयास पाहिजे. रुक्षतेनें स्रोतोरोध झाला असतां कर्णकुहरांत प्रवेश झाला तरी शब्दाचा उपयोग इंद्रियस्थायी ज्ञानतंतूवर होत नाहीं. (इंद्रिय नाश स्वाभाविक सामर्थ्याचा नाश झाल्यानेंहि होतो. ५१ उच्चैश्रुति फार मोठा आवाज ऐकूं येणें. (लहान शब्द अथवा आवाज ऐकूं न येणें.) कमी ऐकूं येणें. ५२ बाधिर्य अगदीं ऐकूं न येणें सर्वच एका विकाराच्या वाढत्या स्वरूपाचे विकार. (अशब्दश्रवण) याचा अर्थ टीकाकार चक्रदत्तांनीं नसलेला शब्द ऐकणें शब्दाभावेपि शब्दश्रवणं असा केला आहे. परंतु या अर्थांत विशेषसें स्वारस्य दिसत नाहीं. असा अर्थ मानावयाचा तर अगंधज्ञता अरसज्ञता यांचाहि अर्थ अभावीं ज्ञान असा करावा लागेल. ५३ वर्त्मस्तंभ. पापण्या ताठणें. पापण्यांची आकुंचनशक्ति कमी होणें. ५४ वर्त्मसंकोच पापण्या संकुचित होणें. तेथील स्नायूंचे संकोचामुळें. ५५ तिमिर अंधारी येणें डोळ्यांतील रूपज्ञान करणाऱ्या ज्ञानतंतूचें कार्य रुक्षतेमुळें न होणें. ५६ अक्षिशूळ डोळ्यांना ठणका लागणें. डोळ्यांतील रूक्षता–कोरडेपणा–यामुळें. ५७ अक्षिव्युदास डोळ्यांतील कनीनिका किंवा तारका विस्तारित होणें. ५८ भ्रूव्युदास भिंवया प्रसार पावणें. संकोचक स्नायूंचा स्तंभ झाल्यानें ही लक्षणें होतात. ५९ शंखभेद शंखास्थि फुटल्यासारख्या दुखणें. ६० ललाटभेद ललाटाला फुट लागणें ६१ शिरोरुक्, सर्व मस्तकाला ठणका लागणें हीं तीनहि लक्षणें त्या त्या भागांत रुक्षता वाढल्यामुळें होतात. ६२ केशभूमिस्फुटन केंसांची जागा–त्वचा फाटते. या त्वचेंतील मार्दव कमी झाल्यानें फाटते. ६३ अर्दित तोंड वांकडें होणें. हनुमूलाचे स्नायूंचा संकोच झाल्यानें होणारें लक्षण. ६४ एकांगरोग. ६६ सर्वांगरोग. एकाद्या भागाच्या क्रिया कमी होणें किंवा सर्व शरीराचे चलनवलन व्यापार कमी होणें. वायूची ज्या भागांतील संवेदना आणि गति कमी होईल त्या भागांत होणारे विकार ६६ पक्षवध. पक्षाघात. एका शरीर भागाचे वायूचे स्नायु क्रियाशून्य

होणें, ६७ आक्षेपक. आंचके. एकाद्या अवयवाचे स्नायु अनैसर्गिक व अव्यवस्थित रितीनें संकुचित होण्यानें निरनिराळ्या प्रकारचे आंचके येतात. ६८ दंडक. लांकडासारखा ताठणें. कारण सर्वांगीण स्नायूंचा स्तंभ. ६९ श्रम. थकवा वाटणें. वायूचा मुख्य गुण जो उत्साह त्याचा अभाव ७० भ्रम ज्ञानतंतूंचा अशक्तपणा आला असतां होतो. ७१ वेपथु. कंप त्वचा किंवा स्पर्शेंद्रिय यांतील स्नायूंचा अव्यवस्थित संकोच-विकास. ७२ जृंभा जांभया येणें. फुफ्फुसांतील वायूचे आधिक्यानें त्याची श्वासमार्गांतून अधिक व प्रतिलोभ प्रवृत्ति. ७३ विषाद. अप्रसन्नता उत्साहाचा अभाव दर्शविणारें लक्षण. ७४ अतिप्रलाप. बडबड शब्दवाहक स्रोतसांवर वायूचे वाढीमुळें अधिक उत्तेजनेचा परिणाम. ७५ ग्लानि. श्रमाची वाढती अवस्था. ७६ रौक्ष्य. रूक्षता. वायूचे वाढीचें सामान्य लक्षण. ७७ पारुष्य खरखरितपणा. वाढत्या—कोरडेपणानें मृदुता नाहींशी होते. ७८ श्यावारुणावभासता त्वचेवर काळसर किंवा तांबूस वर्ण दिसणें. वायूमुळें रक्ताचे क्षीणतेंत त्याचा त्वचेकडे कमी पुरवठा झाला कीं त्वचेमध्यें रक्ताची लाली योग्य प्रमाणांत दिसत नाहीं. ती कमी झाली कीं वास्तविक लालीहून कमी म्हणजे तांबुसपणा, किंवा त्याहूनहि कमी झाली कीं लालीचे अभावीं काळसरपणा हीं लक्षणें त्वचेंतील रक्ताची क्षीणता दाखवितात. क्वचित् एकाद्या ठिकाणीं अभिसरण कमी झालें आणि कांहीं काळपावेतों रक्त एकाच जागीं सांचलें म्हणजे त्याचे अधिक दाबानें कांहीं वेळ (सुजल्या जागीं.) अधिक रक्तवर्ण व कांहीं काळानें तें रक्त नासूं लागल्यास त्यांत काळसरपणा दिसतो. हीं रक्ताच्या दोन अवस्थेंतील लक्षणें एकांगव्यापी आणि सर्वांगीण अशीं होतात. ७९ अस्वप्न. झोंप न येणें. ८० अनवस्थितत्व. आराम न वाटणें हीं दोनहि लक्षणें शरीरांत स्निग्धतेचा ऱ्हास झाला असतां ज्ञानतंतूंचा क्षोभ झाल्यामुळें होतात. याप्रमाणें हीं ऐशीं वातलक्षणें होत.

या लक्षणांची तात्विकता.

हीं वायूचीं सर्व लक्षणें ध्यानीं घेतां वायूचे स्वरूपाचा अथवा कार्याचा विशेष बोध होण्यासारखें एकादें तत्व त्यांत आहे असें वाटत नाहीं. यांत कांहीं लक्षणें इतकीं सामान्य स्वरूपाचीं आहेत कीं त्यांचा मुख्य म्हणून उल्लेख करण्याचें कारण नाहीं. (पारुष्य, रौक्ष्य इ.) आणि कांहीं तर तीव्र विकार आहेत. (पक्षाघात; अर्दित इ.) या सर्वांची एकत्र गोळाबेरीज कां केली कळत नाहीं. वायूमुळें उत्पन्न

होणाऱ्या लहान मोठया लक्षणांचा समावेशच करावयाचा, तर आणखीहि करतां येईल. मग ऐशीं संख्याच मर्यादित कां असावी. “अशीतिर्वातविकाराः चत्वारिंशत्पित्तविकाराः विंशतिः श्लेष्मविकाराः” वातविकार ऐशीं, पित्तविकार चाळीस, व कफविकार वीस, या विशिष्ट संख्येंतच काय विशेष आहे ? विकारांची संख्या सांगत असतां कांहींतरि सामान्य तत्व स्वीकारून त्याचे अनुरोधानें लक्षणांची संख्या द्यावयास पाहिजे. वायूचे प्रकारांचा, त्याचे स्थानांचा अथवा गुणांचा असा कोणता तरी क्रम स्वीकारून त्यावरून लक्षणें किंवा विकारांचा उल्लेख करणें योग्य होतें; परंतु तसा यांत कोणताच क्रम दिसत नाहीं. ही लक्षणें सर्वसामान्य व अनेक वातविकारांतील लहानमोठीं ऐशीं लक्षणें आहेत इतकाच अर्थ समजायचा.

वातविकाराविषयीं विशेष.

वायूचे विकार अथवा लक्षणें यांमध्यें मुख्यत्वें दोन गोष्टींचा विचार करावा लागतो. एक वायूची स्थूलगति व दुसरी सूक्ष्म गति. यांचा स्पष्ट अर्थ ह्मणजे कर्मेंद्रियांतील गति व ज्ञानेंद्रियांतील गति असा होईल चालणें, बसणें, उठणें, बोलणें, उडया मारणें, खाणेंपिणें इत्यादि वायूच्या स्थूल क्रिया असून स्पर्श, गंध रस इत्यादि कार्यकारी त्या त्या भागाची सूक्ष्म हालचाल या दुसऱ्या सूक्ष्म हालचाली विशेषतः संवेदनामय असून पहिल्या प्रकारच्या स्थूल क्रियांनाहि उत्पादक जरि संवेदना असली तरी त्यांमध्यें नंतर गतीचें दृश्य स्वरूप अधिक व याकरितां या दोन क्रिया करणाऱ्या वायूच्या दोन विभागांना एक गतिमय आणि दुसरा संवेदनामय किंवा गतिविशिष्ट आणि ज्ञानविशिष्ट अशीं नांवें व्यावहारिक सोईसाठीं योजावयास हरकत नाहीं. असें केल्यानें वातविकारांमध्यें वर्गीकरण करून गतीचे विकृतीमुळें होणारे व संवेदनेचे विकृतीमुळें होणारे असे वातविकारांचे दोन ठळक पोटभेद करतां येतील. अर्दित, आक्षेपक, हनुस्तंभ, दंडक, वाक्संग इत्यादि विकार वायूचे गतिविशिष्ट विभागांत येतात. व बाधिर्य, अरसज्ञता,स्पर्श न होणें, पादसुप्तता, इत्यादि संवेदनाविशिष्ट विभागांत येतात. अशाप्रकारचें एक वर्गीकरण केल्यावर पुन्हां वातविकारांचा स्पष्ट बोध होण्यासाठीं म्हणून आणखी वातविकारांचे दोन भेद मानावे लागतात. हे भेद ह्मणजे, वायूचा कोप त्याची वाढ होऊन झाला आहे कीं, वायूची वाढ झाली नसतांहि त्याचे संचारांत इतर पदार्थांचे वाढीनें व्यत्यय आला आहे

यांचे निदर्शक होत. पहिल्या प्रकारचे विकारांना केवळ वातजन्य आणि दुसऱ्या प्रकारचे विकारांना संसृष्ट वातजन्य अशीं नांवें देतां येतील. म्हणजे कोणत्याहि प्रकारच्या वातविकारांचा विचार करतांना प्रथम या गोष्टीचा विचार करावयास पाहिजे.

बहुतेक वातविकार संसर्गजन्य असतात.

शुद्ध वायूचे विकारांपेक्षां संसृष्ट वायूचे विकारच अधिक आणि अधिक त्रासदायक होतात. कारण कोणत्याहि रोगाला उत्पादक दोषाचा कोप किंवा उन्मार्गावस्था अवश्य असते. वायूला ज्यावेळीं उन्मार्गावस्था यावयाची त्यावेळीं त्याचे मार्गांत कोणत्या तरी पदार्थाचा प्रतिबंध व्हावयास पाहिजे. वायूचे विकार अनेक सांगितले आहेत. तथापि वायूचें मुख्य व सर्व प्रकारचे विकारांमध्यें नियमानें असणारें लक्षण ह्मणजे शूल किंवा ठणका हें होय. ' शूलं नर्तेऽनिलात्, वायूशिवाय शूल नाहीं. ठणका कां लागतो ? कोणत्यातरी शरिराचे भागांत अभिसरण कमी झालें, सूज आली, जखम झाली इत्यादि कारणानें जर एकाद्या पदार्थाचा संचय झाला तर तो पदार्थ अधिक प्रमाणांत ज्या स्रोतसांत भरेल; तेथील वायूचे—हवेचे संचाराला मार्ग रहात नाहीं. व सुख संचाराऐवजीं संचित पदार्थाकडून दवला जाणारा वायूहि उलट जाण्याचे आवेगानें प्रतिलोम होतो. पण या त्याच्या प्रतिक्रियेच्या प्रयत्नांत स्थानी स्रोतसांवर अधिक दाब व ताण पडून तीं ठणकतात. या दृष्टीनें सर्व शूलांचें कारण वायू सांगितलें आहे.

अशा प्रकारचा प्रतिबंध कोठें प्रवाही रक्त वगैरे पदार्थांचे संचयानें, कोठें घन अशा मांसाचे सुजेमुळें, तर कोठें विरळवायूचें पक्काशय वगैरेंतून उत्सर्जन न झाल्यानें त्याचीच जी वाढ होते तीमुळें म्हणजे वायूमुळेंच होऊं शकतो. परंतु कोणत्याहि प्रकारचें कारण असलें तरी त्याचें शूलस्वरूपी कार्य व्हावयाचें तर शरीरावयवावर वर सांगितल्याप्रकारचा परिणाम झालाच पाहिजे. आणि यामुळें आरंभीं सांगितलेल्या विकाराप्रमाणें वातविकारांनाहि त्याची उन्मार्गगामिता अपरिहार्य आहे. केवळ वायूची वाढ झाली तरि त्याचे क्रियांमध्यें वाढ होईल. पण रोग होत नाहीं. केवळ रूक्षता वाढली, खरखरीतपणा आला, याला वायूचे वृद्धीचें लक्षण इतकेंच म्हणतां येईल; तो रोग नव्हे. या वाढीचे अवस्थेंत कोणत्याही प्रकारचा रोग उद्भवण्याचा संभव असतो. पोटांत—पक्काशयांत—वायु वाढला पण जर गुदमार्गानें त्याचें उत्सर्जन होत आहे तर पोट फुगणें, दुखणें, गुरगुरणें, किंवा गुल्म इत्यादि विकार होत नाहींत. ती फक्त वाढ असते. व याच वाढीचा परिणाम गुदद्वारांत रूक्षता

आणि संकोच उत्पन्न करून सर्व पक्वाशयाचीं स्रोतसें रुक्ष करून व त्यांची उत्सर्जनशक्ति कमी करून त्यायोगें वायु सरण्याचें बंद झालें ह्मणजे वरील विकार होतात वायूला शरिरांतील स्रोतसांचे खुलेपणाची अत्यंत अवश्यकता व इतर पदार्थ चे अत्यल्प वाढीनेंहि या स्रोतसांमध्यें थोडाफार संकोच अथवा प्रतिबंध उत्पन्न झाला कीं वायूला अडथळा उत्पन्न होतो. व वायूचा स्वभावच संचारशीलता असल्यानें अडथळ्याचा प्रतिकार तत्काल सुरू होतो. यामुळें वातविकारांमध्यें बरेच विकार संसृष्टवायूचे अस ात. विशेषतः ज्या विकारामध्यें वायूच्या नित्य क्रिया कमी झालेल्या असतात (स्पर्शज्ञान कमी होणें, रुचि कमी होणें, मलोत्सर्जन कमी होणें, हात, पाय वगैरेंचें चलनवलन कमी होणें इत्यादि.) त्यांमध्यें रोगाचें कर्तृत्व बहुधा वाढलेल्या वायूकडे नसून, वाढलेल्या कफाकडे असतें. याचे वाढीनें प्रमाणांत किंवा कमीहि असलेल्या वायूच्या क्रिया कमी घडतात. स्पर्शेंद्रिय किंवा त्वचा यांमध्यें नित्यापेक्षां स्पर्शज्ञान कमी होतें. त्यावेळीं ही वायूची क्रिया कमी होण्याचें कारण, वाढलेल्या कफामुळें अधिक स्निग्ध, चिकट,घन,शीत असा रसधातु शरिरांत पसरणें, अधिक घन पदार्थांनीं स्पर्शेंद्रियांतील सूक्ष्म स्रोतसांचा अवरोध होणें व या कारणांनीं स्पर्शज्ञान कमी होणें. अशी ही कारणपरंपरा असते; पण अशा वेळीं कारण मात्र वायूची वाढ असत नाहीं. एकाद्या संधिभागांत सूज येऊन तीमुळें स्नायूंची व पेशींची हालचाल नीट होईना, व त्यामुळें त्या भागाचें चलनवलनहि विकृत झालें; ठणकाहि आहे, ठणका वायूचा व चलनाचे वायूच्या क्रियांत विकृति, परंतु कारण मात्र संचित पदार्थ (सुजलेल्या आंगांतील) असतो. असल्या प्रकारच्या रोगांवर उपचारहि वातनाशक नसून वातानुलोमक ह्मणजे वायूचे मार्गांत आणि क्रियांत विघ्न उत्पन्न करणाऱ्या पदार्थांची अडचण दूर करणें असेच असतात; वायूचे विकारांपैकीं एक प्रकार मात्र असा संभवतो कीं, त्यांत कारण वायूचीहि वाढ नाहीं आणि इतर एकाद्या दोषाची अथवा धातूचीहि नाहीं. तर ज्या संवेदनाशक्तीच्या आद्यप्रेरणेमुळें शरीरावयव किंवा शरीरघटक कार्यक्षम होतात तिची क्षीणता हें कारण असतें. एकाद्या अथवा सर्व शरिराची संवेदनाशक्तीच जर कमी झाली तर तीमुळें उत्तेजित होणाऱ्या सर्व स्नायूंची हालचाल मंदावते. आणि हालचाल कमी झाली कीं सर्व क्रिया मंदावतात, अभिसरण कमी होतें, एकाद्या जागीं फाजील संचय होतो; संचय झाल्यावर त्याचे पुढील सुजणें, कुजणें, इत्यादि प्रकार होतात. असा एक प्रकार ध्यानीं घेण्यासारखा असून बहुधा हा इंद्रियनाश या सदरांत येणारा व असाध्य असतो. बाकीचे वातविकारांमध्यें त्याचे कार्यांत व मार्गांत व्यत्यय हें मुख्य कारण असतें. वायूचे क्रियांचा अधिक परिणामहि रोगच

असतो. जसें अधिक बोलणें—बडबड, अधिक चालणें, धांवपळ, हातवारे करणें इत्यादि फाजील व्यापार हे वायूचे विकारच असून ते त्रासदायकहि असतात. पण यांतहि सूक्ष्मदृष्ट्या विचार केला असतां, वायूची वाढ नसून त्याचा कोप अथवा उन्मार्गगामिता असते असें दिसून येईल. सर्व शरिरांत वायूची वाढ तत्वतः व्हावयाची म्हणजे धातुक्षीणता यावयास पाहिजे. आणि धातुक्षीण झालेल्या क्षीण शरिरामध्यें योग्य क्रिया कोठून व्हावयाच्या ? यासाठींच वातविकारांचे गणनेमध्यें स्वतंत्र वातविकारांचा उल्लेख कमी असतो. वायूचा हा विशेष दाखविण्यासाठीं वायू **योगवाही** म्हणजे संयोगानुरूप कार्य करणारा आहे असें त्याचें वर्णन आहे.

योगवाहः परं वायुः संयोगादुभयार्थकृत् ॥
दाहकृत्तेजसा युक्तः शातकृत्सोमसंश्रयात् ॥१॥ (चरक)

वायु हा योगवाही असून तो पित्ताशीं मिश्र झाला असतां दाहकारी, व कफाशीं संयुक्त झाला असतां शीतोत्पादक होतो. या वायूचे वर्णनाचा तात्विक आशय असाच आहे कीं, शुद्ध स्थितींत वाढलेल्या वायूचीं लक्षणें रोगोत्पादक नसून वायूचा इतर दोषांशीं संयोग झाला असतां तो रोगकारी होतो. व याचेंच विकारांत इतर दोषांचीं दर्शक लक्षणें असतात. याचेंच स्पष्टीकरण वायूचे **आवरणांच्या** अनेक प्रकारांनीं केलें आहे.

वायोरावरणं चातो वहुभेदं प्रवक्ष्यते ॥
(अ. हृ. नि. स्था. अ. १६)

वायूचें अनेक प्रकारचें आवरण म्हणजे संयोग सांगतो. अशी प्रस्तावना करून एकंदर बावीस प्रकार सांगितले आहेत.

(इति द्वाविंशतिविधं वायोरावरणं विदुः ॥)

या आवरणांचा बोध वायूचें ज्ञानाला बराच मदतगार होणारा आहे. आवरणाचे प्रकार येणेंप्रमाणें:—

आवृत किंवा प्रतिबंध पावलेल्या वायूचीं लक्षणें.

१ पित्तावृत वायु–लक्षणें:—दाह, तहान, शूल, भ्रम, अंधारी येणें, तिखट, उष्ण, अम्ल व खारट या पदार्थांनीं जळजळ–दाह–होणें आणि थंड पदार्थांची इच्छा होणें.

२ कफावृत वायु–लक्षणें:—शीतता (थंडी वाजणें) जडपणा, वर सांगितलेल्या तिखट वगैरे पदार्थांनीं आराम वाटणें, उपवास, व्यायाम, रूक्ष व उष्ण पदार्थ यांची इच्छा होणें.

३ रक्तावृत वायु–लक्षणें:—त्वचा व मांस यांमध्यें दाह आणि ठणका, सूज, सुजेवर लाली आणि गांधी उठणें.

४ मांसावृत वायु–लक्षणें:—घट्ट सूज, पुळ्या येणें आणि मुंग्या आल्यासारखें वाटणें.

५ मेदानें आवृत वायूचीं लक्षणें:––मृदु, स्निग्ध, सरकणारी, अशी सूज येणें अरुचि. याला आढ्यवात म्हणतात.

६ अस्थ्यावृत वायु–लक्षणें:––सर्वांग सुया टोंचल्याप्रमाणें दुखणें आणि गात्रें शिथिल होणें. दाबून घेण्याची व अति उष्ण स्पर्शाची इच्छा.

७ मज्जावृत वायु-लक्षणें:––वांकणें, (हाडें) जांभया येणें, गुंडाळल्याप्रमाणें वाटणें, आणि दाबल्यानें आराम वाटणें.

८ शुक्रावृत वायु–लक्षणें:—शुक्राचा वेग फार (कामुकता) अथवा वेग अगदीं नसणें किंवा शुक्राचें उत्सर्जन न होणें.

९ अन्नावृत वायु-लक्षणें:––जेवल्यावर पोटाला रग लागणें–दुखणें, अन्न पचल्यावर आराम वाटणें.

१० मूत्रावृत वायु लक्षणें:—लघवी न होणें, मूत्राशय फुगणें.

११ विडावृत–पुरीषावृत वायु–लक्षणें:—अधोभागांतील मळांचें उत्सर्जन न होणें गुदद्वारांत कापल्याप्रमाणें वायु सरकतांना दुखणें, जेवल्यावर पोट फुगणें, अन्नाचे भारामुळेंच मलोत्सर्जन होतें. मळ कोरडा असून मोठ्या कष्टानें आणि वेळानें पडतो.

सर्वधात्वावृत (सर्व धातूंमध्यें कुपित झालेला) वायु—लक्षणें—कमर, पाठ व ओंटीपोट यांत वेदना. वायूची प्रतिलोमता आणि हृदयांत वेदना होणें व अस्वस्थता येणें.

१३पित्त आणि कफ व वायु यांचा संसर्ग—पित्तावृतप्राणवायु लक्षणें भ्रम, मूर्च्छा, दाह आणि अन्नाचे पच्यमान अवस्थेंत वांति होणें. त्याचप्रमाणें अनेक प्रकारच्या वेदना.

१४ पित्तावृत उदानवायु–लक्षणें:—भ्रम वगैरे वरील लक्षणें शिवाय अंतर्दाह आणि उत्साहनाश–ग्लानि.

१५ पित्तावृत उदानवायु–लक्षणें:—सर्वांगाचा दाह, ग्लानि, निरुत्साह, वेदना.

१६ पित्तावृतसमान वायु––लक्षणें. पाचक अग्नीचें मांद्य, घाम फार येणें. अस्वस्थता आणि तहान लागणें.

१७ पित्तावृत अपान वायु–लक्षणें—अपानमार्गांत दाह, मळावर पिंवळेपणा येणें. मूत्रमार्ग आणि मलमार्ग यांमध्यें दाह आणि वेदना.

१८ कफावृत प्राणवायु–लक्षणें—सुस्ति, झांपड, अरुचि, वांति, थुंकणें, शिका येणें, ढेंकरा, श्वासोच्छ्वास यांचा अवरोध.

१९ कफावृत उदानवायु–लक्षणें—अंग जड होणें. अरुचि, वाणी व स्वर अडखळणें–अडकणें, बल आणि कांति–वर्ण–नाश पावणें.

२० कफावृत व्यानवायु–लक्षणें—सांधे धरणें, हाडें फुटणें, शब्द अडणें, सर्वांग जड होणें चालतांना अडखळणें.

२१ कफावृत समानवायु—लक्षणें अंग गार होणें, घाम न येणें. व अग्निमांद्य

२२ कफावृत अपानवायु–लक्षणें मूत्र व मळ यांचें कफयुक्त उत्सर्जन (यणेप्रमाणें हे बावीस प्रकार होत.).

याशिवाय आणखीं वायूचे पोटभेदांमध्यें परस्पर आवरणाचीं लक्षणें हि दिलीं आहेत.

ह्या सर्व लक्षणांचा विचार करतां स्पष्टपणें निदर्शनास येणारी गोष्ट ही कीं, वायूचें रोगकर्तृत्व हें त्याचे स्वतंत्र वाढीनें होत असलें तरी अनावृत किंवा अनिरुद्ध अवस्थेंत वायूचे विकार संभवत नाहींत. कोणताहि वातविकार असो, त्यामध्यें वायूचे मार्गांत–संचारांत कशामुळें तरी व्यत्यय हा आलेला असलाच पाहिजे. त्याशिवाय वातविकारांचा संभव नाहीं. याचे स्पष्टीकरणासाठीं वातविकारांचीं कांहीं उदाहरणें घेऊं.

वायूचे प्रसिद्ध विकारांमध्यें पक्षाघात किंवा अर्धांगवायु प्रसिद्ध आहे. हा विकार वायूनें होतो ह्मणजे काय होतें ? पक्षाघाताची संप्राप्ति आयुर्वेदीय ग्रंथांत दिली आहे ती अशी:—

गृहीत्वाऽर्धं तनोर्वायुः शिराःस्नायूर्विशोष्य च ।
पक्षमन्यतरं हंति संधिबंधान् विमोक्षयन् ॥ १ ॥

अष्टांगहृदय, माधवनिदान.

गृहीत्वा वा शरीरार्धं शिराः स्नायूर्विशोष्य च ॥

चरकसंहिता.

अधोगमाः सतिर्यग्गा धमनीरूर्ध्वदेहगाः ।
यदा प्रकुपितोऽत्यर्थं मातरिश्वा प्रपद्यते ॥ १ ॥
तदन्यतरपक्षस्य संधिबंधान् विमोक्षयन् ।
हंति पक्षं तमाहुर्हि पक्षाघातं भिषग्वराः ॥ २ ॥

सुश्रुत संहिता.

या संप्राप्तीमध्यें कुपित झालेला वायु शरीराचे एका भागांतील शिरा व धमनी आणि स्नायु यांचें शोषण करतो व त्यामुळें पक्षाघात होतो, असा अभिप्राय आहे. कोणत्याही भागांतील अभिसरण आणि संवेदना यांचा नाश झाला ह्मणजे तो भाग निरुपयोगी–नष्ट–समजावयाचा. शिरांचे शोषणानें अभिसरण व स्नायुंचे शोषणानें संवेदना व गति यांचा नाश होतो आणि त्यामुळें शरिराचा अर्धा भाग क्रियाशून्य–मृतप्राय होतो, म्हणूनच त्याला पक्षवध असेंहि नांव योजलें आहे. या विकारांत

वायु वाढलेला असून त्यामुळें शोषण झालेलें असतें हें खरें असलें तरी ज्यावेळीं शरीरार्ध क्रियाशून्य होतें त्यावेळीं वायूचे संचाराला शोषणामुळें स्रोतःसंकोच हेंच कारण असतें. असें झालें नाहीं तोंपर्यंत वायु वाढलेल्या भागांत रूक्षता, लाघव, पारुष्य इत्यादि वातगुणांचें आधिक्य होईल. पण त्यामुळें,

कृत्स्नोऽर्धकायस्तस्य स्यादकर्मण्यो विचेतनः ॥

मा. नि. अ.हृ. च. सु.

"त्या रोग्याचें सर्व शरीरार्ध क्रियाशून्य इतकेंच नाहीं तर चेतनाशून्य होतें." अशी स्थिति येण्याचें कारण नाहीं. धातुक्षय–रक्तक्षय–झाला असतां अशा प्रकारचा वातप्रकोप होतो किंवा धातुक्षय नाहीं इतकेंच नव्हे तर केवळ वायूची वाढहि झालेली नाहीं अशा स्थितीमध्यें वायूचे मार्गरोधामुळेंच पक्षाघात होऊं शकतो. पक्षाघाताचे दोन प्रकार सांगितले आहेत. एक वायु वाढल्यामुळें होणारा व दुसरा वायु न वाढतां त्याचे संचारांत व्यत्यय आल्याकारणानें होणारा. पहिल्याला केवळ वातजनित आणि दुसऱ्याला संवृतवातजनित अशीं नांवें आहेत. दुसऱ्या प्रकारामध्यें कफमिश्र वायूनें अर्थात् कफानें मार्गसंरोध होऊन कुपित झालेल्या वायूनें होणाऱ्या पक्षाघातांत, शीतता, गुरुत्व व सूज हीं लक्षणें असल्याचा उल्लेख आहे. आणि हीं लक्षणें वायूचे वाढीचीं तर नाहींतच पण ज्या वेळीं या लक्षणांची वाढ झालेली दिसून येते त्यावेळीं त्यांचे विरुद्ध गुणाचे वायुचा कांहीं अंशीं क्षयच असतो. वाढीचे अवस्थेंत दोन प्रकार. एक वायूची वातकारक पदार्थांनीं वाढ होऊन त्याचें शोषणात्मक कार्य सुरू होणें व दुसरा प्रकार म्हणजे आकस्मिक जखम वगैरे कारणांनीं धातुक्षय–रक्तक्षय–होऊन वायु वाढणें. पहिल्याहून दुसरा प्रकार अधिक परिणामकारक व यासाठींच वातजन्य पक्षघात कष्टसाध्य व धातुक्षयजन्य तर असाध्यच असा त्याचा उल्लेख केला आहे आणि संसर्गजन्य साध्य असल्याचें सांगितलें आहे. कारण त्यामध्यें झालेला मार्गावरोध दूर झाला कीं शरीरव्यापार पुनश्च सुरळीत चालतात. जोंपर्यंत अभिसरण व चेतना–संवेदना–आहे तोंपर्यंत सुधारणोपायांचा उपयोग व्हावयाचा.

या पक्षाघाताचे उदाहरणावरून ध्यानांत येईल कीं, शुद्ध वातविकारांत क्रियाशून्यता येते. क्रियाशून्यतेचे विकार कमी अभिसरण व संवेदना यांचा अभाव ज्यांत असले विकार निदानशास्त्रांत 'असाध्य' म्हणून शेरा मारण्याला योग्य–बहुतेक वातविकार मार्गरोधामुळें होणारे म्हणून उल्लेख, यासाठींच केला आहे. होणारा मार्गरोध वायु वाढला असतां झाला आहे कीं न वाढतां झाला आहे

इतकाच विचार यांत करावयाचा असतो. वायु न वाढतां दुसऱ्या पदार्थांचे वाढीनें त्याचे क्रियांत व्यत्यय आल्यामुळें विकाराला वातविकार नांव देण्यांत येतें. मेदोवृद्धीमध्यें उघड उघड वायूचे विरुद्ध गुणाचा मेद वाढून वायूच्या क्रिया कमी झाल्या असतां या विकाराला वातक्रियांचें वैषम्य सुचविण्यासाठीं आढयवात हें नांव दिलें आहे. केवळ वाढ किंवा केवळ ऱ्हास म्हणजे वैषम्य अगर रोग नव्हे. अस्थानीं अयोग्य प्रमाणांत झालेली वृद्धि क्षय म्हणजे वैषम्य किंवा रोग हें यावरून उघड होत आहे. वातविकारांमध्यें वायु वाढला तरी त्याला अवरोध झाल्याशिवाय विकार होत नाहीं याचें उदाहरण वात रक्त या विकारांत स्पष्ट आहे.

वातरक्त.

वातरक्त हा विकार वात आणि रक्त यांचे विकृतीमुळें झालेला असतो व म्हणूनच वातरक्त हें नांवही योजलें आहे, म्हणजे या विकारांत रक्त आणि वायु यांची विकृति एक कालीं व एक रोग उत्पन्न करणारी असते आणि यावरूनच या विकारांत रक्त वाढलेलें असत नाहीं हें उघड असतें. वातरक्त हा एक संधिवाताचा प्रकार आहे. यांत सूज असते पण ही सूज वाढलेल्या व वाढून दूषित झालेल्या रक्तामुळें आलेली नसून क्षीणावस्थेंत दूषित झालेल्या रक्तामुळें आलेली असते. विशेषतः अधोभागीं सूज येणें. संधींतच सूज येणें आणि रक्ताचे विदाहावस्थेमुळें स्पर्श सहन न होणें हीं लक्षणें रक्तवृद्धीचीं नाहींत. वायु आणि रक्त एकसमयावच्छेदानें वाढणारीं नाहींत; कारण तीं परस्पर विरुद्ध आहेत.

व संप्राप्तीमध्यें 'तत्संपृक्तं वायुना दूषितेन तत्प्राबल्यादुच्यते वातरक्तं' (दूषित वायूनें संयुक्त आणि वायूचें प्राबल्य असतें, यासाठीं याला वातरक्त नांव आहे) असा खुलासा केलेला आहे. चरकांत वातरक्ताविषयीं वायूची वाढ स्पष्टच सांगितली आहे.

वायुर्विवृद्धो वृद्धेन रक्तेनावारितःपथि ॥ (च० सं० चि स्था. अ२९ वाढलेला वायु वृद्धरक्तानें अवरुद्ध झाला असतां वातरक्त उत्पन्न करतो ! यांत रक्तवृद्ध असा उल्लेख केला आहे, तथापि रक्ताची वाढ सर्व शरिरांतील नाहीं. कारण कारणें सांगितलीं आहेत तीं रक्ताचे वाढीचीं नाहींत.

कषायकट्वतिक्ताल्परूक्षाहारादभाजनात् ॥

तुरट, कडु, तिखट असला आहार, कमी आहार किंवा अनाहार हीं कारणें रक्त वाढविणारीं नाहींत त्यांनीं वायुची वाढ होते. अशा

अवस्थेंत प्रवास वगैरे कारणांनीं खालच्या पाय वगैरे भागांत किंवा संधींत संचित झालेलें रक्त कमीपणामुळें त्याच जागीं राहतें. त्याचें अभिसरण होत नाहीं, व त्या भागांत वायुचे संचाराला अवरोध होऊन सूज येते. रक्त दूषित होतें, या वर्णनावरून वातरक्तांत वृद्धि वायूची व प्रमाणस्थित किंवा कमी झालेल्या रक्ताची सूज असा हा विकार असतो. यामुळेंच धमनी व अंगुलीसंधींचा संकोच होतो.

धमन्यङ्गुलिसंधीनां संकोचोंगग्रहोऽतिरुक्.।।

त्याचप्रमाणें सुजेंत वाढ नसणें हें लक्षण असतें.

शोथस्य रौक्ष्यकृष्णत्वश्यावतावृद्धिहानयः ॥

या विकाराचे असाध्य लक्षणांत अंगुलीवक्रता-बोटें वांकडीं होणें-हें एक आहे. स्नायूंचा संकोच व धमनींची शुष्कता या लक्षणानें दाखविली आहे. वातरक्त हा वातविकार असल्या प्रकारचा म्हणजे वृद्धवातानें झालेला असला तथापि त्यांतहि अवरोध पाहिजे (रक्तेनावारितः पथि ।) हें यांत उघड आहे. मात्र ज्या रक्तामुळें आवरण किंवा अवरोध झाला तें वाढलेलें नाहीं इतकाच फरक व या कारणानें या विकारावरील उपचारांमध्यें बृंहणाचें धोरण स्वीकारलें पाहिजे. सर्व उपचार याच धोरणानें सांगितले आहेत. घृतें व सिद्धक्षीर यांचाच विशेष उपयोग सांगीतला आहे.

वातरक्तामध्यें कांहीं ठिकाणीं रक्त वृद्ध असल्याचा निर्देश आहे व त्यावरून या विकारांत रक्त वाढलेलें असतें अशी समजूत आपाततः होण्याचा संभव आहे. तथापि वायूची वाढ असतां रक्ताची वाढ होणें संभवनीय नाहीं. ज्यावेळीं रक्त वाढेल त्यावेळीं वायु क्षीणच व्हावयास पाहिजे ही गोष्ट अगदीं सिद्ध आहे. व रक्त वाढलेलें आणि वायु क्षीण असें असतां मग या विकारांत वायूचा संबंधच कां असावा ? परंतु वातरक्तामध्यें आधीं वायूचा उल्लेख केला आहे त्यावरून हें उघड होत आहे कीं वायूची वृद्धि या विकारांत मुख्य आहे. व एकाद्या संधी वगैरे टिकाणीं रक्तसंचय अर्थात् रक्ताची वाढ व त्यामुळें संचाराला अडथळा असा याचा उघड निष्कर्ष आहे. यांत सांचून बिघडलेलें रक्त काढून टाकण्यास सांगितलें आहे. त्याचा उद्देश संचाराचे अभावीं जें रक्त नासलें त्याचें उत्सर्जन इतकाच आहे.

वायूची वृद्धि नाहीं किंबहुना क्षीणता असतां होणारा याच जातीचा म्हणजे सांधे दुखणें, सुजणें या स्वरूपाचा संधिवातःचेच जातीचा दुसरा विकार सांगितला आहे. परंतु त्यांत वायूची विकृति असली तरी प्राधान्य नाहीं असें असल्यानें त्याला अशा अर्थाचें सूचक नांव दिलें आहे; अशा प्रकारचा विकार.

आमवात.

हा होय. या विकारांत कफकारक अशा आहाराचारांमुळें अन्नरस व परंपरेनें रसरक्तधातुहि कफदूषित होतात व यालाच आम हें नांव दिलें आहे. असला आम रसधातु सर्व शरीरांत पसरतो. असला रसधातु घन व पिच्छिल–बुलबुळीत झालेला असतो. व असल्या घन रसधातूनें सर्व धमनी आणि इतर शरीरभाग स्नायु–पेशी–यांमध्यें अभिष्यंद उत्पन्न होतो, सूज येते व स्नायूंचे क्रियेमध्यें व्यत्यय येऊन सर्वांगाला विशेषतः संधींमध्यें शूल होतो. या विकारांत सर्व शरीरांत अभिष्यंद झालेला असतो. अर्थात् वाढ आमाची–कफाची–आणि क्रिया वैषम्य व शूल हें मुख्य लक्षण वायूचें यामुळें उत्पादक आमाचा खुलासा होण्यासाठीं नांव आमवात असें दिलें आहे. याचीं उत्पादक कारणें व संप्राप्ति आयुर्वेदांत दिली आहे ती –

कारणें:—“ विरुद्धाहारचेष्टस्य मंदाग्नेर्निश्चलस्य च ॥ ”
संप्राप्ति:—“ तेनात्यर्थं विदग्धोऽसौ धमनीः प्रतिपद्यते ॥

वात्तपित्तकफैर्भूयो दूषितः सोऽन्नजो रसः ॥
स्रोतांस्यभिष्यंदयति नानावर्णोऽतिपिच्छिलः ॥ १५ ॥

यामध्यें श्लेष्मल कारणें आणि त्यांचा सर्व शरीरव्यापी अभिष्यंद ही अवस्था आमवात निर्माण करते. वायु मुख्य नाहीं आमानें वायूचा अवरोध हेंच विकारोत्पादक कारण आहे. वातरक्तामध्यें रक्ताची वृद्धि कारण नाहीं वृद्ध वायु असतो वाढलेल्या वायूचा अवरोध असल्यानें त्यांत संकोच असतो आणि आमवातांत वायूची वाढ नाहीं तर आम-जन्य अभिष्यंद. वातरक्तांत संकोच आणि शुष्कता हें पर्यवसान तर आमवातांत अभिष्यंद सूज, शीतता–स्तब्धता हें पर्यवसान. यामुळें हे दोनहि विकार वायूचे. दोहोंतहि वातसंचाराचा व्यत्यय असतो पण एकांत वायु वाढलेला आणि दुसऱ्यांत नाहीं असा दोन विकारांत स्पष्ट फरक आहे. व हा अशा प्रकारचा फरक विचारांत घेणें हेंच वातविकारांत महत्वाचें असतें.

ऊरुस्तंभ.

हा विकारहि आमवाताप्रमाणेंच होणारा. फक्त यांतील विकृति मांड्यांतच मर्यादित असते. हा विकारहि वायूचा. मांड्यांची हालचाल सुरळीत होत नाहीं पण कारण कफ. यावर उपचार कफनाशक. वायूचा विकार या शंकेनें कदाचित् वातनाशक स्नेहन वगैरे केल्यास फायदा न होतां विकार वाढावयाचा,

" वातशंकिभिरज्ञानात्तस्य स्यात् स्नेहनात्पुनः ॥
पादयोः सदनं सुप्तिःकृच्छ्रादुद्धरणं तथा ॥ १ ॥

अज्ञानानें वायु समजून ' वातस्योपक्रमः स्नेहः ' या सामान्य नियमाअन्वयें स्नेहन (तेल चोळणें इत्यादि) केल्यास त्यानें पायांत स्तब्धता येते व उचलतां येत नाहींत. अशा प्रकारें वायूचे विनाशक उपाय या विकारांत दुष्परिणामी होत असल्याचें सांगितलें आहे या विकारांचे उदाहरणांवरून वायूचे विकार आवरणाशिवाय–अवरोधाशिवाय–होत नाहींत ही गोष्ट ध्यानीं येईल. व यामध्यें दोन प्रकार कसे संभवतात याचा उलगडा होईल.

वायूच्या उत्सर्जक गुणाचें महत्व.

वायु हा तत्वतः वाढून त्याला प्रतिबंध झाल्यानें किंवा तो कमीच होऊन त्यामुळें, कोणत्याहि कारणानें कां होईना पण जर शरीरांतील कोणत्याहि भागांत वायूचें उत्सर्जन करण्याचें कार्य न होईल तर प्रत्येक ठिकाणीं विकार होईल. पक्वाशयांतील वायु कमी झाला अगर वाढून गुदमार्गांतील मृदुता कमी होऊन त्याचे संकोचामुळें मळाचें उत्सर्जन झालें नाहीं तरी मळाचे उत्सर्जनाभावीं विकार होणारच. वाढ झाली असतां प्रतिलोम वायूमुळें वेदना फार व त्यामुळें रोगसंभव अधिक. त्रास फार पण अनुलोमन सुखसाध्य. तत्वतः वायु कमीच झाला तर वेदना कमी रोगोद्भव उशीरानें पण व्याधिनाशही उशीरानें आणि कष्टानें. एकूण उत्सर्जनक्रियेचे न्यूनतेमुळेंच कमी अधिक प्रमाणांत वातविकारांचा संभव; यामुळें वातविकारांचें सामान्य स्वरूप म्हणजे वायूचा गतिविघात होय असेंच ठरतें. वायूचा रूक्ष गुण वाढला व त्यामुळें रूक्षता अथवा स्रोतसांमध्यें शुष्कता आली तर निरनिराळ्या आशयांत व्हावयाचा अनेक उपयुक्त रसांचा स्राव होत नाहीं, अप्रत्यक्षपणें हा गतिनिरोधच होय. ' अव्याहतगतिः ' वायु पाहिजे म्हणजे पूर्ण शंभर वर्षें वांचतो हें सांगण्यांतील हेतु असाच आहे. शरीराला वायूच्या उत्सर्जक गुणाचें फार महत्व आहे. व तें कमी होणें म्हणजेच वातविकार. मग हें उत्सर्जन अभिष्यंद होऊन होवो, पित्ताच्या फाजील उष्णतेचा स्पर्श सहन न झाल्यानें एकाद्या भागांतील ज्ञानतंतु व त्याचे अनुरोधानें स्नायु यांचा आकस्मिक संकोच झाल्यामुळें होवो, रूक्षता वाढून स्रोतसांत शुष्कता येऊन होवो किंवा ज्ञानतंतूंच्या शक्तिक्षीणतेनें स्वाभाविक उत्तेजनाची कमतरता झाल्यानें होवो, या गोष्टीचा विचार चिकित्सा करतांना करणें जरूर असलें तरी 'उत्सर्जनांत व्यत्यय म्हणजे वातविकार, हें सामान्य तत्व अबाधित राहातें. ज्याप्रमाणें कफाचे संयोजन व पित्ताचें विभाजन हीं कार्यें शरीरस्थितीला अत्यवश्यक

त्याचप्रमाणें हें वायूचें उत्सर्जनकार्यहि तितकेंच अवश्यक आहे. व या दृष्टीनेंच वायूची योजना मुख्य तत्वांत केली आहे. संयोजक अणु म्हणजे कफ किंवा श्लेष्मा, विभाजक किंवा पाचक अणु म्हणजे पित्त या व्यावहारिक भाषेप्रमाणें वायूला उत्सर्जक अणु हें नांव देतां येईल. याप्रमाणें श्लेष्मा, पित्त आणि वायु हे आयुर्वेदांतील त्रिदोष आहेत.

संसर्ग आणि सन्निपात.

आयुर्वेदामध्यें ज्याप्रमाणें या तीन दोषांचीं स्वतंत्र कार्यें सांगितलीं आहेत त्याचप्रमाणें त्यांत मिश्र स्थितींतील विकारहि सांगितले आहेत.

संसर्गः संन्निपातश्च तद्द्वित्रिक्षयकोपतः ॥

अष्टांगहृदय.

त्या दोन दोषांच्या क्षयाला किंवा कोपाला आणि तीनहि दोषांच्या क्षयाला किंवा कोपाला अनुक्रमें संसर्ग आणि सन्निपात हीं नांवें आहेत अशी सामान्य व्याख्या दिली आहे. आणि सामान्यत्वें संसर्गाचे ठळक प्रकार तीन व संनिपाताचे प्रकार तेरा सांगितले आहेत.

संसर्गस्त्रिधा तत्र तु तान्नव ।
त्रयोदश समस्तेषु ॥

अष्टांगहृदय.

या प्रकारांच्या स्पष्टीकरणापूर्वीं संसर्ग व संनिपात यांविषयीं थोडा अधिक खुलासा करावयास पाहिजे.

संसर्ग म्हणजे काय ?

दोन दोषांची मिश्र विकृति. अशी विकृति होईल काय ? कफ व पित्त यांची एकाच वेळीं वृद्धि होईल काय ? कफ शीत व पित्त उष्ण अर्थात् हे पूर्णपणें परस्परविरोधि दोष. यांचें मिश्रण होणार कसें? पित्त तीक्ष्ण कफ त्याविरुद्ध मंद त्याचप्रमाणें वायु रूक्ष कफ स्निग्ध वायु चंचल तर कफ स्थिर अशांची एकत्र एकदम वाढ अथवा मिश्रण कसें व्हावें ? व असें असतां संसर्ग संभवनीय कसा ? असा प्रश्न स्वाभाविकपणेंच उत्पन्न होतो. याचें उत्तर काय ? याचें उत्तर असें आहे कीं, हीं मिश्रणें दोषांच्या स्थूल स्वरूपाचीं नसून सूक्ष्म क्रियांचीं सांगितलीं आहेत. तीन दोषांच्या क्रिया म्हणजे अनुक्रमें, संघटन, पचन आणि विसर्जन किंवा विसर्ग, आदान व विक्षेप. या क्रियांपैकीं एका क्रियेची विकृति एक दोषी दोन क्रियांची विकृति संसर्ग किंवा द्विदोषि आणि तीन क्रियांची त्रिदोष किंवा संनिपात ही कशी होते. एकाद्या ठिकाणीं विसर्ग किंवा घटन अधिक झालें याला एकदोषी कफाची वृद्धि

किंवा विकृति म्हणतां येईल. उदाहरण--एकाद्या भागांत आलेली सूज. ज्या भागांत सूज आली तेथें अधिक द्रव्याचा संग्रह झाला हें अगदीं उघड आहे. सुजेविषयीं सामान्य लक्षण सांगतांना कोठें तरी (स्थानानुरूप) निचय-संचय-होतो असें सांगितलें आहे.

उत्सेधं संहतं शोथं तमाहुर्निचयादतः ॥

आणि सूज अधिक संग्रहानें होते याचेंच स्पष्टीकरण-सूज कफावांचून नाहीं. " शोफः कफोदयात् । ऋते न " या वाक्यानें केलें आहे. त्वचा मांस व अर्थात् त्यांमधील शिरा, स्नायु, रुधिर यांत संग्रह अधिक झाला म्हणजे संचय होतो, संचयाला सूज म्हणतात. केवळ संग्रह आहे तोंपर्यंत सूज कफाचीच आहे. आणि कफाचीं लक्षणें जडता, स्निग्धता, स्थिरता इत्यादि सुजेंत असतात. परंतु कांहीं कालानें सुजलेल्या भागांत संचित झालेलें रक्त वगैरे अभिसरणाचे अभावीं कुजूं लागतें. कोणताहि पदार्थ एकाद्या जागीं अनैसर्गिक रीतीनें संचित झाला कीं त्याचें पचनहि अनैसर्गिक रीतीनेंच होतें व नंतर उत्सर्जनामध्येंहि अनैसर्गिकपणा असतो. आणि जेथें हे व्यापार चालतात त्याजागीं अनैसर्गिक अशा वेदना उत्पन्न होतात. व त्यांनाच रोग असें म्हणतात. असो. संचित द्रव्य कुजूं लागलें कीं त्या स्थितीमध्यें एक प्रकारची उष्णता उत्पन्न होते. कुजणें म्हणजे पचन किंवा पृथक्करण होय शरिराच्या अविकृत भागांतून दूषित असलेले पदार्थ पृथक् करणें यासाठीं निसर्गाच्या योजनेनें त्या भागांत पचन सुरू होतें नेहमींचे पचनाहून हें कार्य अधिक प्रमाणांत व्हावयाचें असल्यानें इतकी अधिक पाचकशक्ति येथें कोठून येते हा एक महत्वाचा प्रश्न आहे. वास्तविक पाहतां ज्यावेळीं रोगाची आरंभावस्था होती म्हणजे रोगस्थान विशेष दूषित झालें नव्हतें, तेथील पचनशक्तीवर फार बोजा पडला नव्हता अशा वेळीं जी पचनशक्ती रोगकारक द्रव्याला प्रतिकार करूं शकली नाहीं तिचा उपयोग रोगाची पूर्ण वाढ झाली, रोगकारक द्रव्याचा संग्रह भरपूर झाला अशा वेळीं व्हावा हें आश्चर्य नाहीं काय ? अशी शंका स्वाभाविक असून तिचें समाधान करण्याला अनुभवसिद्ध तर्काशिवाय दुसरें साधन नाहीं. याविषयीं तीन प्रकारचे तर्क संभवणारे आहेत. ते येणेंप्रमाणें:--

रोगप्रतीकारी सामर्थ्य कोठून उत्पन्न होतें ?

१ ज्या वेळीं एखाद्या ठिकाणीं रोगकारक द्रव्याचा संचय होऊन त्रास पीडा वेदना अधिक होऊं लागतात त्यावेळीं तेथील ज्ञानतंतूंचें कार्य वाढतें व स्वाभाविकपणेंच सर्व शरीरांतील ज्ञानतंतूंचें कार्य कमी होऊन रोगी भागांत सर्व शक्ति एकवटतात. एकाद्या भागांत अस्वाभाविक झालेला हल्ला परतविण्यासाठीं सर्व शरीरांतील सामर्थ्य त्या भागांत

उपयोगी पडावें यांत नवल नाहीं. व यामुळेंच रोगस्थानांत प्रतीकारी सामर्थ्य पुरें पडतें.

२ एकाद्या ठिकाणीं रोगकारक द्रव्याचा जमाव होऊं लागला म्हणजे नित्याचे क्रियांमध्यें ज्या पचनसामर्थ्याचा उपयोग व्हावयाचा त्याचा उपयोग न झाल्यानें तें शिल्लक राहतें व रोगकारी द्रव्याचा कांहीं मर्यादेपावेतों संचय होतो त्या अवधींत शिलकी सामर्थ्याचीहि वाढ होते व शिलकेमुळें वाढलेलें सामर्थ्य प्रतीकाराला समर्थ होतें.

३ नित्य ज्या क्रिया चालतात त्या स्थानी सामर्थ्याच्या सर्वांशानें चालत नसून त्याचे कांहीं अंशानें चालत असतात. व रोग होतो त्या वेळीं त्याचा प्रतिकार रोगस्थानीय राखींव सामर्थ्याकडून होतो. एखाद्या विशेष प्रसंगीं मनुष्य अचाट काम करतो. त्या कामाची कल्पनाहि नित्याचे अनुभवावरून असत नाहीं. वजन उचलणें, धावणें, अतर्क्य श्रम इत्यादि प्रसंगवशात् अनुभवास येतात. ज्याचें त्यालाही हें सामर्थ्य समजत नाहीं अशा प्रकारचीं अनेक उदाहरणें दृष्टी पडतात. यावरून शरीरांत अतर्क्य असें राखीव सामर्थ्य असतें हें उघड होतें. व या राखीव सामर्थ्यामुळेंच रोगप्रतीकार होऊं शकतो. ही राखीव सामर्थ्याची गंगाजळी जर वारंवार उपयोगांत आणिली तर ती रिकामी होऊन शरीर निकामी होतें. जबरदस्त रोग असल्यास या सामर्थ्याचे उणेपणानें रोगावर त्याचा परिणाम न होतां नाश होतो व रोग असाध्य होतो.

रोगप्रतीकारी सामर्थ्याविषयीं या तीनही कल्पनांचा समावेश शेवटच्याच कल्पनेंत होतो; शारीरिक सामर्थ्य विशिष्टस्थानीं एकवटणें, शिलकी सामर्थ्य उपयोगी पडणें याचा तात्पर्यार्थ शरीराच्या विशिष्ट प्रकारच्या योजनेचा उपयोग होणें असाच होतो व अशी जी योजना तेंच शरीराचें विशिष्ट अगर राखीव सामर्थ्य होय या सामर्थ्यामुळें रोगाचा प्रतीकार सुरू होण्यापूर्वींचे अवस्थेला आयुर्वेदांत रोगाची

आमावस्था.

असें नांव दिलें आहे. ह्या अवस्थेमध्यें रोगकारक द्रव्य व अविकृत धातु यांमध्यें पृथक्करणाची क्रिया सुरू झालेली असत नाहीं ती शरीराच्या विशिष्ट प्रतीकारी सामर्थ्यानें सुरू होऊन रोगट भागाच्या पृथक्करणाच्या अवस्थेला

पच्यमानावस्था

असें यथार्थ नांव दिलें आहे. या अवस्थेंत ज्या पचनशक्तीचें अनैसर्गिक कार्य सुरू होतें तीमुळेंच उष्णता, दाह इत्यादि पचनशक्तीचीं किंवा पित्ताचीं लक्षणें होतात व आरंभींचे केवळ संग्रहातिरे-

काचें म्हणजे कफाचें स्वरूप जाऊन त्याचे मदतीला रोगनाशाचे दृष्टीनें इष्ट कां होईना पण रोगस्थानाला त्रासदायक या दृष्टीनें रोगाला कफ व पित्त या दोन दोषांचें मिश्र स्वरूप येतें. या अवस्थेला रोगाची संसर्गावस्था असें म्हणतात. अनैसर्गिक संग्रह आणि अनैसर्गिक पचन या दोन मुख्य क्रिया एकत्र त्रास देत असतात. संसर्गांतील दोन दोषांची विकृती अशा स्वरूपाची असते. मात्र द्विदोषी विकार या अवस्थेला म्हणत नाहींत. दोन दोषांच्या क्रियावैषम्याचें उदाहरण ह्मणूनच वरील खुलासा केला आहे. द्विदोषी रोग ह्मणजे उभय क्रिया-वैषम्यानेंच रोगाला सुरुवात होणें असा अर्थ अभिप्रेत आहे. कारण कोणत्याही रोगाच्या आम, पच्यमान आणि पक्क अशा तीन अवस्था असावयाच्याच. मग उत्पादक क्रियावैषम्य एक दोषी असो अथवा अनेक दोषजन्य असो. संसर्ग व संनिपात ह्मणजे दोन व तीन दोषांच्या समकालीन क्रियावैषम्यामुळें उत्पन्न झालेले विकार. हे कसे होतात ?

मागील उदाहरणांत (सुजेचे) उत्पादक मुख्य कारण संग्रहरूपी कफाच्या क्रियेचें वैषम्य सांगितलें आहे. कल्पना करूं कीं एकाद्या ठिकाणीं रक्तसंचय झाला, संग्रह कफाचा ह्मणून कफ हें सामान्य कारण त्यांत आहेच. पण कफाचेच कारणानें सूज यावयाची ह्मणजे रक्तामध्यें स्निग्धता, घनता, इत्यादि गुण वाढलेले असावे लागतील आणि असल्या रक्ताचेंच अभिसरण न होणें स्वाभाविक असतें. एकच कफा-त्मक सूज या प्रकारची असेल, परंतु रोग्याचे आहारादिकांमध्यें जर कफकारक आणि विदाहि असले पदार्थ असतील व त्यामुळें तयार होणारा रसधातु व रक्त यांमध्यें स्निग्धता, गुरुता, घनता इत्यादि कफ-गुणांबरोबरच विदाह (जळजळणें, आग होणें, दाहक गुण) हा पित्त गुणहि असेल तर सुजल्या जागीं संचित पदार्थांत आरंभापासूनच कफाबरोबर पित्ताचींहि लक्षणें उत्पन्न होतील. अर्थातच हीं लक्षणें म्हणजे कफाची सुजल्या जागीं शीतता आणि पित्ताची उष्णता नव्हे. किंवा कफाची सुजेंतील घनता आणि पित्ताची मृदुता असलीं विरोधी लक्षणें नव्हेत. कफामुळें सुजेवर पांडुरता आणि पित्तामुळें लाली एकदम येणारी नाहीं हें उघड आहे. व अशा प्रकारची कल्पनाही संसर्गां-विषयीं आयुर्वेदाची नाहीं. सूज उत्पन्न करणाऱ्या रक्तसंचयामध्यें संग्रह-कारी घनता आणि विदाहकारी विदग्धता या दोन रक्ताच्या अनैसर्गिक दुर्गुणांचा बोध व्हावा यासाठीं सूज कफपित्तात्मक आहे अशी संसर्ग-विषयक शास्त्रीय भाषा ठरविली आहे. चिकित्सेला या परिभाषेची अवश्यकता असते. सूज किंवा संचय घालविण्यासाठीं अंतर्बाह्य जे उपाय करावयाचे त्यांमध्यें केवळ कफावर उष्णवीर्य असे उपचार पण कफपित्त असें संसर्गी स्वरूप असतां उपचार संचय घालविणारे पण

अविदाही असे असावे लागतात. व यासाठींच क्रियावैषम्यांतील सूक्ष्म भेद दाखविण्यासाठीं संसर्गाची कल्पना आहे. या संसर्गांचे प्रकार सांगितले आहेत त्यांमध्यें असेंच धोरण आहे कीं संसर्ग असतांही या दोन दोषांमध्यें अधिक विकृति कोणत्या दोषाची. ज्याची विकृति अधिक असते त्याचा उल्लेख आधीं केला जातो, असा सामान्य नियम आहे. जसें,

१ वातपित्त. २ वातकफ. ३ पित्तकफ; हे तीन प्रकार संसर्गाचे मुख्य होत. यांमध्यें दाखविलेले दोन दोषांची विकृति समप्रमाणांत असते अशी कल्पना स्विकारली आहे. अर्थातच संसर्गांतील दोषांचे विकृतीमध्यें नेहमींच सारखेपणा असणें असंभाव्य आहे. ह्मणजे दोन दोषांची विकृति आणि त्यांतील कमी अधिकपणा दाखविणारे भेदही संभवतात. आणि प्रत्येक जोडींतील दोन दोषांच्या अधिक्यावरून प्रत्येकीं दोन प्रकार याप्रमाणें संभवतात.

जसें एकदां १ वाताधिक वातपित्त व २ पित्ताधिक वातपित्त या अवस्थांचे— आधिक्याचे बोधक शब्द योजावयास पाहिजेत. याप्रमाणें वाताधिक वातकफ व कफाधिक—वातकफ आणि पित्ताधिक पित्त-कफ व कफाधिक पित्तकफ असे तारतम्यमूलक संसर्गाचे सहा प्रकार व पहिले समविकृतीचे तीन एकून नऊ प्रकार सांगितले आहेत.

विद्धि संसर्गस्त्रिधा तत्रतु तान्नव ।
त्रीनेव समया वृद्ध्या षडेकस्यातिशायने ॥ (अ० हृ०)

(संसर्ग तीन प्रकारचा व त्यांत एकंदर नऊ दोषभेद होतात. दोन दोषांच्या समप्रमाण वाढीनें तीन व एकाचे आधिक्यानें सहा या प्रमाणें.)

ही तारतम्य कल्पना चिकीत्सेंतील उपचारगुणांचे तारतम्या-साठीं पाहिजे.

संनिपात.

संनिपात ह्मणजे तीनहि दोषांची एकसमयावच्छेदानें विकृति. परस्परविरोधी गुणांचा संसर्ग ज्याप्रमाणें त्यांच्या क्रियावैषम्याच्या प्रत्येक गुणाचा नव्हे त्याचप्रमाणें संनिपात ह्मणजे देखील परस्पर विरुद्ध गुणांच्या तीन दोषांचें संमेलन नव्हे. ज्याप्रमाणें संसर्ग ह्मणजे दोन क्रियांमध्यें समकालीं विषमता त्याचप्रमाणें संनिपात ह्मणजे शरिराच्या तीनहि क्रियांमध्यें एकदम विषमता येणें, ही विषमता कशी येते पाहूं.

कोणत्याहि ठिकाणीं शरीराचे एका कोणत्या तरी क्रियेंत विषमता

आली असतां इतरांवर त्या विकृतीचा परिणाम व्हावयाचाच. संसर्गामध्यें सुजचे उदाहरणांत, विसर्ग आणि आदान किंवा पोषण आणि शोषण, संग्रह आणि पचन यांविषयींचा क्रम सांगितला आहेच. अतिरिक्त द्रव्याचा संग्रह होऊन त्याचें पचन, पृथक्करण होईनासें झाल्यावर त्या भागांत रुधिराभिसरण व धातूंची देवघेवहि होईनाशी होते. पण सुजलेल्या भागांतील स्पर्शसंवेदनाहि कमी होतात. यावरून दोन विकृत क्रियांचा परिणाम तिसऱ्या वियोजन किंवा उत्सर्जन या क्रियेवर होत असल्याचें उघड होतें. असा होत असलेला परिणाम संसर्गाप्रमाणें संनिपातहि नाहीं. संनिपात ही अवस्था म्हणजे एकदम तीनहि क्रिया विकृत होणें. सुजेचेंच उदाहरण घ्यावयाचें तर एकाद्या विषारी प्राण्याचे दंशानें सूज आली त्यावेळीं पूर्वीं कांहींच विकार नव्हता पण दंशांतून विषाचा प्रवेश होतांच त्याचा दंशाचे जागीं असा परिणाम झाला कीं, रुधिराभिसरण बंद झालें, तें बंद झालें यामुळें सूजहि आली, दाह होतो, म्हणजे विषाचा प्रवेश होतांच सर्व क्रिया एकदम विकृत झाल्या. मग या विकृतीचें उत्पादक दंशविष दाहक असेल तर दाह अधिक होईल, विषारी जात शीतवीर्य असेल तर शीतता स्तंभ इत्यादि लक्षणें अधिक असतील. परंतु एकसमयावच्छेदानें विषयुक्त भागाचें पोषण, पचन आणि उत्सर्जन यामध्यें विकृतपणा येणार ही गोष्ट अगदीं उघड आहे. आणि असल्या वैषम्यालाच, संनिपातिक विकृति नांव आहे. ज्याप्रमाणें बाह्य विषारी पदार्थानें एकाद्या ठिकाणीं अशा प्रकारची संनिपातिक विकृति उत्पन्न होते त्याच प्रमाणें शरीरांतच आहारादिकांच्या विशिष्ट प्रकारच्या संमिश्रणापासून एकाद्या विषारी द्रव्याची उत्पत्ति होते आणि हें द्रव्य ज्या ठिकाणीं आपल्या प्रभावानें शारीरक्रियांमध्यें वैषम्य उत्पन्न करतें त्या वेळीं संनिपातिक विकार होतो. असल्या क्रियावैषम्याचे अवस्थेमध्येंहि प्रत्येक क्रियेच्या वैषम्यामध्यें तरतमभाव असावयाचाच. आणि हा तरतमभाव सुचविण्यासाठींच संनिपाताचे अवस्थाभेद—पोटभेद किंवा प्रकार सांगितले आहेत. संनिपात या शब्दानें त्रिविध क्रियांचें वैषम्य अभिप्रेत आहे. आणि असलें वैषम्य शरीरांत विशेष प्रकारच्या मिश्रणापासून तयार होतें, असा उल्लेख आहे. आयुर्वेदानें कोणत्याहि रोगामध्यें आम, पच्यमान, आणि पक्व, अशा तीन अवस्था सांगितल्या आहेत. विकारोत्पादक दूषित द्रव्य एकाद्या जागीं सांठणें ही आमावस्था; त्यानंतर त्या त्या दूषित पदार्थांचें शारीर पदार्थांपासून पृथक्करण सुरू होणें पच्यमान अवस्था आणि पृथक्करणानें वेगळे झालेल्या मळांचे वियोजन पक्वावस्था, या अवस्था ज्या द्रव्यांमुळें उत्पन्न होतात असलें रोगबीजभूत जें द्रव्य त्याला आम असें पारिभाषिक नांव आहे.

आम.

ह्मणजे काय ? याचा खुलासा करीत असतां त्याचे दोन प्रकार सांगीतले आहेत. एक असा कीं:—

ऊष्मणोऽल्पबलत्वेन धातुमाद्यमपाचितम् ॥
दुष्टमामाशयगतं रसमामं प्रचक्षते ॥ १ ॥ (अ. हृ.)

पाचकाग्नीचे अल्पत्वामुळे अपाचित व त्यामुळें दूषित झालेला जो आद्य रसधातु त्याला आम असें म्हणतात.

ही व्याख्या सामान्यत्वें आमाची सांगीतली आहे. आणि सदर श्लोकाचा भावार्थ 'अपक्व रसाला आम म्हणतात' इतका आहे. परंतु सर्व श्लोकाचा सूक्ष्म विचार करूं लागतांच त्यांत बरेच घोंटाळे दिसतात. श्लोकामध्यें आद्य धातु आणि रस असे शब्द आहेत. आद्य हा रस धातु दूषित झाला असतां त्याला आम म्हणतात हें ठीक आहे. पण मग रस धातु आमाशयगत कसा ? अष्टांगहृदयाचे टीकाकारांनीं (सर्वांगसुंदरा) रसधातूविषयीं केलेल्या विशेष खुलाशांत याविषयीं उल्लेख नाहीं.

(रसग्रहणं पवनस्य निरासार्थं । अन्यथा आद्यो धातुर्वाताख्यः इति आशंक्येत । वातादीनामपिहि धारणाद्धातुसंज्ञास्त्येव ।) आणि केलेला खुलासा विशेष महत्वाचा नाहीं. आद्य आणि रसधातु या दोन शब्दांत विशेष स्वारस्य काय ? हा प्रश्न विचार करण्यासारखा आहे. रसधातु येवढेंच म्हणण्यानें वातादि दोष नव्हे हें उघड आहे. मग 'आद्य' कशाला ? आद्य हें रसधातूला विशेषण योजण्याचा विशेष उद्देश सर्व धातूंना आद्य असा 'रस' म्हणजे रसधातूच्याहि पूर्वींचा **अन्नरस** असावा असा असेल ? आणि जर अन्नरस दूषित होईल तर तसल्या अपक्व रसानें सर्व दोष दूष्य व मळ हे साम होतील हें अगदीं उघड आहे. रसधातु हाहि दूष्य सदरांत येत आहे आणि त्यांत मलांचाहि समावेश होतो.

मला मूत्र शकृत्स्वेदादयोऽपि. ॥

या वाक्यांतील 'अपि' या अव्ययानें मूत्र शकृत् व स्वेद हे मल आणि दूष्याहि असल्याचें सुचविलें आहे, अन्नरस अपाचित राहिल्यास तो सर्व धातूंना दूषित करूं शकेल हें उघड आहे. तरीहि या अन्नरसाचें जें आमाशयगत असें विशेषण आहे त्याचा अर्थ काय ? अन्नरस हा आमाशयगत कसा ? आमाशय या शब्दानें बहुधा आमाचा अन्नाचा—आशय सांगण्यांत येतो. व शब्दांतील व्यापक धात्वर्थावरून पच्यमानाशय म्हणजे लघ्वंत्राचाहि बऱ्याच ठिकाणीं उल्लेख असतो. पण या दोनहि ठिकाणीं रसाचा संभव नाहीं व यावरून रसपचनाचें

कार्य ज्या ठिकाणीं होतें त्या यकृताला अनुसरून हा आमाशय शब्द योजला असावा. ' रंजकपित्ताचे वर्णनांत ' याच अर्थानें आमाशय या शब्दाचा उपयोग अष्टांगहृदयांत केला आहे. (आमाशयाश्रयं पित्तं रंजकं रसरंजनात्) म्हणजे अन्नरसाचें यकृतांत नीट पचन न झालें त्यामुळें हा अपाचित रस सर्व धातूंमध्यें सामता उत्पन्न करण्यास समर्थ होतो. असा या आमशब्दावरून बोध होईल.

आम म्हणजे यकृत्स्थायी अपाचित अन्नरस असा अर्थ स्वीकारल्यानें निदानशास्त्रामध्यें योजल्या जाणाऱ्या आमविषयक वर्णनाला पूर्णता येत नाहीं, इतकेंच नव्हे तर निदानमध्यें आणि चिकित्सेंतहि जरूर तो वस्तुबोध होत नाहीं. कारण एकाद्या धातूमध्यें विकार होतो त्यावेळीं यकृतांत नियमानेंच रसपचन होत नाहीं असा सिद्धांत बांधतां येणार नाहीं. अपाचित रसामुळें सर्व धातु व मळ दूषित होणें शक्य आहे. पण प्रत्येक विकृतीमध्यें रसाजीर्ण असेलच असें नाहीं. शिवाय जर रसापासून शरीरपोषण होतें व त्याचे आपचित अवस्थेचा सर्व पदार्थांना दूषक असा परिणाम होतो म्हणून आमरसाला ' आम ' म्हणून संबोधून त्याचें महत्व सांगणें याहून पाचक पित्ताच्या—जठराग्नीच्या—मांद्यानें अपाचित अन्नाला आम हें नांव कां न द्यावें ? आम अन्नापासून अन्नरस आम व त्यामुळें सर्व धातु आम होणार हेंहि तितकेंच संभाव्य आहे. आमसंयुक्त रोगांना साम असें विशेषण आहे. (सामा इत्युपदिश्यंते ये च रोगास्तदुद्भवाः ।) रोग आमसंभव असावयाचे व त्यांची सामावस्था आणि निरामावस्था चिकित्सेला विचारणीय म्हणजे प्रत्येक रोगामध्यें आम असावयास पाहिजे. व धात्वाश्रयी विकारांत रसाजीर्ण—आम—असणें निश्चित नाहीं असें असतां आमाची वरील व्याख्या निदानशास्त्राचे दृष्टीनें तरी अपुरी होईल. रोगांच्या नांवामध्यें आमय हें एक आहे आणि प्रत्येक रोगाला आम अवश्य आहे असें या नांवावरून सुचविलें आहे. त्याचप्रमाणें:—

" आमंविदह्यमानं च सम्यक् पक्वं च यो भिषक् ।
जानीयात्स भवेद्वैद्यः शेषास्तस्करवृत्तयः । "

जो, आम पच्यमान आणि पक्व चांगल्या प्रकारें जाणतो त्यालाच वैद्य म्हणावें. इतर सर्व तस्कर समजावे. अशा प्रकारें रोगाची साम अवस्था व तिचें ज्ञान अवश्य सांगितलें आहे. दोषांचे साम अवस्थेमध्यें शोधनाचा निषेध सांगत असतां आमाची सर्वरोगव्याप्ति दर्शविली आहे.

सर्वदेहप्रविसृतान्सामान् दोषान्न निर्हरेत् ।

अ. हृ.

सर्व शरीरांत पसरलेल्या साम दोषांना काढूं नयेत. तात्पर्य आम शब्दानें रसाची अपाचित अवस्था न मानल्यास सामरोग हे केवळ रसाजीर्णापुरतेच मानावे लागतील आणि ज्या विकारांत रसाचें अपचन नाहीं त्यांमध्यें-सामता असंभवनीय असा अनवस्था प्रसंग येईल. रोगोत्पादक असें अपाचित व म्हणूनच दूषित जें द्रव्य तो आम होय. अशी आम या शब्दाची व्याख्या केल्यानें रोगनिदानामध्यें रोगाची अवस्था ठरविण्याला सोपें जाईल. रोगाची संप्राप्ति सांगत असतां, संचय, प्रकोप, प्रसर, व स्थानसंचय यांचा उल्लेख केला आहे. कोठें तरी वाढ किंवा अडथळा हें रोगाचें सामान्य कारण मानल्यावर या वाढलेल्या किंवा अटकावलेल्या पदार्थाचें पचन होत नाहीं हें उघडच होत आहे. रसाचें शरीरांतील विक्षेपण निरंतर चालणारें ज्या ठिकाणीं स्थानी दुर्बळतेमुळें पोषक रसधातु पचला जात नाहीं तेथें विकार होतो असें रोगोत्पत्तीचें सामान्य कारण सांगितलें आहे.

क्षिप्यमाणः खवैगुण्याद्रसः सज्जति यत्र सः ।
तस्मिन्विकारं कुरुते ।

फेंकला जाणारा रसधातु ज्या ठिकाणीं थांबतो त्या ठिकाणीं रोग उत्पन्न करतो. रसधातु थांबावयाचें कारण स्थानी वैगुण्य असतें.

रसधातु सर्व शरीरभर फेंकण्यांत येतो व तो अपाचित नसतांहि स्थानवैगुण्यामुळें कोणत्या तरी ठिकाणीं त्याला अडथळा होतो. यावरून त्या स्थानांत रसाचा प्रवेश होत नाहीं. त्या स्थानांतील पाचकशक्ति त्याला आत्मसात् करूं शकत नाहीं व अशा रीतीनें विकार होतो त्यावेळीं रसधातु सर्वत्र अपाचित नसून केवळ एकाद्या स्थानापुरताच अपाचित असतो. व अपाचितरस या स्थानापुरता आमहि म्हणतां येईल. पण मग 'आमाशयांत' या विशेषणाचा विशिष्टस्थलवाचक असा मर्यादित अर्थ करून भागणार नाहीं रसधातूचा कोणत्याहि ठिकाणीं होणारा संचय किंवा 'संग' तेथील पचनशक्तीच्या म्हणजे धात्वग्नीच्या अल्पबलत्वानें होणारा असतो. रसधातूनें शरीधातूंचें पोषण व्हावयाचें म्हणजे धात्वग्नीनें किंवा प्रत्येक शरीरपदार्थांतील पाचकशक्तीनें त्याचें पचन व्हावें लागतें. धातूंतील ही पाचनशक्ति वाढली असतां धातूंचा ऱ्हास होतो. व कमी झाल्यास धातूची वाढ (अर्थात् वैषम्य) होतें.

स्वस्थानस्थस्य कायाग्नेरंशा धातुषु संश्रिताः ।
तेषां सादातिदीप्तिभ्यां धातुवृद्धिक्षयोद्भवः ॥ १ ॥ (अ० हृ०)

जठराग्नीचे (स्वस्थानस्थस्य कायाग्नेः ।) अंश धातूंमध्यें असून त्यांची मंदता व अति वाढ यांनीं अनुक्रमें धातूंची वृद्धि आणि क्षय होतात.

यावरून सदैव सर्व शरीरांत फेंकल्या जाणाऱ्या रसधातूचें अपचन ऊष्म्याच्या ह्मणजे स्थानी पाचक शक्तीच्या ' अल्पबलत्वानें ' झालें असतां त्याला आम म्हणतां येईल व ज्या ठिकाणीं असला आम दुष्ट होतो तेथें रोग होतो. आम अन्न ज्यांत असतें असा आशय ह्मणजे आमाशय (अन्नाशय) ज्यांत अन्नावर पूर्णपणे पचन संस्कार झाले नसतात अशा आशयाला ह्मणजे पच्यमानाशय किंवा लध्वंत्र यालाहि नांव आमाशय दिलें आहे.

(हीं दोन स्थानें अनुक्रमें कफ व पित्त यांचीं आहेत). त्यापुढें आमरसाचें स्थान म्हणून यकृतालाहि आमाशय हें नांव आहे. (आमाशयाश्रयं पित्तं रंजकं रसरंजनात्) या नांवांचा विचार करतां पुढील अवस्थेचे तूलनेनें येणाऱ्या पक्वावस्थेची जी पोषक पदार्थाची पूर्वावस्था-पचनसंस्काराची पूर्वावस्था तिला आम आणि त्याचे स्थानाला आमाशय अशी आम आणि आमाशय यांची व्यापक व्याख्या स्वीकारली आहे असें दिसतें. मग आमाशय या शब्दानें प्रत्येक धातूचें आद्य स्वरूप कां घेऊं नये ? पोषक रसाचा स्वीकार करून नंतर त्याला आत्मसात् करावयाचा हा धातूंचा नित्य व्यापार. त्यांत जर सात्म्य करण्याची क्रिया मंदावली तर रोज हें सात्मीकरण ज्या धातूंकडून होतें तेहि या अर्थानें आमाशयच होत. धात्वग्नीचें वर्णनावरून धातूंच्या या क्रियासातत्याची आयुर्वेदानें योग्य कल्पना दिली आहे. त्याचप्रमाणें धातु हे नेहेमीं तीन अवस्थांमध्यें असतात असें वर्णन करूनहि याच तत्वाचा खुलासा केला आहे.

' **स्थूलसूक्ष्ममलैः सर्वे भिद्यंते धातवस्त्रिधा ।**
स्वः स्थूलोंऽशः परं सूक्ष्मस्तन्मलं याति तन्मलः ॥ १ ॥

(डलुगाचार्य).

यावरून पाहतां आम व आमाशय यांचा व्यापक अर्थ स्वीकारल्यास त्यानें प्रत्येक धातूचाहि उल्लेख होऊं शकतो. व अर्थाची अशी व्याप्ति अथवा अतिव्याप्ति स्वीकारण्याचें कारण निदानशास्त्रामध्यें यथार्थ बोध व्हावा हें आहे.

रोगाः सर्वेपि मंदेग्नौ । अग्निमूलं बलं पुंसां ।

इत्यादि वाक्यांत पचनाचें सांगितलेलें महत्व हें केवळ जठराग्नीतकेंच मर्यादित नाहीं. जठराग्नीचें कार्य सुरळीत चालू असतांहि रसाचें यकृतांत व रसवाहिनींत पचन नाहीं यामुळें राजयक्ष्मा होतो. रसपचन सर्व शरीरांत असतांहि सूज, ग्रंथि, अर्बुद इत्यादि स्थानी विकार होतात. यावरून अग्निमांद्यामुळें सर्व प्रकारचे रोग होऊं शकतात. पण या सामान्य स्वरूपाचे नियमापेक्षां कोणत्याहि भागांत रोग व्हावयाचा

म्हणजे तेथील पचनशक्ति कमी झालेली असते असा सामान्य सिद्धांतच अधिक बोधक होईल. मग हें ऊष्म्याचें ह्मणजे पचनशक्तीचें ' अल्पबलत्व ' तत्वतः कमी झालेलें असेल अथवा फाजील संचयाला अपुरें पडत असेल पण रोग व अपाचित रस यांचें नित्य साहचर्य किंवा व्याप्ति आहे, हाच अर्थ आमाचे व्याख्येंत अभिप्रेत असून महत्वाचा आहे. आद्य रसधातु म्हणजे पोषक असा हा रस होय. आयुर्वेदीय ग्रंथांत अशा प्रकारचा आमाशयाचा अर्थ कांहीं ठिकाणीं स्वीकारला आहे. सुश्रुतामध्यें विषमज्वराची उपपत्ती सांगतांनाः--

अहोरात्रादहोरात्रास्स्थानात्स्थानं प्रपद्यते ।
ततश्चामाशयं प्राप्य करोति विषमज्वरम् ॥ १ ॥

सुश्रुत उ० स्था० अ० ३९.

एकैक दिवसानें एकेका स्थानांत प्रवेश करून आमाशयांत येतो व [दोष] विषमज्वर करतो.

यांत आमाशय हा शब्द अन्नाशय किंवा पच्यमानाशय या अर्थीं योजलेला नाहीं. कारण, विषमज्वर आणि इतर ज्वर यांतील मुख्य अंतर म्हणजे इतर ज्वर हे आमाशया (लघ्वंत्रा) चे बिघाडामुळें उत्पन्न होतात तसे विषमज्वर नाहींत. विषमज्वरांत आमाशयाची विकृति नसते हें त्यांचे संप्राप्तीमध्यें स्पष्टपणें सांगितलें आहे.

दोषोऽल्पोऽहितसंभूतो ज्वरोत्सृष्टस्य वा पुनः ।
धातुमन्यतमं प्राप्य करोति विषमज्वरम् ॥ १ ॥

मा० नि०

ज्वर गेल्यावर किंवा आरंभींच एकाद्या धातूमध्यें असणाऱ्या विकृतीनें विषमज्वर होतो. आणि इतर ज्वरांमध्यें—

दोषा ह्यामाशयाश्रय ः ॥

आमाशयाश्रयी दोष ज्वर उत्पन्न करतात असा उल्लेख आहे. असा फरक असल्यानें व विषमज्वराचे पांच प्रकार--

संततं रसरक्तस्थः सोऽन्येद्युः पिशिताश्रितः ।
मेदोगतस्तृतीयेऽह्नित्वस्थिमज्जगतः पुनः ॥ १ ॥
कुर्याच्चतुर्थकं घोरं ।

रसाश्रयी दोषानें संतत, दोष रक्ताश्रयी असतां सतत, तो मांसधातूचे आश्रयानें असतां अन्येद्युष्क, मेदोधात्वाश्रयी दोषानें तृतीयक आणि अस्थिमज्जागत दोषानें चातुर्थिक ज्वर उत्पन्न होतो असें वर्णन आहे. यावरून या विषमज्वरांचा आमाशयाशीं संबंध असत नाहीं हें उघड आहे. मग हा ज्वर कसा येतो याचा खुलासा करीत असतां ' आमाशयं प्राप्य ' म्हणून सांगितलेला हा आमाशय निराळ्या अर्थानें सांगि-

तला असला पाहिजे हें ओघानेंच ठरतें. व या ठिकाणीं आमाशयाचा अर्थ आम किंवा अपाचित असा अन्यतम धातु हाच अर्थ अभिप्रेत असावयास पाहिजे हें निर्विवाद सिद्ध होतें.

या सर्व खुलाशावरून आम या शब्दानें केवळ पचनेंद्रियांतील अन्नरस येवढाच अर्थ नसून कोणत्याही शारीरपदार्थाची आमावस्था असाच अर्थ निष्पन्न होत आहे. व त्याच अर्थानें निदानशास्त्रामध्यें त्याचा योग्य व्यवहार होऊं शकतो. स्थानी पचनशक्तीला–म्हणजे पाचकपित्ताला किंवा पाचकअणुसमुदायाला ज्यावेळीं पोषकपदार्थ आत्मसात् करण्याचे कामीं अशक्तता येते त्यावेळीं त्या अपाचित पदार्थाचा फाजील संचय अभिसरणाचे व परंपरेनें शरीरधातूंचे उत्पादनक्रियेचे सततकार्यांत अंतराय उत्पन्न करून विविध रोगांचा उत्पादक होतो. यालाच आम अशी संज्ञा आहे. अशा प्रकारच्या आमाचा संचय झाल्यावर नैसर्गिक क्रमाला अनुसरून त्याचें पचन होतें व मल किंवा टाकाऊ भाग शरीराबाहेर फेंकला जाऊन पुनश्च सर्व व्यापार सुरळीत चालू होतात. या अवस्थेला निरोगी अवस्था आली असें मानण्यांत येतें. अशा रीतीनें क्रमशः तीन अवस्था भोगणाऱ्या रोगोत्पादक दूषित द्रव्याला–किंवा आमाला—

एक दोषी विकार.

समजण्यांत येतें. पण हा क्रम सोडून ज्यावेळीं अतित्वरित सर्वच क्रियांमध्यें बिघाड होतो, एकाद्या अथवा अनेक शरीरभागांत एकदम बिघाड होतो त्यावेळीं असला त्वरित बिघाड घडविणारें द्रव्य कोणतें व तें कसें तयार होतें? आशुकारी म्हणजे ज्याची उत्पत्ति व वाढ अतित्वरित होते असे विकार होतात ही गोष्ट खरी. अर्थात् उत्पादक कारण तीव्र असलें पाहिजे. व आमाची म्हणजे रोगोत्पादक दूषित द्रव्याची वरील व्याख्या या विकारांचें उत्पादक कारण या दृष्टीनें अपुरीच ठरणार आणि ह्मणूनच या आमाचे व्याख्येबरोबरच दुसरीहि व्याख्या दिली आहे ती अशीः—

अन्ये दोषेभ्य एवातिदुष्टेभ्योऽन्योन्यमूर्च्छनात् ॥
कोद्रवेभ्यो विषस्येव वदंत्यामस्य संभवम् ॥ १ ॥ [अ० हृ०]

अत्यंत दुष्ट अशा दोषांच्या परस्परमिश्रणापासून कोद्रव नांवाच्या (हरीक) धान्यापासून विष उत्पन्न होतें त्याप्रमाणें आमाची उत्पत्ति होते. या व्याख्येमध्यें आम म्हणजे शारीरपदार्थांच्या अव्यवस्थित अनैसर्गिक मिश्रणापासून–तयार झालेलें–विषारी द्रव्य असा आभिप्रायार्थ आहे. व्यावहारिक भाषेंत या व्याख्येचा तात्पर्यार्थ.

विषारी अथवा विनाशक द्रव्य.

असा करतां येईल. हें द्रव्य शरीराचें पोषण करीत नाहींच पण ज्या ठिकाणीं त्याची उत्पत्ति व वाढ झाली असेल तेथील शरीरधातु आपल्या विषारी गुणानें दूषित करतें व शरीरामध्यें एक प्रकारची विनाशक किंवा विध्वंसक क्रिया सुरू होते. अशी अवस्था जेथें सुरू होते त्या जागीं या तिव्र व विषारी आमानें स्वाभाविकतयाच नित्य व्यापारांत एकदम व्यत्यय येतो, आमद्रव्याच्या विषारी तीव्रतेनें ज्या ठिकाणीं क्षोभ उत्पन्न होतो तेथें कफ पित्त आणि वायु यांच्या अनुक्रमें संयोजन, विभाजन आणि वियोजन या क्रिया घडत नाहींत व या करतांच अशा तीव्र आमजन्य.

समकालीन क्रियावैषम्याला

सन्निपात असें नांव आहे. अशा रीतीनेंच त्रिदोषप्रकोप होऊं शकतो. सृष्टींतील पदार्थांमध्यें असलेल्या विचित्र गुणांमुळें दोषप्रकोपाचे अनेक प्रकार संभवतात. व अशा प्रकारचे विकृतीभेदांचें वर्गीकरण करीत असतां त्यांतील हे प्रमुख तीन प्रकार ह्मणजे, एकदोषी, द्विदोषी किंवा संसर्गजन्य आणि त्रिदोषी अथवा सांनिपातिक हे होत. या तीनही प्रकारांत स्थानभेदानुसार एक, दोन आणि तीन या क्रियांचें वैषम्य पहावयाचें असतें. एकदोषी विकृती तीन प्रकारची १ वातिक २ पैत्तिक ३ श्लैष्मिक. यांचे व्यावहारिक अर्थ ह्मणजे संयोजन क्रियेंतील विकृति, पचनक्रियेंतील विकृति आणि उत्सर्जनक्रियेंतील विकृति असे आहेत. आणि शास्त्रीय भाषेत या अर्थांचा निर्देश, अनुक्रमें अभिष्यंद, अभिताप आणि क्षोभ या शब्दांनीं केला जातो.

विकारांमध्यें एक वर्ग असा कीं ज्यामध्यें वरील प्रकार अनुक्रमें घडावेत व दुसरा असा कीं ज्यामध्यें हा सामान्य नियम नाहीं. याचें कारण रोगोत्पादक पदार्थांचें विशिष्टगुणकारित्व असतें. (प्रभाव.) एकाद्याच्या विकारांत प्रथम अभिष्यंद (वाढलेल्या पदार्थानें सूक्ष्म स्रोतसें बंद होऊन एक प्रकारचा ओलसरपणा–सुजीरपणा येणें. अनैसर्गिक–संग्रह–संयोग.) सुरू होऊन त्यानंतर अभिताप व क्षोभ होईल. तर एकाद्या विकारांत आरंभींच तीक्ष्ण, उष्ण, विदाही (दाहक) असल्या पदार्थांमुळ अभिताप (अतिरिक्त उष्णतेमुळें एखाद्या ठिकाणीं दाह–असह्य दाह–होणें) उत्पन्न होईल व त्यामुळें अपरिचित दाहानें संकुचित झालेल्या स्रोतसांतून योग्य उत्सर्जन झालें नाहीं ह्मणजे अर्थातच शिल्लक राहिलेल्या अनुत्सर्जित पदार्थांचा संचय व त्यामुळें अभिष्यंद. आणि कांहीं विकारांत ज्ञानतंतूचे क्षोभामुळें एखाद्या ठिकाणीं

आरंभीं क्षोभ व नंतर इतर क्रिया होतात. (असल्या शुद्ध क्षोभांत संचय व अभिताप यांचा संभव असत नाहीं. या अवस्थेला शुद्ध वायूचे विकार ह्मणतात. इतर वेळीं ह्मणजे अभिष्यंदांत स्रोतोनिरोधानें आणि अभितापांत स्रोतःसंकोचनामुळें उत्सर्जन क्रियेंत व्यत्यय येऊन अवरुद्ध वायूचा त्या जागीं फाजील ताण किंवा दाब शूल वगैरे लक्षणें उत्पन्न करतो. अर्थात् हा क्षोभ खरा व विकृतीही वायूची पण केवळ वायूची नव्हे. आवृत किंवा मिश्र वायूची व अशा विकृतींत अभिष्यंदांत कफाशीं व अभितापांत पित्ताशीं वायूचीं लक्षणें संयुक्त असतात. ' योगवाहः परं वायुः ' हें वाक्य याच अवस्थेचें बोधक आहे. वायूचे वर्णनांत याचा खुलासा आहेच.) अशा रीतीनें रोगोत्पादक कारणाचे गुणविशेषानुसार होणाऱ्या विकृतीचे स्वरूपावरून त्याचें तारतम्य ठरवावयाचें. एकदोषी विकृतीमध्यें कदाचित् कांहीं कालानें आमाला तीव्र आमाचें किंवा विषारी आमाचें स्वरूप येणें संभवनीय असतें व तसें आल्यावर त्याच विकृतीला सांनिपातिक नांवानें ओळखून चिकित्सेचें धोरण बदलावें लागतें. मिश्र दोषांची विकृती ह्मणजे त्यांमध्यें आरंभापासूनच दोन क्रियांची दुष्टि व सांनिपातिक ह्मणजे विनाशक आमद्रव्यानें उत्पन्न केलेलें समकालीन तीन क्रियांतील वैषम्य हें यावरून ध्यानीं येईल. या सांनिपातिक विकृतीमध्येंही पोटभेद आहेतच. हे पोटभेद ह्मणजे शारीरिक तीन क्रियांचे विकृतींतील तारतम्य दाखविणारे असतात. असे प्रकार तेरा सांगितले आहेत. ते असेः—

१ वाताधिक २ पित्ताधिक ३ कफाधिक ४ वातपित्ताधिक ५ पित्तकफाधिक ६ कफवाताधिक. या सहा प्रकारांमध्यें सांनिपातिक विकृतींतही अधिकांत अधिक एका क्रियेची विकृती व त्याचप्रमाणें दोन क्रियांची अधिक विकृती व त्या मानानें इतर कमी विकृत असें हें तारतम्य आहे. याहूनही अधिक सूक्ष्म फरक दाखविणारे आणखी सहा प्रकार असे कल्पिले आहेत कीं त्यांमध्यें एकाहून एक अधिक विकृत ह्मणजे तरतमभावदर्शक अर्थात् तीन दोष व त्यांपैकीं प्रत्येक एकदां तरभावदर्शक व एकदां तमभावदर्शक अशा रीतीनें प्रत्येकीं दोन अवस्था किंवा विकृत मर्यादा दाखविणारे मिळून सहा होतात. जसें १ वायूहून पित्त व पित्ताहून कफ विकृत. २ पित्ताहून कफ व कफाहून वायु विकृत. ३ कफाहून वायु व त्याहून पित्त विकृत. ४ वायूहून कफ व त्याहून पित्त वाढलेलें. ५ पित्ताहून वायु व त्याहून कफ विकृत. ६ कफाहून पित्त व त्याहून वायु विकृत. असे हे प्रकार १२ व तेरावा प्रकार ह्मणजेः—

सर्वांचा सर्वांगीण प्रकोप होय.

या तारतम्यदर्शक प्रकारांचा उपयोग चिकित्सेसाठीं महत्वाचा आहे. त्रिदोषांची भाषा म्हणजे कांहीं तरी गूढ, अचिंतनीय असें मानल्यास किंवा कांहीं तरी कल्पना म्हणून उपेक्षा केल्यास हे प्रकार म्हणजे कांहीं तरी वर्णन वाटेल आणि त्यांचा रोगाचे सूक्ष्म आणि चिकित्सोपयागी ज्ञानाला विशेष उपयोगहि होणार नाहीं. पण त्रिदोषांचें तात्विक स्वरूप ध्यानीं घेतल्यास या वर्णनाचें महत्व ध्यानीं येईल. " अविकृतावस्थेंतील उपयुक्त वायूचें कार्य उत्सर्जन, त्याचें विकृत व रोगकारी स्वरूप क्षोभ-पित्ताचें अविकृतावस्थेंतील उष्णतामूलक जें पचनाचें कार्य त्याचें विकृत व रोगोत्पादक स्वरूप अभिताप आणि संयोजन या कफाचे अविकृत कार्याचें विकृत स्वरूप अभिष्यंद हीं त्रिदोषांचीं विकृत स्वरूपें प्रथम ध्यानीं घेऊन या तीनहि विकृतींचा संभव आहे अशी संनिपातिक अवस्था एकाद्या रोगांत असतां, या तिहींतून प्राबल्य कोणाचें याचा विचार अवश्य असतो. कफाधिक संनिपात म्हणजे अभिष्यंद इतरांहून अधिक, पित्ताधिक म्हणजे अभिताप अधिक व इतर त्या मानानें कमी त्याचप्रमाणें कफपित्ताधिक अभिष्यंद आणि अभिताप अधिक असलेला संनिपात आणि यांतहि तारतम्य म्हणजे अभिष्यंद आहेच अभिताप त्याहून व त्याहूनहि क्षोभ अशा प्रकारचीं सूक्ष्म अवांस्थांतरें या प्रकारांवरून विचारांत घ्यावयाचीं असतात. प्रत्येक रोगामध्यें अधिक त्रासदायक व आद्य उत्पादक विकृतीवर प्रामुख्यानें उपचार करावयाचे असतात, (यं दोषमधिकं पश्येत्तस्यादौ प्रतिकारयेत् ॥) अ० हृ० याच विकृतिभेदाला अनुसरून रोगांत कमी अधिक लक्षणें असतात, आणि या लक्षणांवरून रोगोत्पादक विकृतीचें स्वरूप ठरवावयाचें असतें. (लक्ष्यते अनेनइतिलक्षण ज्यानें रोग समजतो तें) प्रत्येक रोगामध्यें लक्षणें विविध असलीं तरी अभिष्यंद अभिताप आणि क्षोभ यांपैकीं––एक दोन अथवा तीनहि क्रियांचे-विकृति भेदानुसार व बलाबलाला अनुसरून असतात. केवळ शास्त्रीय किंवा कल्पनीय असे भेद आणखीहि पाडतां येतील. पण रोगज्ञानांत इतकें सूक्ष्म ज्ञान कठीण असतें यासाठीं वरील तेरा प्रकार सांगीतले आहेत. शेवटचा तेरावा प्रकार म्हणजे ज्यांत सर्वच क्रियावैषम्य हा प्रकार

असाध्य कोटींतला असतो.

तीन पृथक् (एकेकटे), संसर्ग नऊ आणि तेरा संनिपात एकूण दोषांचे हे पंचवीस प्रकार रोगोत्पादक विकृतीचे याप्रमाणें बोधक आहेत. याच पद्धतीनें आणखी इतकेच (२५) दोषांचे प्रकार संभवतील.

कारण शरीरांतील क्रियांचें वैषम्य दोन प्रकारचें. एक क्रियांची वाढ व दुसरी क्षीणता. वर सांगितलेले प्रकार वाढीचे. अर्थात् क्षयाचेहि इतके होतील, तथापि त्यांतील त्रिदोषभेद विशेष चिंतनीय नाहींत. कारण, ज्या वेळीं एकाचा क्षय होईल त्या वेळीं अर्थातच त्याचे विरुद्ध गुणाचे दोषाची वाढ होणार व त्रासदायक जीं लक्षणें तीं क्षीणतेमुळें कां होईना पण वाढलेल्या दोषांची असणार. ज्यावेळीं तीनहि क्रियांचा ऱ्हास असेल अशा वेळींच रोगसंभव आहे. पण या अवस्थेंत तरी रोग कसा व्हावा ? व कोठें तरी संग पाहिजे तो; झाल्याशिवाय रोग नाहीं. संग म्हणजे अडथळा झाला कीं संचय झालाच व रोग संचयामुळें अर्थात वाढीमुळें झाला. यामुळें रोगप्रकरणांत क्षीण दोषांच्या क्रिया विरुद्ध गुणाचे वाढीचें साधन किंवा क्षीण संनिपात असल्यास इंद्रियनाश करूं शकतात.

एक क्रिया क्षीण, एकाची वाढलेली व एक समप्रमाणांत असेहि आणखी त्रिदोषांचे सहा प्रकार सांगितले आहेत. हेहि प्रकार आरंभींच्या तारतम्य कल्पनेवरून ध्यानांत येण्यासारखे आहेत. असे प्रकार शिवाय एक क्षीण,दोन वृद्ध व दोन क्षीण एक वृद्ध याप्रमाणें सहा प्रकार एकूण बारा आणि पूर्ण सम स्थितींत असलेला एक याप्रमाणें.

एकंदर त्रिदोषांचे त्रेसष्ट प्रकार दिले आहेत.

सम स्थितींतील निरोगी, क्षीण स्थितींतील साम्यं, क्रियाशून्य आणि वृद्धस्थितींतील समवैषम्य—पूर्ण विकृत अशा या तीन अवस्था चिकित्सेला निरुपयोगी होत, बाकी ६० त्रिदोषभेद तारतम्यपूर्वक प्रत्येक प्रकारांतील अवस्थांतराला अनुसरून चिकित्स्य आहेत.

याप्रमाणें त्रिदोषांचीं शरीराचे निरोगी आणि रोगी अवस्थेंतील कार्यें होत असतात.

शरीराचें सूक्ष्म अवलोकन करीत असतां त्याचे अनेकविध पदार्थांमध्यें ज्या सर्वव्याप्त आणि निरंतर चालणाऱ्या महत्वाच्या क्रिया दिसून आल्या आणि ज्यांवर शरीराचें अस्तित्व अवलंबून त्या क्रिया करणारे जे शरीरांतील पदार्थ त्यांना आयुर्वेदानें मुख्य मानून अन्वर्थक नांवांनीं त्यांचा उल्लेख केला तेच हे त्रिदोष होत. व त्यांची यथार्थता याप्रमाणें आहे.

त्रिदोषांचा शास्त्रीय व्यवहार.

याप्रमाणें त्रिदोषांचें तात्विक स्वरूप व त्यांचा शरीराशीं असलेला नित्य संबंध निश्चित झाल्यावर आयुर्वेदाच्या सर्व वाङ्मयांत त्यांचा या नांवानींच उल्लेख करण्याचा प्रचार सुरू झाला. एकाद्या ठिकाणीं अभिष्यंद होऊन विकार झाला असेल अशावेळीं रोगी भागांतील विकृतीचें बोधक पण संक्षिप्त परिभाषेंत कफ चा विकार असें वर्णन होऊं लागलें. त्याचप्रमाणें या दोषांचे सादृश्यावरून शरीर पदार्थांचेंहि वर्गीकरण स्थूल मानानें करण्यांत येऊन साधारणपणें रोगांचें स्थूल वर्गीकरण केलें आहे. मागें सांगीतल्याप्रमाणें शरीर पदार्थांपैकीं तीन दोष सोडून दिले म्हणजे सात धातु आणि तीन मल एकूण दहा पदार्थ राहतात. ह्या दहांनां दूष्य असें नांव असल्याचें मागें सांगीतलें आहेच. शरीर म्हणजे हे पदार्थ व ह्या पदार्थांमध्यें कर्तृत्वसंपन्न दोष हें त्यांचे सामर्थ्य व या दोहोंच्या संयोगापासून घडतो तो जीवन व्यापार. या नित्य व्यापारामध्यें ज्यावेळीं वैषम्य येतें त्याचवेळीं रोग उत्पन्न होत असल्यानें ' रोगस्तु दोषवैषम्यं ' दोषांचे वैषम्य म्हणजे रोग होय अशी रोगाची सामान्य व्याख्या ठरविण्यांत आली. ज्या शरीरभागांत रोग झालेला असतो तेथें स्पष्टपणें दृश्य अशी विकृतिधातु म्हणजे शरीराचे स्थूल पदार्थ यांत झालेली असते. रक्त दूषित होणें, मांस बिघडणें, स्नायु जखडणें, मळाचा अवरोध होणें, सूज येणें, पचन न होणें, सांधे सुटणें इत्यादि रोग शरीराच्या दृश्य अशा पदार्थांत म्हणजे सामान्यतः धातु अगर मळ यांत झालेले दिसतात. असें असतांहि सर्व रोगांचें कर्तृत्व दोषांकडेच दिलें आहे. " दोषाएवहि सर्वेषां रोगाणामेककारणम् ॥ (अ०हृ०) सर्व रोगांचें मुख्य कारण दोषच आहेत. " याचें कारण असें कीं, जरी दृश्य भागांत रोगट अवस्था दृग्गोचर होत असली तरी विकृति येण्याला दृश्य पदार्थांच्या सूक्ष्म आणि कार्यकारी भागांतच कांहीं तरी बिघाड होणें अवश्य असतें, आणि हा भाग म्हणजेच त्रिदोष समजावयाचे. कोणत्याहि प्रकारच्या अपथ्याचा परिणाम एकाद्या शरीर भागावर होतो म्हणजे त्या भागांतील शक्तिरूप भागावर होतो. जोंपर्यंत ही शारीरपदार्थांची शक्ति–अर्थात् शक्तिसंपन्न पदार्थ म्हणजे दोष–संपन्न स्थितींत असतात तोंपर्यंत अपथ्याचरणाचा कांहींच परिणाम होत नाहीं. आणि याचे उलट ही शक्ति कमी झाली असतां अल्पशा अपथ्याचाहि अनिष्ट परिणाम होतो. यावरून कोणत्याहि दृश्यविकाराचें उत्पादक कारण अंतर्गत सामर्थ्यसंपन्न असे अणु म्हणजे त्रिदोष हें उघड होत आहे. व याच हेतूनें आयुर्वेदाच्या निदानशास्त्रांत त्रिदोषांचा सर्वत्र समावेश करण्यांत आला आहे. कोणत्याहि ठिकाणीं विकार झालेला असो त्याचे मुळाशीं विकारी स्था-

नांतील अभिष्यंद असेल किंवा या तीन विकृतींपैकीं दोन अथवा तीन विकृतींपैकींच कोणाकडे तरी उत्पादकत्व असावयास पाहिजे ही गोष्ट अगदीं उघड झाली आणि या तीन प्रकारांपैकीं कोणता याचा बोध झाल्याशिवाय कोणत्याहि विकाराची चिकित्सा अशक्य आहे. केवळ रक्तविकार रक्त बिघडलें येवढें ज्ञान होऊन भागत नाहीं. तर त्याचा बिघाड झाला म्हणजे काय झालें हें कळावयास पाहिजे. एका रक्ताचे बिघाडामुळें कित्येक विकार होतात. प्रत्येक विकाराचें उत्पादकत्व विकृतींतील भिन्न अवस्थांवर अवलंबून असतें. सूज येणें, पांडुरोग, कांवीळ, कुष्ठ, फोड, काळेपणा, कोरडेपणा, दाह, गांधी इत्यादि प्रकार एका रक्ताचे बिघाडानें होतात. पण या प्रत्येक विकाराचे वेळीं रक्तदुष्टीचे प्रकार वेगळे असतात ? रक्तांत उष्णता वाढली कीं कमी झाली ? त्याची गति वाढली कीं कमी झाली, त्याचे अभिसरणांत एकादा अडथळा आला कीं काय ? त्यांतील अम्लता वाढली कीं क्षारत्व कमी झालें इत्यादि अनेक पोटभेदांचे ज्ञानाशिवाय उपचारांचें धोरण ठरत नाहीं. हें धोरण ठरविण्यासाठींच आयुर्वेदाचे निदानशास्त्रांत त्रिदोषांचा उपयोग केला आहे. विकृतीमध्यें अनेक पोटभेद असले तरी त्यांचा अभिष्यंद, अभिताप आणि क्षोभ यांतच अंतर्भाव होतो व हे अनुक्रमें कफ पित्त आणि वायु या नांवानीं संबोधले आहेत. यांतहि मग त्रिदोषांचे गुणभेदानें आणखी पोटभेद करून अधिकांत अधिक स्पष्ट ज्ञान करून घ्यावयाचें. जसें—सामान्यतः कफाची विकृति या उल्लेखावरून रोग अभिष्यंदमूलक आहे ही गोष्ट ठरली. पण कफाचे कोणत्या गुणामुळें हा अभिष्यंद झाला याचा खुलासा पाहिजे. आर्द्रता किंवा शीतता वाढली कीं स्निग्धता वाढली आणि तीमुळें अभिष्यंद झाला; पित्ताचा विकार आणि अभिताप या सामान्य ज्ञानानंतरहि, पित्ताची उष्णता वाढली कीं तीक्ष्णता हा विचार करावाच लागतो. क्षोभ वायुमुळें खरा, पण वायूचे क्षोभाला जो त्याचे मार्गाचा अवरोध व्हावा लागतो त्याचें स्वरूप कोणतें, रूक्षतेमुळें कीं शैत्यजन्य संकोच झाल्यामुळें कीं एकाद्या पदार्थाचे संचयामुळें या गोष्टींचा उलगडा होण्यासाठीं केवळ त्रिदोषांचें स्थूल ज्ञान पुरेसें नाहीं, त्यासाठीं अत्यंत सूक्ष्म ज्ञान पाहिजे; असा इषारा स्पष्टपणें आयुर्वेदानें देऊन ठेविलेला आहे. रोगविज्ञान किंवा निदानशास्त्र यामध्यें संप्राप्तीला अत्यंत महत्व आहे. संप्राप्ती ह्मणजे विकृत दोषांचें सूक्ष्म ज्ञान होय. (अंशांशपरिकल्पना संप्राप्तिः) शरीराचे निरनिराळ्या स्थानांतील निरोगी स्थितींत घडणारे व्यापार ह्मणजे त्रिदोषांचें नित्य व अविकृत कार्य, व हेच विकृत व्यापार ह्मणजे दोषांचें विकृत कार्य किंवा रोगकर्तृत्व होय. ह्मणजे अविकृत अशा शारीरक्रियांचें ज्ञान

अथवा विकृतीचें ज्ञान या दोहोंनाहीं त्रिदोषविज्ञानाची अवश्यकता आहे. शरीरांत अनेक ठिकाणीं अनेक प्रकारच्या क्रिया घडत असतात. व प्रत्येक क्रियेच्या निष्पत्तीला योग्य असे निरनिराळे अवयव आणि आशय शरीरांत आहेत. तथापि आशयांत कर्तृत्व नाहीं, या आशयांमध्यें जे विशिष्ट प्रकारचे पदार्थ सांठविले आहेत त्यांमुळें या क्रिया घडतात. अन्नाचा स्पर्श तोंडांत लाळ उत्पन्न करतो. त्याच अन्नस्पर्शानें अन्नाशयांत निराळ्या पदार्थाचा स्राव होतो. आंतड्यांत निराळा होतो. याचें कारण स्राववैशिष्ट्य. अर्थात् ज्या पदार्थांमुळें हें स्राववैशिष्ट्य उत्पन्न झालें ते पदार्थच होत. असल्या पदार्थांचें पूर्वीं सांगितलेल्या वातादि दोषांशीं साम्य पाहून ज्या दोषाचे जातींचे पदार्थ ज्या ज्या ठिकाणीं असतील त्या स्थानाला त्या दोषांचें निवासस्थान समजणें हें शास्त्रीय व्यवहारासाठीं सोयीचें होतें. वायुपित्तकफांचीं स्थानें म्हणजे त्यांचे एक अथवा त्याहून अधिक गुणांचीं किंवा त्यांचे मुख्य क्रियांचीं ठिकाणें—वायूचें स्थानांत कोठें रूक्षता तर कोठें गतिमत्ता, पित्ताचे स्थानांत कोठें उष्णता तर कोठें तीक्ष्णता कोठें अम्लता, कोठें विस्रता, कफाचे स्थानांत कोठें गुरुता,कोठें स्निग्धता, कोठें आर्द्रता अशा रीतींची स्थूलमानानें बोधक अशी ही स्थानव्यवस्था आहे.

दोष आणि दूष्यें.

याचप्रमाणें शरीरांतील सप्तधातूंना वातादिकांचीं दूष्यें ह्मणून सांगितलीं आहेत. दूष्य ह्मणजे बिघडविले जाणारे पदार्थ अगर ठिकाणें. व शरीरांतील धातु सात; पैकीं, अस्थि तेवढाच कठीण आणि रूक्ष. आणि अर्थात् काठिण्य आणि रूक्षता या गुणांच्या वायूचा परिणाम प्रथम त्यांवर होणार. रक्त हा धातु उष्ण व पचनसामर्थ्य असलेला त्यामुळें उष्णता व पचनसामर्थ्याचें पित्त प्रथम रक्तावर परिणाम करतें. राहिलेले धातूंमध्यें मेद, मज्जा, शुक्र, (स्निग्धधातु) मांस गुरु व स्थिर आणि रस धातु स्निग्ध व आर्द्र हे कफाच्या त्या त्या गुणांचें समानधर्मी यांवर कफाचे अनुक्रमें स्निग्धता, गुरुता, स्थिरता स्निग्धता, व आर्द्रता या गुणांचा परिणाम होतो यामुळें.—

वायूचा दूष्य धातु अस्थि, पित्ताचा दूष्य धातु रक्त व बाकी राहिलेले मेद, मज्जा, शुक्र, मांस, आणि रस हे पांच धातु कफाचे दूष्य अशी व्यवस्था विकृतिज्ञानाचे सोयीसाठीं करण्यांत आली आहे. धातूंप्रमाणेंच मळ म्हणजे, पुरीष, मूत्र, आणि स्वेद, हेहि या दोषांचे दूष्य असल्याचें सांगितले आहेत. बाष्पावस्थेंतील स्वेद हा ऊष्णता-

विशिष्ट म्हणून पित्ताचें दूष्य आणि पुरीष व मूत्र हे अनुक्रमें गुरुता आणि आर्द्रता या गुणान्वयें कफाचे दूष्य होत.

रसासृग्मांसमेदोस्थिमज्जाशुक्राणि धातवः ।

सप्त दूष्या मला मूत्रशकृत्स्वेदादयोपि च ॥ १ ॥ अ. हृ.

रस, रक्त, मांस, मेद, अस्थि, मज्जा आणि शुक्र हे शरीरांतील धातु होत. व यांना दूष्य असें नांव आहे. (वातादिभिः दूष्यंत इति दूष्याः । सर्वांगसुंदरा टीका) त्याचप्रमाणें शकृत् म्हणजे घनमळ, मूत्र म्हणजे द्रव मळ आणि स्वेद म्हणजे बाष्पावस्थेंतील मळ हेहि दूष्य होत. अशीं दूष्यें सांगून त्यांचा व दोषांचा संबंध वरीलप्रमाणें सांगितला आहे.

तत्राऽस्थनि स्थितो वायुः पित्तं तु स्वेदरक्तयोः ।

श्लेष्मा शेषेषु ॥

या धातुमलांपैकीं अस्थीमध्यें वायु, रक्त व स्वेद यांमध्यें पित्त आणि इतरांत श्लेष्मा असतो (अ. हृ. सू. अ० १२ वा.)

अशी व्यवस्था करण्याचा उद्देश असा कीं, वातादि दोषांच्या विशेष क्रिया व विकृतावस्थेंतील त्यांचे परिणाम विशेषतः समानधर्मी अशा या पदार्थांमध्यें घडतात ही गोष्ट सहज ध्यानीं यावी. व त्याबरोबरच उपचारांचें सामान्य तत्वहि लक्ष्यांत यावें हा आहे.

शारीरविज्ञानामध्यें त्रिदोष हे किती महत्वाचे आहेत ?

शरीराचें ज्ञान म्हणजे त्याचा आकार, रचना, कार्य व त्यांतील अनेक पदार्थ व या पदार्थांतील कार्यकारी पदार्थ या सर्वांचें ज्ञान होय. शरीराचे दृश्य अगर स्थूल अशा पदार्थांत, (धातूंत) विकृति झालेली दिसते. पण ही विकृति घडविणारें द्रव्य सूक्ष्म असतें. यामुळें विकृतिज्ञान म्हणजे निदान व विकृतीचा परिहार म्हणजे चिकित्सा या सूक्ष्मपदार्थांचे ज्ञानाशिवाय करतां येत नाहीं. शरीराचे दृश्य पदार्थांतील किंवा क्रियांतील विकृति समजण्याला वैद्यशास्त्र नको असतें. तें विकृतिज्ञान ज्याचें त्याला उत्तम असतें. चिकित्सकाहूनहि' दुखणारें पोट रोग्यालाच चांगलें समजतें. जड डोक्याची कल्पना वैद्यानें करावी पण अनुभव रोग्याला असतो. अर्थात् झालेली विकृति, कां झाली कोणत्या कार्यकारी पदार्थाचे वैषम्यानें झाली याचें ज्ञान करून घेण्याला वैद्यशास्त्र पाहिजे. अर्थात् शारीरविज्ञानामध्यें शरीराच्या स्थूल किंवा प्रत्यक्ष परिचयाहून सूक्ष्म क्रियाज्ञानाला महत्व अधिक असल्याचें उघड होतें. व या दृष्टीनें शरीरांतर्गत व्यापारांचा शोध करीत असतां शरीराचे निरनिराळ्या ठिकाणीं घडणाऱ्या क्रिया कशामुळें घडतात याचा विचार अपरिहार्य

असतो. उदाहरणार्थः—आमाशय किंवा अन्नाशय यांचे विकारांवर चिकित्सकाला उपचार करावयाचे आहेत. अशा वेळीं आमाशयाची रचना, आकार, लांबी, रुंदी, जाडी, वजन उत्तम प्रकारें माहित असलीं तरी असल्या आमाशयांत अन्नपचनाचें होणारे कार्य व त्याचा क्रम यांचे ज्ञानाची अवश्यकता आहे. हें पचन कसें होतें, कशामुळें होतें व रोगीस्थितीमध्यें काय विकृति झाली याचें ज्ञान पाहिजे. निदान-चिकित्सेमध्यें शारीरविज्ञानापैकीं या दुसऱ्याच प्रकाराला महत्व अधिक असतें. पहिल्या प्रकारचे ज्ञानाला स्थूल शारीरविज्ञान, आणि दुसऱ्या प्रकाराला सूक्ष्म शारीरविज्ञान ह्मणतां येईल. प्रचारांत या दोन प्रकारचे विज्ञानाला अनुक्रमें, शारीरशास्त्र व इंद्रियविज्ञानशास्त्र या नांवाचा उपयोग बहुधा केला जातो. आयुर्वेदामध्यें ह्यापैकीं इंद्रियविज्ञानाचा स्वतंत्रपणें उल्लेख नाहीं. आणि याचें कारण असें आहे कीं, आयुर्वेदामध्यें क्रियाकारी पदार्थ वातादि दोष मानण्यांत आले आहेत. व त्यांची यथार्थता उघड आहे. व हे वातादि क्रियाकारी मानल्यावर इंद्रियांच्या क्रिया वेगळ्या राहत नाहींत शिवाय, चिकित्साशास्त्रामध्यें एक महत्वाची गोष्ट अशी आहे कीं, इंद्रियांवर चिकित्सा करतां येत नाहीं. प्रथमतः हें विधान विचित्र वाटेल परंतु थोडा सूक्ष्मरीत्या विचार केल्यास त्याची सत्यता ध्यानीं येईल. ज्याप्रमाणें शरीराच्या स्थूल अशा भागावर उपचार यशस्वी होत नसून तदंतर्गत सूक्ष्म पदार्थांवर उपचारांचा परिणाम होऊन त्यांचे द्वारा दृश्य पदार्थांतील विकृति नाश पावते. त्याचप्रमाणें कोणत्याही इंद्रियाची शक्ति किंवा कार्य तत्वतः नाश पावलें अथवा कमी झालें तर त्यावर उपाय—उचापार—नाहींत. इंद्रियाचे व्यापारांत—क्रियेंत—येणारा जो अडथळा त्यावर उपाय असतात. कोणत्याही इंद्रियाचे नित्यव्यापारांत येणारा अडथळा दूर करून त्या इंद्रियाची क्रिया पुनः सुरळीत चालू करणें व अशा रीतीनें दृश्य पदार्थांत ह्मणजे एखाद्या धातूंत, आशयांत किंवा अवयवांत अथवा त्यांचे स्थूल क्रियेंत आलेली विकृति नाहींशी करणें यालाच चिकित्सा असें नांव आहे.

चतुर्णां भिषगादीनां शस्तानां धातुवैकृते ॥
प्रवृत्तिर्धातुसाम्यार्था चिकित्सेत्यभिधीयते ॥ १ ॥ चरक.

ह्मणजे उपचार हे शरीराच्या नाशवंत स्थूल घटकांवर नाहींत आणि मर्यादित अशा इंद्रियसामर्थ्यावरही नाहींत. तर ते या दोहोंचे मध्यवर्ती असणारे असे साधक क्रियाकारी व सामर्थ्यसंपन्न जे पदार्थ ह्मणजे त्रिदोष त्यांवर करावयाचे असतात. एखाद्याला एखाद्या विकारांत स्पर्शज्ञान कमी झालें अशा वेळीं स्पर्शनेंद्रिय जी त्वचा तीवर अथवा इंद्रियसामर्थ्यावर उपचारांचा उपयोग नसून बाह्य स्पर्श आणि त्याचें

ज्ञान ज्यांना होतें अशा ज्ञानवाहकांमध्यें ज्या कोणत्या एकाद्या द्रव्यानें, (दूषित, रस, रक्त,) अडथळा येऊन स्पर्शज्ञान कमी होतें, तो अडथळा दूर करणें अशी उपचारांची पद्धत असते. शेकणें अथवा स्वेदन औषधें अशा प्रकारचेंच कार्य करीत असतात. ज्या कोणत्याही भागामध्यें अशा प्रकारें अडथळा उत्पन्न होतो तेथें,त्या भागाची विशिष्ट प्रकारची हालचाल म्हणजे गति आणि अभिसरण यांमध्येंच तत्वतः अडथळा येतो. व ही गति आणि अभिसरण सुरळीत चालू करणें हेंच उपचारांचें धोरण असतें. एकाद्या घनद्रव पदार्थाचे अधिक संचयामुळें हा अडथळा उत्पन्न झाला, वाढलेल्या कोरडेपणामुळें होणाऱ्या स्रोतःसंकोचामुळें हा व्यत्यय आला कीं, वाढलेल्या उष्णतेच्या दाहक स्पर्शानें संकुचित झालेल्या स्रोतसांत अभिसरणकार्य नीट घडत नाहीं या प्रकारचा खुलासा झाल्याविना, पहिल्या प्रकारांतलि अतिरिक्त संचयाला स्रावक किंवा शोधन असे तीक्ष्ण असे उपचार, दुसऱ्या प्रकारांत, विकासी किंवा उत्तेजक आणि त्याबरोबरच वाढलेली रूक्षता कमी होण्यासाठीं उष्ण आणि स्निग्ध असल्या प्रकारचे उपचार आणि वाढलेली उष्णता व दाह कमी होण्यासाठीं शामक—शीत उपचार अशा प्रकारचें चिकित्सेचें स्वरूप ठरविण्याला रोग व ते होण्याचे कारणभूत विकृतींतील फरक कळावा लागतो. या प्रकारानांच, अनुक्रमें श्लैष्मिक, वातिक आणि पैत्तिक या नांवांनीं संबोधण्यांत येतें. आणि यासाठींच आयुर्वेदामध्यें त्रिदोषविज्ञान हें शारीरविज्ञानांत महत्वाचें मानलें आहे. त्याचे अभावीं चिकित्सा करतां येणार नाहीं. मात्र त्रिदोषांचा शास्त्रकारांना अभिप्रेत असा व्यापक व बोधक अर्थ ध्यानीं ध्यावयास पाहिजे. अवयवांचें ज्ञान व इंद्रियांचें ज्ञान झाल्यावर देखील जर त्यांतील क्रियावैषम्यामध्यें उत्सर्जक शक्ति विकृत झाली, (वायु) संग्राहक शक्ति विकृत झाली (कफ) कीं पाचकशक्ति विकृत झाली, (पित्त) याविषयीं खुलासा न होईल तर विकृतिज्ञान होणें अशक्य व उपायहि व्यर्थ होतील. आयुर्वेदाचे त्रिदोषपद्धतीनें या सूक्ष्म भेदांचें ज्ञान होत असल्यानें हें ज्ञान महत्वाचें ठरतें. शारीरव्यापारांतील प्रत्येकाचें संग्राहक, पाचक, व उत्सर्जक किंवा संयोजक, विभाजक, आणि वियोजक अशा स्वरूपाचें ज्ञान झाल्याशिवाय शारीरविज्ञान अपुरेंच राहणार. भाषाभेदामुळें या ज्ञानाचे वाचक शब्द निरनिराळे असले तरी या दृष्टीनें विसंगतपणा राहतच नाहीं.

चिकित्सेमध्यें त्रिदोषविज्ञान किती महत्वाचें आहे ?

त्रिदोषांचा विचार करीत असतां असा प्रश्न उपस्थित होणें संभवनीय आहे कीं, प्रत्येक रोगामध्यें रोगी भागांतील उत्पादक विकृतीचें सूक्ष्म आणि तात्विक ज्ञान होण्याला त्रिदोषांचे ज्ञानाचा उपयोग होतो त्याप्रमाणें चिकित्सेमध्यें होतो काय ? कोणत्याहि रोगावर चिकित्सा करावयाची ह्मणजे ज्या ठिकाणीं रोग झाला त्यावर प्रामुख्यानें कार्य करील अशी चिकित्सा पाहिजे. मग एकाद्या दोषाचे अनुरोधानें ती कशी करतां यावी, दोष सर्वव्यापी व त्यांचे विकार सर्व शरीरभर कोठेंहि होणार ! अशा स्थितींत या दोषांवर उपचार केल्यास त्यांचा विशिष्ट रोगावर किंवा रोगस्थानावर परिणाम कसा व्हावा? आपाततः ही शंका बरोबर वाटते; परंतु निदानाप्रमाणें यांतहि अधिक तात्विक दृष्टीचाच विचार पाहिजे. चिकित्सेंतील त्रिदोषांचा उपयोग ह्मणजे ज्याप्रमाणें अवयव आणि इंद्रियविकृति यांचे ज्ञानानंतरहि या विकृतीचे पोटभेद समजण्यासाठीं त्याप्रमाणें चिकित्सेमध्येंहि स्थानी उपचारानांच महत्व आहे. ज्याप्रमाणें शारीरविकृतीचा विशिष्टस्थानाश्रय रोगांत प्रमुख त्याप्रमाणें विशिष्ट स्थानावर व त्यांतील रोगावर काम करणारे उपचार हेच श्रेष्ठ असून आयुर्वेदानें याच तत्वांना महत्व दिलें आहे कफानें श्वास होतो, खोकला येतो, राजयक्ष्मा होतो, वांति होते, सुप्ति येते, यांवर एकच कफनाशक उपाय न सांगतां श्वासनाशक, कासनाशक, क्षयनाशक इत्यादि रोगविनाशक औषधांच्या नांवांनींच उपयोग केला आहे. पित्तानें वांति, आतिसार, अंतर्दाह, बहिर्दाह, रक्तपित्त, ज्वर इत्यादि विकार होतात त्यांवर आयुर्वेदांत केवळ पित्तशामक उपचार सांगण्याचा अप्रयोजकपणा कोठेंच नसून त्या त्या रोगाचे नाशक असेच उपाय सांगितले आहेत वायूनें अनेक विकार होतात. पक्षघात, सर्वांगघात्, आक्षेपक, अर्दित इत्यादि वातजन्य विकारांत उपचार एकच नाहीं. रोगस्थानाला अनुलक्षूनच त्यांवर निरनिराळे उपचार सांगितले आहेत. असें असतांहि या अनेकविध विकारांमध्यें ज्याप्रमाणें उत्पादक कारणाचें एकादें विशिष्ट साम्य असतें त्याप्रमाणें चिकित्सेचें धोरणहि सामान्य राखावयास येतें. विकार कोणत्याहि शरीरभागावर झाला असला आणि स्थानभेदानुसार जरी त्यामध्यें विकृतीचा फरक असला तरी मुख्यत्वें ज्याप्रमाणें शारीरिक तीन क्रियांपैकीं एक, दोन अथवा तीन क्रियांची विकृति असावयाची त्याचप्रमाणें विशिष्ट स्थानावर कार्य करणाऱ्या उपचारांमध्यें विकृत क्रियांवर म्हणजे दोषांवर कार्य करण्याचें धोरणहि त्या उपचारांत पाहिजे. आणि यासाठींच चिकित्सेमध्यें त्रिदोषांचा उपयोग केला जातो. आयुर्वेदानें,—

दोषा एव हि सर्वेषां रोगाणामेककारणं ।
(अष्टांगहृदय सू० अ० १२).

दोष हेच सर्व रोगांचें मुख्य कारण आहे. असा सिद्धांत सांगितला असतांहि ज्याप्रमाणें प्रतिरोगांत वेगळीं रोगोत्पादक कारणें व रोगाची वेगळी संप्राप्ति देऊन स्थानसंश्रयाला निदानांत महत्त्व दिलें आहे त्याचप्रमाणें चिकित्साशास्त्रांतहि चिकित्सोपयोगी पदार्थांचे प्रभावाला महत्व दिलें आहे. व यावरून केवळ दोषांवर 'बस्तिर्विरेको-वमनं, तथा तैलं घृतं मधु । बस्ति, विरेचन, वमन, तेल, तूप, व मध, येवढेच उपचार सांगितले नाहींत. निरनिराळ्या रोगांवर अनेक प्रकारचे उपचार सांगण्याचें कारण हेंच होय. रोगांचे प्रकार ठरवितानांहि त्यांमध्यें इतके प्रकार संभवूं शकतात कीं, अखेर रोगी स्थानांतील क्रिया-वैषम्यावरच निदानाचें तत्व प्रस्थापित करावें लागतें. आणि शरीरांतील अनेकविध विकार या मुख्य तीन क्रियांचे अनेक प्रकार असल्याकारणानें मुख्यत्वें या तीन क्रियांची विकृतीच रोगज्ञानाचें मुख्य साधन ठरतें व मग अर्थातच या विकृतीवरील उपचार हें चिकित्सेचें धोरण निश्चित झाल्यानें निदानाप्रमाणें चिकित्सेमध्येंहि त्रिदोषांनाच सहजीं प्राधान्य प्राप्त होतें. उदरांतील एकादा रोग असून त्याचें कारण मलोत्सर्जनाची न्यूनता किंवा अभाव असें निदर्शनास आलें व त्याला अनुसरून विरेचन हा स्थानानुकूल उपचारहि उघड ठरला. परंतु विरेचन औषधें अनेक प्रकारचीं. मृदु, तीक्ष्ण, रूक्ष, स्निग्ध इत्यादि गुणांचीं. त्यांतून कोणत्या औषधाचा उपयोग करावयाचा हा प्रश्न शिल्लक राहतोच. आणि त्याशिवाय औषधाचा उपयोग केल्यास अपाय होणें संभाव्य असतें म्हणून मलावरोध कळल्यावरहि तो कां झाला ? उत्सर्जनक्रियेच्या मांद्यामुळें, अपचनामुळें कीं आणखी एकाद्या क्षोभक कारणानें याचा विचार करून संचित मळाचे उत्सर्जनासाठीं, तीव्र, मंद, वगैरे विरेचनाचा उपयोग करावयास पाहिजे. ह्यासाठीं चिकित्साप्रसंगीं त्रिदोषांना महत्व आहे. आयुर्वेदानें विरेचक पदार्थांची दोषभेदानें केलेली योजना हें स्पष्ट करते.

कषायमधुरैः पित्ते विरेकः कटुकैः कफे ॥
स्निग्धोष्णलवणैर्वायौ ॥ (अ. हृ. सू. अ. १७)

तुरट व मधुर पदार्थांनीं(आंवळकाठी, त्रिफळा वगैरे)पित्तावर,तिखट पदार्थांनीं (रेवाचिनी, कापिला, स्वर्णक्षीरी इ०) कफावर आणि स्निग्ध, उष्ण व खारट पदार्थांनीं वायूवर (एरंडेल, द्राक्षें इ०) विरेचन द्यावें. याप्रमाणें सर्वत्र उपचारांचें धोरण ठरविण्याचें मुख्य साधन आयुर्वेदांत त्रिदोष हें आहे. त्याकडे दुर्लक्ष्य केल्यास चिकित्सा यशस्वी होणें

अशक्य होईल. अनेक विकारांत ज्याप्रमाणें संयोजन, विभाजन आणि वियोजन यांचें म्हणजे त्रिदोषांचें विकृतिविज्ञान हें सूक्ष्मज्ञानकारक असतें, त्याचप्रमाणें या विकृतींना शामक म्हणजे कुपित दोषांचें शामक असे उपचार ठरविण्याला जें ज्ञान त्याचा आयुर्वेदाचे परिभाषेला अनुसरून त्रिदोषांत अंतर्भाव करणें स्वाभाविक आहे. रोगाविरुद्ध उपचार हेंच तत्व आयुर्वेदालाहि मान्य आहे. व्याधिप्रत्यनीक चिकित्सा हें आयुर्वेदीय चिकित्सेचें मुख्य अंग असल्याचें चिकित्साप्रकरणीं पहावयास मिळेल. त्याचप्रमाणें रोग व रोगी यांच्या अनेक अवस्थांना अनुसरून प्रतिबंधक, (हेतुप्रत्यनीक) विनाशक (व्याधिप्रत्यनीक) मिश्र (उभयप्रत्यनीक) उपद्रवशामक, वेदनाशामक इत्यादि जरी अनेक प्रकार असले तरी या सर्व प्रकारांमध्यें एक अशा प्रकारचें धोरण स्वीकारणें अवश्य आहे कीं ज्यामुळें कोणत्याहि प्रकारची चिकित्सा रोगस्थानीय नैसर्गिक क्रियेची विकृती दूर करणारी असावयास पाहिजे हें धोरण सांभाळणें हेंच त्रिदोषांचें चिकित्सेंतील महत्व होय. आयुर्वेदानें केवळ दोषांचेवर स्थूलमानानें चिकित्सेची उभारणी केली अशी समजूत अज्ञानमूलक किंवा दुराग्रहमूलक आहे. आयुर्वेदाचें चिकित्साविषयक वाङ्मय पाहतां ही गोष्ट उघड प्रत्ययास येणारी आहे

येथपर्यंत आयुर्वेदांतील त्रिदोषांची मूळ कल्पना व तिचें यथार्थत्व, सर्व शरीरांतील त्यांची व्याप्ति, महत्व, कार्यकरिता, समविषमावस्थेंतील क्रिया, प्रकार, विकार, अवस्था, निदानचिकित्सेंतील महत्व यांचें दिग्दर्शन केलें आहे.व त्यावरून शारीरविज्ञानामध्यें त्रिदोषांची कल्पना ही उपपत्तिपूर्ण, अबाधित व निदानचिकित्सेच्या सोयीची असल्याचें ध्यानीं येईल आयुर्वेदाच्या सर्व वाङ्मयांत त्यांचा उपयोग केला असून तात्विकदृष्ट्या त्यांचा उपयोग होत आहे. अशा या त्रिदोषांचें नित्योपयोगी स्वरूप ध्यानीं येण्यासाठीं किंवा राहण्यासाठीं खालील कोष्टक दिलें आहे.

१ दोष–म्हणजे शरीरघटकांतील स्थिर क्रियाकारी सामर्थ्यसंपन्न व आयुष्याचे मर्यादेपर्यंत टिकाऊ असा सूक्ष्म अंश. अणुभाग.

२ याचेच तीन पोटभाग म्हणजे तीन दोष. एक संयोजक, संग्राहक किंवा संघटनात्मक कार्य करणारा. दुसरा विभाजक किंवा पचन व पृथक्करण हीं कार्यें करणारा आणि तिसरा वियोजक किंवा गतिमान अथवा उत्सर्जनात्मक कार्य करणारा.

३ यांना अनुक्रमें श्लेष्मा, पित्त व वायु हीं नांवें आहेत.

४ अनुक्रमें, ' श्लिष् ' ' तप् ' व ' वा ' या संग्रह, पचन, व गति अशा अर्थांच्या धातूंपासून तयार झालेलीं हीं नांवें अन्वर्थक आहेत.

५ हे दोष सर्व शरीरभर आहेत तथापि त्यांचें अधिक प्रमाणांत

वास्तव्य, वायूचें पक्काशयांत, पित्ताचें पच्यमानाशयांत आणि कफाचें आमाशयांत याप्रमाणें असतें.

६ या दोषांचा बोध त्यांचे क्रियांना अवश्य जे गुण त्यांवरून होतो. असे दोषांचे गुण—

वायूचे—१ रूक्षता, २ लाघव, ३ शीतता, ४ खरखरीतपणा, ५ सूक्ष्मता, व ६ चलता.

पित्ताचे—१ किंचित् स्निग्धता, २ तीक्ष्णता, ३ उष्णता, ४लघुता, ५ आंबुसपणा, ६ सारकपणा, व ७ द्रवता.

कफाचे—१ स्निग्धता, २ शीतता, ३ गुरुता, ४ मंदता, ५ गुळगुळीतपणा, चकाकी–चिकटपणा ७ स्थिरता. (एकूण. ६+७+७=२०).

७ या त्रिदोषांचें शरीराचे धातूंमध्यें अधिकप्रमाण, वायु अस्थीमध्यें, पित्त रक्तांत आणि कफ इतर पांच धातूंत याप्रमाणें असतें

८ त्रिदोषांचीं मुख्य सांगितल्या स्थानांशिवाय आणखी स्थानें वायूचीं—पक्काशय, श्रोणिमंडल, सक्थि, (तंगडया व हात) श्रवणेंद्रिय, स्पर्शनेंद्रिय.

पित्ताचीं—नाभि, (ग्रहणी) आमाशय, (आंतडीं) स्वेद, लस, रक्त, रसधातु, त्वचा व स्पर्शनेंद्रिय.

कफाचीं—ऊर, कंठ, मस्तक, क्लोम, सांधे, आमाशय, (अन्नाशय.) रसधातु, मेदोधातु, घ्राणेंद्रिय रसनेंद्रिय. याप्रमाणें आहेत.

९ त्रिदोषांचे क्रियाकारी प्रकार व स्थानें.–वायु० प्रकार पांच–नांवें—१ प्राण, २ उदान, ३ व्यान, ४ समान, ५ अपान.

पित्त प्रकार पांच–नांवें–१ पाचक २ रंजक ३ साधक, ४ आलोचक ५ भ्राजक.

कफ प्रकार पांच–नांवें–१ अवलंबक, २ क्लेदक ३ बोधक, ४ तर्पक ५ श्लेष्मक.

प्राणवायूचें स्थान मस्तक त्याचा संचार ऊर व कंठ यांमध्यें असतो.

उदानवायूचें स्थान ऊर. संचार वर नाक व खालीं नाभिपर्यंत असतो.

व्यान वायूचें स्थान हृदय—संचार सर्व शरीरभर असतो.

समानवायूचें स्थान–ग्रहणीसमीप व संचार सर्व आंतडयांत असतो.

अपानवायूचें स्थान, अपानद्वार व संचार अधोभागांतील उत्सर्जनमार्ग व श्रोणिमंडल यांमध्यें असतो.

पाचकपित्ताचें स्थान ग्रहणी. रंजकपित्ताचें स्थान यकृत्, साधकपित्ताचें स्थान हृदय, अलोचक पित्ताचें स्थान नेत्र व भ्राजकपित्ताचें स्थान त्वचा.

अवलंबक कफाचें स्थान उर, क्लेदक कफाचें स्थान आमाशय, बोधक कफाचें स्थान रसनेंद्रिय, तर्पक कफाचें स्थान मस्तक व श्लेशक कफाचें स्थान संधि; याप्रमाणें स्थानें आहेत.

---

१० निरनिराळ्या स्थानांतील दोषांच्या नैसर्गिक क्रिया.

प्राणवायूच्या क्रिया म्हणजे बौद्धिक व्यापारांची प्रवृति करणें आणि श्वासमार्ग—कंठ—यांवर अवलंबून असलेल्या थुंकणें, गिळणें, श्वासोच्छ्वास, खोकणें इत्यादि क्रिया होत. या भागांतील वायूमुळें हीं नित्य कार्यें घडतात.

उदानवायूचें शरीरांतील नित्य कार्य म्हणजे, बोलणें, प्रयत्न, उत्साह, वर्णोच्चारण स्मरण वगैरे.

व्यानवायूच्या नित्यक्रिया म्हणजे सर्व शरीराच्या लहानमोठ्या एकूण एक हालचाली.

समानवायु अन्नपचनाचें आणि त्याज्यांश व ग्राह्यांश यांचे पृथक्करणाचें कार्य करतो.

अपानवायु, मळ, मूत्र, शुक्रार्तव, गर्भ यांचें उत्सर्जन करतो.

पाचकपित्त अन्नपचनाचें कार्य प्रामुख्यानें करणारें आणि शरीरांतील सर्व भागांत पाचक तत्वाचा (अन्नरसद्वारा) पुरवठा करणारें.

रंजकपित्त अन्नरसाला लाली आणणारें.

साधकपित्त स्मरण, धारणाशक्ति, बुद्धि इत्यादिकांनीं इष्टार्थ साधन करतें.

आलोचक पाहण्याचें काम करतें.

भ्राजक त्वचेवर तेजस्विता ठेवण्याचें काम करणारें.

अवलंबक नांवाचा कफ सर्व कफस्थानें, त्रिकसंधि, (माकडहाड) हृदय ह्यांतील कफाच्या क्रिया या कफावर अवलंबून असतात.

क्लेदक कफ आमाशयांतील अन्नांत पातळपणा उत्पन्न करतो.

बोधक कफ जिभेला रसाचा बोध करतो.

तर्पक कफ इंद्रियांची तृप्ति (समाधान) राखतो.

श्लेषक कफ, सांधे चिकटवून ठेवण्याचें कार्य करतो.

वातादींचे पोटभेदांचीं हीं नांवें घडणाऱ्या क्रियांवरून दिलेलीं सार्थ आहेत.

---

११ दोषांच्या विकृतीचीं सर्वसामान्य कारणें.

वायु तुरट, तिखट, कडु, रूक्ष असल्या पदार्थांनीं, कमी खाण्याचे संवयीनें, वेगांचा अवरोध किंवा जुलमी प्रवृत्ति, जागरण, फार मोठ्यानें

बोलणें, अतिश्रम, व्यायामातिरेक. वमनविरेचनादि शोधनांचा अत्युप-योग. चिंता, अतिव्यवाय, विषमाचार इत्यादि कारणांनीं वाढतो— विकृत होतो.

पित्त तिखट अम्ल, खारट असले त्याचप्रमाणें विदाहि म्हणजे जळ-जळ करणारे पदार्थ, क्रोध, ऊन्ह वगैरेनीं कुपित होतें.

कफ गोड, आंबट, खारट पदार्थ, स्निग्ध, जड, शीत, अभिष्यंदि असले पदार्थ, श्रमांचा अभाव, दिवसा झोंप,अजीर्ण इत्यादि त्याचप्रमाणें वमन वगैरे शोधनांच्या हीन योगानें दूषित होतो.

(१२) वातादींचे वाढ, प्रकोप आणि प्रशम यांचे स्वाभाविक काळ.

वायु ग्रीष्मऋतूंत वाढतो, वर्षाऋतूंत कुपित होतो. (विकार करतो.) शरदृतूंत त्याचा स्वाभाविक शम होतो.

पित्त—वर्षा ऋतूंत वाढतें. शरद् ऋतूंत कुपित होतें आणि हेमंत ऋतूंत शम पावतें.

कफ—शिशिर ऋतूंत वाढतो, वसंत ऋतूंत कुपित होतो व ग्रीष्म ऋतूंत शम पावतो.

(१३) दोषांच्या दैनिक वाढीच्या वेळा.

दिवसाचा व रात्रीचा उत्तर भाग आणि आहाराची पक्वावस्था या वेळीं वायूची वाढ होते.

पित्ताची वाढ, दिवस रात्रांचा मध्यभाग आणि आहाराचे पच्यमान अवस्थेंत होते.

कफाची दिवस आणि रात्रि यांचा पूर्वभाग व आहाराची प्रथमची आमावस्था यांत वाढ होते.

(इतर वेळीं समप्रमाणांत व वाढलेल्यांच्या अपेक्षेनें इतर कमी प्रमाणांत असतात.)

(१४) दोषांचे वर्धक व शामक रस.

रस	मधुर	अम्ल	लवण	कडु	तिखट	तुरट.
वायु	कमी क.	कमी क.	कमी क.	वाढवितो	वाढवितो	वाढवितो
पित्त	कमी क.	वाढवितो	वाढवितो	कमी क.	वाढवितो	कमी क.
कफ	वाढवितो	वाढवितो	वाढवितो	कमी क.	कमी क.	कमी क.

(१५) कोणते पदार्थगुण चयप्रकोपप्रशम करतात.

	वायु =	पित्त =	कफ.
संचयकारक गुण	उष्णयुक्त रूक्षादि=	शी.युक्त तीक्ष्णादि=	शी युक्त स्निग्धा.
प्रकोपकारक गुण	शीत =	उष्ण =	उष्ण.
प्रशमकारक गुण	उष्णयुक्त स्निग्धादि=	शीतयुक्त मंदादि =	उ. रूक्षादि.

(१६) वातादींचीं वाढीचीं लक्षणें.

वायु वाढला असतां, कृशता, काळेपणा,ऊष्ण पदार्थांची इच्छा, कंप, पोट फुगणें, मलावरोध, बलाचा ऱ्हास, निद्रानाश, इंद्रियांमध्यें अशक्तपणा, बडबड, भ्रम आणि विकलता उत्पन्न करतो.

पित्त वाढलें असतां, त्वचा, नेत्र, नखें, मलमूत्र यांवर पिंवळेपणा, क्षुधा, तृषा अधिक, दाह, झोंप कमी हीं लक्षणें उत्पन्न होतात.

कफ वाढला असतां अग्निमांद्य, तोंडाला पाणी सुटणें, आळस,जाड्य, अंगाला गारपणा, फिकटपणा, गळल्यासारखें वाटणें, दमा, खोकला, झोंप फार हीं लक्षणें उत्पन्न करतो.

(१७) दोषांच्या क्षीणतेचीं लक्षणें.

वायु क्षीण झाला असतां अंगाला सुंदपणा, बोलणें व शरीर व्यापारांत कमीपणा हीं लक्षणें होतात.

पित्त क्षीण असतां पचनशक्ति कमी होते, शैत्य वाढतें आणि कांति कमी होते.

कफ क्षीण झाला असतां, भ्रम, कफस्थानांत स्तब्धता, हृदय आणि संधि यांमध्यें शिथिलता वाटणें हीं लक्षणें होतात.

(१८) कुपितावस्थेंतील विकार.

वायूचीं कुपितावस्थेंतील लक्षणें—अवयव स्थानभ्रष्ट होणें, आंचके येणें, टोंचल्यासारखें दुखणें, सुप्तता, इंद्रियांमध्यें सुंदपणा,शूल, चुरचुरणें, रोमांच, फोडल्याप्रमाणें वेदना (हाडें) तहान, कंप, कठीणपणा येणें, रूक्षता येणें, पोकळी येणें, स्फुरण, वांकडेपणा येणें, गुंडाळल्यासारखें, (मांसपेशी) वाटणें, ताठणें, तोंडाला तुरटपणा येणें, वर्ण काळसर किंवा तांबुस हीं कुपित वायूचीं लक्षणें होत.

पित्त कुपित झालें असतां, दाह, लाली, उष्णता वाढणें, पिकणें, घाम येणें, पाणी सुटणें, स्राव होणें, कुजणें, शरीर म्लान होणें, मूर्च्छा, उन्मत्तपणा, आंबटपणा, व तोंडाला तिखटपणा अथवा कडुपणा येणें आणि श्वेत व तांबुस यांशिवाय रंग हीं लक्षणें उत्पन्न करतें.

कफ प्रकुपित झाला असतां स्निग्धता, कठीणता, कंडु, शैत्य, जडता, बंध, लेप, सुंदपणा, सूज, अपचन, अतिनिद्रा, वर्ण श्वेत, तोंडाची रुचि गुळचट आणि खारट हीं लक्षणें होतात.

(हीं लक्षणें सर्वसामान्य आहेत. विकार ज्या शरीरभागांत झाला असेल त्या स्थानाला अनुसरून यांतील लक्षणें असतात. हीं लक्षणें साधारणतः सर्वसामान्यरीत्या नेहमीं होणारीं प्रमुख अशीं दिलीं आहेत. यांसारखी व यांवरून कल्पना करतां येण्यासारखीं आणखींहि नाहींत असें नाहीं. ही सामान्यत्वें लक्षणांची दिशा आहे.)

(१९) वातादींवरील शामक उपाय ?

वायूवर स्नेहन, स्वेदन, मृदु, सौम्य, शोधन; मधुर, अम्ल, खारट, व अल्प असा आहार; अभ्यंग, मर्दन (दाबणें) बांधणें, त्रासविणें, सेक (धार ओतणें) पिठाची व गुळाची दारु, स्निग्ध व उष्ण बस्ति, बस्तिविधींतील पथ्य, सुखी राहणी, दीपन पाचन पदार्थांनीं सिद्ध केलेले अनेक जातीचे स्वेद ह्यांचा वातविकारावर युक्तीनें उपयोग करावा. सर्व उपचारांमध्यें अनुवासन म्हणजे स्नेहबस्ति, तेल आणि पुष्टिकारक पदार्थ मांसाचा रस (सुरवा) हे सर्व प्रकारचे वातविकारावर श्रेष्ठ प्रतीचे उपचार आहेत.

पित्तावर--घृतपान, गोड आणि शीतवीर्य औषधांनीं विरेचन, गोड, कडू आणि तुरट अशीं औषधें व आहार, चांगले सुगंधी पदार्थ, शीत स्थलीं बसणें, हार माला धारण करणें, गायन, गोष्टी इत्यादींनीं मनोरंजन वगैरे उपचार असून प्रामुख्यानें सौम्यभाव दूध, तूप, व विरेचन हे श्रेष्ठ होत.

कफावर--तीक्ष्ण असें वमन आणि विरेचन, तिखट, कडू, तुरट, रूक्ष, उष्ण असा व अल्प आहार; जुनें मद्य, मैथून, जागरण, व्यायाम, चिंता, मर्दन इत्यादि उपचार असून विशेषतः वमन, यूष (कढण, कांट) मध, चर्बी कमी करणारे पदार्थ, धूम्रपान, उपवास गंडूष (गुळण्या) व त्रास हे कफाचे प्रकोपावर गुणकारी होतात.

२०. वृद्धि, क्षय व साम्य याचें सामान्य लक्षण.

वातादि दोष वाढले असतां वाढीचे योगानें त्यांचे नित्य क्रियांची वाढ होते. कमी झाले असतां नित्य व्यापारांत त्या मानानें क्षीणता येते. व सम स्थितीमध्यें नित्य व्यापार सुरळीत चालतात.

(२१) दोष व देश.

ज्या प्रांतांत पाणी, झाडें आणि पर्वत कमी तो देश जांगल या नांवानें ओळखण्यांत येतो. यामध्यें वायूचें प्राधान्य असतें.

ज्यांत पाणी, झाडें, पर्वत पुष्कळ त्याला आनूप ह्मणतात व तेथें कफाचें आधिक्य असतें.

(आनूप प्रांत रोगट अधिक व जांगल त्याहून कमी, साधारण म्हणजे समशीतोष्ण प्रांत निरोगी; उत्तम.)

(२२) दोष व प्रकृति.

वातप्रकृति मनुष्य, साधारणतः कृश व उंच, शरीराचा वर्ण काळसर (भुरकट) त्वचा फुटीर, केसांना स्निग्धता न णें (भुरे) स्वभाव चंचल, बुद्धि अस्थिर, खादाड, आवाज रूक्ष (घोगरा). डोळे धुरकट व त्यांत पाणी नसणें आणि झोपेंत ते पूर्ण न मिटणें. वातप्रकृति मनुष्यांना गोड, आंबट, खारट, ऊष्ण अशा पदार्थांची स्वाभाविक आवड असते. हे नास्तिक व विलासी असतात.

पित्तप्रकृति मनुष्य वर्णानें गौर, हातापायांचे तळवे व तोंड लाल वर्णाचे, केसांचा वर्ण पिंगट, केस कमी, भूक, तहान तीव्र; बांधा मध्यम हीं माणसें अभिमानी, शूर, बुद्धिमान् व दिलदार असतात, यांना वलीपलित लवकर येतें, रागीट असतात, हेकेखोर असतात. श्रमसहिष्णुता कमी असते, डोळे पिंगट असतात. ऊष्ण पदार्थ, हवा इत्यादिकांचा कंटाळा असून शीत पदार्थ, हवा त्याचप्रमाणें गोड, तुरट, कडू पदार्थांची त्यांना स्वाभाविक आवड असते.

कफप्रकृति मनुष्यांचा बांधा मजबूत, स्थूल, सांधे मांसाच्छादित, शरीर मांसल, वर्ण स्निग्ध गौर, पुष्ट; केस काळे, स्निग्ध; एकंदरींत दर्शनीय शरीर, आवाज गंभीर, घुमणारा; स्वभाव गंभीर, शांत व नम्र, आहार कमी, झोंप अधिक व या मनुष्यांच्या वागणुकींत एक प्रकारची गंभीरता आणि स्थिरता असते.

वातप्रकृतीहून, पित्तप्रकृती व तीहून कफप्रकृति अधिक चांगली परंतु सर्वांहून समदोष प्रकृति उत्तम, या प्रकृतीची कल्पना करावयाची म्हणजे सर्व शारीरिक व मानसिक बाबतींतील उत्तमता. अर्थात् दुर्मिळ.)

(२३) दोष व अग्नि किंवा पचनशक्ति.

जठराग्नि वातदूषित असतां आहाराचे पचनामध्यें विषमता असते ह्मणजे कधीं नियमित वेळांत पचन नीट होतें तर कधीं होत नाहीं.

जठराग्नि पित्तदूषित असतां पचन अधिक व लवकर होतें.

जठराग्नि कफदूषित असेल तर पचन कमी व उशीरानें होतें.

(२४) दोष आणि कोठा.

वातानें कोठा क्रूर असतो, यावर विरेचनाचा उपयोग कष्टानें होतो. पित्तानें कोठा मृदु असतो यावर सौम्य विरेचन लागू पडतें.

कफानें कोठा मध्यम असतो. यावर तीव्र विरेचन योजावें लागतें. (निदानचिकित्सेमध्यें नित्य व्यवहार्य अशा या गोष्टी चिकित्सकाचे ध्यानीं नेहमीं असाव्या लागणाऱ्या असल्यानें त्यांचा उल्लेख केला आहे. याला आयुर्वेदीय ग्रंथाचे आधार मुळांतील खालीं क्रमानें दिले आहेत.)

ग्रंथोक्त वाक्यें.

(१) वायुः पित्तं कफश्चेति त्रयो दोषाः समासतः ॥
विकृताऽविकृता देहं घ्नंति ते वर्तयंति च ॥ १ ॥ सू. अ. १श्लो.
(२) विसर्गादानविक्षेपैः सोमसूर्यानिला यथा ॥
(३) धारयंति जगद्देहं कफपित्तानिलास्तथा ॥ २ ॥ सु. सू अ. १९
(४) तत्र ' वा, गतिगंधनयोरिति धातुः,
' तप, संतापने, ' श्लिष् अ लिंगने,
इत्येषां व तापित्तश्लेष्मेति रूपाणि भवंति ॥ ३ ॥
(५) ते व्यापिनोऽपि हृन्नाभ्योरधोमध्योर्ध्वसंश्रयाः ॥ अ. सू. अ. १
(६) तत्र रूक्षो लघुः शीतः खरः सूक्ष्मश्चलोऽनिलः ॥ ४ ॥
पित्तं सस्नेहतीक्ष्णोष्णं लघुविस्रं सरं द्रवम् ॥
स्निग्धः शीतो गुरुर्मंदः श्लक्ष्णोमृत्स्नः स्थिरः कफः ॥ ५ ॥
अ. हृ. सू. अ. १

[७) तत्रास्थनि स्थितो वायुः पित्तं तु स्वेदरक्तयोः ॥
श्लेष्मा शेषेषु ॥
(८) पक्वाशयकटीसक्थि श्रोत्रास्थिस्पर्शनेंद्रियं स्थानं वातस्य ॥
नाभिरामाशयः स्वेदो लसीका रुधिरं रसः ॥
दृक्स्पर्शनं च पितस्य । (७)
उरःकंठशिरः क्लोम पर्वाण्यामाशयो रसः ॥
मेदो घ्राणं च जिव्हा च कफस्य ॥
अ. हृ. सू. अ. १२ श्लोक १–३

(९) प्राणादिभेदात् पंचात्मा वायुःप्राणोऽत्र मूर्धगः ॥
उर.कंठचरो बुद्धिहृदयेंद्रियचित्तधृक् ॥ ११ ॥ (९)
ष्ठीवनक्षवथूद्गारनिश्वासान्नप्रवेशकृत् ॥
उरःस्थानमुदानस्य नासानाभिगलांश्चरेत् ॥ १ ॥ (१०)
वाक्प्रवृत्तिप्रयत्नोर्जाबलवर्णस्मृतिक्रियः ॥
व्यानो हृदि स्थितः कृत्स्नदेहचारी महाजवः ॥ १ ॥ (११)

गत्यपक्षेपणोत्क्षेप निमेषोन्मेषणादिकाः ॥
प्रायः सर्वाः क्रियास्तस्मिन् प्रतिबद्धाः शरीरिणाम् ॥ (१२)
समानोऽग्निसमीपस्थः कोष्ठे चरति सर्वतः ॥
अन्नं गृण्हाति पचति विवेचयति मुंचति ॥ १ ॥ (१३)
अपानोऽपानगः श्रोणिबस्तिमेढ्रोरुगोचरः ॥
शुक्रार्तवशकृन्मूत्रगर्भनिष्क्रमणक्रियः ॥ १ ॥ (१४)
पित्तं पंचात्मकं तत्र पक्वामाशयमध्यगम् ॥
त्यक्तद्रवत्वं पाकादिकर्मणाऽनलशब्दितम् ॥ १ ॥ (१५)
पचत्यन्नं विभजते सारकिट्टौ पृथक् तथा ॥
तत्रस्थमेव पित्तानां शेषाणामप्यनुग्रहम् ॥ १ ॥ (१६)
करोति बलदानेन पाचकं नाम तत्स्मृतम् ॥
आमाशयाश्रयं पित्तं रंजकं रसरंजनात् ॥ १ ॥ (१७)
बुद्धिमेधाभिमानाद्यैरभिप्रेतार्थसाधनात् ॥
साधकं हृद्गतं पित्तं रूपालोचनतः स्मृतम् ॥ १ ॥ (१८)
दृक्स्थमालोचकं त्वक्स्थं भ्राजकं भ्राजन त्वचः ॥
श्लेष्मा तु पंचधोरस्थः स त्रिकस्य स्ववीर्यतः ॥ १ ॥ (१९)
हृदयस्यान्नवीर्याच्च तत्स्थएऽवांबुकर्मणा ॥ १ ॥
कफधाम्नां च शेषाणां यत्करोत्यवलंबनम् ॥ १ ॥ (२०)
अतोऽवलंबकः श्लेष्मा यत्स्वामाशयसंस्थितः
क्लेदकः सोऽन्नसंघातक्लेदनाद्रसबोधनात् ॥ १ ॥ (२१)
बोधको रसनास्थायी शिरःसंस्थोऽक्षतर्पणात् ॥
तर्पकः संधिसंश्लेषात् श्लेषकः संधिषु स्थितः ॥ १ ॥ (२२)
(अ. हृ. सू. स्था. अ. १२ श्लोक ४–१०॥)

(१०) तिक्तोषणकषायाल्परूक्षप्रमितभोजनैः ॥
धारणोदीरणनिशाजागरात्युच्चभाषणैः ॥ १ ॥ (२३)
क्रियातियोगभीशोकचिंताव्यायाममैथुनैः ॥
ग्रीष्माहोरात्रिभुक्तांते प्रकुप्यति समीरणः ॥ १ ॥ (२४)
पित्तं कट्वम्लतीक्ष्णोष्णपटुक्रोधविदाहिभिः ॥
शरन्मध्याह्नरात्र्यर्धविदाहसमयेषु च ॥ १ ॥ (२५)
स्वाद्वम्ललवणस्निग्धगुर्वभिष्यंदिशीतलैः ॥
आस्यास्वप्नसुखाजीर्णदिवास्वप्नातिबृंहणैः ॥ १ ॥ (२६)
प्रच्छर्दनाद्ययोगेन भुक्तमात्रवसंतयोः ॥
पूर्वाण्हे पूर्वरात्रे च श्लेष्मा द्वंद्वं तु संकरात् ॥ १ ॥ (२७)

(११) मिश्रीभावात्समस्तानां संनिपातस्तथा पुनः ॥
(अ. हृ. नि. अ. १ श्लोक १४–१९)
ऊष्मणोऽल्पबलत्वेन धातुमाद्यमपाचितम् ॥
दुष्टमामाशयगतं रसमामं प्रचक्षते ॥ १ ॥ (अ. हृ.)

(१२) चयप्रकोपप्रशमा वायोर्ग्रीष्मादिषु त्रिषु ॥ (२८)
वर्षादिषु तु पित्तस्य श्लेष्मणः शिशिरादिषु ॥ १ ॥
(अ. हृ. सू. अ. १२ श्लोक २४–२५)

(१३) वयोहोरात्रिभुक्तानां तेंऽतमध्यादिगाःक्रमात् ॥
(अ. हृ. सू. अ. १ श्लोक)

(१४) रसाः स्वाद्वम्ललवणतिक्तोषणकषायकाः ॥
तत्राद्या मारुतं घ्नंति त्रयस्तिक्तादयः कफम् ॥
कषायतिक्तमधुरः पित्तमन्ये तु कुर्वते ॥ १ ॥
(अ. हृ. सू. अ. १ श्लोक)

(१५) उष्णेन युक्ता रूक्षाद्या वायोः कुर्वंति संचयं ॥ (३१)
शीतेन कोपमुष्णेन शमं स्निग्धादयो गुणाः ॥
शीतेन युक्तास्तीक्ष्णाद्याश्चयं पितस्य कुर्वंते ॥ (३२)
उष्णेन कोपं मंदाद्याः शमं शीतोपसंहिताः ॥
शीतेन युक्तास्निग्धाद्याः कुर्वते श्लेष्मणश्चयम् ॥
उष्णेन कोपं तेनैव गुणा रूक्षादयः शमम् ॥ (३३
(अ. हृ. सू. अ. १२ श्लोक)

(१६) वृद्धस्तु कुरुतेऽनिलः ॥
कार्श्यकार्ष्ण्योष्णकामित्वं कंपानाहशकृद्ग्रहान् ॥ (३४)
बलनिद्रेंद्रियभ्रंशप्रलापभ्रमदीनताः ॥
पीतविण्मूत्रनेत्रत्वक्क्षुत्तृड्दाहाल्पनिद्रताः ॥ (३५)
पित्तं श्लेष्माग्निसदनप्रसेकालस्यगौरवं ॥
श्वैत्यशैत्यश्लथांगत्वं श्वासकासातिनिद्रताः ॥ (३६)
(अ. हृ. सू. अ. ११ श्लो ५।७.)

(१७) लिंगं क्षीणेऽनिलेंगस्य सादोल्पं भाषितेंहितं ॥
संज्ञामोहस्तथा श्लेष्मवृध्युक्तामयसंभवः ॥ (३७)
पित्ते मंदोऽनलः शीतं प्रभाहानिः कफे भ्रमः ॥
श्लेष्माशयानां शून्यत्वं हृद्द्रवश्लथसंधिताः ॥ (३८)
(अ. हृ सू. अ. ११ श्लो. १५ ॥).

(१८) संस्रव्यासव्यधस्वापसादरुक्तोदभेदनं ॥
संगभंगसंकोचवर्तहर्षणतर्षणम् ॥ (३९)
कंपपारुष्यसौषिर्यशोषस्पंदनवेष्टनम् ॥
स्तंभः कषायरसता वर्णःश्यायोऽरुणोपि वा ॥ (४०)
कर्माणि वायोः ॥
पित्तस्य दाहरागोष्मपाकिताः ॥
स्वेदः क्लेदः स्रुतिः कोपः सदनं मूर्च्छनं मदः ॥ (४१)

कटुकाम्लौ रसौ वर्णः पांडुरारुणवर्जितः ॥
श्लेष्मणः स्नेहकाठिन्यकंडूशीतत्वगौरवम् ॥ (४२)
बंधोपलेपस्तैमित्यशोफापक्त्यातिनिद्रताः ॥
वर्णः श्वेतो रसौ स्वादुलवणौ चिरकारिता (४३)
(अ. हृ सु. अ. १२ श्लो. ४८।२४)

(१९) वातस्योपक्रमः स्नेहः स्वेदः संशोधनं मृदु ॥
स्वाद्वम्ललवणोष्णानि भोज्यान्यभ्यंगमर्दनम् ॥ (४४)
वेष्टनं त्रासनं सेको मद्यं पैष्टिकगौडिकम् ॥
स्निग्धोष्णा बस्तयो बस्तिनियमः सुखशीलता ॥ (४५)
दीपनैः पाचनैः सिद्धाः स्नेहाश्चानेकयोनयः ॥
विशेषान्मेध्यपिशितरसतैलानुवासनम् ॥ (४६)
पित्तस्य सर्पिषः पानं स्वादुशीतैर्विरेचनं ॥
स्वादुतिक्तकषायाणि भोजनान्यौषधानि च ॥ (४७)
सुगंधशीतहृद्यानां गंधानामुपसेवनम् ॥
कंठे गुणानां हाराणां मणीनामुरसा धृतिः। (४८)
कर्पूरचंदनोशीरैरनुलेपः क्षणे क्षणे ।
प्रदोषश्चंद्रमाः सौधं हारिगीतं हिमोऽनिलः । (४९)
अयंत्रणसुखं मित्रं पुत्रः संदिग्धमुग्धवाक् ॥
छंदानुवर्तिनो दाराः प्रियाः शीलविभूषिताः ॥ (५०)
शीतांबुधारागर्भाणि गृहाण्युद्यानदीर्घिकाः ॥
सुतीर्थविपुलस्वच्छसलिलाशयसैकते ॥ (५१)
सांभोजजलतीरांते कायमाने द्रुमाकुले ॥
सौम्या भावाः पयः सर्पिर्विरेकश्च विशेषतः ॥ (५२)
श्लेष्मणो विधिना युक्तं तीक्ष्णं वमनरेचनं ॥
अन्नं रूक्षाल्पतीक्ष्णोष्णं कटुतिक्तकषायकं ॥ (५३)
दीर्घकालस्थितं मद्यं रतिप्रीतिप्रजागरः ॥
अनेकरूपो व्यायामश्चिंता रूक्षं विमर्दनम् ॥ (५४)
विशेषाद्वमनं यूषः क्षौद्रं मेदोघ्नमौषधं ॥
धूमोपवासगंडूषा निःसुखत्वं सुखाय च ॥ (५५)
(अ० हृ० सू० १३ श्लो० १-१२)

(२०) यथाबलं यथास्वं च दोषा वृद्धा वितन्वते ॥
रूपाणि जहति क्षीणाः समाः स्वं कर्म कुर्वते ॥ (५६)
(अ० हृ० सू० अ० ११ श्लो० ४४.)

(२१) देशोऽल्पवारिद्रुनगो जांगलः स्वल्परोगदः
आनूपो विपरीतोऽस्मात्समः साधारणः स्मृतः ॥ (५७)
(अ० हृ० शा० अ० श्लो० ७९)

जांगलं वातभूयिष्ठमनूपं तु कफोल्बणं ॥
साधारणं समम्लं त्रिधा भूदेशमादिशेत् ॥ (५८)
(अ॰ हृ॰ सू॰ अ॰ १ श्लो॰ २३.)

(२२) प्रायोतएव पवनाध्युषिता मनुष्याः ।
दोषात्मकाः स्फुटितधूसरकेशगात्राः ॥
शीतद्विषश्चलधृतिस्मृतिबुद्धिचेष्टा--
सौहार्ददृष्टिगतयोऽतिबहुप्रलापाः ॥ (५९)
अल्पपित्तबलजीवितनिद्राः ।
सन्नसक्तचलजर्जरवाचः ॥
नास्तिका बहुभुजः सविलासा--
गीतहासमृगयाकलिलोलाः ५ (६०)
मधुराम्लपटूष्णसात्म्यकांक्षाः ।
कृशदीर्घाकृतयः सशब्दयाताः ॥
न दृढा न जितेंद्रिया न चार्या ।
न च कांतादयिता बहुप्रजा वा ॥ (६१)
नेत्राणि चैषां खरधूसराणि ।
वृत्तान्यचारूणि मृतोपमानि ॥
उन्मीलितानीव भवंति सुप्ते ।
शैलद्रुमांस्ते गगनं च यांति ॥ (६१)
अधन्या मत्सराध्मातास्तेनाः प्रोद्बद्धपिंडिकाः ॥
श्वशृगालोष्ट्रगृध्राखुकाकाजूकाश्च वातिकाः ॥ (६३)
पित्तंवन्हिर्वन्हिजं वायदस्मात् ।
पित्तोद्रिक्तस्तीक्ष्णतृष्णाबुभुक्षः ॥
गौरोष्णांगस्ताम्रहस्तांघ्रिवक्त्रः ।
शूरो मानी पिंगकेशोऽल्परोमा ॥ (६४)
दयितमाल्यविलेपनमंडनः ।
सुचरितः शुचिराश्रितवत्सलः ॥
विभवसाहसबलान्वितो ।
भवति भीषु गतिर्द्विषतामपि ॥ (६५)
मेधावी प्रशिथिलसंधिबंधमांसो ।
नारीणामनभिमतोऽल्पशुक्रकामः ॥
आवासः पलिततरंगनीलिकानां ।
भुक्तेऽन्नंमधुरकषायतिक्तशीतं ॥ (६६)
धर्मद्वेषी स्वेदनः पूतिगंधिः ।
भूर्युच्चारः क्रोधपानाशनेर्ष्यः ॥

सुप्तः पश्येत्कार्णिकारान्पलाशान् ।
दिग्दाहोल्काविद्युदर्कानिलांश्च ॥ (६७)
तनूनि पिंगानि चलानि चैषां ।
तन्वल्पपक्ष्माणि हिमप्रियाणि ॥
क्रोधेन मद्येन रवेश्च भासा ।
रागं व्रजंत्याशु विलोचनानि ॥ (६८)
मध्यायुषो मध्यबलाः पंडिताः क्लेशभीरवः ॥
व्याघ्रर्क्षकपिमार्जारयक्षानूकाश्च पैत्तिकाः ॥ (६९)
श्लेष्मा सोमः श्लेष्मलस्तेनसौम्यो ।
गूढस्निग्धश्लिष्टसंध्यस्थिमांसः ॥
क्षुत्तृड्दुःखक्लेशधर्मैरतप्तो ॥
बुध्या युक्तः सात्विकः सत्यसंधः ॥ (७०)
प्रियंगुदूर्वाशरकाऽशस्त्र-
गोरोचनापद्मसुवर्णवर्णः ॥
प्रलंबबाहुः पृथुपीनवक्षा-
महाललटो घननीलकेशः ॥ (७१)
मृद्वंगः समसुविभक्तचारुवर्ष्मा ।
बव्होजोरतिरसपुत्रशुक्रभृत्यः ।
धर्मात्मा वदति न निष्ठुरं च जातु
प्रच्छन्नं वहति दृढं चिरं च वैरम् ॥ (७२)
समद्विरदेंद्रतुल्ययातो ।
जलदांभोधिमृदंगतुल्यघोषः ।
स्मृतिमानभियोगवान् विनीतो ।
न च बाल्येप्याति रोदनो न लोलः ॥ (७३)
तिक्तं कषायं कटुकोष्णरूक्ष-
मल्पं स भुंक्ते बलवांस्तथापि ॥
रक्तांतसुस्निग्धविशालदीर्घ ।
सुव्यक्त शुक्लासितपक्ष्मलाक्षः ॥ (७४)
अल्पव्याहारक्रोधपानाशनेर्ष्यः ।
प्राज्यायुर्वित्तो दीर्घदर्शी वदान्यः ॥
श्राद्धो गंभीरः स्थूललक्ष्यः क्षमावान् ।
आर्योनिद्रालुर्दीर्घसूत्रः कृतज्ञः ॥ (७५)
ऋजुर्विपश्चित् सुभगः सलज्जो ।
भक्तो गुरूणां स्थिरसौहृदश्च ॥
स्वप्ने सपद्मान्सविहंगमालां-

स्तोयाशयान्यश्यतितोयदांश्च ॥ (७६)
ब्रह्मेंद्ररुद्रवरुणतार्क्ष्यहंसगजाधिपैः ॥
श्लेष्मप्रकृतयस्तुल्यास्तथा सिंहाश्वगोवृषैः ॥ (७७)
(२३) तैर्भवेद्विषमस्तीक्ष्णो मंदश्चाग्निः समैः समः ।
(२४) कोष्ठः क्रूरो मृदुर्मध्यो मध्यः स्याच्चैः समैरपि ॥ (७८)

(वरील त्रिदोषांच्या स्वरूपाचे वर्णनात्मक श्लोक पाठ करण्यासारखे आहेत म्हणून दिले आहेत.)

आयुर्वेदांतील त्रिदोषांचें याप्रमाणें सामान्य स्वरूप आहे. मानवी शरीर जोंपर्यंत बाधारहित व अव्याहतपणें नित्य व्यापार करीत होतें तों पावेतों त्या विषयींचा विचार स्वाभाविक रीतीनेंच उद्भवला नाहीं. व त्याचे व्यापार नीट चालेनात, दुःख होऊं लागले, कर्तबगारी आणि ताकद कमी दिसूं लागली व अनुभूत जें शतसांवत्सरिक आयुर्मान त्यांतहि कमतरता क्वचित् दिसूं लागली. अर्थातच या आपत्तीचे प्रतीकारार्थ तिचें स्वरूप, कारणपरंपरा इत्यादींचा विचार करतां करतां ओघानेंच शरीराचा, आकार, पदार्थ, कार्य, 'उत्पत्तिस्थितिविनाशात्मक जीवनव्यापार यांविषयीं विचारहि सुरू झाला व प्रथम सहज दिसणाऱ्या स्थूल पदार्थांचें आणि त्यानंतर तर्कानुमेय सूक्ष्म पदार्थांचें संशोधन सुरु झालें. व शेवटीं शरीरांतील नित्य घडामोडींत ज्यावर सर्वस्वी शरीर अवलंबून आहे असला शरीराच्या सर्व घटकांतील एक कार्यकारी अणुसमुदाय हाच शरीरांत महत्वाचा पदार्थ म्हणून मानण्यांत आला. व या कार्यकारी पदार्थांचें अनुभवसिद्ध असें त्रिविध कार्य जें संग्रह, पचन व उत्सर्जन त्यावरून शास्त्रीय दृष्टया हा अणुसमुदाय तीन प्रकारचा मानण्यांत येऊं लागला. आयुर्वेदारंभी ठरविलेले "वायुःपित्तं कफश्चेति, तीन दोष म्हणजे हेच त्रिविध अणु होत. आयुर्वेदामध्यें या शरीरतत्वविषयक सिद्धांताविषयीं इतका विश्वास रूढ झाला कीं या त्रिदोषांविषयीं पौनःपुन्यानें विचार करण्याची अवश्यकताच राहिली नाहीं. त्यांचा निरनिराळ्या शरीरविभागांतील संबंध व कार्यक्रम, शरीरपदार्थांतील व सृष्टींतील पदार्थांतील विविध गुणांशीं त्यांचें विशिष्ट प्रकारचें साधर्म्य इत्यादि धोरणानें रोगीनिरोगी स्थितींतील सर्व शारीरिक क्रियांशीं त्यांचा संबंध एका विशिष्ट पद्धतीनें अनुभवसिद्ध ठरला. याच पद्धतीनें चिकित्सेंत येणाऱ्या उत्तम यशानें ह्या त्रिदोषांच्या कल्पनेला गृहीतसिद्धांताचे शास्त्रज्ञसंमत स्वरूप येऊन

" वातपित्तश्लेष्माण एव देहसंभवहेतवः । तैरेव अव्यापन्नैः अधोमध्योर्ध्वसंनिविष्टैः शरीरमिदं धार्यतेऽगारमिवस्थूणाभिस्तिसृभिरतश्च त्रिस्थूणमाहुरेके ।

तएवत्त व्यापन्नाः प्रलयहेतवः । (सु० सू० अ० २१)
विसर्गादानविक्षेपैः सोमसूर्यानिला यथा ॥
धारयंति जगद्देहं कफपित्तानिलास्तथा ॥ (सु०सू० अ० २१ अ ७ ८

या प्रकारचा निर्वादसिद्धांत आयुर्वेदतत्वज्ञानाचा पाया झाला. आयुर्वेदाच्या उपपत्तीचें मुख्य तत्व व शरीरांतील अत्यंत महत्वाचे असे हे पदार्थ असतांहि त्यांना सर्व आयुर्वेदीय वाङ्‌मयांत दोष या नांवानें संबोधण्याचें कारण, रोगीअवस्थेंत शरीराला बिघडवितो कोण या उपस्थित प्रश्नाला हे उत्तर आहेत.

नाहीं पेक्षां शरीर धारण करणारे प्रमुख असतां त्यांना दोष या नांवानें ओळखण्याचें कारण नव्हतें. आणि अविकृत स्थितीमध्यें त्यांना दोष हें नांव अन्वर्थक नाहींहि. अविकृतावस्थेमध्यें देहधारणाच्या अर्थाचें द्योतक असें धातु हें नांव ग्रंथकारांनीं योजलेंहि आहे; तथापि एकंदर प्रचार दोष, या नावानेंच असून " दोषधातुमलमूलंहि शरीरम् " याप्रमाणें शरीराचे वर्गीकरणांत धातु या नांवानें दुसऱ्या पदार्थांचा उल्लेख असल्यानें दोष, हें प्रचालित नांव अधिक सोयीचें आहे. तत्वतः अविकृत किंवा निरोगी अवस्थेंत त्यांना धातु हें नांव देतां येईल. आणि रोगावस्थेंत, दोष हें नांव सार्थ खरें. पण मग देहधारक या नात्यानें मलांनाहि धातु हें नांव संभवतें. व अशा रीतीनें धात्वर्थावरून अर्थ स्वीकारावयाचा ह्मणजे या अर्थाची अव्याप्ति अतिव्याप्ति टळत नाहीं व म्हणूनच, दोष धातु आणि मळ हीं रूढ नांवेंच स्वीकारणें अधिक श्रेयस्कर होय. दोषांना उत्सर्जनीय किंवा शोधनीय अवस्थेंत मळ या नांवानें उल्लेखण्यांत येत असतें. पण सामान्य शास्त्रीय व्यवहारांत धात्वर्थावर भर देऊन भागत नाहीं. असो.

धातु आणि मळ.

वातादि दोषांच्या स्वरूपाची नीट ओळख होण्याला त्यांचे सहचर जे धातु व मळ त्यांचीहि ओळख असावयास पाहिजे. अंगप्रत्यंगशः शरीराचे अनेक विभाग असले तरी त्या सर्व अंगावयवांचें तीन पदार्थांत वर्गीकरण होतें. सर्व अंगावयवांचें समवायि कारण हे तीन पदार्थ होत. व म्हणून

दोषधातुमला मूलं सदा देहस्य ।

असा आद्य सिद्धांत सांगण्यांत आला. या तीन पदार्थांपैकीं एक दोष त्यांचें वर्णन आतांपर्यंत झालें. धातु सात तेः—रस, रक्त, मांस, मेद, अस्थि, मज्जा आणि शुक्र. शरीरांत दिसणारे हे स्वतंत्र व स्पष्ट पदार्थ आहेत. पैकीं पाहिल्या रसधातूचें आणि रक्त धातूचें स्वरूप बहु-

तेंच सारखें असून मिश्र किंवा संदिग्ध असें आहे. रसधातु ह्मणजे जठरांत अन्न पचन होऊन त्यापासून एक रस तयार होतो व नंतर हा अन्नरस यकृतांतील पित्तानें पुनः पचनसंस्कार पावून त्याला रक्तवर्ण येतो. असा संस्कार झाल्यावर त्याला सर्व शरीरभर फिरण्यासारखें स्वरूप येतें. आयुर्वेदांत या तयार झालेल्या अन्नांतील पोषक पदार्थाला रसधातु हें नांव आहे. कित्येक अन्नरस म्हणजे रसधातु मानतात व सकृद्दर्शनीं असा अभासात्मक समज होण्याला आधारहि आहेत. सुश्रुतामध्यें " तत्र पांचभौतिकस्य, चतुर्विधस्य, षड्रसस्य द्विविधवीर्यस्य, अष्टविधवीर्यस्य वाऽनेकगुणस्योपयुक्तस्याहारस्य सम्यक् परिणतस्य—यस्तेजोभूतः सारः स रसइत्युच्यते । असें वर्णन आहे. अन्नाचें चांगल्या रीतीनें पचन होऊन त्यापासून निघणारा जो सारभाग त्याला रस हें नांव आहे. असा याचा तात्पर्यार्थ असून त्यावरून हाच रसधातु अशी स्वाभाविक कल्पना होते. आणि याच वर्णनाचे पुढें--

रंजितास्तेजसात्वापः शरीरस्थेन देहिनां ।
अव्यापन्नाः प्रसन्नेन रक्तमित्यभिधीयते ॥ १ ॥

सु० सू० अ० १५).

असा श्लोक आहे. शरीरस्थ अशा तेजानें (पित्तानें). आप् ह्मणजे रसधातु रंजित झाला (लाल) म्हणजे त्याला रक्त म्हणतात. असा अर्थ या श्लोकाचा होतो व तें रक्ताचें वर्णन अशी समजूत होते. अर्थात् मागील अन्नरस म्हणजे रसधातु या कल्पनेला हा श्लोक पुष्टिदायक होतो परंतु.– आयुर्वेदाचें सर्व वाङ्मय पाहतां ही समज साफ चुकीची असल्याचें ध्यानीं येईल. आयुर्वेदामध्यें.--१ सर्व शरीर सप्त धातूंचें मानलें असून त्यांतील रसधातु हा एक असल्याचें सांगितलें आहे. २ धातु हे सर्व शरीरव्यापी आहेत म्हणजे रसधातु हाहि व्यापी पदार्थ पाहिजे. ३ रसधात्वाश्रयी असे सर्वशरीरव्यापी ज्वरकुष्ठादि विकार सांगण्यांत आले आहेत. ४ हृदयांतील रक्तवर्ण पावलेल्या पदार्थाला रसधातु याच नांवानें आयुर्वेदीय वाङ्मयांत संबोधलें आहे. रक्त या नांवानें नाहीं. याला आयुर्वेदांतील प्रमाणें अशीं आहेत.

रसासृङ्मांसमेदोऽस्थिमज्जाशुक्राणि धातवः ।

(अ० हृ० सू० अ० १).

रसगत ज्वराचीं लक्षणें.

गुरुता हृदयोत्क्लेशः सदनछर्द्यरोचकौ ॥
रसस्थे तुज्वरेर्लिंग दैन्यं चास्योपजायते ॥ १ ॥

(माधव निदान ज्वर).

ज्वर रसधातूमध्यें असतां अंगाला जडता, मळमळ, अग्निमांद्य, व स्तुति, अरुचि, हीं लक्षणें होतात. त्याचप्रमाणें.

' **रसरक्ताश्रितः साध्यः ।**

(माधव निदान ज्वर प्र०).

रसरक्ताश्रयी ज्वर साध्य असतो. तसेंच " **संततौरसरक्तस्थौ** " (मा. नि. ज्व.) संतत व सततक हे ज्वर अनुक्रमें रसधातु व रक्तधातु यांचे आश्रयानें होतात. ज्वर हा विकार सर्वांगव्यापी आहे. अर्थात् रसधातू जर सर्वांगव्यापी असेल तरच ज्वराचा त्यामध्यें संभव हें अगदीं उघड आहे. **कुष्ठांचे वर्गीकरणांत**हि त्वग्गत कुष्ठ हें रसधात्वाश्रयी असल्याचा उल्लेख आहे. व त्यावरून त्वचेमध्यें रसधातु असतो हें उघड झालें. मा. नि. म. टीकेमध्यें " त्वक्शब्देनात्ररसोभिधीयतेधातुप्रस्तावात्।त्वक्शब्देनरसस्याभिधानता स्यात् । भोजेप्युक्तं–प्रदुष्टाः प्रच्युता दोषा रसासृऽमांससंश्रिताः ॥ कुष्ठानि जनयंत्याशु शरीरेषु शरीरिणाम् ॥ १ ॥ अशा प्रकारचा उल्लेख आहे. तसेंच डल्हनाच्या सुश्रुतसंहितेवरील टीकेंतहि–" प्रागेव रसधातुं क्रोडीकृत्य दोषाः कुष्ठारंभकाः, रसधातुलक्षण नोक्तमित्येके अपरे त्वक्शब्देन रसमाहुः । असा खुलासा आहे. मसूरिका अथवा देवी या विकाराचें दूष्यांमध्यें रसधातूचा त्वक् शब्दानें उल्लेख आहे. " त्वक शब्देनात्र रसोऽभिधीयते । (मधुकोश) यावरून रसधातूची व्याप्ती उघड होते. रसाचा शरीरांत सर्वत्र प्रसार असल्याचा उल्लेख आहे. " सशब्दार्चिर्ज्वलनसंतानवदणुना विशेषेण अनुधावत्येव केवलं शरीरम् ॥ " (सुश्रुत सू. अ. १४)

व्यानेन रसधातुर्हि विक्षेपोचितकर्मणा ॥
युगपत्सर्वतोऽजस्त्रं देहे विक्षिप्यते सदा ॥ १ ॥
क्षिप्यमाणः स्ववैगुण्यात् रसः सज्जति यत्र सः ॥
तस्मिन् विकारं कुरुते खे वर्षमिव तोयदः ॥ २ ॥

(अ. हृ. शा. अ. ३ श्लो. ६८।६९.)

या वाक्यांचा अर्थ रसधातु सर्व शरीरभर निरंतर फेंकला जात असून त्याला ज्या शरीरभागांत अडथळा होतो त्या जागीं विकार होतो असा आहे. चरकांत " रसवहानां–स्रोतसां हृदयं मूलं दश च धमन्यः " ह्मणजे रसवाहि स्रोतसांचें मूळ हृदय व त्यापासून निघणाऱ्या

दहा धमनी असें आहे. ह्मणजे हृदयांतून सर्व शरीरभर पसरणारा धातु रसधातु होय हें उघड होतें. चरकांत हृद्रोगाची संप्राप्ति सांगत असतां, 'मर्मैकदेशे संक्लेदं रसश्चास्योपगच्छति । ह्मणजे हृदयाचे एकाद्या भागांत ज्यावेळीं रसधातु दूषित होईल त्यावेळीं हृद्रोग होतो असें वाक्य आहे. व यावरून हृदयांत व सर्व शरीरांत रसधातूची व्याप्ति उघड होते. आयुर्वेदानें रसधातूचे वाढीचीं किंवा ऱ्हासाचीं जीं लक्षणें सांगितलीं आहेत त्यांमध्येंहि सर्व शरीरगत अशीं आहेत. तात्पर्य, रसधातु ह्मणजे अन्नरस नसून तो सर्व देहभर पसरलेला स्रोतोगामी असा रक्ताची पूर्वावस्था स्वरूपी धातु होय. व कफाचें दूष्य हा धातूच समजावयाचा. दुसरा धातु रक्त होय. सर्व शरीरांतील शिरांमध्यें हें आहेच. रसधातु व रक्तधातु यांतील फरक ह्मणजे रसाचें शरीरांतील पाचक शक्तीनें पचन होऊन त्यांतील मळ पृथक् झाल्यावर जें स्वच्छ स्वरूप राहतें तें रक्त होय; आणि त्यापूर्वींचा रसधातु समजावयाचा. अन्नरसाला रसधातु मानणारे रसधातूलाच रक्त मानतात. परंतु शरीरांतील पचनसंस्कार पावलेलें रक्त व त्यापूर्वीं रसधातु हा भेद ध्यानीं घेणें अगत्य आहे.

रक्ताविषयीं आणखी एक ध्यानीं घेण्यासारखी गोष्ट ह्मणजे अशुद्ध रक्त ह्मणून सध्यां प्रचारांत ज्याचा उल्लेख करण्यांत यतो त्याला आयुर्वेदामध्यें रक्ताचा मळ ह्मणून ओळखण्यांत येत असतें. प्रत्येक धातूचा मळ सांगितला आहे. त्यांत रक्ताचा सांगितला आहे. रसरक्तांतील त्याचप्रमाणें शुद्धाशुद्ध रक्ताविषयीं आयुर्वेदाची भाषा ध्यानांत न राहिल्यानें निदानचिकित्सेमध्यें घोंटाळा होण्याचा संभव असतो. असो

तिसरा धातु मांस हा होय. याचें स्वरूप स्पष्टच आहे. मांसाच्या अनेक घटकांनीं तयार झालेल्या संघाताला पेशी म्हणतात.

चवथा धातु मेद हा होय. हा मांसल भागांत व उदरांत (उदराच्यदक आवरणांत किंवा कलेंत) विशेषें असतो. मांस तयार झाल्यावर त्यापासून हा पदार्थ तयार होऊन आयुर्वेदानें जी ' एका धातूपासून दुसऱ्या धातूची उत्पत्ति अशा एकाची एक परंपरा मानली आहे तीप्रमाणें मांस व अस्थि यांचे मध्यवर्ति व मध्यस्वरूप असा हा धातु होय. हा पदार्थ तुपासारखा आहे. याचें स्थान त्वचेखालीं मानण्याचा प्रचार सध्यां दिसतो. परंतु धातुपरंपरेप्रमाणें मांसोद्भव व मांसानंतर उत्पन्न होणारा हा पदार्थ पेशींचे खालीं व अस्थींचे वर असावयास पाहिजे. त्वचेखालीं असणारा पदार्थ वसा या नांवाचा समजावयाचा. हा स्निग्ध पदार्थांचा मळ होय. शुद्धमेदोधातु नव्हे. आयुर्वेदामध्यें रसरक्ताश्रयी विकारांहून मेदोगत विकारांना कष्टसाध्य मानण्यांत येतें; या-

वरून मांसाहूनहि अधिक स्वच्छ अधिक टिकाऊ, अधिक महत्वाचा हा धातु आयुर्वेदीयांना वाटतो हें उघड आहे व म्हणून हा धातु त्वचेखालील स्निग्ध पदार्थ नव्हे.

पांचवा धातु अस्थि किंवा हाडें आणि सहावा मज्जा हा धातु अस्थींचे पोकळींत भरून राहिलेला घन स्वरूपाचा तुपासारखा पदार्थ. शुक्र हा धातु सातवा हा मज्जेचेंच एक त्याहूनहि स्वच्छ असें तयार होणारें स्वरूप असून तो सर्वत्र आहे तरी विशिष्ट मनोविकारांनीं त्याचें उत्सर्जन होऊन ज्या स्वरूपांत दिसतो तसा नेहमीं शरीरांत असत नाहीं. मनोविकारांनीं उत्तेजित झालेल्या ज्ञानवाहकांनीं शरीराची एक प्रकारची हालचाल होते व या धातूचा द्रव स्त्रवून त्याचवेळीं वंक्षणानजीक असणाऱ्या ग्रंथीपासून उद्भवणाऱ्या स्त्रावाशीं संयोग होतो व उत्सर्जित शुक्राचें हें संयुक्त स्वरूप असतें. असे हे सात धातु होत.

तीन मळ.

मळ मुख्यत्वें तीन सांगितले आहेत. १ शकृत् किंवा पुरीष २ मूत्र व तिसरा स्वेद. या मळांविषयींहि आयुर्वेदांतील वर्णन थोडया तात्विक दृष्टीनें वाचावयास पाहिजे. तीन मळ म्हणजे मळ, मूत्र आणि घाम अशी प्रथमदर्शनीं कल्पना होते. आणि कांहीं अंशीं ती खरी आहे. परंतु उत्सर्जनयोग्य अशा घाणेऱ्या पदार्थांना शरीराचे महत्वाचे अवयव मानण्यांत येईल काय ? हा प्रश्नहि विचारणीय आहे. या मळाचीं देहधारणोपयोगी म्हणून जीं कार्यें सांगीतलीं आहेत तीं अशीं.—

अवष्टंभः पुरीषस्य मूत्रस्य क्लेदवाहनं ॥
स्वेदस्य क्लेदविधृतिः ॥

(अ. हृ. सू. अ. ११)

पुरीषाचें धारण करणें हें कार्य, मूत्राचें म्हणजे धातूंतील द्रवांश वाहणें हें कार्य आणि स्वेदाचें कार्य हा क्लेद धारण करणें हें आहे. हीं कामें स्थूल रूपाचे हे मळ कशीं करूं शकतील ? अर्थात् मळांना जें देहधारणाइतकें महत्व दिलें आहे त्याला अनुसरून ह्यांचा अर्थ करणें जरूर आहे. आणि या दृष्टीनें पाहतां पुरीषदि मळ हे सर्व देहांत व्यापी असे आहेत. शरीराच्या कोणत्याहि धातूचा अथवा घटकाचा कार्य करून झिजूं पाहणारा—थोडया काळानें ज्याचें उत्सर्जन होणार अशा स्थितींतील जो घनभाग तो पुरीष किंवा शकृत् होय. याचेमुळें उपयुक्त भागाचें संरक्षण होतें. त्याचप्रमाणें प्रत्येक घटकाचें शारीरिक रसायनक्रियेनें रूपांतर होत असतां प्रथम रसीभवन होतें—

एक प्रकारचें पातळ स्वरूप येतें व त्याचवेळीं दूषित किंवा अशुद्ध भागाचें उत्सर्जन होतें. प्रत्येक घटकांतील असला उत्सर्जित द्रवभाग वाहून नेणारा सार्वदेहिक द्रव–अभिष्यंद रूपी–म्हणजे मूत्राचें व्यापी स्वरूप होय. आणि या क्लेदाचें शारीरिक उष्णतेनें जें बाष्प होतें व पचनाला मदत होते तो स्वेद समजावयाचा. ह्या तीनहि अवस्थांतील पदार्थांच्या अविकृत स्थितीमध्येंच शरीरधातु सुरक्षित राहतात. मळांचें जर फार त्वरित उत्सर्जन झालें तर शुद्धधातु झिजण्याचे मार्गाला लागतील. व मलभाग योग्य प्रमाणांत उत्सर्जित न झाला तर त्यामुळें धातु दूषित होतील. म्हणून त्यांची साम्यावस्था जरूर आहे.

थोडें स्पष्टीकरण.

सर्व शरीरभर अर्थात् शरीराचे अति लहान घटकांतहि हे तीन दोष धातु व मळ असे वर्ग आहेत. शरीर असंख्यात घटकांनीं बनलें आहे.

शरीरावयवास्तु परमाणुभेदेन अपरिसंख्येया भवंति । (चरक)

परमाणुभेदानें शरीरावयव असंख्यात आहेत.

मग यांतील कोणताहि घटक घेतला तरी तो दोष, धातु व मळ या त्रिविध स्वरूपाचा असावयास पाहिजे हें उघड झालें. कारण " दोषधातुमलमूलं हि शरीरम्, " हा सिद्धांत आहे. शरीराच्या प्रत्येक घटकाला उत्पत्ति, स्थिति व विनाश असतात. व ह्या तीन अवस्था भोगण्यासाठीं तो नेहमीं तीन अवस्थांतच—स्वरूपांत–राहणार. एक उत्पद्यमान दुसरी स्थीयमान आणि तिसरी क्षीयमाण किंवा उत्पन्न होत असलेला एक भाग, उत्पन्न होऊन पूर्णस्वरूप पावलेला दुसरा भाग आणि झिजकट असा तिसरा भाग. हा जो तिसरा तो मळ. कारण झिजून झाल्यावर त्याचे उत्सर्जन होणेंच अवश्य. न होईल तर ही घाण चांगल्या भागाला दूषित करील. पण त्या क्षीयमाण भागानें या घटकाची एक बाजू सुरक्षित असते. जर झिजकट भाग कांहीं काळ तरी न राहील तर चांगल्या पदार्थाला हें स्वरूप लवकर येईल. अशा प्रकारचें जें संरक्षक पण झिजकट असें धातुस्वरूप ते संरक्षक म्हणून महत्वाचें मळ सांगण्यांत आले आहेत. उत्पन्न होणें आणि झिजणें या दोन क्रियांमध्यें निव्वळ स्थितिस्वरूपाचा किंवा शुद्ध स्वरूपाचा अंश किती असतो हा प्रश्न विचारणीय आहे. किंबहुना हा भाग कल्पनेनें अस्तित्व मानण्यासारखाच आहे असें म्हटलें असतां चालेल. शरीरघटकांमध्यें ही जी नित्य व निरंतर उत्पत्ति व विनाश अशा प्रकारची क्रांति चालू असते तिचें कर्तृत्व कोणाकडे तरी असावयास पाहिजे. असें कर्तृत्व याच घटकांतील अंतर्गत सूक्ष्म भागाकडे असतें. ह्या

सूक्ष्म अवयवांमुळेंच शरीरघटकांची क्रांति नित्य चालते. असला एक भाग दोष, व दुसरा जो उपाद्य तो धातु व त्याच धातूचा झिजका भाग म्हणजे मळ. मळ हे उत्पाद्य धातूचेच क्षीणसामर्थ्य असे अंश. अर्थात् त्यांत स्वतः सामर्थ्य नाहीं. धातु देखील उत्पाद्य म्हणजे ते परावलंबी व दोष हे उत्पादक, स्वतंत्र म्हणून त्यांना महत्व; पण दोष धातूंशिवाय राहूं शकत नाहींत व धातूंची सुरक्षितता मळांवाचून राहत नाहीं, म्हणून या धातुमळांनाहि शरीरधारणाला तितकेंच महत्व आहे. उत्पादनक्रियेमध्यें तीन पोटभेद, एक संग्रह, दुसरें पचन, व तिसरें उत्सर्जन. ह्या तीन क्रियांमुळें उत्पादक दोषांचे संग्राहक, पाचक व उत्सर्जक असे तीन भेद पडून तदर्थसूचक श्लेष्मा पित्त व वायु या नांवानीं त्यांचा प्रचार झाला. उत्पाद्य पदार्थांमध्यें अन्नरसापासून प्रथम रस धातू, त्यानंतर, रक्त, मांस, मेद, अस्थि, मज्जा व शेवटीं शुक्रामध्यें पर्यवसान होऊन त्यापुढें ही उत्क्रांति (धातूची) थांबते. हे जे दृश्य सात प्रकार शरीरांतील घटकसमुदायाचे त्यांचेंच बनलेलें शरीर म्हणून धातु या नांवानें त्यांचा उल्लेख व झिजक्या मळांत, घन, द्रव व बाष्पावस्थित असे असणारे तीन प्रकार शकृत्, मूत्र व स्वेद या नांवांनीं आयुर्वेदानें त्यांचा उल्लेख केला आहे, आणि तीन दोष, सात धातु व तीन मळ असे एकूण तेरा पदार्थ शरीरांत मुख्य होत. शरीराचे ज्ञानामध्यें अंग-प्रत्यंगांचें ज्ञान व त्यांतील निरनिराळ्या क्रिया यांचें ज्ञान असावयास पाहिजे ही गोष्ट निर्विवाद आहे. तथापि येवढ्यावर शारीरविज्ञान पूर्ण होत नसून अपरिसंख्येय परिमाणूंचा जीवनक्रमहि ज्ञात असावयास पाहिजे. अनेक जातींचा आहार जठरांत पचत असतांहि त्यांतील विविध परमाणु शरीराच्या विशिष्ट व सजातीय विभागावरच परिणामकारी होतात. हा एक शरीराचा धर्म ह्मणून मानल्यावर शरीरांतील अणु आणि त्यांचे सधर्म बाह्य सृष्टींतील अणु यांचा संबंध कसा येतो हा विचार अवश्य आहे. शरीरांतील अणूशीं त्यांचें तादात्म्य ज्या पद्धतीनें आणि क्रमानें होतें ती पद्धति आणि क्रम आयुर्वेदांतील कफपित्तानिलांच्या व्यापक अर्थानें दाखविला आहे. शरीराचीं अंगप्रत्यंगें ज्या असंख्य अणूंचे समुदायानें तयार झालीं त्याच अणूंच्या उत्पत्तिस्थितीविनाशावर या अंगावयवांची स्थिति अवलंबून असते आणि निरोगी अवस्थेंत आहार्य पदार्थांतील सजातीय अणूंनीं प्रथम या अणूंची उत्पत्ति व त्यांची सामुदायिक वाढ ह्मणजे निरनिराळ्या अवयवांची वाढ त्याचप्रमाणें रोगावस्थाही याच अणूंचे आरंभक विकृतीपासून व पुनः सुधारणाहि यांचेपासूनच; उपचारांचा उपयोगहि याच उत्पादक भागावर अशा प्रकारची तर्क-

सिद्ध कल्पना चुकीची कां मानावी ? कोणत्याही द्रव्यांतील गुण व सामर्थ्य त्यांतील सूक्ष्म अशा अणूंवर अवलंबून असतें. शरीराचेंहि तत्व हेंच. व ह्मणून आयुर्वेदानें ते दोष—

विकृताऽविकृता देहं घ्नंति ते वर्तयंति च ॥ (अ ह्)

विकृत झाले असतां देहाचा नाश करतात व अविकृत असतां त्या देहाचें धारण व वृद्धि करतात, असें महत्व दिलें आहे.

साधारणतः पदार्थमात्राचे उत्पत्तिक्रमाकडे पाहिलें असतां सहज ध्यानीं येण्यासारखी गोष्ट अशी आहे कीं, पांचभौतिक परमाणु कांहीं एका विशिष्ट प्रमाणांत कोणत्या तरी अज्ञेय सामर्थ्यानें एकत्र होतात व तसे ते संयुक्त झाल्यावर त्यांची वाढ व कांहीं गुणधर्म, कार्य इत्यादि सुरू होतात. व कांहीं कमी अधिक काळानें त्यांचा विनाश अथवा क्रांति, जन्मांतर—होतो. प्रथम संयोग कोण करतो हा प्रश्न निरुत्तर असून त्यावर समाधानासाठीं कोणी परमेश्वर तर कोणी निसर्ग; असें स्वतःच्या मनोभावनेला अनुसरून उत्तर मानून घेण्यांत येतें. प्रथम संग्राहक, अशा रीतीनें अज्ञात असला तरी पुढील त्या पदार्थाचा जीवनक्रम अनुभवावयास मिळतो. प्रत्येक पदार्थाचा आकार, कार्य, सामर्थ्य व आयुष्य ह्यांत भिन्नता असते. व ही भिन्नता कां असावी याचें सहज सुचणारें उत्तर म्हणजे संयुक्तावस्थेंतील संयुक सामर्थ्याची भिन्नता हें होय. हें संयोगी सामर्थ्य जितकें प्रभावी तितका त्या पदार्थाचा प्रभाव मोठा; व जितकें टिकाऊ तितका पदार्थ आयुष्मान् अधिक. पदार्थांच्या उत्पत्तीच्या गूढ प्रश्नाचा विचार फारसा प्रस्तुत नाहीं; तरी त्यांतील एका तत्वाचा स्वीकार अपरिहार्य आहे तें हें कीं, प्रत्येक पदार्थामध्यें त्याचे उत्पत्तीचे प्रसंगीं संयुक्त स्वरूप पावलेले व कांहीं काल त्याच अवस्थेंत टिकणारे असे पदार्थ किंवा—अति सूक्ष्म कां होईनात—अणु—परमाणु—अवश्य असून त्यांचेच सामर्थ्यानें पदार्थाचे क्रांत्यात्मक व्यापार चालतात. या अणूंची—संयुक्तावस्थेंत असलेल्या—शक्ति क्षीण झाली—संपली कीं पदार्थाचेंहि सामर्थ्य व आयुष्य संपून त्याला वियुक्तावस्था किंवा पंचत्व प्राप्त होतें. अर्थात् दृश्यस्वरूप नाहींसें होतें. पदार्थाचें दृश्य स्वरूप पालटतें पण जर अदृश्य स्वरूपहि दैनंदिन क्रांति अनुभवील तर मग अमर्याद टिकाऊपणा सृष्टपदार्थांमध्यें राहूं शकेल. शरीराचे घटक नित्य झिजतात—नाश पावतात. अर्थात् नवे उत्पन्नहि होतात, व या दृष्टीनें शरीर नित्य नवें होतें, अशी एक कल्पना प्रचारांत आहे. पण ध्यानांत ठेवणें अवश्य आहे कीं, या बदलत्या घटकांत त्यांना बदलणारे पण स्वतः न बदलणारे असे जर घटक नसते तर मानवी शरीर जगाचे अंतापावेतों टिकविणें शक्य झालें असतें. शरीराच्या बाल्यादि अवस्था, प्रत्येक इंद्रियाची व अव-

याची ठराविक मर्यादेपर्यंतच होणारी वाढ व सर्वसामान्य आयुष्य-मर्यादा वाढविण्याला कोणत्याहि उपायानें न येणारें यश, या गोष्टी ध्यानीं घेतां शरीरांत न बदलतां आयुष्याचे अंतांपर्यंत टिकणारा भाग असून त्यावरच शरीराच्या क्रिया अवलंबून आहेत ही गोष्ट सहज पटेल. असल्या पदार्थांना मुख्य मानून आयुर्वेदानें शारीरविज्ञानाचा या सूक्ष्म भागापर्यंत शोध केला आहे.

सर्व पदार्थमात्राप्रमाणेंच शरीर हा पांचभौतिक परमाणूंचा संयोग होण्याला, या परमाणूंना प्रथम आकर्षून जवळ आणणें, नंतर स्थिर करणें व एकमेकांत मिश्र होण्यासाठीं त्यांचें **रसीभवन** असा एक उत्पत्ति किंवा वाढीचे कार्याचा विभाग, त्यानंतर मिश्र पदार्थांचें पृथक्करण व त्यानंतर पृथक् (सापेक्षतया) राहण्यासाठीं उत्सर्जन अशा प्रकारची विविध अवयवांनीं वाढ होण्यांत तीन विभाग पडतात व हे तीन द्रव्याश्रयी, देहाश्रयी–उत्पादक अणूंचे भाग आयुर्वेदानें मानले आहेत. शरीराविषयीं—

**" तत्र शरीरं नाम चेतनाधिष्ठानभूतं
पंचभूतविकारसमुदायात्मकम् , "**

(च. शा. अ. ५

पंचमहाभूतांच्या विकृति समुदायात्मक व चेतनेचा आधार असें शरीर आहे.

" पंचमहाभूतशरीरिसमवायः पुरुषः "

(सु० शा० अ० १).

पंचमहाभूतें व शरीरि म्हणजे आत्मा यांचा समवायस्वरूप पुरुष आहे, असें वर्णन केलें आहे.

संयोगाद्वर्तते सर्वं तदृते नास्ति किंचन ॥

(च० शा० अ० १ श्लो० ५६).

संयोगामुळें सर्व राहतें त्या शिवाय कांहीं नाहीं.

पृथिव्यापस्ते जोवायुराकाशं ब्रह्मचाव्यक्तमित्येत एव षड्धातवः समुदिताः पुरुष इति शब्दं लभंते (चरक शा. अ. ५).

पृथ्वी, आप्, तेज, वायु, आकाश व अव्यक्त ब्रह्म हे सहा पदार्थ (धातु धारणात्) समुदित झाले म्हणजे त्यांना पुरुष (देही) संज्ञा प्राप्त होते.

तत्र संयोगापेक्षा लोकशब्दः षड्धातुसमुदायो हि सामान्यतः सर्वलोकः ।

षड्धातुविभागो वियोगः । स जीवापगमः सप्राणनिरोधः । स भंगः ॥ १ ॥

लोक हा शब्द संयोगापेक्षी आहे कारण सामान्यतः वरील सहा धातूंचा समुदाय म्हणजेच लोक (पदार्थमात्र) होय. यांचा विभक्तपणा म्हणजे वियोग त्याला जीवापगम,प्राणनिरोध,भंग हीं नांवें आहेत. (मृत या अर्थाचीं).

या वर्णनामध्यें शारीरसंघाला महत्व दिलें असून असल्या प्रकारचा संघ हा कोणा तरी एका विशिष्ट तत्वाचे सामर्थ्यावरच टिकून ठराविक कालपावेतों रहावयाचा हें ओघानेंच ठरलें. या सामर्थ्याचा कांहीं ठराविक नियमानुसार मर्यादित व्यय झाला तर त्याला निश्चित जी मुदत ती उपभोगितां येते आणि अव्यवस्थितपणानें फाजील व्यय झाला कीं लवकरच क्षय होऊन संयोगाभावी 'पंचत्व, येतें. शारीर पदार्थांचे प्रमुख असे तीन विभाग, म्हणजे (दोष, धातु व मळ) करून ते अन्योन्याश्रयी असल्यानें सर्वांना देहधारक म्हणून सांगण्यांत आलें असलें तरी, आद्य उत्पादक, व वर्धक आणि ज्यांचे अभावीं धातुमळांचें अस्तित्व राहात नाहीं अथवा संभवत नाहीं, उलट धातुमळांची विकृति ज्यांमुळें जाते असल्या सामर्थ्यसंपन्न व सूक्ष्म अणूंना शारीरपदर्थांत महत्व अधिक हें उघड आहे. जोंपर्यंत या घटकांत सामर्थ्य आहे, तोंपर्यंत दूषित धातुमळ दुरुस्त होतात, कमी झाले तर वाढतात. पण यांचें सामर्थ्य क्षीण झालें असतां सर्व साधनें व उपाय निरुपयोगी ठरतात व यावरून यांचें महत्व उघड होतें. यासाठीं आयुर्वेदानें शारीरविवेचनामध्यें दोषांना महत्व दिलें आहे. कोणत्याहि शरीरभागाची विकृति ध्यानीं घेतांना त्या स्थानाला अनुसरून उत्पादक दोषांचें सामर्थ्य विचारांत घेतल्याविना विकृतीचें पूर्ण स्वरूप आकलन होणारें नाहीं. विकृतीची साध्यासाध्यता कळणार नाहीं, व दोषभेदांशिवाय उपचारांचें धोरण ठरवितां येणार नाहीं. चरकामध्यें—

सर्वदा सर्वथा सर्वं शरीरं वेद यो भिषक् ।।
आयुर्वेदं स कार्त्स्न्येन वेद लोकसुखप्रदम् ।।

(च. शा. अ. ६ श्लो. २१)

नेहमीं सर्व शरीर सर्व प्रकारें जो वैद्य जाणतो तो लोकसुखदायी अशा सर्व आयुर्वेदाला जाणतो. असा उल्लेख असून यांतील सर्वथा याचा अर्थ सूक्ष्म दोषविज्ञानसुद्धां असाच आहे.

प्रथमतः शरीराचें मुख्य तत्व व त्याचे तीन विभाग अशा प्रकारची तात्विक उपपत्ति निश्चित झाल्यावर 'व्यपदेशस्तु भूयसा, (आधिक्यावरून निर्देश) या सामान्य नियमानुसार ज्या ठिकाणीं या तात्विक तीन क्रियांचें आधिक्य, ते आशय, ते धातु, क्रियासूचक अशा वातादींचे नांवानें ओळखण्यांत येऊं लागले. त्याचप्रमाणें क्रिया व क्रियाकारी सामर्थ्य पदार्थविहीन राहूं शकत नाहीं अर्थात् या सामर्थ्याचेंच

तात्विक वर्णन न करतां असलें सामर्थ्य ज्या पदार्थांत आहे त्या पदार्थांच्या स्वरूपाचें वर्णन सुरू होऊन त्यांचे नांवानें शास्त्रीय व्यवहार चालू झाला. एकाद्या क्रियेच्या संपादनासाठीं अवश्य असणाऱ्या गुणसमुदायाचा पदार्थ व क्रिया यांना भाषेंत बहुधा भिन्न स्वरूप राहत नाहीं. याच न्यायानें, शरीरांत उत्सर्जकशक्ति विकृत झाली असतां उत्सर्जक सामर्थ्य असलेल्या पदार्थांचे—वायूचे—नांवानें ही विकृति ओळखणें व अशा रीतीनें दोष व शरीर यांचा व्यवहार रूढ झाला व तसा होणें सोयीचेंहि असतें. त्यानंतर या व्यवहाराची व्याप्ति अशी वाढली कीं एका दोषाचे गुणसमुदायापैकीं कोणत्या तरी एकाच गुणाचाहि त्या दोषाचे नांवानें उल्लेख होऊं लागला म्हणजे, रूक्षता वाढली, वातविकृति, मलोत्सर्जन नाहीं, वातविकृति, ठणका वातविकृति, कोरड पडते वातविकृति, कृशता वातविकृति, अशा रीतीनें निरनिराळे विकार त्यांचीं स्थानें व अवस्था यांमध्यें दोषांचा उल्लेख सरसहा होऊं लागला व कोणत्याहि विकाराचें विवेचन केवळ त्रिदोषांचे नांवानेंच होऊं लागलें. व एक प्रकारें तें घोंटाळ्याचेंहि भासावें यांत आश्चर्य नाहीं. परंतु त्रिदोषांचें तात्विक स्वरूप व त्यांचें निरनिराळ्या शरीरभागांतील निरनिराळ्या गुणांचे स्वरूपानें अस्तित्व आणि वेगवेगळें कार्य ध्यानीं आणून जर सामान्य दोषशब्दाचा विचार केला तर हा घोंटाळा राहत नाहीं. आयुर्वेदानें रोगविज्ञानासाठीं केवळ दोषांचा उल्लेख केला नसून त्यांचा निरनिराळ्या स्थानांतील संबंध ध्यानीं घेण्यास सांगितलें आहे.

संचयं च प्रकोपं च प्रसरं स्थानसंश्रयं ॥
व्यक्तिं भेदंच यो वेत्ति दोषाणां स भवेत् भिषक् ॥१॥ सुश्रुत

दोषांची वाढ, प्रसार, प्रकोप, स्थानाश्रय, भेद व रूप यांचें ज्ञान असेल त्यालाच वैद्य समजावें. या सूचनेनें निरनिराळ्या स्थानांतील नित्यव्यापार व त्यांत असणारा निरोगी स्थितींतील दोषांचा संबंध ध्यानांत आणून तदनुसार दोषविकृति याचा अर्थ करावयाचा हें स्पष्ट होत आहे. सर्व शरीराच्या सर्वसामान्य तीन क्रिया ज्या, संग्रह,पचन, उत्सर्जन त्यांपैकीं कोणत्या क्रियेच्या विकृतीमुळें एकादा भाग रोगी झाला हें समजण्यासाठीं त्रिदोषांचा उपयोग असतो. कोठ्यांत अजीर्ण झालें हें समजलें असतांहि, पचनशक्ति कमी झाली, अन्न अधिक झालें कीं मळाचें उत्सर्जन होत नाहीं याचा बोध झाल्याविना पाचक औषध द्यावें, उपवास करवावा कीं विरेचन द्यावें याचा बोध होत नाहीं. त्याचप्रमाणें या प्रत्येक अवस्थेंतहि पुनः वातादींचे तीन प्रकार मानावे लागतात. अशासाठीं कीं त्यामुळें विकृतीचा स्थानी परिणाम ध्यानांत यावा. जसें—पचनशक्ति कमी झाली, योग्यप्रमाणांत खाल्लेलें नित्याचें संवयीचें अन्नपचन नाहीं असें अनुभवास आलें व त्यावरून पचन कमी ही विकृति

थानीं आली तरी, जठरांतील पाचकरस कमी झाला, कीं त्याचें मिश्रण अन्नांत कांहीं तरी व्यत्यय आल्यानें होत नाहीं. आंतडयांत अभिष्यंद होऊन—आर्द्रता येऊन, जाठररसाचे वियोजनांत व्यत्यय येतो कीं आंतडयांत कोरडेपणामुळें उत्पन्न झालेल्या स्रोतसांच्या संकोचामुळें व्यत्यय येतो याविषयीं ज्ञान होणें चिकित्सेला अवश्य असतें व त्यासाठींच प्रत्येक रोगांत त्रिदोषांचा संबंध सांगितला आहे. रोगी भागाची स्थूलतया स्वरूपशः व नंतर क्रियाविषयक तपासणी केल्यानंतर आलेलें क्रियावैषम्य कोणत्या मूळ क्रियेच्या विकृतीचें याचेंहि ज्ञान व्हावयास पाहिजे. तरच तत्वतः विकृतीचें ज्ञान झालें असें म्हणतां येईल. म्हणजे रोगविज्ञानाला, शारीरविज्ञान तर पाहिजेच पण त्रिदोषविज्ञान जर नसेल तर निदान, औषधीप्रयोगांचा तरी उपयोग करणें अशक्य आहे. कारण औषधांचे गुण शरीरांतील विभाग व त्या त्या विभागांतील कार्यकारी अणूंवर होणारा परिणाम यांना अनुसरूनच सांगितले आहेत. औषधांचा परिणाम सूक्ष्म भागावर होतो. (विशेष खुलासा पुढें करण्यांत येईल.)

प्रतिरोगमितिक्रुद्धा रोगाधिष्ठानगामिनीः ॥
रसायनीः प्रपद्याशु दोषा देहे विकुर्वते ॥१॥ (अ. हृ. नि. अ.१ला.

आपापल्या कारणांनीं कुपित झालेले दोष रोगस्थानांतील रसायनींमध्यें (सूक्ष्म वाहिनी) प्रवेश करून रोग उत्पन्न करतात.

दोषांचें रोगकर्तृत्व अशा प्रकारें सांगितलें आहे प्रत्येक भागांत ज्या सूक्ष्मवाहिन्या किंवा स्रोतसें असतात त्यांचेमध्यें चालणाऱ्या नित्याच्या रासायनिक क्रियेनेंच शरीराची–घटकांची–घडामोड होत असते व याच भागांत–स्रोतसांत–कार्यकारी असे दोष असतात. असें आयुर्वेदाचें मत आहे.

"वातपित्तश्लेष्मणां पुनः सर्व शरीरचराणां –
स्रोतांस्यनभूतानि ॥ " (च. वि. अ. ५)

याच भागांत प्रथम क्रिया सुरू होते. विकृति याच ठिकाणीं व औषधांतील सजातीय अणुहि याच भागावर प्रथम परिणामी होऊन कार्य करतात. यामुळें त्रिदोषांना म्हणजे सार्वदेहिक स्रोतसांतून राहणाऱ्या सूक्ष्म अशा कार्यकारी अणूंना महत्व देऊन शरीराच्या अविकृत अथवा विकृत अवस्थेंत त्यांचाच विचार मुख्य मानला जावा यांत अनैसर्गिक असें कांहींच नाहीं.

त्रिदोषांचा क्रम कोणता ?

त्रिदोषांचें सर्व विवेचन पाहतां त्यांत श्लेष्मा पित्त व वायु असा

क्रम दिसतो. कारण श्लेष्म्याचें संग्रह किंवा संघटना हें कार्यच देहाचा आरंभ आहे. व

विसर्गादानविक्षेपैः सोमसूर्यानिला यथा ॥
धारयंति जगद्देहं कफपित्तानिलास्तथा ॥ १ ॥
नर्ते देहः कफादस्ति न पित्तान्न च मारुतात् ॥

या वाक्यांत कफपित्तवायु असा क्रम स्वीकारला आहे, परंतु बहुतेक सर्व ठिकाणीं विशेषतः निदानचिकित्साप्रकरणीं वायु पित्त कफ असाच क्रम स्वीकारलेला आहे, व वायूचें महत्वहि त्याचप्रमाणें वर्णिलें आहे.

विभुत्वादाशुकारित्वाद्बलित्वादन्यकोपनात् ॥
स्वातंत्र्याद्बहुरोगत्वाद्दोषाणां प्रबलोऽनिलः ॥ १ ॥
पित्तं पंगुः कफः पंगुः पंगवो मलधातवः ॥
वायुना यत्र नीयंते तत्र गच्छंति मेघवत् ॥ १ ॥
अव्याहतगतिर्यस्य स्थानस्थः प्रकृतिस्थितः ॥
वायुस्यात्सोऽधिकं जीवेत् वीतरोगः समाः शतम् ॥ १ ॥

या वाक्यांनीं धातु मळ त्याचप्रमाणें कफपित्ताहून वायुस्व तंत्र व श्रेष्ठ असल्याचें सांगितलें आहे.

वायुः पित्तं कफश्चेति त्रयो दोषाः समासतः ।(वाग्भट. सू. अ. १)
वायु पित्तं कफश्चोक्तः शारीरो दोषसंग्रहः॥ (चरक सू. अ. १ श्लो. ५६)

अशा प्रकारें वायुपित्तकफांचा अनुक्रमच सर्वत्र आहे. व कफाचा उत्पादक या नात्यानें महत्वाचा संबंध असतां तो मागें पडून कफाचे पूर्वी वायु कां यावा? असा प्रश्न सहजींच उत्पन्न होतो व त्याचा विचार करणें अवश्य आहे.

याचें कारण असें आहे कीं उत्पादनक्रमामध्यें जरी दोषांपैकीं कफ प्रमुख किंवा प्रथम असला तरी विकृतीचे प्रसंगीं मात्र वायूचेंच सामर्थ्य अधिक असतें. शरीराच्या अनेकविध व्यापारांचा उगम नित्य चालणाऱ्या चलनवलनापासून होत असतो. गति–हाल चाल–हा मुख्य जीवनव्यापार आहे. हा व्यापार ' वायूचा हें ' स्पष्ट आहे. या हालचालीमध्यें ज्यावेळीं अडथळा–प्रतिबंध–होतो त्यावेळींच रोगाला स्वरूप येत असतें. कित्येक विकारांत, कफामुळें उत्पन्न झालेला अभिष्यंद अथवा पित्तामुळें होणारा अभिताप हीं वायूचे गतीला विघातक कारणें असतात. हें खरें असलें तरी रोगाला स्पष्ट स्वरूप येण्याला कोठें तरी या गतीमध्यें व्याघाताची अवश्यकता असते.

कुपितानां हि दोषाणां शरीरे परिधावतां ॥
यत्र संगः स्ववैगुण्यात् व्याधिस्तत्रोपजायते ॥१॥ (चरक)

क्षिप्यमाणः स्ववैगुण्यात् रसः सज्जति यत्र सः ॥
तस्मिन् विकारं कुरुते खेवर्षमिव तोयदः ॥ १॥(अष्टांगहृदय.)

या श्लोकांमध्यें गति अथवा अभिसरण यांमधील अडथळा म्हणजेच रोग असा स्पष्ट अर्थ आहे. मागें सांगितलेंच आहे कीं शरीरविकृती नंतर तें कां-विकृत होतें ? कोण दूषित करणारें या प्रश्नाचें उत्तर ह्मणून अविकृतावस्थेंतील देहधारक वातादिकांनाहि दोष नांव देऊन त्यांची विकृति टाळण्याची सूचना देण्यांत आली ह्मणजे विकृति टाळणें आणि चालवणें हें ध्येय मानणाऱ्या वैद्यशास्त्रानें रोगोत्पादक कारणांवर विशेष लक्ष ठेवणें अगत्याचें या न्यायानें अविकृतावस्थेंत तत्वतः धारक असलेल्यांत श्लेष्मा प्रमुख पण दोषांत वायु प्रमुख मानणें सयुक्तिक होय. याच उद्देशानें "वायुः पित्तं कफश्चेति" अशा क्रमाचा प्रसार-'फलं चास्य चिकित्सितं' चिकित्सा हें ध्येय मानणाऱ्या आयुर्वेदांत झाला आहे 'व्याध्युपसृष्टानां व्याधिपरिमोक्षः स्वास्थ्यस्य रक्षणं च' (सुश्रुत) व्याधितांना रोगमुक्त करणें आणि निरोग्यांना तसेंच राखणें हें आयुर्वेदाचें ध्येय प्रसिद्ध आहे.

दोष तीन कीं चार ? रक्त हा चवथा दोष आहे काय?

आयुर्वेदाचे वाङ्मयामध्यें क्वचित् तीन दोषांबरोबरीचें महत्व रक्तालाहि दिल्याचें आढळतें. व त्यावरून दोष रक्तासह चार असावे असें मानण्याचा एक संप्रदाय आहे अष्टांगहृदयाचे सर्वांगसुंदरा व्याख्येमध्यें याविषयींचें शंकासमाधान चांगल्या प्रकारें केलें आहे (अ. सं. सूत्र अ० १ श्लोक ५ वरील व्याख्या.) रक्त हें सर्व शरीराचें पोषक. आणि त्यावर प्रथम परिणाम होतो.

"तदेभिरे शोणितचतुर्थैः संभवस्थितिप्रलयेष्वप्यविरहितं--शरीरं भवति ।

नर्ते देहः कफादस्ति न पित्तान्न च मारुतात् ॥
शोणितादपिवा नित्यं देहएतैस्तु धार्यते ॥१॥ (सु.सु.अ २१)

सुश्रुतांतील या वाक्यांत त्रिदोषांबरोबरच रक्तालाहि महत्व दिलें आहे. दोषांप्रमाणेंच रक्ताचें वर्णन स्थान विकार सांगितले आहेत.

अनुष्णशीतं मधुरं स्निग्धं रक्तं च वर्णतः ॥
शोणितं गुरु विस्रंस्याद्विदाहश्चास्यपित्तवत् ॥१॥

समशीतोष्ण, मधुर, स्निग्ध, वर्णानें लाल, जड, आमगंधि असें रक्त असून त्याचा विदाह पित्ताप्रमाणें होतो.

शोणितस्य स्थानं यकृत्प्लीहानौ तच्चप्रागभिहितम् ।
तत्रस्थमेव शेषाणां शोणितस्थानानामनुग्रहं करोति ।

रक्ताचें स्थान यकृत् आणि प्लीहा मुख्य असून तेथेंच राहून इतर रक्तस्थानांना तें मदत करतें. (सु. सू. अ. २१)

अशा प्रकारें रक्ताचें स्वतंत्र वर्णन विशेषतः सुश्रुतांत आहे. तरी देखील रक्ताच्या विकृतीमध्यें वातादींचे संसर्गामुळें भेद सांगितले असून तदनुसार उपचारामध्यें भेद आहेत. यावरून रक्ताचें स्वातंत्र्य नष्ट होतें.

यस्माद्रक्तं विना दोषैर्न कदाचित्प्रकुप्यति ॥
तस्मात्तस्य यथादोषं कालं विद्यात्प्रकोपणे ॥१॥

दोषांशिवाय रक्त प्रकुपित होत नाहीं ह्मणून दोषांना अनुसरून त्याचे कोपाचा काळ समजावा. (सु. सू. अ० २१)

कोणत्याहि रोगामध्यें त्रिदोषविकृतीला अनुसरूनच संप्राप्ति सांगितली आहे तशा रक्ताचा उल्लेख नाहीं. द्रव्याचे गुणधर्म सांगतांना त्यांतील रसामध्यें त्रिदोषांचा प्रकोपप्रशम सांगितला तसा रक्ताचा नाहीं. (चरक विमानस्थान अध्याय १ ला यांत वर्णन आहे.)

कांहीं रक्ताश्रयी विकारांवर स्वतंत्र चिकित्सेचा बोध होण्यासाठीं व इतर धातूंपेक्षां रक्त हें सर्वगामी, अधिक प्रसरणशील म्हणून त्याची विकृति सर्व शरीरहि विकृत करूं शकेल, शुद्ध रक्तानेंच सर्व धातूंची वाढ या कारणांनीं त्याला इतर धातूंपेक्षां महत्व दिलें तरी त्यामध्यें स्वतः सामर्थ नाहीं म्हणून तें दोषांमध्यें समाविष्ट होणार नाहीं. रक्त, धातु आणि दूष्य याच स्वरूपाचें असावयाचें म्हणजे दोष हे तीनच ठरतात. ' त्रयो दोषाः ' हा सिद्धांत अबाधित आहे.

त्रिदोषासंबंधीं गैरसमज.

त्रिदोषांसंबंधीं आयुर्वेदाच्या उपपत्ति ध्यानीं न घेतां कांहीं तरी गृहीत कल्पनांवर नसते आरोप करण्यांत येतात. याला एक कारण जसें पूर्वग्रहदूषित व संभ्रमात्मक कल्पना तसेंच दुसरें कारण त्रिदोषांच व्यवहारांत शारीरविज्ञानाकडे दुर्लक्ष्य हेंहि असेल. वाताचा विकार या सर्वसामान्य संदिग्ध ज्ञानानें रोगज्ञान होत नाहीं असा स्पष्ट आयुर्वेदांत उल्लेख असतां दोष दूष्य व त्यांचे अंशांश, स्थानविभाग प्रसार-स्थानाश्रय इत्यादि गोष्टी ध्यानीं घेण्याचा आग्रह असतां असल्या संदिग्ध ज्ञानावर विश्वास ठेवणें व हेंच आयुर्वेदाचें तत्वज्ञान मानणें दोनहि अज्ञानाचीं निदर्शकच होत. निदानशास्त्रांत ज्याअर्थीं आयुर्वेदानें संचय, प्रकोप आणि प्रसार व स्थानाश्रय यांचा समावेश केला आहे त्या अर्थीं शरीराचे विभाग, रचना, कार्य व अन्योन्यसंबंध यांचें ज्ञान

अवश्य होतें याविषयीं संशय कां असावा ? पक्काशयाश्रयी वायु व अस्थिगत वायु, वायूनें येणारी सूज व वातिक मस्तकशूळ, डोळ्यांची आग करणारें पित्त व मळमळ, जळजळ करणारें पित्त, खोकल्यांतून पडणारा कफ व सांध्यांतील कफ इत्यादि सर्व एकाच एका सामान्य स्वरूपाचे असते तर आयुर्वेदाचें चिकित्साशास्त्र इतकें विस्तृत झालें नसतें. या स्थानांतील तारतम्यपूर्वक संबंध ध्यानीं घेऊन विचार करावयास पाहिजे.

अपरिसंख्येय परमाणु समुदाय स्वरूपीं शरीरामध्यें या परमाणुंचा संयोग व शारीराचे व्यापार अखंड राखण्यासाठीं संयुक्तावस्थेतील शरीर घटकांमध्यें असणाऱ्या व्यापी व कर्तबगार अणूंना महत्व देऊन त्याचे सामर्थ्यावर दृष्टी ठेवण्यासाठीं त्रिदोषवाद उत्पन्न झाला. हें ध्यांनीं घेऊन मग त्यांचा निरनिराळ्या गुणांनीं निरनिराळ्या स्थानीं सांगितलेला क्रियाक्रम विचारांत घेतल्यास, खोकल्यांतून पडणारा कफ, वांतींतून पडणारें पित्त अधोमार्गानें सरणारा वायु म्हणजे आयुर्वेदांतील त्रिदोष नसून, प्रत्येक अणुंतील संग्राहक किंवा आकर्षक शक्तिसंपन्न भाग म्हणजे कफ, पाचक किंवा विभाजकसामर्थ्ययुक्त भाग म्हणजे पित्त आणि गति उत्सर्जनाचें सामर्थ्य असलेला अणुभाग म्हणजे वायु त्याचप्रमाणें,संग्रह, पचन, उत्सर्जन, किंवा पोषण, पृथक्करण, उत्सर्जन, याशिवाय चवथी क्रिया नाहीं म्हणूनच दोषांची त्रयी प्रचारांत आली केवळ या संख्येच्या आवडीमुळें नव्हे अशी खात्री होऊन आयुर्वेदाचे तत्वज्ञानाकडे उपहासबुद्धीऐवजीं सादरबुद्धि नाहीं तरी निदान जिज्ञासबुद्धि वळल्यास आयुर्वेदीयांनीं स्विकारलेला,—

विसर्गादानविक्षेपैः सोमसूर्याऽनिला यथा।
धारयंति जगद्देहं कफपित्तानिलास्तथा ॥ १ ॥

हा सिद्धांत भ्रामक, काल्पनिक, अज्ञानमूलक न वाटतां सत्य असाच वाटेल.

त्रिदोषांचा निदानाविषयीं उपयोग ?

त्रिदोषांच्या तात्विक स्वरूपाचा बोध झाल्यावर त्यांचा निदान आणि चिकित्सा यांमध्यें कसा उपयोग करावयाचा हा विचार कर्तव्य आहे. वैद्यशास्त्राचें सर्व विवेचन चिकित्सेच्या सुलभतेसाठीं असतें आणि चिकित्सा रोगाची; अर्थात् निदान व चिकित्सा हींच वैद्यशास्त्राचीं मुख्यांगें झालीं. रोगाचें नक्की ज्ञान व खात्रीचे उपाय यांसाठीं सर्व विवेचन आहे. (व्याधेस्तत्वपरिज्ञानं वेदनायाश्च निग्रहः ।) आयुर्वेदाच्या सर्व विवेचनाचें तत्त्व त्रिदोष आहेत अर्थात् त्यांचा

निदान चिकित्सेचे कामीं उपयोग झाला पाहिजे नाहींपेक्षां त्रिदोषवर्णन हें शब्दशास्त्राचें एक विनोदी स्वरूप होईल. आयुर्वेदानें कफपित्तानिलांना दोष हें नांव देऊन हेच शरीर दूषित करतात; (दूषणात् दोषाः।) रोगकर्तृत्व त्यांचेकडेच आहे असा उद्देश प्रथमदर्शनींच स्पष्ट केला आहे. त्याचप्रमाणें—

दोषा एव हि सर्वेषां रोगाणामेककारणं । (वाग्भट.)
वातादि दोषच सर्व रोगांचें मुख्य कारण आहेत.

सर्वेषामेव रोगाणां निदानं कुपिता मलाः । (वाग्भट)
सर्व रोगांचें निदान म्हणजे उत्पादक कारण कुपित झालेले दोष होत.

विकारजातं त्रिविधं त्रीन् दोषान्नातिवर्तते ॥ (वाग्भट)
तीन प्रकारचे रोग (सर्व) वातादि तीन दोषांशिवाय होत नाहींत.

प्रतिरोगमिति क्रुद्धा रोगाधिष्ठानगामिनीः॥
रसायनीः प्रपद्याशु दोषा देहे विकुर्वते ॥१॥ (वाग्भट)
याप्रमाणें क्रुद्ध झालेले दोष रोगस्थानगत अशा ज्या रसायनी ह्मणजे सूक्ष्मवाहिनी त्यांचे ठिकाणीं जाऊन शरीरांत विकृति उत्पन्न करतात.

त एव व्यापन्नाः प्रलयहेतवः (सुश्रुत.)
तेच बिघडले असतां प्रलय म्हणजे नाश (रोग आणि मरण.) करतात.

विकृता देहं घ्नंति । (वाग्भट.)
विकृत झाले असतां देहाचा नाश करतात.

इत्यादि अशा प्रकारचीं अनेक वाक्यें आहेत कीं त्यांवरून आयुर्वेदीयांनीं सर्व रोगांचें कर्तृत्व वातादि त्रिदोषांकडेच सांगितलें असल्याचें स्पष्ट होतें. सर्व शरीराच्या अनेक क्रियांचा अंतर्भाव विसर्गादानविक्षेपरूपी तीनच क्रियांत होतो व त्याच तीन क्रियांमध्यें वैषम्य आलें असतां रोगोद्भव होतो. यावरून नित्य व्यापारांप्रमाणें रोगकर्तृत्वहि तत्वतः त्रिदोषांकडे सांगावें हें ओघानेंच प्राप्त झालें. पण याप्रमाणें तत्वतः त्रिदोष रोगकारक मानल्यावरहि अनेक रोग आणि त्यांच्या अनेकविध अवस्था यांचें नक्की ज्ञान त्रिदोषांनीं कसें होतें ?

कांहीं विकार शरीराच्या एखाद्या भागांतच असतात तर कांहींचा संबंध अनेक भागांत असतो. सूज, गुल्म, व्रण इत्यादि विकार एका भागांतील तर ज्वर, कुष्ठ, संधिवात, सर्वांगाची सूज इत्यादि अनेक शरीरावयवांचे विकार होत. या विकारांना अनुक्रमें स्थानी आणि सार्वदेहिक अशीं नांवें देतां येतील. एकाद्या विकारांत अनेक उपद्रव

असतात तर कांहींत असत नाहींत, कांहीं रोग झाले असतां त्यांचा परिणाम आणखी रोग उत्पन्न करण्यांत होतो, कांहीं तसे नांहींत असे अनेक प्रकारचे रोग तीन दोषांनीं कसे समजून घ्यावयाचे ? तीन दोष व अनेक स्थानांत अनेक विकार यांचा संबंध कसा येतो ? याविषयीं आयुर्वेदाची पद्धति काय आहे पाहूं.

रोग म्हणजे काय ?

प्रथमतः आयुर्वेदानें रोगाविषयीं काय व्याख्या केली आहे याविषयीं विचार करावयास पाहिजे. "रोगस्तु दोषवैषम्यं" रोग म्हणजे दोषांचें वैषम्य होय. अशी रोगाची व्याख्या आहे. दोषांमध्यें वैषम्य येणें म्हणजे त्यांच्या नैसर्गिक क्रियांमध्यें अनियमितपणा येणें. दोषांच्या न्यूनाधिक्याला वैषम्य मानण्यांत येतें. परंतु अशा अर्थानें पूर्णता येत नाहीं. दोषांचें प्रमाण हें मर्यादित नसून तें शरीराच्या प्रमाणावर अवलंबून असतें. "दोषधातुमलादीनां परिमाणं न विद्यते." (चरक.) दोष, धातु, मळ इत्यादि पदार्थांना ठराविक प्रमाण असत नाहीं. कोणी ऱ्हस्व, तर कोणी दीर्घ, कोणी स्थूल कोणी कृश, कोणी मांसल तर कोणी मांस कमी असणारा, कोणी कृष्णवर्णाचा कोणी गोरा, अस्थिसार, मांससार, शुक्रसार, वातप्रकृति, पित्तप्रकृति, कफप्रकृति इत्यादि सहज जो शरीरधर्म त्यामध्यें "व्यक्ती तितक्या प्रकृति" या न्यायानें दोषादींचें प्रमाण भिन्न असावयाचें. आणि या जन्मादारभ्य असणाऱ्या प्रमाणभिन्नत्वाला किंवा न्यूनाधिक्याला रोग नांव दिल्यास सर्वच रोगी मानण्याचा अनवस्थाप्रसंग येईल. त्याचप्रमाणें वयोमानानुसार वाढणाऱ्या आणि जरेनें जीर्ण होणाऱ्या शरीरामध्यें दोषधातुमलांचें प्रमाण बदलतेंच राहतें. इतकेंच काय ? पण एकाद्याला पोषणाभावीं अथवा एखाद्या आजारामुळें वगैरे सार्वदेहिक क्षीणता येते व पुनः ती जाते. म्हणजे या दोनही अवस्था रोग नव्हेत. रोगामध्यें प्रमाणभिन्नता हें तत्त्व नसून विषमता म्हणजे त्यांच्या क्रियांमध्यें विरुद्धता उत्पन्न होणें हें तत्त्व आहे. "विषमता स्वरूपात् च्यावः" "दोषाणां साम्यं स्वरूपात् अप्रच्युतिः ।" दोषांची विषमता म्हणजे स्वरूपभ्रष्टता, आणि साम्य म्हणजें ते स्वभावापासून भ्रष्ट न होणें, ही सर्वांगसुंदरा व्याख्येंतील, रोगव्याख्या मार्मिक आहे.

सर्व शरीराची क्षीणता अथवा वृद्धि म्हणजे त्यांतील दोषांची क्षीणता आणि वाढ म्हणजे वैषम्य अगर रोग नव्हे; त्याचप्रमाणें एकाद्या भागाची अथवा एकाद्या पदार्थाची वृद्धि अथवा क्षीणताहि रोग नव्हे. तर विषमता अर्थात् "अनैसर्गिकपणा" हा रोग होय. म्हणजे

दोषवैषम्य याचा अर्थ क्रियावैषम्य असा उघड होतो. ज्या ठिकाणीं जी नैसर्गिक क्रिया घडावयाची ती न घडतां भलतीच क्रिया घडते त्या वेळीं रोग होतो. यासाठींच दोषांची वृद्धि, क्षय यांचीं लक्षणें सांगून त्याशिवाय कोपाची एक अवस्था सांगितली आहे. आणि हीच अवस्था रोगकारण असल्याचा उल्लेख आहे. वृद्धिक्षयांमध्यें रोगकर्तृत्व नाहीं. मात्र या अवस्था कोपावस्थेला उत्पन्न करूं शकतात. त्यांतही क्षीणावस्था ही रोगकारक नाहीं. कारण जो पदार्थ क्षीण अथवा क्षीण-सामर्थ्य झाला त्यामध्यें कोप संभवनीय नसतो. म्हणून कोणत्या तरी दोषाचा संचय व त्याचा प्रकोप आणि त्यापासून रोग असा क्रम सांगण्यांत आला आहे.

शरीर निरोगी स्थितींत असतां सर्वत्र योग्य प्रमाणांत संग्रह, पचन व उत्सर्जन या क्रिया चालतात, आणि ज्या वेळीं एका अथवा अनेक शरीरभागांत अनैसर्गिक संग्रह, पचन आणि उत्सर्जन होईल त्या वेळीं रोग होतो. शरीरामध्यें ज्यावेळीं कोठें संग्राहादि कार्यांचा अतिरेक होतो त्या वेळीं त्याचा परिणाम दुःखकारक होतो म्हणून "रुजंति इति रोगाः" पीडा देणारे या अर्थानें रोग या शब्दानें या अवस्था संबोधण्यांत येऊं लागल्या. पीडा ज्या ठिकाणीं होते तेथील क्रियावैषम्याचें ज्ञान हेंच रोगज्ञान होय. अर्थातच रोगस्थानीय क्रियावैषम्य ध्यानीं येण्याला त्या स्थानांतील नित्य क्रियांचें ज्ञान अवश्य होय. आणि शरीराचे विविध भागांतील अनेकविध नित्य क्रियांचे ज्ञानाला त्या त्या स्थानाचें स्थूलतया रचना आकार, पदार्थ, स्वरूप यांचें ज्ञानहि असावयास पाहिजे. या ज्ञानाला **शरीरेंद्रियविज्ञान** या नांवानें संबोधण्यांत येतें. शारीरविज्ञान आणि इंद्रियविज्ञान यांचे अभावीं दोषविकृति अथवा क्रियावैषम्य यांचा योग्य खुलासा होणारा नाहीं. निदानशास्त्रामध्यें स्थूलतया त्रिदोषविज्ञान अपुरें असून त्यांचें विशिष्ट स्वरूप व स्थानानुरूप कार्य यांचा बोध नीट व्हावयास पाहिजे. स्थानविशिष्ट दोषविकृती किंवा विशिष्ट स्थानांतील क्रियावैषम्य रोगकारक असल्यानें आयुर्वेदानें निदानाविषयीं दोषांचा प्रकोप आणि स्थानसंश्रय यांना प्राधान्य दिलें आहे. प्रकोप म्हणजेच क्रियावैषम्य समजावयाचें. प्रकोपाची व्याख्या अशी आहे कीं,

कोपस्तून्मार्गगामिता ।
लिंगानां दर्शनं स्वेषामस्वास्थ्यं रोगसंभवः ।

कोप म्हणजे उन्मार्गगामिता होय. ही झाल्यावर त्या दोषाचीं लक्षणें व रोग होतात. उन्मार्गगामिता म्हणजे अयोग्य मार्गानें प्रवृत्ति होणे. असली उन्मार्गप्रवृत्ति होण्याला प्रथम अतिरिक्त संचय व्हावयास

पाहिजे. म्हणजे आधीं संचय व मग उन्मार्गप्रवृत्ति असा क्रम प्राप्त होतो. व तो तसाच सांगितलेलाही आहे.

शरीराच्या रोगी अथवा निरोगी अवस्थांचा विचार करीत असतां त्याचा सर्वसामान्य धर्म किंवा स्वाभाविक सामर्थ्य गृहीत मानणें अवश्य असतें. ज्याप्रमाणें त्या त्या शरीरभागांतील नित्याच्या क्रिया विशिष्ट ठिकाणीं या नैसर्गिक सामर्थ्यानें चालतात त्याचप्रमाणें रोगी अवस्थेमध्येंहि दूषित पदार्थ किंवा दोष ह्यांच्या उन्मार्ग अवस्थेंतहि त्यांचा विशिष्ट मर्यादेपावेतों त्रास न व्हावा अशा प्रकारचें सामर्थ्य मानावें लागतें. तोंपर्यंत वाढलेल्या दोषाला शरीर सहन करूं शकतें. व ह्या सामर्थ्याबाहेर वाढ झाली कीं, त्याचा त्रास होऊं लागतो. व त्याला प्रतीकार सुरू होतो. ' रोग म्हणजे एक प्रकारें विकृतीचा प्रतीकार होय; ' एकाद्या ठिकाणीं रोग होतो म्हणजे त्या ठिकाणीं रोगोत्पादक विकृतीला प्रतीकार सुरू होतो. कांहीं विकारांत शरीराची प्रतीकारी शक्ति रोगाला पुरी पडून त्याचा नाश करूं शकते तर कांहीं रोगांमध्यें ही शक्ति अपुरी पडून रोगनाशाला बाह्योपचारांची अवश्यकता असते. आणि याच कारणासाठीं चिकित्साशास्त्राची अवश्यकता निर्माण झाली. कित्येक रोगांची स्थिति अशी असते कीं, एकाद्या ठिकाणीं नैसर्गिक क्रियांमध्यें वैषम्य उत्पन्न होऊन त्याच ठिकाणीं रोग होतो परंतु कांहीं विकारांमध्यें एका ठिकाणीं विकृति सुरू होते परंतु तेथें प्रत्यक्ष असें रोगरूपी कार्य न घडतां क्रियाकारी जे वातादि पदार्थ त्यांची उन्मार्गप्रवृत्ति इतर भागांत हाऊं लागते व असा प्रकार होत असतां जेथें या उन्मार्गप्रवृत्त दोषाला—क्रियावान् पदार्थाला—प्रसारांत व्यत्यय उत्पन्न होतो त्या जागीं रोगाला स्पष्ट रूपता येते. रोगपरीक्षा करीत असतां रोगाचें ज्ञान ह्मणजे उन्मार्गप्रवृत्त दोषाचा स्थानसंश्रय ह्मणून सांगितलें आहे त्याचा आशय हाच होय. संप्राप्तीचें लक्षण सांगतांनाहि:—

यथादुष्टेन दोषेण यथा चानुविसर्पता ॥
निर्वृत्तिरामयस्यासौ संप्राप्तिः । (माधवनिदान, वाग्भट.)

दुष्ट होऊन व त्यांचा प्रसार होऊन एकाद्या दोषानें जी रोगाची (एकाद्या जागीं) उत्पत्ति होते. तिला संप्राप्ति ह्मणावयाचें असें सांगितलें आहे.

त्याचप्रमाणें:—

संचयं च प्रकोपं च प्रसरं स्थानसंश्रयं ॥
व्यक्ति भेदं च यो वेत्ति दोषाणां संभवेद्भिषक् ॥ १ ॥
(सुश्रुत.)

दोषांचा संचय, प्रकोप, प्रसार, स्थानसंश्रय, रोगाची स्पष्टता आणि त्याचे त्याचे भेद जाणतो त्यालाच वैद्य ह्मणावें.

याप्रमाणें रोगस्थान, त्यांत होणारा उन्मार्गप्रवृत्त दोषाचा संचय, हा उन्मार्गप्रवृत्त दोष कोठून कोठून उन्मार्गगामी झाला, त्याचा प्रसार कोणकोणत्या भागांतून झाला इत्यादि समजणें रोगज्ञानाला अवश्य आहे. थोडक्यांत याचा अर्थ असा कीं, विकृतीच्या आरंभाचें स्थान, त्याच्या रोगरूपी परिणामाचें स्थान व या दोन स्थानांचे मध्यवर्ति शरीरावयवांवर प्रसाराचे वेळीं घडणारा परिणाम इतक्या गोष्टी विचारांत घेतल्या असतां रोगज्ञान होतें. कांहीं रोगांत विकृति किंवा दोषवैषम्य आणि रोगस्थान एकच असावें आणि कांहीं विकारांत हीं दोन स्थानें भिन्न असावींत याचें कारण स्थानी सामर्थ्याची न्यूनाधिकता असते. एकाद्या शरीरभागांत नैसर्गिक क्रियांमध्यें विषमता आणि त्यायोगें जरी एकाद्या अनैसर्गिक पदार्थाचा संचय झाला तरी तो शरीरभाग सामर्थ्यसंपन्न असल्यास असल्या अतिरिक्त, अनैसर्गिक, किंवा दूषित पदार्थाला आपल्या सामर्थ्यानें बाहेर टाकून स्वतः सुरक्षित राहतो. अशा रीतीनें उन्मार्गगामी दोष (दूषित पदार्थ) प्रसार पावत असतां ज्या एखाद्या सामर्थ्यहीन भागाकडून त्याचें उत्सर्जन होऊं शकत नाहीं तेथें त्याचा संचय होऊन दूषित पदार्थाच्या संयोगानें त्या भागांतील पदार्थहि दूषित होतात व मग हा दूषित संचय फार झाला कीं त्याच्या प्रतीकारांकरतां शरीराचें प्रतिकारी सामर्थ्य या विशिष्ट भागांत एकवटतें. तेथील नित्य व्यापार बंद (बरेच कमी) होतात. व मग तेथें सर्वच अनैसर्गिक क्रिया उत्पन्न होतात यालाच रोग हें नांव आहे. (रोगप्रतिकारी सामर्थ्याविषयीं पा. १०६ पहा.) रोगस्थानीय वैगुण्याला आणि त्यामुळें होणाऱ्या उन्मार्गप्रवृत्त दोषाचे संचाराला रोगविज्ञानांत महत्त्व दिलें आहे:—

कुपितानां हि दोषाणां शरीरे परिधावतां ।
यत्र संगः स्ववैगुण्याद्व्याधिस्तत्रोपजायते॥१॥ (चरक)

दोष कुपित होऊन त्यांचा शरीरांत प्रसार चालू असला तरी ज्या ठिकाणीं स्थानवैगुण्य उद्भवलें तेथें त्या दोषाचा संग होतो आणि त्याच जागीं रोग होतो हें जें स्थानी वैगुण्य आलेलें असतें त्याचें कारण अनेक प्रकारचें असूं शकेल. कोणत्या तरी कारणानें एकाद्या स्थानांतील शक्ति क्षीण होते व तेथें रोगाला स्पष्ट स्वरूप प्राप्त होतें. यासाठीं रोगाचे ज्ञानाला, विकृतीचें आरंभस्थान व त्याचा परिणाम रोगरूपानें होतो तें स्थान, यांचा बोध व मग विमार्गप्रवृत्त दोषाचा भेद कळला कीं सामान्यतः रोगाची माहिती होते. ज्या दोषांच्या प्रकोप, प्रसर—स्थानाश्रयावर रोगज्ञान अवलंबून आहे त्यांचें निरनिराळ्या रोगस्थानांतल-

कार्य व कार्यकारी गुण अथवा अंश यांविषयीं प्रथम ज्ञान असावयास पाहिजे.

वाढ, प्रकोप किंवा उन्मार्गप्रवृत्ति आणि स्थानाश्रय हे मानतांच अर्थात् हे दोष पदार्थ असावयास पाहिजेत हें ओघानेंच प्राप्त होतें. पदार्थाशिवाय उन्मार्गप्रवृत्ति आणि प्रसार कशाचा होणार ? अतिरिक्त वाढून दूषित स्वरूप आल्यावर त्यांना दोष हें नांवहि सार्थ होतें. त्यापूर्वी प्रमाणस्थित शुद्धस्थिति ही दोषवाचक नसून ती देहधारक अवस्था असते, आणि याकरतांच यांना समस्थितींत धातु हें नांव योग्य आहे. शास्त्रीय व्यवहाराचे सोयीसाठीं दिलेलें दोष हें नांव नेहमींच वापरण्यांत येतें. अशा रीतीनें दूषित झालेल्या वातादींना मल हें नांवहि क्वचित् योजण्यांत येतें. कारण, या अवस्थेंत शारीरधातूंना मलिन करणें व टाकाऊ किंवा उत्सर्जनीय स्वरूप पावणें हे गुण (दुर्गुण) त्यांत उद्भवतात.

सर्वेषामेव रोगाणां निदानं कुपिता मलाः ।

कोणत्याहि ठिकाणीं रोग अथवा रोगात्मक विकृति व्हावयाची ह्मणजे एकादा दोष वाढतो. वाढ झाल्यावर मग त्याचा प्रसार इत्यादि होतात. ह्मणजे, कोणत्या तरी दोषाच्या वाढीशिवाय रोग होत नाहीं हें उघड होय. वाढीचा परिणाम रोगरूपानें होतो म्हणून वाढीच्याच अवस्थेंत दोषाचा प्रतीकार करून कोपादि अवस्था उद्भवण्याचें टाळावें असा अभिप्राय आहे. " चय एव जयेद्दोषं " चयाचे अवस्थेंतच दोषाला जिंकावा त्याचप्रमाणें, मुख्यत्वें उपचार सांगत असतां शोधन व शमन हेच प्रकार सांगितले आहेत. "शोधनं, शमनं चेति समासा दौषधं द्विधा ।" शोधन व शमन या भेदांनीं औषध मुख्यतः दोनच प्रकारचें आहे. (अ. हृ.) आणि हे दोन प्रकार लंघनाचे आहेत.

शोधनं शमनं चेति द्विधा तत्रापि लंघनम् ।

शोधन व शमन या भेदांनीं लंघन दोन प्रकारचें आहे. शोधन म्हणजे वाढलेल्या दोषांना शरीराबाहेर काढून टाकणें व शमन ह्मणजे प्रत्यक्ष बाहेर न काढतां विषमता घालविणें. चिकित्सा सांगत असतां आयुर्वेदीय ग्रंथांत बृंहण व लंघन असे दोन प्रकार सांगण्यांत आले आहेत.

उपक्रम्यस्य हि द्वित्वाद्द्विधैवोपक्रमो मतः ।
एकः संतर्पणस्तत्र द्वितीयश्चापतर्पणः ॥ १ ॥
बृंहणो लंघनश्चाति तत्पर्यायावुदाहृतौ ।
बृंहणं यद् बृहत्वाय लंघनं लाघवाययत् ॥
देहस्य भवतः ॥

उपक्रम्य म्हणजे चिकित्स्य जो देह तो मुख्यत्वें दोनच प्रकारचा म्हणजे कृश आणि स्थूल या दोनच स्वरूपाचा असल्याकारणानें चिकित्साहि दोनच प्रकारची आहे. एक संतर्पण किंवा बृहण आणि दुसरी अपतर्पण किंवा लंघन. अनुक्रमें हे उपचार शरीराला पुष्टि आणि लाघव (कृशता) आणतात म्हणून हीं नांवें आहेत. (अ. हृ.)

यावरून बृंहण हा उपचार मानून वृद्धीप्रमाणें क्षयहि रोगोत्पादक मानण्यांत येतो. (कांहिंजणांकडून) परंतु ही चूक आहे. कारण लंघन बृहण हें देहाचें दोषांचें नव्हे. देह कृश झाला असतां, क्षीण झाला असतां वायु हा दोष वाढलेला असतो. आणि अशा अवस्थेंत वातरोग होतात. त्यांवर वाढलेल्या वातावरील उपचार करावयाचे असतात. कृशता हा रोग नसून तीमुळें वायु वाढून रोग करूं शकतो. व बृहणानें वृद्धवायु कमी होतो. बृंहणं शमनं त्वेव वायोः । बृंहण हें वायूवरील शमन, अर्थात् वाढलेल्या वायूचें लंघनच आहे. असा उल्लेखहि याकरतांच आहे. रोगोत्पादक दोष आहेत. ते कोणत्या अवस्थेंत रोग करतात हा महत्त्वाचा मुद्दा असून निदानशास्त्रांत विशेषतः विचारणीय आहे. आणि त्याचें उत्तर दोष वाढल्यावर विकारकारी होतात क्षीणावस्थेंत नव्हे असें आहे. मग ही वाढ तत्वतः झालेली असो अथवा दुसऱ्या दोषाचे क्षीणावस्थेशीं सापेक्षतया झालेली असो. कित्येकवेळीं क्षीण दोषाच्या अवस्थेमध्यें विकार झालेले असतात. परंतु ते क्षीण दोषाचे नसून त्याचे उलट गुणाच्या दोषाचे सापेक्ष वाढीनें झालेले असतात हें ध्यानीं ठेवणें अगत्य आहे. "रोगस्तु दोषवैषम्यं" दोषांचें वैषम्य ह्मणजे वृद्धिक्षयावरून हें वैषम्य व त्यालाच रोग मानतांना क्षयहि रोगावस्था मानण्यांत येते. परंतु वैषम्य याचा अर्थ केवळ वाढ किंवा केवळ ऱ्हास असा नसून सापेक्षतया वाढ आणि ऱ्हास म्हणजे तीन दोषांच्यामध्यें नैसर्गिक क्रियाप्रवर्तनाला अवश्य जें एक प्रमाण त्यामध्यें वैषम्य येणें असा वैषम्य शब्दाचा तत्वतः अर्थ आहे. आणि असल्या वैषम्यामध्यें क्षीणसामर्थ्य अशा दोषांपासून विकार होत नसून त्याच्या उलट वाढलेल्यांचे विकार होतात ही गोष्ट ध्यानीं घेऊन रोगसंप्राप्तीचें निरीक्षण करावयास पाहिजे. प्रतीकार वाढलेल्यावर असतो. प्रतिकार अथवा चिकित्सा ज्यावर करावयाची तो दोष क्षीण नाहीं तर वृद्धच असतो याविषयीं मतभेदाचें कारण नाहीं रोगारंभक विकृतीशीं दोषांचा संबंध विचारांत घेतानां ते वाढलेले असतात व वाढ पदार्थस्वरूपाची असते या दोन गोष्टी ध्यानीं घेणें अगत्य आहे. (मागें पाचक पित्ताचे वर्णनांत पित्ताचे दूषित स्वरूपाविषयीं खुलासा पहा.) दोषांचें शुद्ध व सूक्ष्म असें स्वरूप व रोगोत्पादक नसून तें देहधारक आहे आणि ही

सूक्ष्मता जाऊन स्थूल द्रव्याश्रयी अशी त्यांची वाढ होते त्यावेळीं दोष हे दोष होतात. या दृष्टीनें विचार करतां ध्यानांत येईल कीं, कफाच्या अनेक गुणांमध्यें वर्गीकरण केल्यास, शीत आणि स्निग्ध असे दोन भाग त्यांत मुख्य दिसतात, गुरु, मंद इत्यादि गुण स्निग्ध गुणाचे अनुषंगी आहेत. या दोन प्रकारच्या श्लेष्मगुणांमध्यें शीत हा गुण सूक्ष्म आणि शक्तिस्वरूप आहे तितका स्निग्ध नाहीं. स्निग्धगुणाची प्रतीति स्थूलाश्रयी आहे. आणि संघटना किंवा संग्रहाचें दृश्य कार्य याच पदार्थाश्रयी गुणानें व्हावयाचें. व ज्यावेळीं कफाची रोगकारी वाढ होते त्यावेळीं याच गुणाची वाढ अधिक प्रमाणांत होत असते. पित्ताचेंहि असेच दोन भाग पडतात. एक उष्णगुणप्रधान, आणि दुसरा तीक्ष्ण-गुणप्रधान. उष्णता आणि तीक्ष्णता. तीक्ष्णता हा गुण द्रव अशा आम्लाचा आश्रयी असतो. पित्ताचे गुणांमध्यें एक उष्णता व द्रव, अम्ल, तीक्ष्ण इत्यादि गुण हे द्रवपदार्थाश्रयी तीक्ष्ण अम्लाचे आहेत. या दोन प्रकारांत उष्णता सूक्ष्मद्रव्याश्रयी आणि द्रवाश्रयी तीक्ष्णता त्यामानानें स्थूल हें उघडच आहे. मात्र कफाचें संग्रहात्मक कार्य स्निग्धगुणानें घडतें त्याचप्रमाणें पित्ताचें पचनात्मककार्य याच द्रवाश्रयी गुणानें प्रत्यक्ष घडून येतें. सामर्थ्य हें सूक्ष्मपदार्थाश्रयी असतें आणि विकारकारी अवस्था दूषित अवस्था स्थूल पदार्थांत उद्भवते. वायु हा पदार्थ सूक्ष्म आहे. तरी देखील त्यामध्यें दूषित अवस्था उद्भवते याचा अर्थ त्यामध्यें विरळपणाची मर्यादा कमी होते. त्याचें कार्य अथवा धर्म गति हा आहे. व ह्मणूनच त्याची विकारकारी अवस्था म्हणजे संचारांत अंतराय ह्मणून सांगण्यांत आला आहे. गतिस्वभावी वायूचा संचय व्हावयाचा म्हणजे तो एखादे जागीं कोंडला जावयाचा हा अर्थ उघड आहे. रोगकारी संचयाचें स्वरूप ध्यानांत घेतांना कफाची शीतलता, पित्ताची उष्णता किंवा वायूची गति यांचा संचय नसून कफाची स्निग्धता, पित्ताची तिक्ष्णता आणि वायूचा अणुसमुदाय यांची वाढ रोगकारी होते; अर्थात शीतता, उष्णता अथवा गति हे धर्म ते ज्या सूक्ष्म अणूमध्यें असतात असे सूक्ष्म पदार्थ बिघडणारे नाहींत तर त्यांचें स्थूल स्वरूप दुष्ट होतें व इतर पदार्थांना दूषित करतें. कफपित्तानिलांच्या नित्यव्यापारांत, स्निग्धता-किंवा संग्राहक पदार्थ, पाचक पदार्थ किंवा उष्णता, आणि गति यांचें दूषित स्वरूप म्हणजे स्निग्धतेचा अतिरेक अभिष्यंद, उष्णतेचा अतिरेक आभिताप आणि गतीचा एकाच ठिकाणीं अतिरेक म्हणजे क्षोभ अशीं नांवें त्यांना दोषी स्थितींत प्राप्त होतात. यांचे स्पष्ट अर्थ—अभिष्यंद ह्मणजे अतिसंचय, ओलसरपणा अभिताप,—दाहात्मक उष्णता, अक्षोभ—फाजील ताण असे समजावें.

प्रत्येक विकारांतील त्रिदोषांचा संबंध म्हणजे विकार अभिष्यंदजन्य आहे, अभितापजन्य आहे कीं क्षोभजन्य आहे यांचा बोधक समजावयाचा.

शूलं नर्तेऽनिलाद्दाहःपित्तात् शोफः कफोदयात् ॥

"शूल वायूशिवाय नाहीं, दाह पित्तशिवाय नाहीं आणि सूज कफाशिवाय नाहीं. असा सिद्धांत याच अर्थाचा आहे. अनेक विकारांतील अनेक लक्षणांचा तत्वतः या तीनच मुख्य लक्षणांत अंतर्भाव होतो. कोणताही विकार यांपैकींच एका अथवा अनेक अवस्थांमुळें होतो. आणि याच कारणानें सर्व रोगांमध्यें त्रिदोषांचा संबंध येतो. श्लेष्मजन्य, पित्तजन्य, वातजन्य यांचा अर्थ अभिष्यंदापासून, दाहापासून अथवा क्षोभापासून झालेला विकार असा असतो. कित्येक विकारांमध्यें धातु म्हणजे रसरक्तादि पदार्थांचा त्याचप्रमाणें मलमूत्रांचा संचय होतो, परंतु हे संचय होण्यालाही वरील तीहींपैकीं एकाद्या अवस्थेची अवश्यकता असते. आणि यासाठीं रोगस्थान व त्यांतील धातु वगैरे पदार्थांची विकृती समजली तरी तिचें कारण, अभिष्यंद, अभिताप कीं क्षोभ हें कळावें म्हणून निदानशास्त्रांत तत्त्वतः त्रिदोषज्ञानाला महत्त्व देण्यांत आलें आहे.

केवळ दोषज्ञान निदानांत पुरें होणारें नसून धातूंचा व रोगस्थानाचा विचारहि अवश्य आहे. हें प्रत्येक रोगाची संप्राप्ति पाहतां ध्यानीं येईल. धातु आणि मळ यांचा कफपित्तादिकांशीं संबंध निश्चित करण्याकरतां दोषदूष्य संबंध सांगण्यांत आला आहे. दोष व दूष्यें हीं परस्पर साधर्म्ययुक्त असतात. दोषांचे जे गुण ते ज्या धातूंत अधिक ते त्या दोषांचें दूष्य ह्मणजे विशेषतः दूषित होणारे पदार्थ. एकदां शरीर विकृत झाल्यावर मग सामान्य नियम उल्लंघिले जाऊन कोणत्याहि धातूंमध्यें कोणत्याहि दोषांची विकृति होऊं शकते. परंतु प्रामुख्यानें अधिक प्रमाणांत व प्रथम होणारी विकृति या दोषदूष्यां मध्यें होते. क्रियाकारी असे जे सूक्ष्म दोष त्यांचे हे दूष्य धातु आधारभूत असतात. म्हणून त्यांवर प्रथम परिणाम होतो.

रोगपरीक्षा करीत असतां महत्त्वाची गोष्ट ह्मणजे रोगस्थानीय नित्य क्रिया आणि त्यांचें कर्तृत्व असलेल्या दोषांच्या अंशाचें ज्ञान ही होय. एकाद्या दोषानें एकाद्या ठिकाणीं रोग झाला अशा शब्दसमुच्चयानें रोगस्थानीय अशा नित्य क्रियांतील विक्रियेचा स्पष्ट खुलासा झाला पाहिजे तरच त्रिदोषांचा निदानशास्त्रांत उपयोग होतो असें म्हणतां येईल. स्पष्टीकरणासाठीं एकदोन उदाहरणें घेऊं.

———

(१) ज्वर.

ज्वर हा सर्वांना महशूर असलेला विकार आहे. आयुर्वेदामध्यें याची संप्राप्ति दिली आहे ती अशी (संप्राप्ति ह्मणजे रोगाची उत्पादक विकृति क्रम वगैरे) आमाशयांत कुपित झालेले दोष जठराग्नीला बाहेर काढून रसाबरोबर फिरत असतां ज्वर उत्पन्न करतात.

मिथ्याऽहारविहाराभ्यां दोषा ह्यामाशयाश्रयाः ॥
बहिर्निरस्य कोष्ठाग्निं ज्वरदा स्यू रसानुगाः ॥१॥ (मा० नि०)
आमाशयं प्रविश्यामममनुगम्य पिधायच ॥
स्रोतांसि पक्तिस्थानाच्च निरस्य ज्वलनं बहिः ॥ १ ॥
सह तेनाभिसंर्पतस्तपंतः सकलं वपुः ॥
कुर्वंतो गात्रमत्युष्णं ज्वरं निर्वर्तयंति ते ॥२॥ (अ. हृ)

अर्थः—अव्यवस्थित आहारविहारांनीं आमाशयांत उत्पन्न झालेले दोष कोष्ठाग्नीला बाहेर घालवून रसानुगामी होत्साते ज्वर उत्पन्न करतात. (मा. नि०)

दोष आमाशयांत प्रवेश करून, आमांत मिश्र होऊन, स्रोतसें बंद करून, पचनस्थानांतून अग्नीला बाहेर घालवून, त्या सहवर्तमान सर्व शरीरांत फिरून शरीराला त्रास देणारे असे सर्व शरीर अत्यंत उष्ण करतात व अशा रीतीनें ज्वर हा रोग उत्पन्न करतात. (अ० हृ०)

ज्वर या विकाराचा दोषांशीं हा असा संबंध सांगितला आहे. यावरून त्रिदोषपद्धतीचे आधारें शारीरविकृतीचा स्पष्ट खुलासा कसा होतो पाहूं. प्रथमतः ज्वराचें अगदीं साधें व सहज कळण्यासारखें स्वरूप ह्मणजे विशेषतः त्वचेंत व सर्वांगांतहि उष्णता वाढणें हें असून कोणालाहि कळतें. ही जी उष्णता वाढली ती कशी वाढली, कोठून आली तिचें स्वरूप काय याचा खुलासा वैद्यशास्त्रानें करावयाचा. त्वचेमध्यें जें एक ठराविक उष्णतामान असतें त्याहून त्याची वाढ होण्याला साधन काय ? याचें उत्तर आयुर्वेदांतील वरील ज्वराचे संप्राप्तीमध्यें आहे. आयुर्वेदाच्या त्रिदोषपद्धतीमध्यें त्वचा हें एक पित्ताचें स्थान, त्याचप्रमाणें त्वचेखालील स्वेद हेंहि पित्ताचें स्थान आहे. म्हणजे त्वचेमध्यें उष्णता किंवा पित्त असतें ही गोष्ट पित्तस्थानांचा निर्देश करीत असतां सांगितली आहे. या त्वचारूपी स्थानांत पित्ताची वाढ होते. कारण पित्त आणि उष्णता हे दोनहि शब्द एकाच अर्थाचे प्रतिपादक आहेत. आणि उष्णता वाढते अर्थात् पित्त वाढतें ह्मणजे त्वचेमध्यें पित्ताची वाढ ज्वरामध्यें झालेली असते. याच उद्देशानें:—

उष्मा पित्तादृते नास्ति ज्वरो नास्त्यूष्मणा विना ॥

ज्वर उष्णतेशिवाय नाहीं.आणि उष्णता पित्ताशिवाय नाहीं. अशा रीतीनें ज्वर या विकाराचें उत्पादकत्व पित्ताकडे आलें. ज्वराचें स्थान

त्वचा व उत्पादक दोष पित्त येवढें कळून भागत नाहीं; कारण त्वचेंत पित्त किंवा उष्णता वाढण्यानें ज्वराशिवाय इतरहि पैत्तिक विकार होणें संभवनीय आहे. दाह, उदर्द, त्वक्पाक, कुष्ठ, व्यंग, नीलिका इत्यादि अनेक विकार त्वचेमध्येंच होणारे आणि त्यांचें कारण—उत्पादक-पित्तच. मग ज्वरोत्पादक पित्त कोणतें आणि कोणत्या अवस्थेचें ? ज्या अर्थी दाहोत्पादक पित्त वाढलें असतां दाह होतो पण ज्वर नाहीं, दाहांत उष्णता वाढली ती रोग्याला कळते, असह्य दाह होतो पण त्वचेवर उष्णतामान वाढलेलें दुसऱ्याला स्पर्शानें कळत नाहीं. ज्वरांत दाह नसेलहि पण थोडयाफार प्रमाणांत उष्णतामान वाढावयाचेंच. ही उष्णता कोठून येते याचें उत्तर आयुर्वेदानें दिलें तें असें. अव्यवस्थित आहार वगैरेनें आमाशयांत दोषांचा प्रादुर्भाव होतो. दोष आमाशयाचा आश्रय करतात. आमाशय या शब्दाचा अर्थ लघ्वंत्रें किंवा पच्यमानाशय असा आहे. (मागें खुलासा आहेच आणि सदर पुस्तकांत विवेचनाचे सोयीसाठीं पच्यमानाशय याच शब्दानें लघ्वंत्रें संबोधिलीं आहेत.) पच्यमानाशयांत दोष उत्पन्न होतात अथवा प्रवेश करतात याचा अर्थ काय ? दोष शब्द बहुवचनी अर्थात् तीनहि दोष असावयास पाहिजेत पच्यमानाशयामध्यें तीन दोषांची विकृति एकदम होते काय ? आहाराचे अनियमितपणानें पचनाचें कार्य विकृत झालें म्हणजे अर्थातच तीन दोषांच्या पच्यमानाशयांतील क्रिया विकृत होतात. अन्नाचें पचन, अन्नरसाचा संग्रह व वियोजन नीट होत नाहीं. पचन व अन्नरसाचें वियोजन हीं कार्यें कमी होतात व आंतडयामध्यें अन्नाचा संग्रह अधिक—अधिक काल पावेतों होतो. ह्मणजे विसर्गादानविक्षेप किंवा संयोग विभाग वियोग या क्रियांमध्यें अव्यवस्थितपणा प्राप्त झाला व त्यामुळें दोषाः हें बहुवचन सार्थ आहे. अशा प्रकारें जर आमाशयांत एका अव्यवस्थित आहारविहारामुळें तीनहि दोषांच्या क्रिया विकृत झाल्या तर ज्वरोत्पादक विकृति तीनहि दोषांनीं उत्पन्न केली असें म्हणावें लागेल. व ज्वर हा रोग सांन्निपातिकच मानावा लागेल. पण तसा तो मानला नाहीं. त्यामध्यें एक दोषी, द्विदोषी सान्निपातिक असे भेद सांगितले आहेत. अर्थात् ज्वरारंभक दोष एक असतो, हें उघड होतें. शिवाय आमाशयांत दोषविकृति झाली ती तीन दोषांची झाली तरी कोप अथवा उन्मार्गावस्था कोणत्या कोणत्या दोषांत उत्पन्न होऊन ज्वर उत्पन्न होतो हा प्रश्न तसाच राहतो उन्मार्ग प्रवृत्त जो दोष तोच रोगकारी असतो. " सर्वेषामेव रोगाणां निदानं कुपिता मलाः ॥" या वाक्यांत कुपित दोषच सर्व रोगांचें कारण सांगितलें आहे आणि कोप ह्मणजे उन्मार्गगामित्व होय.

कोपस्तून्मार्गगामिता ।

उन्मार्गगामिता ज्या दोषामध्यें उत्पन्न व्हावयाची त्याचा नैसर्गिक मार्ग कांहीं तरी कारणानें रुद्ध व्हावयास पाहिजे; एरवीं तो उन्मार्गगामी होण्याचें कारण नाहीं हेंहि न सांगतां कळण्यासारखें आहे. अशी अवस्था ह्मणजे–कोणत्या तरी दोषाचा नित्याचा मार्ग रुद्ध होऊन त्यामुळें उन्मार्गप्रवृत्ति होणें अशी अवस्था–आमाशयामध्यें कोणत्या दोषांत आल्यानें ज्वर निर्माण होईल. याचें उत्तर वरील ज्वर संप्राप्तीचे प्रकरणांत असलेल्या श्लोकांमध्यें आहे तें हें कीं,--

बहिर्निरस्य कोष्ठाग्निं ॥ मा० नि०

पक्तिस्थानाच्च निरस्य ज्वलनं बहिः [अ०हृ०]

या वाक्यांनीं पचनस्थानांतून पाचकाग्नीला बाहेर घालवून ज्वर उत्पन्न करतात (दोष) असें सुचविलें आहे. अर्थात् उन्मार्गावस्था पाचक अग्नीची म्हणजे पाचक–पित्ताची झाली. जें पाचक पित्त अन्नांत स्त्रवून पचनाचें कार्य करणार त्याचा योग्य मार्ग ह्मणजे पच्यमानाशय अथवा लहान आंतडें यांतील अंतर्मुख (आंत वाहणारीं) जीं स्रोतसें तो होय. हा नैसर्गिक मार्ग अजीर्णजन्य दोषांनीं बंद झाला. अजीर्ण असल्या स्निग्ध, शीत पदार्थांच्या संसर्गानें आंतड्याचा अंतर्भाग, अभिष्यन्न–(क्लिन्न–ओलसर–फुगीर–सुजीर) झाला व त्यामुळें स्रोतसें बंद झालीं व त्याचा परिणाम असा झाला कीं या स्रोतसांतून आंत पाझरणारें पित्त स्त्रवूं शकलें नाहीं व तें समीपवर्ति अशा अन्नरसवाहक स्रोतसांतून रसाबरोबर बाहेर पडून त्याचेबरोबर शरीरांत फिरूं लागलें. (स्रोतसें सर्वत्र व अंतर्बहिर्भागीं असल्याचा उल्लेख मागें आहे. पहा. पा. ७५)

वर दिलेल्या संप्राप्तीमध्यें " पिधाय स्रोतांसि " स्रोतसें बंद करून आणि " रसानुगाः सह तेनाभिसर्पतः । " म्हणजे दोष रसानुगामी होऊन (मा. नि., अ. हृ.) त्या उन्मार्गगामी पाचकाग्नीसहवर्तमान फिरणारे असे, असा उल्लेख आहे तो याच अर्थाचा होय. व या उल्लेखावरून स्रोतोरोध पित्तवाही स्रोतसांचा व कोप अथवा उन्मार्गगामिता पित्ताची, आणि या उन्मार्गप्रवृत्त पित्तामुळेंच ज्वर हा रोग उत्पन्न होतो या गोष्टी उघड झाल्या. यामुळेंच 'उष्मा पित्तादृते नास्ति ज्वरो नास्त्यूष्मणा विना । " असा सामान्य सिद्धांतहि सांगण्यांत आला आहे.

सदरहू विवेचनामध्यें उत्पन्न होणारी एक शंका अशी आहे कीं, ज्या पाचक पित्ताची उन्मार्गावस्था ज्वरोत्पादक ह्मणून सांगण्यांत आली आहे तें पित्त उन्मार्गावस्थेंत येण्यासारखें आहे काय ? शिवाय या

पित्ताचें स्थान आमाशय किंवा लहान आंतडें हें आहे काय ? कारण, पाचक पित्ताचे वर्णनांत त्याचें स्वरूप द्रवत्वविरहित केवळ पाकादि कार्यानुमेय उष्णता असें असून स्थान हें पक्काशय व आमाशय यांचा मध्यभाग म्हणजे लहान आंतडें आणि मोठें आंतडें यांचा मध्यभाग अर्थात् ग्रहणी हें सांगण्यांत आलें आहे.

पित्तं पंचात्मकं तत्र पक्कामाशयमध्यगं ।
पंचभूतात्मकत्वेपि यत्तैजसगुणोदयात् ॥ १ ॥
त्यक्तद्रवत्वं पाकादिकर्मणाऽनलशब्दितं ।
पचत्यन्नं विभजते सारकिट्टौ पृथक्तथा ॥ २ ॥

अर्थ--पांच पित्तांपैकीं पाचक पित्त पक्काशय व आमाशय यांचेमध्यें असून तें पंचभूतात्मक असतांहि तैजसगुणाचे आधिक्यामुळें ज्यांत द्रवत्व नाहीं असें व अन्नपचनादि कार्यावरून ज्याला अग्नि नांव आहे असें असून तें पित्त अन्न पचवितें, सारकिट्टांचें पृथक्करण करतें इत्यादि. (अ. हृ. सू.)

हा पक्काशय व आमाशय यांचा मध्यभाग म्हणजे ग्रहणी होय.

अन्नस्य पक्त्या पित्तं तु पाचकाख्यं पुरेरितं ।
दोषधातुमलादीनामूष्मेत्यात्रेयशासनं ॥ १ ॥
तदधिष्ठानमन्नस्य ग्रहाणात् ग्रहणी मता ।
सैव धन्वंतरिमते कला पित्तधराव्हया ॥ २ ॥
आयुरारोग्यवीर्यौजो भूतधात्वा ग्निपुष्टये ।
स्थिता पक्काशयद्वारि भुक्तमार्गार्गलेव सा ॥ ३ ॥

अर्थः--पूर्वीं अन्नाचें पचन करणारें जें पित्त सांगितलें त्यालाच आत्रेय दोषधातुमलांचा ऊष्मा ह्मणतात. (आत्रेय, चरक.) त्या उष्म्याचें स्थान आणि अन्नाचें ग्रहण करणारी ती ग्रहणी होय. याच ग्रहणीला धन्वंतरीचे (सुश्रुत ग्रंथ) मतानें पित्तधरा कला नांव आहे. ती पक्काशयाचे द्वारावर अन्नमार्गांतील अडसराप्रमाणें आहे. या वर्णनावरून अग्नी किंवा पाचकाग्नि याचें स्थान लहान आंतडें (अ. हृ.शा.) नसून ग्रहणी आहे हें उघड झालें. (सर्व लघ्वंत्राला ग्रहणी मानणें ही गोष्ट आयुर्वेदाला संमत नाहीं.) मग आंतड्यांतील पित्त कोणतें ? व त्याचा पचनाशीं काय संबंध ? (याविषयीं पित्ताचे वर्णनांतील रंजक पित्ताचें वर्णन ध्यानीं ठेवावें.) पित्ताचे वर्णनामध्यें आंतड्यांमध्यें जें पित्त आहे त्याचा उल्लेख रंजक या नांवानें आहे. मात्र रंजकशब्दानें अन्नाचें रंजक व अन्नरसाचें रंजक हा भेद ध्यानीं धरावयास पाहिजे. आमाशय या शब्दाची व्याप्ति आम अन्न, आम रस, व आम धातु यां-

पर्यंत असल्याचा उल्लेख आमाचे विवेचनांत केला आहे. अन्नपचनाचें कार्य ग्रहणीमध्यें पूर्ण होतें म्हणजे अन्नांतून शरीरोपयुक्त असा रस व निःसत्व मलभाग यांचें पृथक्करण या ठिकाणीं होतें म्हणून तत्वतः याच भागाला पाचकाग्नीचें अधिष्ठान मानणें योग्य. दुसरे पक्षीं चर्वणापासूनच पचनाला सुरवात होते असें म्हणावयास प्रत्यवाय नाहीं. पचनाचे मुख्य वर्ग अगर पोटभेद करावयाचे झाल्यास सोप्या भाषेंत असे करतां येतील कीं; तोंडांत चर्वण–बारीक करणें, आमाशय-अन्नाशय यांत सर्व अन्नाचें एकत्र पातळ मिश्रण करणें, नंतर या पातळ मिश्रणामध्यें लहान आंतडयांत—(पच्यमान आशयांत–) पित्ताचें मिश्रण होऊन एक प्रकारें रासायनिक पद्धतीनें शिजण्याची क्रिया करणें व नंतर ग्रहणीमध्यें पृथक्करण–गाळण्याची क्रिया–पूर्ण होणें, असे पाडतां येतील. चावणें–बारीक करणें,मिसळणें, शिजविणें आणि गाळणें या चार अवस्थांतरांपैकीं मुख्य क्रिया गाळण्याची ती ग्रहणींत होते.पाचक शब्दाचा स्पष्ट अर्थ, पचविणें, आत्मसात् करणें अर्थात् एकादा विजातीय भाग काढून टाकून सजातीय घेणें अर्थात् पृथक्करण असा होतो हें ध्यानांत ठेवणें अगत्य होय. त्यापूर्वीं पित्त अन्नां‍त मिश्र होऊन जें शिजण्याचें कार्य घडतें तें पित्त आंतडयांतून स्रवणारें असतें. याच कार्याला यकृतांतून पित्तवाही नलिकेच्या द्वारें येणाऱ्या पित्ताची अवश्यकता असते हेंहि उघड आहे. परंतु, आंतडयांतील पित्त हेंच मुख्य असून त्याला मदत यकृतांतील पित्ताची असते. (प्रस्तुत लेखकाला या दोन पित्तांचे रासायनिक पृथक्करणाची नक्की माहिती नाहीं तरी आंतडयांचा दाह व भेदन–जुलाब–हें कार्य आंतडयांतील पित्ताचें दिसतें यावरून असें अनुमान करणें अयोग्य वाटत नाहीं कीं, तीक्ष्ण–भेदी–असलें पित्त हें आंतडयांतील असून या तीक्ष्ण गुणाला मर्यादित करणारें पित्त हें यकृतांतील पित्त असावें अन्नाचे घटक फोडून–विरळ करून–त्यांतील सूक्ष्म भाग वेगळे करण्याला त्यां तीक्ष्ण भेदी असलेल्या एकाद्या पदार्थाची अवश्यकता आहे तोच पदार्थ हें आंतडयांतील पित्त होय) हें पित्तच पचनाचें कार्य करतें यामुळें त्याला पाचक नांवानें संबोधणें अयोग्य नाहीं. हें द्रव–प्रवाही–आहे. अर्थात् याची उन्मार्गप्रवृत्ति होणें संभवनीय असतें. (संस्कृत भाषेंतील धातूंच्या बव्हर्थानें असे अर्थ पुष्कळ ठिकाणीं स्वीकारले जातात.) व हेंच पित्त म्हणजे ज्वलन किंवा अग्नि. त्याला दोष बाहेर काढतात याचा अर्थ त्या पित्ताचा अंतःस्राव बंद करून अंतर्वाहि स्रोतसांऐवजीं बहिर्वाही जीं रसवह स्रोतसें त्या विरुद्ध मार्गाकडे त्याची प्रवृत्ति होते. म्हणून पित्ताची उन्मार्गगामिता अथवा कोप हा ज्वरोत्पादक होय. अन्नरसाचें पृथक्करण ग्रहणीप्रदेशांत पूर्णतया होत असलें तरी सर्व आंतडयांतूनहि सूक्ष्म स्रोतसांतून तो

झिरपत असतो. अशा रीतीनें त्रिदोषपद्धतीला अनुसरून पाहतां ज्वरारंभक विकृती म्हणजे प्रथमतः आमाशयांतील पित्ताची उन्मार्गप्रवृत्ति असा अर्थ अभिप्रेत असल्याचें दिसून येतें. त्यानंतर ह्या उन्मार्गप्रवृत्त पित्तासंबंधीं असा प्रश्न उपस्थित होतो कीं, ह्याचा संचय झाला असतो काय ? कारण आधीं संचय व मग प्रकोप असा सामान्य क्रम आहे. आणि पित्ताचे स्रावाला अडथळा झाला म्हणजे त्याचा स्वतःच्या स्रोतसांमध्यें संचय होतोच. यथामार्गप्रवृत्ति कांहीं काळापुरती बंद झाली अर्थात् स्थानी वाढ) उत्सर्जनाभावीं.) झाली यांचेंच नांव संचय. ' चयोवृद्धिः स्वधान्म्येव,, (अ. हृ.) स्वतःचे स्थानांत वाढ म्हणजे चय समजावा. कांहीं काल चय झाल्यावर मग अयथामार्गाकडे प्रवृत्ति होते व तो कोप. अशा प्रकारें पित्ताचा संचय व कोप यांविषयीं उलगडा होतो. त्यानंतर प्रश्न उद्भवतो कीं, हें उन्मार्ग प्रवृत्त पित्त-त्वचेंतच रोगकारी कां व्हावें ? रसानुगामी झाल्यावर प्रथम त्याचा यकृतांत (प्लीहेंतहि) प्रवेश, नंतर हृदयांत मग रसवाही धमनींत व मग सर्व लहानमोठया वाहिनींत असें असल्यानें या पित्तानें यकृत्, हृदय, रसवाहिनी यांत एकादा विकार उत्पन्न न करतां त्वचेंतच कां करावा ? याचें कारण असें कीं, ज्यावेळीं आंतडयांतील पित्ताचें प्रमाण या सर्व प्रसारमार्गांतून उत्सर्जित होण्यासारखें असतें आणि हीं सर्व स्थानें स्वसामर्थ्यानें या पित्ताला आपल्यांतून बाहेर टाकण्याला समर्थ असतात त्यावेळीं कोणत्याहि ठिकाणीं त्याचा परिणाम न होतां सर्व शरीरभर तें परसतें. परंतु हा अनैसर्गिक, विजातीय असला पित्तरूपी पदार्थ सर्व भागांतून फिरून ज्यावेळीं रक्ताचे मळाबरोबर त्वचेंत म्हणजे स्वेदामध्ये येतो त्यावेळीं त्वचेंतील सूक्ष्म अशा स्वेदवाहिनींतून त्याचें उत्सर्जन होत नाहीं. याचेंहि कारण असें घडलें असतें कीं आहाराचें गुरुत्वामुळें त्याचप्रमाणें पित्ताचे मिश्रणाच्या न्यूनत्वामुळें अन्न अजीर्ण राहतें अर्थातच जो थोडाफार अन्नरस तयार होतो (कोणतीहि क्रिया पूर्णपणें नष्ट होत नाहीं. ती कमी अधिक प्रमाणांत कमी होते.) तोहि अपक्व असल्यानें त्यामध्यें स्निग्धता, घनता, साम्लता अधिक असते व असल्या अन्नरसानें इतर शरीरभागांपेक्षां सूक्ष्म असलेलीं त्वचेंतील स्रोतसें अवरुद्ध होतात. हें जें स्थानी वैगुण्य त्यामुळें त्यांतून नित्याचेंच स्वेदोत्सर्जन होईनासें झालेलें असतें. व विमार्गप्रवृत्त पित्तहि इतर शरीरभागांतून प्रसार पावत या ठिकाणीं आलें म्हणजे स्वाभाविक-पणेंच त्याचा अटकाव होतो. यालाच स्थानसंश्रय नांव आहे. हें त्वचा या स्थानांत संश्रित झालेलें पित्त, नित्याची त्वचेंतील उष्णता आणि त्याचबरोबर नित्याच्या उत्सर्जनक्रियेंत व्यत्यय आल्यानें संचित झालेलें स्वेद–बाष्प–रूपी द्रव्य या सर्व उष्ण पदार्थांचा अनैसर्गिक जो संचय

त्यामुळें वाढलेली उष्णता ज्वररूपानें तापदायक होते. स्वेदावरोध हें प्रमुख ज्वराचें लक्षण याच उद्देशानें सांगितलें आहे.

कुपितानां हि दोषाणां शरीरे परिधावतां ॥
यत्र संगः स्ववैगुण्याद्व्याधिस्तत्रोपजायते ॥ १॥

याचा तात्पर्यार्थ हाच होय. घामाचे वियोजनाला व्यत्यय झाल्याशिवाय ज्वर नाहीं व घाम येऊं लागतांच ज्वर नष्ट होतो, या निदानांतील उल्लेखांचा तात्पर्यार्थ याच धोरणाला अनुलक्षून आहे. सदर संप्राप्तीचा थोडक्यांत तात्पर्यार्थ असा होतो.

" आमाशय—लहान आंतडीं अथवा पच्यमानाशय यांतील उन्मार्गगामी पित्ताचा त्वचा अगर स्वेदवाहिनींमध्यें होणारा स्थानसंश्रय किंवा संग म्हणजे ज्वर होय. "

आंतड्यांतील पित्ताचें, व त्वचेंतील पित्ताचें कार्य ध्यानीं घेऊन सदर संप्राप्ती वाचल्यास हा अर्थ उघड होणें कठीण नाहीं. या संप्राप्तीचें निरीक्षण केल्यास निदानशास्त्रांतील कांहीं ठळक तत्वांचा सहजीं बोध होण्यासारखा आहे. तीं तत्वें अशीं कीं.—

१ केवळ, क्षीणता अथवा वृद्धि रोगकारक नाहीं.

२ उन्मार्गप्रवृत्तिच रोगकारक असते.

३ उन्मार्गप्रवृत्तीला संचयाची अवश्यकता असते.

४ केवळ उन्मार्गप्रवृत्ति अथवा कोपाहि रोगकारक नसून कुपित दोषाला अडथळा होणें रोग होय.

५ उन्मार्गावस्था हें रोगाचें आरंभस्थान.

६ उन्मार्गगामी दोषाचें संग्रहस्थान हें रोगाचें स्थान.

७ उन्मार्गगामिता अथवा उन्मार्गी दोषाचा स्थानसंश्रय यांना कारण स्रोतोरोध हें आहे.

८ ह्मणून संग—अवरोध-अडथळा हें रोगाचें मुख्यत्वें व सर्वसामान्य कारण ठरतें.

९ आयुर्वेदांत,

रसः सज्जति यत्रसः ।
तास्मिन्विकारं कुरुते ॥ (अ. हृ,)
यत्र संगः स्ववैगुण्यात् व्याधिस्तत्रोपजायते॥

जेथें थांबतो तेथें रोग. जेथें संग तेथें रोग हीं सिद्धांतवाक्यें सांगितलीं आहेत.

१० संगानें किंवा उत्सर्जनांतील अडथळ्यानें अनुत्सर्जित द्रव्याचा-दोषाचा संचय—वृद्धि—होते. अर्थात् वाढीशिवाय रोग नाहीं.

११ वाढ, कोप, प्रसार व स्थानाश्रय आणि मग रोग, रोगाची स्पष्टता व भेद असा क्रम सुचविणारें सुश्रुतांतील वाक्यः—

संचयंच प्रकोपंच प्रसरं स्थानसंश्रयम् ।
व्यक्तिं भेदं च यो वेत्ति दोषाणां सभवेत् भिषक् ॥

हें निदानशास्त्रांतील आदर्शवाक्य आहे.

त्रिदोषविषयक सर्वसामान्य उपपत्तीनें ज्वराची संप्राप्ति ठरली व तिनें सामान्यतः ज्वरज्ञान ह्मणजे कोणत्या प्रकारची विकृति याचा वरीलप्रमाणें बोध झाला, मग पुनः त्यांत पोटभेद व वातादींचा संबंध कोणती स्पष्टता दाखवितो हा विचार उत्पन्न होतो.

याविषयींहि त्रिदोषकल्पनेचा उत्तम उपयोग होतो. ज्वराविषयीं वरील खुलासा ध्यानीं घेतल्यावर दोन गोष्टी निश्चित होतात त्या या कीं, ज्वर म्हणतांच (आयुर्वेदाचे मतानुसार) स्वेदवाही अशीं त्वचेंतील व पच्यमानाशयांतील पित्तवाहि स्रोतसें दुष्ट–अवरुद्ध झालेलीं असतात आणि आंतड्यांत पित्त कमी होऊन त्वचेंत वाढ झालेली असते. (रोगस्तु दोषवैषम्यं, या सूत्राचा अर्थ केवळ न्यूनाधिक्य नसून क्रियावैषम्य याचा या उदाहरणावरून नीट खुलासा होईल.) पित्त उत्पादक ही गोष्ट या ःमाणें उघड असते. त्यानंतर ज्या पित्ताची उन्मार्गावस्था झालेली व ती होण्याला आंतड्यांतील स्रोतोनिरोध कारण असतो; त्या पित्ताचीं आणि स्रोतसांचीं अवस्थांतरें ध्यानीं येणें अगत्य असतें. कारण या पित्ताच्या यथामार्गप्रवृत्तीचे उपाय ह्मणजे चिकित्सा असून तिचें धोरण एरवीं ठरवितां यावयाचें नाहीं. याकरितां पुनः विचार असा करावा लागतो कीं, हें उन्मार्गप्रवृत्त पित्त वाढलेलें आहे, क्षीण आहे कीं समावस्थेंतील आहे ? (स्रोतोरोध झाल्यावर होणारा संचय वेगळा) याच अवस्था त्रिदोषांच्या पोटभेदांनीं दाखविल्या जातात. श्लैष्मक ज्वर म्हणजे कफाची वाढ होऊन आलेला ज्वर अर्थात् कफाची वाढ झाली त्यावेळीं तत्वतः पित्ताची क्षीणता. व क्षीण पित्ताची उन्मार्गावस्था; पित्तजन्य ज्वर म्हणजे पित्ताची वाढ व वाढलेल्या पित्ताची उन्मार्गावस्था आणि वातज्वरांत तत्वतः पित्ताची वाढ अथवा क्षय नसून त्याचें योग्य प्रमाण कायम असतें. या पित्ताच्या अवस्थांमध्यें स्रोतोरोध होऊं शकतो. तोहि निरनिराळ्या प्रकारांनीं होतो. कफ वाढतो त्यावेळीं स्रोतसांमध्यें अभिष्यंद–ओलसरपणा वाढतो. पित्त वाढतें त्यावेळीं फाजील दाहाचा परिणाम सहन न होऊन स्रोतसें उद्विग्न व संकुचित होतात. व वायु वाढतो त्यावेळीं रूक्षतेमुळें स्रोतसांचा संकोच होतो. आंतड्यांत पित्ताचा स्राव न होतां अन्नाचें अजीर्ण, स्रोतसांचा संकोच व पित्ताची उन्मार्गप्रवृत्ति हें

एकच कार्य या तीन प्रकारांनीं होतें. अन्नरसामार्फत हेच गुण स्वेद-वाही अशा त्वचेंतील स्रोतसांतहि प्रसार पावतात. व त्यांमध्यें कफ, पित्त व वायु यांचे अनुक्रमें अभिष्यंद दाह, आणि रूक्षता हे गुण उत्पन्न होतात. कोणत्याहि दोषाची वाढ, क्षीणता व साम्य या अवस्था चरकांत:—

क्षयःस्थानं च वृद्धिश्च दोषाणां त्रिविधा गतिः ॥

(अर्थः—क्षय, साम्य (स्थान) आणि वाढ अशीं दोषांचीं तीन प्रकारची गति आहे.) या वाक्यानें सांगितली आहे. चिकित्सेचे वेळीं या पोटभेदांना अनुसरून, कफपित्तनिलांवर अनुक्रमें, क्षोभक–तीक्ष्ण - शामक–मंद व स्वेदन–स्निग्धोष्ण अशा उपायांची योजना केलेली असते. याच भेदांवरून ज्वराची मुदत व तीव्रताहि ठरवितां येते. कफासारखें घनद्रव्य आणि उष्णतेचा अभाव यामुळें ज्वराची मुदत अधिक पण पित्त कमी म्हणून तापाची तीव्रता कमी. पित्त जात्या तीक्ष्ण म्हणून त्याची मुदत त्याहून कमी पण ज्वराची तीव्रता अधिक आणि वायूचे वेळीं पित्त प्रमाणांत व केवळ रूक्षता यामुळें मुदत कमी आणि तापाचें प्रमाण मध्यम अशी व्यवस्था सहज करतां येऊन शारीरविकृतीचा सूक्ष्म भेद अगदीं स्पष्ट होतो. व त्रिदोषांची निदानशास्त्रांतील योजना बोधदायक आणि पूर्ण शास्त्रीय अशी ठरते. एक दोषी पोटभेदाप्रमाणें द्विदोषी अथवा सांन्निपातिक भेदहि अधिक स्पष्टतेसाठीं आहेत. सृष्टींतील पदार्थांमध्यें अनेक विचित्र गुण असल्याकारणानें एकाच वेळीं दोन अथवा तीन अशा दोषांचे वाढीला अवसर मिळतो. मात्र ही वाढ सर्वांगीण किंवा परस्पर विरुद्ध गुणांची होत नाहीं. जसें, कफ व पित्त यांमध्यें उष्ण व शीत अशी विरोधी गुणांची वाढ संभवनीय नाहीं तरी स्निग्ध व तीक्ष्ण ही संभाव्य असते, तूप, स्निग्ध एकट्या स्निग्धगुणाची वाढ करतें; पण तेल स्निग्धता उत्पन्न करतें ती दाहक असते. रूक्ष व तीक्ष्ण या दोन गुणांची वाढ होऊं शकते. व १ अभिष्यंद+दाह=कफपित्त २ रूक्षता अधिक दाह = वातपित्त असें संसर्गजन्य पोटभेद उद्भवतात. ३ रा प्रकार कफवात हा आहे. हा प्रकार थोडा भानगडीचा आहे. तो असा कीं, कफाचा शीत हा गुण वाढला आणि त्यामुळें वायूचाही शीत गुण वाढला अर्थातच यामुळें प्रत्येक संवेदनात्मक कार्यामध्यें न्यूनत्व संभवतें व त्याचा परिणाम संवेदनेचे अभावीं हालचाल कमी व त्यायोगें अभिसरण अथवा स्राव कमी. मात्र यामध्यें ध्यानीं ठेवावयाचें असतें तें हें कीं, वायूचा गतिधर्म वाढून रोग होत नाहीं. कारण अडथळा म्हणजे रोग हा मूळ सिद्धान्त आहे. त्याचे क्रियेंत व्यत्यय येतो व

शीतता वाढते. उष्ण गुण पित्ताचा वाढतो त्यावेळीं मात्र वायूचा रूक्ष गुण वाढला असल्यास क्षोभ अधिक व गती अधिक असते, पण या गतीचा उपयोग उन्मार्गप्रवृत्तीलाच संवर्धक असतो. व म्हणूनच वातपित्तजन्य रोगांत पित्ताचीं लक्षणें अधिक व क्षोभकारी वायु मदतगार आणि वातकफजन्य विकारांत शैत्यकारीं कफाचीं लक्षणें अधिक व हीनगतिक वायु शीत रूपानें मदतगार अशी स्थिति असते. या कारणांमुळेंच—

योगवाहः परं वायुः संयोगादुभयार्थकृत् ॥
दाहकृत्तेजसा युक्तः शीतकृत्सोमसंश्रितः ॥१॥

वायु हा योगवाही असून संयोगानें उभयविध कार्य करणारा आहे. तो पित्ताशीं संयुक्त झाला कीं दाह व कफाशीं संयुक्त झाला कीं शैत्य करतो. या दोनहि अवस्था मानण्याचें कारण असें असतें कीं, वायूचे संयोगावरून वाढलेल्या रूक्षतेचा बोध होऊन उपचारांत स्निग्धतेची मदत मिळावी. यानंतर संनिपात हा भेद आहे. संनिपात ह्मणजे तीन दोषांची वाढ. याविषयीं मागील खुलासा (संसर्ग आणि संनिपात) ध्यानांत घेणें जरूर आहे. संनिपात शब्दानें समकालीन क्रियावैषम्य घ्यावयाचें याविषयीं मागें सांगितलें आहे. ज्वरामध्यें संनिपाताची कल्पना अशी संभवते कीं, एकाच वेळीं विदाही व स्निग्ध पदार्थांनीं विदाही पित्त व स्निग्ध कफ यांची वाढ व स्निग्ध पदार्थरूपी कफानें भरलेल्या स्रोतसांतील नित्याच्या संचाराला व्यत्यय उत्पन्न झाल्यानें विरुद्ध मार्गानें वायूची गति क्षोभक होणें. याला प्रतीलोमन नांव आहे ह्मणजे यांत वायूचीहि उन्मार्ग–प्रवृत्ति असते. वायूची गति तीक्ष्ण, क्षोभक पदार्थांनीं पित्ताबरोबरच वाढलेली असते.

या एकंदर सात प्रकारांतील दोष तत्वानुसार फरक असा:—

१ वाताधिक—रूक्षता प्रधान. २ पित्ताधिक–दाहप्रधान. ३ कफाधिक स्निग्धता—अभिष्यंद प्रधान. ४ वातपित्ताधिक–रूक्षताजन्य शूल, व पित्तजन्य दाहप्रधान. ५ वात कफाधिक–शैत्य व शूल प्रधान. ६ कफपित्ताधिक, स्निग्धता–अभिष्यंद–दाहप्रधान ७ संनिपातिक दाह, अभिष्यंद शूलप्रधान.

ज्वरांत निरनिराळ्या शरीरभागांत होणारीं लक्षणें या मुख्य धोरणाला धरून होतात ह्मणजे पूर्वीं सांगितल्याप्रमाणें वायुपित्त कफांच्या नैसर्गिक शरीरोपयोगी क्रियांच्या अनैसर्गिक स्वरूपाच्या क्रिया ज्या अनुक्रमें क्षोभ, अभिताप व अभिष्यंद—त्यांतील एक दोन अथवा तीन याप्रमाणें हे बोधक भेद होत. संनिपाताचे अनेक भेद हे यामुख्य लक्षणांचें न्यूनाधिक्य व निरनिराळ्या स्थानांवरील परिणामाचे

द्योतक असून ज्वरासारख्या सर्वांगीण विकारांत त्याचें तारतम्य तार्किक बुद्धीनें ध्यानीं येण्यासारखें असतें. एकांगी विकारांत या पोटभेदांचा संभव असत नाहीं. शरीरांत एकादा विकार निर्माण होतो त्यावेळीं त्यामुळें निरनिराळ्या भागांवर जीं लक्षणें उत्पन्न होतात त्यांचा कमी अधिकपणा कांहीं तरी अन्य कारणानें ते ते शरीरभाग आधीं दूषित झालेले असतात हें आहे. व त्या दूषित भागांवर अधिक परिणाम होतो.

स एव कुपितो दोषः समुत्थानविशेषतः ॥
स्थानांतराणि च प्राप्य विकारान् कुरुते बहुन् ॥ १ ॥

तोच कुपित झालेला दोष कांहीं अन्य कारणानें भिन्न भिन्न स्थानांत प्राप्त होउन अनेक विकार उत्पन्न करतो. (अ० हृ०)

अशा प्रकारें रोगनिदानामध्यें रोगकारक शारीरविकृति व तिचे सूक्ष्म पोटभेद त्रिदोषांच्या सूक्ष्म तारतम्यज्ञानानें ओळखण्याची आयुर्वेदीय पद्धति असून त्रिदोषांचें तात्विक स्वरूप व भेद यांचा नीट विचार केला असतां ती कठीण वाटली तरी अव्यवहार्य नाहीं हें ध्यानीं येईल.

---

[२] अतीसार (आणखी एक उदाहरण.)

अतीसाराविषयीं आयुर्वेदाचा खुलासा येणेप्रमाणें आहे: —

संशम्यापां धातुरग्निं प्रवृद्धः शकृन्मिश्रो वायुनाधः प्रणुन्नः ॥
सरत्यतीवातिसारं तमाहुर्व्याधिं घोरं षड्विधं तं वदंति॥१॥(मा नि)

" कुपितोऽनिलः
विस्रंसयत्यधोऽब्धातुं हत्वा तेनैव चानलं ।
व्यापद्यानु शकृत्कोष्ठं पुरीषं द्रवतां नयन् ॥१॥
प्रकल्पतेऽतिसाराय ॥ वाग्भट.

अर्थः—वाढलेला अप् धातु (शरीरांतील सर्व प्रवाही पदार्थ असा अर्थ टीकाकारांनीं केला आहे. ' अपां धातुरित्यनेन रसजलांबुद मूत्रादयो ग्राह्याः, असें मधुकोश व्याख्येंत आहे.) म्हणजे पाणी किंवा जलांश अग्नि मंद करून तो मळांत मिश्र होतो व वायूकडून खालीं फेंकला जाणारा असा अधिक प्रामाणांत सरतो त्याला अतीसार म्हणतात. (मा. नि.)

कुपित झालेला (वाढलेला) वायु जलांशाला खालीं (गुदमार्गाकडे)

फेंकतो. याच वाढलेल्या: जलांशानें अग्निमांद्य उत्पन्न करतो, कोठा आणि मळ दूषित करतो व मळाला पातळपणा आणून अतीसार उत्पन्न करतो. (अ. हृ.)

तात्पर्य, अतीसार कां व कसा होतो याचा खुलासा, जलांशाची कोठयांत म्हणजे (प्रकरणानुसार) लघ्वंत्र किंवा पच्यमानाशयांत वाढ होते त्यामुळें अग्निमांद्य होतें, मळांत अधिक पातळपणा उत्पन्न होतो व या सर्व कारणांनीं कुपित झालेला वायु या मलमिश्र वाढलेल्या अप्धातूला गुदमार्गानें उत्सर्जित करतो. अधिक पातळ आणि अधिक प्रमाणांतील मळाचें (सरण) वाहणें म्हणजे अतीसार होय. (गुदेन बहुद्रव सरणमतीसार : – मधुकोश व्याख्या: गुदद्वारानें पुष्कळ द्रवाचा स्राव म्हणजे अतिसार.) या संप्राप्तीमध्यें चय प्रकोप आणि स्थानाश्रय कसें व कोणत्या दोषाचे संभवतात पाहूं ?

अतीसार हा विकार म्हणजे जुलाब अधिक होणें. व तो मळ नित्याप्रमाणें नसून त्यांत फाजील जलांश असणें. हा जलांश कोठें संभवतो व तो नित्य कां असतो नित्याचें मलोत्सर्जन मर्यादित असून मळांतहि विशिष्ट प्रमाणांत घनता असते. मळाबरोबर येणारा जलांश किंवा द्रव पदार्थ कोठें संभवेल. पक्वाशय किंवा मोठें आंतडें यांत जलांश नाहीं. यांत जो मळ येतो तो घनस्वरूप पावून येत असतो. आणि लहान आंतडयांत अन्नाशयांतून जें अन्न येतें तें पातळ होऊन येत असतें. आहारांत. घन व द्रव असे दोन मुख्य प्रकार त्या सर्वांचें प्रवाही मिश्रण आमाशयांत–अन्नाशयांत होऊन तें सर्व लघ्वंत्रांत–पच्यमानाशयांत येतें व मळ घनस्वरूपाचा पक्वाशयांत–मोठया आंतडयांत येतो म्हणजे द्रव अशा आहारांतील जलांशाचें वियोजन लहान आंतडयांतून होते ही गोष्ट उघड होते. लघ्वंत्रांतील पचनक्रिया होऊन त्यांतील अभिष्यंदि–पाझरणाऱ्या–स्रोतसांतून अन्नरस पाझरतो.टाकाऊ घनभाग पक्वाशयांत व टाकाऊ द्रव भाग या भागांतील स्रोतसांतून पाझरून उदरांतील अभिवाही–अभिष्यंदि–अशा स्रोतसांचे द्वारें मूत्राशयांत सांठविला जातो व अशा रितीनें मलस्वरूपी द्रवांश व साररूपी रस हे पातळ पदार्थ अन्नांतून वियुक्त झाले कीं घन असा टाकाऊ भाग शिल्लक राहतो. येथें मूत्रवियोजनासंबंधीं थोडा फार मतभेद भासण्याचा संभव आहे. तो असा कीं, मूत्रवाहिनी दोन नलिका वृक्कांतून (मूत्रपिंडांतून) मूत्राशयाकडे (प्रत्येकीं एकेक) येऊन त्यांयोगें मूत्र बस्तीमध्यें मूत्राशयामध्यें–सांठतें असें प्रत्यक्ष दृष्ट आहे. व यावरून वृक्कांना मूत्रपिंड असें नांव सध्यां प्रचारांतहि आहे. मूत्रोत्पादनक्रिया वृक्कांत होते असा सिद्धांतहि यावरून प्रस्थापित केला जातो. आयुर्वेदांत या दोन वाहिनी मानल्या–सांगितल्या असूनही त्यांशिवाय आणखी

अधोमुखोपि बस्तिर्हि मूत्रवाहिशिरामुखैः ।
पार्श्वेभ्यः पूर्यते सूक्ष्मैः स्यंदमानैरनारतं ॥ १॥ (अ. हृ. निदान)

मूत्राशय अधोमुख असूनहि त्याचे पार्श्वभागावर (सर्व आजूबाजूला) असलेल्या व निरंतर पाझरणाऱ्या सूक्ष्म स्रोतसांचे द्वारें तो भरतो, असा उल्लेख आहे. म्हणजे मूत्राशयांत संचित होणारा जलांश हा एकटा वृक्कांतील नसून आणखीहि पाझरणाऱ्या स्रोतसांतून त्याचा संचय होतो हें आयुर्वेदाचें मत आहे. (याविषयींच मतभेद) अतीसाराची आयुर्वेदीय संप्राप्ती वाचीत असतां या मताचा विचार अपरिहार्य आहे. अन्नांतील द्रवांश जातो कोठें व कसा हा या विषयांतील महत्वाचे मुद्याचा प्रश्न आहे. त्याचें आंतडयांतील सूक्ष्म अशा बहिर्मार्गी स्रोतसांकडून वियोजन होण्या सारखी योजना नसेल तर हा जलांश रसाबरोबर सर्व शरीरभर प्रसार पावावा लागेल. आणि अशा प्रकारची योजना निसर्गाला योग्य दिसत नाहीं. शुद्ध व पोषक अन्नरसामध्यें अशुद्ध व मलस्वरूपाचा द्रव–जलांश मिश्र असणें संभाव्य नाहीं. हा द्रवांश पच्यमानाशयाच्या अभिष्यंदि स्रोतोमार्गानें उदराच्या आवरणांतून मूत्राशयामध्यें पाझरतो हीच कल्पना व्यवहार्य आहे. वृक्कांतून जें मूत्र मूत्रवाहिनींचे द्वारें (ढेगवीन्यो) मूत्राशयांत येतें तो रक्तांतील पचनक्रियेनंतर मलस्वरूप पावणारा जलांश होय. अशा प्रकारची आयुर्वेदाची कल्पना आहे. असो. अशाप्रकारें अन्नांतून जो जलांश अंत्रगत स्रोतसांचे द्वारें पाझरून जावयाचा तो त्या स्रोतसांचा अवरोध झाला असतां योग्य रीतीनें पाझरत नाहीं. व त्याची वाढ होऊन तो परत अन्नांत येतो. व अन्नपचनाचे अभावीं त्यांतील द्रवांशाचें शोषण होत नाहीं यामुळें अन्नांत जलांशाचें प्रमाण वाढतें व तें अधिक पातळ होतें. ह्मणजे वाढ जलांशाची व जलवाही स्रोतसांचा अवरोध या गोष्टी उघड झाल्या. अशा प्रकारें आंतडयाचा अंतर्भाग व सूक्ष्म स्रोतसें भरून गेलीं कीं वायूचे संचाराला व्यत्यय येतो. पच्यमानाशयाची जी हालचाल–वळवळ–चालते ती त्यांतील स्रोतसांत भरून राहणाऱ्या वायूमुळें चालते. याच वायूला समानवायु हें नांव आहे. (समान वायु वर्णन. पृ. ८३ पहा.) मग अशा रीतीनें रुद्ध झालेल्या वायूचा क्षोभ होऊन तो या आंतडयाची गति वाढवितो व या द्रवीभूत अन्नाला–किंवा मळाला जोरानें खालीं फेंकण्याची क्रिया सुरू होते. हा वायूचा क्षोभ ह्मणजेच कोप होय. यांत वाढ जलांशाची व कोप वायूचा असतो. पच्यमानाशयांतील कार्य व स्थानानुरूप तेथील दोषांचें कार्य ध्यानीं घेतलें असतां ही कल्पना पटेल. निदानांतील दोषांचा संबंध रोगस्थानाचें कार्य ध्यानांत आणून ठरवावा लागतो. फाजील संचय

व कोप हे कोणत्याही विकारांत पाहिजेतच. अतीसारांत कुपित वायूचा कोप वायु तत्वतः वाढून होत नाहीं तो वाढलेल्या जलांशानें मार्गरोध होऊन होतो. वायूचा कोप मार्गावरोधामुळें होत असल्याचा उल्लेख अनेकवार आला आहे.

(वायोर्धातुक्षयात् कोपो मार्गस्यावरणेन च ।)

ज्वरांत पित्तप्रवाही अंतर्मुख स्रोतसांचा अवरोध होतो तर अतिसारांत तो जलवाही–(क्वचित् रसवाही) अशा बहिर्मुख स्रोतसांचा होतो. अतीसाराचें कार्य घडण्याला आणखी स्रोतोरुद्ध वायूची मदत लागते.

अशा रीतीनें होणाऱ्या अतीसारामध्यें त्रिदोषानुरूप पोटभेद हे मागील ज्वरांत सांगितल्याप्रमाणेंच संभवतात. जलांशाची वाढ होऊन ह्मणजे अभिष्यंदि पदार्थांनीं तत्वतः वाढ होऊन होणारा कफातीसार, आंतड्यांत दाहक पदार्थांच्या सहवासानें दाहात्मक क्षोभ होऊन जलांशाचे वियोजन न होतां होणारा पित्तातिसार आणि जलांशाची वाढ नाहीं पण रुक्षता वाढून त्यामुळें स्रोतः संकोच झाला व वियोजन झालें नाहीं त्यामुळें तात्कालिक व स्थानी वाढ यामुळें होणारा वातातिसार असे तीन पोटभेद ! द्वंद्वजन्य आणि सांन्निपातजन्य हे भेद यांत फारसे महत्वाचे नाहींत तरी ते ज्वरांत सांगितल्याप्रमाणेंच ठरवावयाचे.

वातादि भेदांवरून अनुक्रमें, रूक्षताजन्य स्रोतः संकोचामुळें, दाहजन्य स्रोतः संकोचामुळें आणि अभिष्यंदजन्य स्रोतः संकोचामुळें हे भेद उत्पन्न होतात अशी व्यवस्था मानली आहे.

---

(२) उदर.

उदर रोगाची संप्राप्ति अशी सांगितली आहे.—

रुद्ध्वा स्वेदांबुवाहीनि दोषाः स्रोतांसि संचिताः ॥
प्राणाग्न्यपानान् संदूष्य जनयंत्युदरं नृणां ॥ १ ॥ (मा. नि.)
ऊर्ध्वाधो धातवो रुध्वा वीहनीरंबुवाहिनीः ॥
प्राणाग्न्यपानान् संदूष्य कुर्यु स्त्वङ्मांससंधिगाः ॥ १ ॥
आध्माप्य कुक्षिमुदरं ॥ (अ. हृ.)

अर्थ—वाढलेले दोष स्वेद व जलवाही स्रोतसें बंद करून प्राण व अपान वायु आणि जठराग्नि यांना दूषित करून उदर रोग उत्पन्न करितात.

(मा. नि.)

दोष उर्ध्व व अधोभागांतील जलवाहिनी बंद करून प्राण, अपानवायु आणि अग्नि दूषित करून त्वचा व मांस यांतील संधिभागाचा

आश्रयं करणारे असे पोटाला फुगारा उत्पन्न करून उदररोग उत्पन्न करितात. या संप्राप्तीमध्येंहि ' दोषाः, असें बहुवन आहे. वातादि दोष उदर रोग उत्पन्न करतात. यांपैकीं कोणताहि एक अथवा अनेक दोष उदर उत्पन्न करतो. दोष उदररोग उत्पन्न कसा करतात ? ते विशेषतः अंबुवाहि–जलवाहि स्रोतसांचा अवरोध करतात. हीं स्रोतसें कोणतीं ? विकाराच्या स्थानावरून तीं उदरांतील समजावयाचीं. मागें सांगितल्याप्रमाणें उदराच्या ह्या आवरणामध्यें संचित होऊन मूत्राशयांत पाझरणारा जलांश ज्या या भागांतील स्रोतसांतून पाझरतो तीं स्रोतसें बंद होतात. या श्लोकांत ' ऊर्ध्वाधः खालीं व वर जाणारी असा उल्लेख आहे त्याचा आशय, खालीं म्हणजे मूत्राशयाकडे व वर म्हणजे रसवाही असा आहे उदराच्या एका कलेमध्यें स्रोतसांचा अवरोध झाला म्हणजे रसवाहि जलवाहि व स्वेदवाहि स्रोतसांचा अवरोध होतो व त्याच ठिकाणीं या सर्व जलांशाची वाढ होते. त्याचा योग्य मार्ग बंद झाला कीं यथा मार्गप्रवृत्ति म्हणजे उदरत्वचेंतून निघण्याचा प्रयत्न सुरू होतो. त्वचा फाडून बाहेर पडण्याइतकें सामर्थ्य त्यांत नाहीं या मुळें सहज निघूं शकत नाहीं पण शस्त्रानें भोंक पाडल्यास पाणी वाहतें. या विकारांत स्रोतोरोध जल व रसवाहि स्रोतसांचा, संचय जलांशाचा व त्याचाच कोप, विकारस्थानीं असल्यानें प्रसार संभवनीय नाहीं, हा विकार दोष करतात व वातादि दोषांचा त्यांत संबंध, स्रोतोरोध, फाजील अभिष्यंदानें झाला कीं रुक्षतेमुळें झाला या पोटभेदांचें ज्ञान व्हावें यासाठीं सांगितला असतो. कोणत्याहि रोगाच्या संप्राप्तींत स्थान व विकृत होणारी क्रिया सांगून ती विकृती दोषांनीं होते असें सांगण्याचें कारण विकृती होत असतां प्रमुख ज्या तीन क्रिया त्यांच्यापैकीं कोणत्या क्रियेची विकृती आदिकारण झाली याचा खुलासा व्हावा हें आहे.

रोग जरी एकाद्या अवयवांत झाला तरी तो व्हावयाचा म्हणजे त्या अवयवांतील नित्य क्रियांतून एकादी विकृत होणें अवश्य असतें. तिचाच परिणाम प्रत्यक्ष रोगरूपानें होतो, म्हणून निदानामध्यें दोषांचा संबंध अवश्य व विशेष बोधक आहे. दोष हा सामान्य शब्द योजण्यांत आलेला असतो तरी त्याचा अर्थ रोगस्थानीय दोषाचा भेद अर्थात् तेथील नित्यक्रिया करणारा जो दोष तो समजावयाचा. कोणताही विकार झाला असतां तो शरीराचा एकादा किंवा अनेक धातु अथवा याच धातूंनीं बनलेल्या अवयवांवर स्पष्ट होत असतो. असें असलें तरी विकृति–धातूंत दिसली तरी–धातूमध्यें स्वतः सामर्थ्य असत नाहीं. त्यांतील कार्यकारी विकृति होऊन मग धातूंवर परिणाम होतो म्हणून रोगांचें कर्तृत्व दोषांकडे सांगितलें आहे. चिकित्सा अथवा उपचार ही विकृत

झालेली क्रिया दुरुस्त करणारे असतात. ज्या कोणत्या, धातु अगर आशयामध्यें, रोग होतो त्याला दूष्य हें नांव याच उद्देशानें देण्यात आलें आहे. आणि निदानाचे वेळीं दूष्य व दोष यांचा स्वाभाविक संबंध ध्यानीं घेणें अगत्य असतें. दूष्यज्ञान ह्मणजे रोगस्थानाचें ज्ञान असेंहि म्हणतां येईल. परंतु अनेक दूष्यांचे मिश्रणांपासून आशय बनले असल्यानें केवळ दूष्यांवरून रोगस्थानाच्या स्वरूपाचा नीट बोध होणार नाहीं यासाठीं स्थानसंशयच महत्वाचा होय.

शरीराच्या एकंदर नित्यव्यापारांचें थोडक्यांत स्वरूप ह्मणजे उत्पादन उत्सर्जन, व पृथक्करण असें असतें. नवीन घटकांची उत्पत्ति, झिजले-ल्यांचें उत्सर्जन व नम्याजुन्या घटकाचें पृथक्करण या सर्वांत तारतम्य-भाव किंवा कमी अधिक महत्व कोणालाच नाहीं. सर्वच क्रिया महत्वा-च्या आहेत. तथापि त्यांतहि उत्पादक क्रिया विशेष महत्वाची. कारण तीशिवाय पुढील—इतर दोन क्रियांचा संभव नसतो. या तीन क्रियाची अविकृतावस्था सारखीच रोगोत्पादक असली तरी शरीराचे अस्तित्वा-लाच उत्पादन क्रिया अधिक महत्वाची आहे. आणि उत्पादक जे दोष त्यांचें रोगज्ञानासाठीं आवश्यक असें ज्ञान यासुळेंच आहे. रोगाचें ज्ञान करुन घेतांना या तत्वाला—

अनुसरून थोडा सूक्ष्म फरक ध्यानांत घेणेंहि विशेष बोधप्रद आहे. तो असा कीं, ज्या कोणत्या स्थानांत विकार झाला असेल तेथील उत्पादन क्रिया कमी झाली आहे कीं, पृथक्करण अथवा उत्सर्जन यांतील अव्य-वस्थितपणा आला असल्यानें उत्पादनक्रिया कमी झाली आहे. साधा-रणतः मलांचा संचय उत्पादनक्रियेला व्यत्यय करतो व मलाचे आधि-क्यावरून त्याची कल्पना येते. व्यत्ययामुळें होणाऱ्या रोगाहून उत्पादन-क्रियेच्या कमीपणामुळें होणारे रोग अधिक कष्टसाध्य असतात; कारण रोगी भागाची स्वाभाविक शक्ति असल्या विकारांत कमी होते. विकार धातूमध्यें होतो. आणि धातु दूषित व्हावयाचा म्हणजे अंतर्गत साम-र्थ्यरूपी दोषांच्या विषमतेमुळें अथवा धात्वाश्रयी मलभागाच्या वियो-जन क्रियेंतील विषयतेमुळें. त्यांतहि मळाचा क्षय किंवा अतिविसर्ग फाजील उत्सरर्जन—झालें असतां धातुक्षीणता येते परंतु प्रत्यक्ष रोग होत नाहीं. पण मळांचें उत्सर्जन कमी झालें म्हणजे रोगसंभव अधिक असतो. मळासारख्या टाकाऊ—घाणेऱ्या पदार्थांचे संसर्गानें धातु त्वरित बिघडतात. आणि पृथक्करण किंवा पचन नीट न झाल्यास, ज्या धातु-मध्यें हें पचन व्हावयाचें ते धातु स्वतः व त्यापासून उत्पन्न होणारे मळ बिघडतात. आणि दोष बिघडले कीं, धातु व मळ दोनही बिघडून रोग होतो.

दोषा दुष्टा रसैर्धातून् दूषयंत्युभये मलान् (अ. हृ.]

आहार्य पदार्थांनीं-रसांनीं- दोष दूषित होऊन, धातूंना दूषित करून दोष व धातु दोघे मळांना बिघडावितात.

म्हणजे सर्व विकारांमध्यें मुख्य प्रकार तीन होतात; एक दोषविकृतिजन्य; दुसरा, धातुविकृतिजन्य आणि तिसरा मलविकृतीजन्य. धातु व मळ यांमध्यें तत्वतः दोषांचेंच कर्तृत्व असल्याकारणानें या तीनहि प्रकारांत तत्वतः त्रिदोषांचाच संबंध येतो. परंतु विकाराची व्याप्ति ध्यानीं येण्यासाठीं असे पोटभेद मानणें सोयीचें आहे. त्याचप्रमाणें प्रत्येक ठिकाणांतील क्रियांमध्यें तीनहि दोषांचा संबंध येत असला तरी, उत्सर्जन वायूमुळें, पृथक्करण पित्तामुळें व उत्पादन, (संग्रहाची अवस्था) कफामुळें, असल्यानें या तीन प्रकारच्या विकारांमध्यें अनुक्रमें वायु, पित्त आणि कफ यांचें प्राधान्य असतें.

त्रिदोषांचें तारतम्य ओळखणें हेंहि निदानांतील एक मुख्य अंग आहे. त्याचप्रमाणें मिश्र दोषांमध्यें स्वतंत्र उत्पादक, व मदतगार हाहि विचार महत्त्वाचा आहे. कफ वाढून वायूंचे मार्गांत त्याचा व्यत्यय आला तर विकार वायूचा होईल. पण उपचार वाढलेल्या कफावरच करणें अवश्य असतें.

कारण चिकित्सेचें तत्व वैषम्य घालवणें हें असून वैषम्याचें कारण दूर करणें अवश्य. यासाठींच वाढ आणि मार्गसंरोध व कोप यांना महत्त्व आहे. वाढीशिवाय मार्गसंरोध नाहीं. कफाच्या स्निग्धादि गुणांची पित्ताच्या तीक्ष्णतेची अथवा वायूचे रूक्षतेची कोणती तरी वाढ पाहिजे खास. व कोणत्याही रोगामध्यें नक्की ज्ञान हेंच पाहिजे कीं, वाढ कोठें आणि कोणत्या दोषांची झाली आहे. आयुर्वेदाचें सर्व रोगनिदान पाहिल्यास त्यांत कोप कसा कोठें व कोणत्या दोषाचा झाला आहे याचाच उल्लेख केलेला आढळेल. व हा कोप समजून घेतांना त्या स्थानांतील, दोष दूष्यांचा संबंध व नित्यक्रिया या सर्व ध्यानीं घेऊन कोपाचें स्वरूप ठरविलें तरच रोगाचें स्वरूप समजेल. केवळ वायुपित्तकफांच्या ढोबळ माहितीवर निदान होणार नाहीं. निरनिराळ्या शरीर विभागांतील नित्याची कार्यें त्रिदोषांचे सहाय्यानें कशीं घडतात ही कल्पना ध्यानी घेतली म्हणजे रोग अथवा विकृतीची कल्पनाहि नीट येईल. त्रिदोषांचें असें निरनिराळ्या रचनांतील निरनिराळ्या अंशांनीं घडून येणारें कार्य ज्ञान म्हणजे इंद्रियविज्ञान होय.

आयुर्वेदांत स्वतंत्रपणें इंद्रियविज्ञान नाहीं. आणि सकृद्दर्शनीं ही वैद्यशास्त्राची मोठी उणीव वाटते व असली महत्वाची उणीव असणारा आयुर्वेद शास्त्रीय वाटत नाहीं. आणि इंद्रियविज्ञानाचें अभावीं इंद्रिय कृती स्वरूपी रोगांचें ज्ञान अशक्य असल्यानें आयुर्वेदाची निदान पद्धति सदोष वाटते. परंतु दोषाचे ज्ञानावरून इंद्रिय यापार सांगणाऱ्याचीं आयु

वेदानें दोषांवरच रोगांची उपपत्ती सांगावी यांत सदोष काय? ज्यां उपपत्तीचे आधारें निरोगी अवस्था सांगितल्या त्याच उपपत्तीनें रोगविज्ञान सांगितलें हें शास्त्रीय पद्धतीला धरून आहे. त्रिदोषांच्या उपपत्तीशीं परिचय व तादात्म्य झाल्यास आयुर्वेदाचें इंद्रियविज्ञान तसेंच रोगविज्ञान सदोष (त्रिदोषांनीं युक्त) आहे म्हणूनच तें निर्दोष आणि पूर्णपणें शास्त्रीय आहे असें कळेल. त्रिदोषांचें आधारें रोगनिदान कसें करतां येतें याविषयीं सर्वसामान्य कल्पना दिग्दर्शित करून, त्याच त्रिदोषांच्या आधारें चिकित्सेची योजना कशी होते याविषयीं विचार करूं. (निदान, चिकित्सा हे विषय स्वतंत्र आहेत त्यांचा विचार या छोटयाशा निबंधांत पूर्ण होणारा नाहीं. हें केवळ दिग्दर्शन केलें आहे.)

त्रिदोषांचा चिकित्सेंतील उपयोग.

आयुर्वेदाचें शरिरविज्ञान आणि रोगविज्ञान त्रिदोषांवर अवलंबून आहे त्याचप्रमाणें चिकित्साहि यांचे धोरणानेंच सांगितली आहे. उपचार अथवा चिकित्सा धातु किंवा मळ यांवर करावयाची नसून या धातु व मळांमध्यें असणाऱ्या दोषांवर करावयाची असा अभिप्राय आहे. शारीरिक सर्व क्रियांचा तीन क्रियांमध्यें अंतर्भाव, सर्व रोगांचीं कारणें तीनच दोष, सर्व लक्षणें आणि रोगांचें त्रिविध स्वरूप या सर्व गोष्टी ध्यानीं घेतां चिकित्सेचें स्वरूपहि त्रिविध असणें स्वाभाविक आहे. मात्र निरनिराळ्या स्थानविभागानुरूप व दोषांचे विशिष्ट अंशानुरूप हें धोरण बदलावें लागतें. एकाद्या दोषाचे अनेक विकार जसे त्या स्थानांतील अंशभेदाला अनुसरून संभवतात परंतु सर्व सामान्य रीतीनें सर्व विकार दोषाचे नांवानें संबोधले जातात, त्याचप्रमाणें चिकित्साहि सामान्यत्वें दोषांवर असली तरी ती विशिष्ट स्थानावर परिणाम करणारी असावयास पाहिजे. रोग एकांगी अथवा सर्वांगी असेल त्या मानानें एकांगपरिणामी अथवा सर्वांगपरिणामी उपचारांचें स्वरूप असावयाचें. मात्र सर्वहि विकारांमध्यें वायु, पित्त व कफ या दोषांचे परिणाम, क्षोभ, अभिताप व अभिष्यंद हे असल्यानें स्थानानुरूप असे उपचारांमध्यें अनेक पोटभेद संभवले तरी, क्षोभशामक, अभितापशामक व अभिष्यंदनाशक असे सर्व उपचारांचे तीनच मुख्य प्रकार होतात. आणि यावरूनच सर्व उपचारांचें थोडक्यांत वर्णन करीत असतां.—

बस्तिर्विरेको वमनं तथा तैलं घृतं मधु ॥ (वाग्भट)

अर्थः—वायु, पित्त आणि कफ यांवर अनुक्रमें बस्ति, विरेचन व वमन हें शोधन उपचार, आणि, तेल, तूप व मध हे शमन उपचार मुख्य आहेत, असें सांगितलें आहे.

सर्वांगीण विकारांवर मुख्यतः शोधन उपचारांची अवश्यकता असते. कारण, दोषांच्या मुख्य स्थानांत त्यांची वाढ होऊन व दूषित स्वरूप येऊन ते इतर सर्व शरीरभागांत पसार पावतात. आणि याचसाठीं वाढून दूषित स्वरूप पावलेल्या दोषांना शरीराबाहेर काढून टाकणें हाच उपाय श्रेयस्कर असतो.

यदीरयेद्बहिर्दोषान् पंचधा शोधनं च तत् ॥ (वाग्भट)

अर्थ—जें (औषध उपचार) बिघडलेल्या दोषांना शरीराबाहेर काढून टाकतें तें शोधन समजावें.

एकांगी विकारांत मार्गरोधजन्य वाढ असते अर्थातच त्यासाठीं, शमन उपाय योजावयाचे. शमन म्हणजे.—

नशोधयति यद्दोषान् समान्नोदीरयत्यपि ।
समीकरोति विषमान शमनं तच्चसप्तधा ॥ १ ॥ (वाग्भट.)

जें दोषांना बाहेर काढून टाकीत नाहीं, त्याचप्रमाणें समस्थितींतील दोषांना वाढवीत नाहीं तर विषम दोषांना सम करतें त्याला (त्या औषधाला) शमन समजावयाचें.

तात्विक भाषेंत शमन म्हणजे स्थानी शोधनच असतें असें म्हणावयास हरकत नाहीं. कोप अथवा उन्मार्गगामिता उत्पन्न होऊन एकादा दोष भलत्या जागीं सांठतो अर्थात् त्या ठिकाणीं अनैसर्गिक संचयच होत असतो. आणि हा संचय ज्या कोणत्या उपायानें दूर होईल त्याला शोधन मात्र स्थानी असें नांव देण्यास अडचण नाहीं. अशा विकारांमध्यें दोषाचा ऱ्हास करावयाचा नसतो. कारण त्याची तत्वतः वाढ झालेली नसून केवळ कोप, उन्मार्गगामिता अथवा वैषम्य असतें आणि तें दूर करावयाचें. दोषाचा ऱ्हास करावयाचा नाहीं. या तत्वाची जाणीव राहण्यासाठीं या उपायाला शमन या नांवानें संबोधणे सोयीचें आहे. जसें:—ज्वरामध्यें ताप वाढलेला असून अधिक उष्णता हाच त्रास देणारा रोग असतो. व पित्ताशिवाय ज्वर नाहीं असा यामुळें सिद्धांतहि आहे. परंतु ज्वरावर शोधन हा उपाय नाहीं त्यावर लंघनच सांगितलें आहे याचें कारण त्वचा अथवा धातु यांमध्यें जी उष्णता किंवा पित्त वाढलें असतें त्याची शरिरांत तत्वतः वाढ झालेली नसून पच्यमानाशयांत अवश्य असणाऱ्या पित्ताची उन्मार्गावस्था असते ह्मणून उपाय पित्तनाशक केल्यास—शोधन उपाय योजल्यास—पित्ताचें शरिरांतील प्रमाण कमी होईल. तें न व्हावें व त्वचेंतील पित्त मात्र नाहींसें होऊन पचनक्रिया सुरळीत चालू व्हावी व अशा प्रकारें पित्ताचें वैषम्य नष्ट व्हावें यासाठीं लंघन, पाचनरूपी शमनोपायांची योजना करावयाची.

दीपनं, पाचनं क्षुत्तृड्व्यायामातपमारुताः ।

दीपन, पाचन, उपवास, पाणी न पिणें, व्यायाम, उन्ह व वारा (हे शमनाचे प्रकार आहेत).

" येत्वेनां पित्तस्य स्थायकृष्टिं न विंदंति ते दाहोपलंभेन पित्तवृद्धिं मन्यमानाः पित्तं ह्रासयंतः पित्तक्षयलक्षणं रोगांतरमुत्पादयंत-आतुरमतिपातयंति । इति भट्टार हरिचंद्रः " (मधुकोश).

अर्थः—जे ही पित्ताची अन्यस्थान गति जाणीत नाहींत ते दाह पाहून पित्ताची वाढ समजून, तें कमी करून पित्तक्षयरूपी नवा रोग उत्पन्न करून रोग्याला अधिक रोगी करतात.

शमनाचें हें धोरण सर्व स्थानीविकारांत सारखेंच असतें. मात्र अशा रीतीनें स्थानांतरगत दोष ज्या स्थानांत संचित होतो तेथून त्याला काढावाच लागतो. आणि त्या स्थानापुरती ती चिकित्सा शोधन असते. जोंपर्यंत एकाद्या भागांत रोगकारी दूषित द्रव्य–दूषित दोष–आम--आहे तोंपर्यंत तो शरीरभाग निरोगी होणें शक्य नाहीं. उपचारांमध्यें स्थानी व सर्वांगीण असा फरक दाखविणारे हे दोन प्रकार आहेत, येवढाच याचा अर्थ असून शास्त्रीय व्यवहाराचे सोयीसाठीं शमन व शोधन हे शब्द अनुक्रमें स्थानीशोधन व सार्वदेहिक शोधन यांचे वाचक योजले आहेत हें चिकित्सकानें ध्यानीं ठेवण्यासारखें आहे. निरनिराळ्या विकारांमध्यें उत्पादक दोषविकृती ही भिन्न स्वरूपाची असल्यानें रोगनाश होईपावेतों निरनिराळ्या अनेक प्रकारच्या उपचारांचा अवलंब करावा लागतो तरी मुख्य धोरण ठरविण्याला अशा प्रकारची व्यवस्था जरूर असते. खचित् शोधन व शमन अशा दोनहि प्रकारांचा अवलंब करावा लागेल. क्वचित् शमनांपैकीं अनेक उपाय योजावे लागतील. हें खरें असलें तरी शोधनानें सर्वांगीण शुद्धि आणि शमनानें स्थानीशुद्धि होते या तत्त्वाला बाध येत नाहीं.

शोधन ही चिकित्सा सार्वदेहिक विकार घालविण्यासाठीं आहे. बस्ति, विरेचन आणि वमन हे तीन शोधनाचे मुख्य प्रकार अनुक्रमें वायु, पित्त व कफ यांचे शोधन उपाय असून त्रिदोषांचीं मुख्य स्थानें जीं पक्वाशय (वायूचें) पच्यमानाशय (पित्ताचें) आणि आमाशय (कफाचें) यांत वाढून दूषित झालेल्या दोषांना शरीराबाहेर काढून टाकतात. या उपायांचा प्रत्यक्ष परिणाम पक्वाशयादि स्थानांवर झालेला दिसतो. बस्तीनें पक्वाशय शुद्ध होतो, विरेचनानें पच्यमानाशय शुद्ध होतो. व वमनानें आमाशय स्वच्छ होतो. या शोधनानें त्या त्या आशयांतील पचन मलोत्सर्जनादि नित्यक्रिया सुरळीत चालतील ही गोष्ट सहज ध्यानीं येणारी आहे. परंतु या उपायांनीं सार्वदेहिक विकारांवर परिणाम कसा व्हावा ? अशी शंका येणें स्वाभाविक आहे. आणि हे

उपाय तर सार्वदेहिक अशा विकारांना समूळ घालविणारे म्हणून मुख्य सांगण्यांत आले आहेत.

दोषाः कदाचित् कुप्यंति जिता लंघन पाचनैः ॥
ये तु संशोधनैः शुद्धा न तेषां पूनरुद्भवः॥ १ ॥ (वाग्भट.)

लंघनपाचनादि शमनोपायांनीं जिंकलेले दोष कदाचित् पुनः कुपित होतील. परंतु शोधनोपायांनीं शुद्ध केलेल्या दोषांची पुनः उत्पत्ति होत नाहीं.

शोधनोपायांचा सार्वदेहिक उपयोग उघड सांगितला आहे:—

शाखागताः कोष्ठगताश्च रोगा मर्मोर्ध्वसर्वावयवांगजाश्च ।
ये संति तेषां न तु कश्चिदन्यो वायोः परं जन्मनि हेतुरस्ति ॥१॥
विश्लेष्मपित्तादिमलाशयानां विक्षेपसंहारकरः स यस्मात् ।
तस्यातिमात्रस्य शमाय नान्यद् बस्तेर्विनाभेषजमस्ति किंचित् ।
तस्माच्चिकित्सार्थ इति प्रदिष्टः कृत्स्ना चिकित्सापिच बस्तिरेकैः
(वाग्भट.)

अर्थः—शाखा, कोठा, मर्म, ऊर्ध्वांगें इत्यादि सर्व अंगावयवांचे ठिकाणीं जे विकार उत्पन्न होतात त्यांचे उत्पत्तीला वायूचे शिवाय दुसरें कारण नाहीं.

मळ, श्लेष्मा, पित्त इत्यादि मलांच्या संचयाला फेकणारा व नाश करणारा असा जो वायु त्या अतिवृद्ध वायूला बस्तीशिवाय दुसरें औषध नाहीं.

बस्ति हा सर्व चिकित्सेचा अर्धभाग आहे किंवा कांहींचे मतें बस्ति हा एकटाच सर्व चिकित्सा होऊं शकतो.

" विशेषेण तु वामयेत् ॥ १ ॥
नवज्वरातिसाराधः पित्तासृग्राजयाक्ष्मिणः ।
कुष्ठमेहापची ग्रंथिश्लीपदोन्मादकासिनः ॥ २ ॥
श्वासहृल्लासवीसर्पस्तन्यदोषोर्ध्वरोगिणः ॥

अर्थः—विशेषेंकरून, नवज्वर (आमज्वर) अतीसार, अधोगामी रक्तपित्त, राजयक्ष्मा, कुष्ठ, मेह, अपची (गंडमाला भेद) ग्रंथि, श्लीपद, (वारुळ) उन्माद, खोकला, दमा, मळमळ, स्तन्यदोष व ऊर्ध्वजत्रु-विकार असलेल्यांना वमन द्यावें.

" विरेकसाध्या गुल्मार्शोविस्फोटव्यंगकामलाः ।
जीर्णज्वरोदरगरछर्दिप्लीह हलीमकाः ॥ १ ॥
विद्रधिस्तिमिरं कामः स्यंदःपक्काशयव्यथा ।
योनिशुक्राशया रोगाः कोष्ठगाः कृमयोव्रणाः ॥ २ ॥

वातास्त्रमूर्ध्वगं रक्तं मूत्राघातः शकृद्ग्रहः।
वम्यश्च कुष्टमेह घाः।

अर्थः—गुल्म, मूळव्याधि, विस्फोट, (मोठाले फोड) वांग, (एक क्षुद्ररोग अंगावर डाग पडणें) कावीळ, जीर्णज्वर, उदर, गर (कृत्रिम, विष) वांति, प्लीहा, हलीमक (पांडुरोगाचा प्रकार) विद्रधि, तिमिर, काच, स्यंद (नेत्रविकार) पक्काशय, शुळ, योनिरोग, शुक्राशयाचे विकार कोष्टांतील कृमि व्रण, वातरक्त, ऊर्ध्वगामी रक्तपित्त, मूत्राघात, मलावरोध आणि कुष्ट, मेह इत्यादि (वरील) वमनार्ह यांना विरेचन योग्य आहे.

याप्रमाणें बस्ति, विरेचन आणि वमन यांनीं जे साध्य विकार सांगितले आहेत त्यावरून या उपायांचा केवळ कोठ्यापुरताच स्थानी उपयोग होतो असें नसून सार्वदेहिक उपयोग होतो हें उघड होतें. या उपायांनीं शरीरांतील रोग कसे जाऊं शकतात याविषयीं आयुर्वेदाचीं कल्पना अशी आहे कीं;—

अपथ्याचरणामुळें, कोठ्यांत वाढलेल्या दोषांचा सर्व शरीरधातूंमध्यें प्रसार होतो आणि दूषित होतात व तेच शरीरावर धातूंत प्रसार पावलेले दोष पुनः कोठ्यांत परत येतात व तेथें आल्यावर शोधनोपायांनीं त्यांना बाहेर काढून टाकावें म्हणजे शरीर निर्दोष होतें. दोषांचा शरीरांत प्रसार आणि ते पुनः कोठ्यांत परत कसे व कोणत्या साधनांनीं येतात याविषयीं.—

व्यायामादूष्मणस्तैक्ष्ण्याद्हिताचरणादपि ।
कोष्ठात् शाखास्थिमर्माणि द्रुतत्वान्मारुतस्य च ॥ १ ॥
दोषो यांति तथा तेभ्यः स्रोतोमुखविशोधनात् ।
वृद्ध्याऽभिष्यंदनात्पाका त्कोष्ठं वायोश्च निग्रहात् ॥२॥(अ.हृ.सु.)

अर्थः—कोठ्यांत वाढलेले दोष, व्यायाम, शारीरिक उष्णता, अपथ्याचरण आणि वायूची गति यांमुळें कोठ्यांतून शाखा (रक्तादि धातु) मर्मे इत्यादि शरीरांत जातात–पसरतात; आणि,

फार वाढीनें, अभिष्यंद–पाझरणें यामुळें, पचन–पृथक्करण होऊन, व वायूचे आकर्षण सामर्थ्यानें परत कोठ्यांत येतात.

याप्रमाणें उल्लेख आयुर्वेदांत आहे. याचा तात्पर्यार्थ असा कीं, शरीरांत जें एकादें दूषित द्रव्य (आम) तयार होतें तें प्रथम कोठ्यांतील अपचनदोषांमुळें होतें (आमाची व्याख्या पहा.) आणि व्यायामादि कारणांनीं त्याचा रसाबरोबर क्रमशः सर्व शरीरभर प्रसार होतो. ज्या एकाद्या भागांत त्याचाच संचय होईल त्या ठिकाणीं रोगोद्भव होतो. परंतु असें हें रोगकारी द्रव्य सर्व शरीरांत प्रसार पावतें त्यावेळीं सर्व शरीरामध्यें अस्वस्थता निर्माण करतें. व एकांगीं अथवा सर्वांगीं

विकार निर्माण होतात. असल्या द्रव्यापासून झालेले आणि होणारे विकार टाळण्याकरतां त्याचें शरीराबाहेर उत्सर्जन होणें अवश्य होय. शरीराच्या अनेक भागांतील असंख्यात स्रोतसांमध्यें जें आमद्रव्य रक्ताबरोबर घुसून विकार करणार तें त्या स्रोतसांतून बाहेर काढावयास पाहिजे. ज्याप्रमाणें रसाबरोबर (रक्ताबरोबर) त्याचा सर्व शरीरभर प्रसार होतो त्याचप्रमाणें त्या स्रोतसांतील स्थानी पचनक्रियेनें पचन होऊन कांहीं कालानें आम व शुद्ध धातु यांचें पृथक्करण होतें, अथवा आमाची अति वाढ झाल्यानें स्रोतसें पूर्णपणें भरून त्याचा अभिष्यंद होतो व अशा प्रकारें या स्रोतसांतून निघालेला आमरूपी दूषित पदार्थ पुनश्च वायूच्या संकोचक्रियात्मक आकर्षणानें कोठयांत परत येतो. हा जो शारीरिक निसर्गक्रम त्यालाच अनुसरून शोधनोपायांची योजना आहे. बास्ति, विरेचन आणि वमन हे शोधन उपाय योजण्यापूर्वी स्नेहन स्वेदन सांगण्याचा उद्देश हाच आहे. स्नेहनानें शरीरांतील स्रोतसें स्निग्ध झालीं म्हणजे स्वेदन क्रियेनें या स्रोतसांतील दोषांचें ह्मणजे दोषविशिष्ट आमद्रव्याचें वियोजन होऊन ते वायूच्या आकर्षक सामर्थ्यानें (रक्ताच्या परत येण्याच्या गतीनें.) परत कोठयांत येतात. व मग शोधनानें त्यांना शरीराबाहेर काढण्यांत येतें. अशा प्रकारें शरीरांत पसरून रोग उत्पन्न करणारें जें दूषीत विषारी आमद्रव्य त्याचा नाश करतां येतो.

या आमद्रव्याचीं त्रिदोषांना अनुसरून तीन स्वरूपें असतात. एक कफविशिष्ट, दुसरें पित्तविशिष्ट आणि तिसरें वातविशिष्ट. याचा उघड अर्थ असा कीं, दूषित कफ, दूषित पित्त व दूषित वात यांचा प्रसार सर्व शरीरभर होतो. आणि या तीन दोषांनीं तीन प्रकारचे विकार होतात. कोठयांत आमाशय, पच्यमानाशय आणि पक्वाशय असे प्रमुख तीन विभाग त्यांतच अनुक्रमें या तीन प्रकारच्या दूषित पदार्थांची उत्पत्ति व्हावयाची. आमाशयांतील दूषित कफ, लहान आंतडयांतील दूषित पित्त व पक्वाशयांतील दूषित वायु ह्यांचा सर्व शरीरांत प्रसार झाला ह्मणजे त्या त्या दोषांचे विकार होतात. त्रिदोषांचें सर्व शरीरव्यापी सात्विक स्वरूप ध्यानांत घेतलें असतां, प्रत्येक ठिकाणीं असणारा जो स्निग्ध पदार्थ, त्यामध्यें या दूषित कफाची, प्रत्येक स्थानांतील पाचक रसांत–पित्तांत–दूषित पित्ताची भर व स्रोतसांतील वायूमध्यें वायूची भर पडणार हें उघड झालें. कफ आणि पित्त हे अन्नरसांबरोबर शरीरांत प्रसार पावावेत हें सहज पटण्यासारखें आहे. प्रवाहि पित्त आणि बहुतांशीं असल्याच स्वरूपाचा कफ यांचें अनुक्रमें अन्नरस, रसधातु, रक्त आणि रसरक्तवाहि स्रोतसें यांतील अभिसरण उघड दिसणारें आहे. आणि यावरून शरीरांतर्गत स्रोतसांतील दूषित कफपित्तांची व्याप्ति सहज कळण्यासारखी आहे. परंतु वायूची गोष्ट तशी नाहीं.

कारण रसरक्तवाहिनीप्रमाणें वातवाहिनींचें दृश्य आणि स्पष्ट असें अस्तित्व उपलब्ध नाहीं. आमाशयांतील दूषित कफ आणि पच्यमानाशयांतील दूषित पित्त ज्या प्रवाही स्वरूपानें अन्नरस आणि रसधातु यांशीं मिश्र होऊन शरीरांत प्रसार पावतात तसेंच स्वरूप वायूचें नसल्यानें पक्काशयांत दूषित झालेला वायु विरल अणुंस्वरूपी वायु शरीरांत प्रसार कसा पावावा हा प्रश्न विचारणीय राहतो.

शरीराला त्याचे पांचभौतिकत्वाला अनुसरून सर्व तत्वांचा पुरवठा व्हावयास पाहिजे हें उघड आहे. हा पुरवठा अन्नपान, हवा, प्रकाश यांनीं होत असतो. पक्वाशयामध्यें मलोत्सर्जनाचें कार्य ज्या पक्काशयाश्रयी वायूकडून होतें तो आहारांतील वातकारक म्हणजे रूक्षादि गुणांच्या पदार्थांनीं होत असतो. या पदार्थांची अधिक भर पडते त्या वेळीं पक्काशयाचे स्रोतसांमध्यें वायु अधिक वाढतो व त्यामुळें पोट फुगणें, गुरगुर आवाज होणें इत्यादि लक्षणें झालेलीं दृष्टीस पडतात. ही जी स्थानीवाढ होते तिचीच व्याप्ति अधिक प्रमाणांत झाली असतां सर्व शरीरांत होते. अन्नांतून निघणाऱ्या रसा, बरोबर सूक्ष्म प्रमाणांत या वातकारक अशा गुणांच्या पदार्थांचे सूक्ष्म अंश शरीरांत प्रसार पावतात, व विशेषतः पक्काशयांतून कांहीं प्रमाणांत होणाऱ्या रसाचे शोषणाबरोबर वाढलेल्या वायूचा पुरवठाहि सर्व शरीरांत होतो. व प्रत्येक ठिकाणीं असणाऱ्या स्रोतोभागांत वायूची वाढ होते. अन्नरसाचें रसधातूंत पर्यवसान होऊन त्याचा शरीरांत प्रसार झाल्यावर धातुपोषण होऊन जो मळ निघतो त्यांतील उत्सर्जनीय भाग पुनः त्या त्या भागांत यावा अशी शरीराची नैसर्गिक योजना दिसते. व या योजनेला अनुसरून शोधनोपचारांची योजना आहे. नवीन दोषी पदार्थांचा पुरवठा होऊं नये यासाठीं ही योजना उघड पटणारी आहे. कफस्थान, पित्तस्थान, व वातस्राव अनुक्रमें आमाशय, पच्यमानाशय आणि पक्काशय निर्दोष होऊन त्यांचीं कामें सुरळीत होऊं लागल्यावर नवीन दूषित पदार्थांची शरीरांत भर पडत नाहीं. शुद्ध पदार्थांचा पुरवठा होतो व अशा रीतीनें रोगाला आळा बसतो. म्हणजे शोधन हें प्रतिबंधक आणि विनाशक या गुणानें कार्य करतें. शोधनोपचारांचा असा सार्वदेहिक विकारांवर जो उपयोग सांगितला आहे तो ते उपचार यथाविधि उपयोगांत आणले असतां होतो; एकादा बस्ति, एकादें विरेचन किंवा वमन यांनीं नव्हे हें विसरतां उपयोगी नाहीं. एकाद्या प्रयोगाचा परिणाम तात्कालिक आणि स्थानीगुणाला पुरेसा झाला तरी सार्वदेहिक विकारांवर सांगितलेला उपयोग यथाविधि बस्तिविधि-विरेचनविधि वमनविधि यांचा व्हावयाचा. कोणत्याहि भागांत त्रिदोषांचे दूषित स्वरूपामुळें रोग झाला असतां तें

द्रव्य, स्नेहन स्वेदनोपायांनीं कोठ्यांत परत यावें व मग शोधनानें काढून टाकावें अशी ही व्यापी शोधनचिकित्सा सामान्य स्वरूपाची आहे. आणि यामुळें सर्वसामान्य म्हणून महत्त्वाची परंतु विशिष्ट रोगाचे दृष्टीनें कमी महत्त्वाचीहि म्हणावयास हरकत नाहीं. रोग-चिकित्सेमध्यें सामान्य चिकित्सेहून विशिष्ट चिकित्सेलाच अधिक महत्त्व असून तें चिकित्सेचें रोगानुसार भिन्न प्रकारचें स्वरूप आहे. या सर्व-सामान्य स्वरूपाच्या चिकित्सेविषयींहि एक गोष्ट विचारार्ह आहे ती ही कीं, शरीराचे एकाद्या भागांत रोग झाला असतां आणि उपचार सर्व शरीरावर सामान्यतः परिणामकारी असतां त्यांचा रोगी भागा-वर रोग नाशक उपयोग कां आणि कसा व्हावा ? या प्रसंगीं सामा-न्यतः उपचारांचें

रोगनाशक सामर्थ्य

विचारांत घेणें अवश्य आहे.

कोणताहि रोग शरीराच्या विशिष्ट भागांत होतो याचें कारण, त्या भागांतील नैसर्गिक सामर्थ्य इतर शरीराहून क्षीण झालेलें असतें हें होय. (स्वैवगुण्य) या भागांत रोगोत्पादक द्रव्य रोगरूपी कार्य घडवितें. आणि रोगामुळें त्या स्थानामध्यें रोगविनाशक सामर्थ्य निर्माण होतें. ह्मणजे रोगावस्थेमध्यें रोगी भाग शरीराचे इतर भागां-हून अधिक क्रियावान्–प्रतिक्रियावान् होतो. (रोग प्रतीकारी सामर्थ्य कोठून येतें. पा. १०५ पहा.) रोगविनाशाचें अधिक व अनैसर्गिक काम या भागाला करावयाचें असल्या कारणानें त्या ठिकाणीं सर्व शरीरांतील शक्ति एकवटलेली असते, आणि याचमुळें सर्वसामान्य असे उपचारहि इतर शरीराहून रोगस्थानावर परिणामी होतात. रोग प्रतिकारार्थ प्रयत्नतत्पर झालेला रोगी भाग उपचारां-तील मदतगार गुण प्रत्यय आणि अधिक प्रमाणांत आत्मसात् करतो. मात्र रोगाच्या अगदीं प्रथमावस्थेंत ह्मणजे रोगोत्पादक दोषांचे आक्र-मणानें रोगस्थानीय सामर्थ्य दडपून गेलें असून प्रतीकारार्थ प्रयत्न सुरू झाले नाहींत अशा वेळीं उपायांत सफलता येत नाहीं. (ही आमा-वस्था चिकित्स्य नाहीं.) कोणत्याहि रोगाला कारणीभूत वातादि त्रिदोष असल्यानें, या रोग कारणांचे सामान्यतः विनाशक असे जे उप-चार ते सामान्यतः त्या त्या दोषापासून उद्भवलेल्या सर्व विकारांवर गुण-दायी असतात. वायूमुळें कोणत्याहि शरीरभागांत रोग झाला असला तरी सामान्यत्वें वातनाशक उपचार त्या रोगांवर उपयोगीं पडतात. असें असलें तरी चिकित्साशास्त्रांत या सर्वसामान्य चिकित्सेहून

निराळें धोरण अथवा वेगळी चिकित्सा महत्त्वाची मानण्यांत येते. जी मुळें या सामान्य चिकित्सेहून मुख्यत्वें व रोगस्थानांवर आणि विशिष्ट प्रकारच्या रोगांवर त्वरित आणि खात्रीनें गुण येतो. ज्याप्रमाणें वाढलेले दुष्ट झालेले अथवा कुपित झालेले वातादि दोष शरीराचे निरनिराळ्या भागांत अनेकविध लक्षणें उत्पन्न करीत असतांहि या अवस्थेला रोग हें नांव नसून कुपित दोषांचा स्थानसंचय आणि स्थानाश्रय विकृतिविशिष्ट रोग या नांवानें ओळखण्यांत येते त्याचप्रमाणें असल्या विशिष्ट स्थानाश्रयी विकृतीवर किंवा रोगांवर विशिष्ट गुणानें म्हणजे प्रभावानें रोगनाशाचें कार्य करणारी चिकित्सा हीच महत्वाची समजावयाची. निदानांतील दोषांच्या स्थानसंश्रयामुळें चिकित्सेमध्यें उपचारांच्या स्थानींप्रभावाला महत्त्व आहे. चिकित्साशास्त्रांत या प्रकाराला व्याधिप्रत्यनीक अथवा रोगविपरीत चिकित्सा या नांवानें संबोधण्यांत येतें, आणि द्रव्यगुणशा ांत या विशिष्ट गुणाला प्रभाव हें नांव आहे, कोणताहि विकार उत्पादक कारणांच्या विशिष्टगुणप्रभावामुळ उत्पन्न होतो आणि अर्थातच रोगनाशहि पदार्थांतील विशिष्ट प्रकाराच्या गुणप्रभावानेंच व्हावयाचा. असें असतां चिकित्सेमध्यें दोषांचा संबंध कसा आणि कशासाठीं यावा असा प्रश्न उपस्थित होत असून त्याचें उत्तर दोषांची शारीरिक व्याप्ती ध्यानी घेतल्यानें मिळूं शकेल. कोणत्याहि रोगकारक पदार्थांचा शरीरांत घडणारा परिणाम शारीरधातुंतील क्रियावान् अशा अणूंवर प्रथम होऊन नंतर रोगरूपीं कार्य घडून येतें आणि हेच क्रियाकारी अणु पुनः अविकृतावस्थेंत आल्यानें रोग नाश होतो. यामुळें निदानचिकित्सेंत या असल्या अणूंचा म्हणजे वातादि त्रिदोषांचा विचार अपरि-हार्य ठरतो.

सामान्य अथवा विशिष्ट कोणत्याहि प्रकारची चिकित्सा, करीत असतां त्रिदोषांचा व्यवहार चिकित्सेचे स्पष्टतेसाठीं केलेला असतो. ज्या रोगविनाशक पदार्थांचे गुणांमुळें रोगविनाश व्हावयाचा ते गुणहि या त्रिदोषांच्या विशिष्ट कल्पनेच्या अनुरोधानेंच आयुर्वेदांत वर्णिलें आहे. आयुर्वेदाला त्रिस्कंध म्हणजे तीन प्रमुख शाखानीं युक्त असें विशेषण असून हे तीन स्कंध अथवा शाखा म्हणजे हेतु—कारणें, लींगलक्षणें आणि औषध हे होत. या तीन शाखांनींच वैद्यशास्त्र पूर्णता पावतें. आयुर्वेदानें जी शास्त्रीय उपपत्ति स्वीकारली आहे ती या तीनहि शाखांना सर्व सामान्य अशी असून तिचे एकवाक्यतेनें निदान चिकित्सा विषयींचा खुलासा होऊं शकतो.

सामान्य स्वरूपाचे चिकित्सेमध्यें, त्रिदोषांचा उपयोग त्या त्या दोषाचे मुख्य गुणांचे पोटभेद सुचविण्यासाठीं आणि विशिष्ट रोगनाशक

चिकित्सेमध्यें उत्पादक दोषाच्या खुलाशासाठीं केला जातो. सर्वसामान्यतः वातरोगनाशक उपचार करावयाचे असतां, वातनाशक उपचार परंतु ते वायूचे रूक्षशीतादि कोणत्या गुणांच्या विरुद्ध हें समजावयास पाहिजे.

औषधांचे–द्रव्यांचे–गुण सांगत असतां अशा प्रकारचा खुलासा निघंटु-द्रव्यगुणवर्णन–ग्रंथांत असतो. गुणवर्णनामध्यें दोषनाशक म्हणून सांगून शिवाय ज्या गुणानें दोषनाश व्हावयाचा त्याचाहि उल्लेख केलेला असतो. व त्या गुणाला अनुसरून दोषनाशक उपयोग मानावयाचा. एकादें वातनाशक द्रव्य उष्ण गुणानें वातनाशक तर एकादें स्निग्ध गुणानें आणि एकादे दोनहि गुणांनीं वातनाशक असें असतें. उपयोग करावयाचें वेळीं वाढलेल्या वातगुणाचा विचार करून त्याचे विरुद्ध गुणाच्या पदार्थाचा उपयोग करावा लागतो. जसें सुंठ, वातनाशक आहे. लसूण, वातनाशक आहे, तेल वातनाशक तूप वातनाशक दूधहि वातनाशक परंतु या पदार्थांतील वातनाशक गुणांत अंतर असतें. सुंठ, लसूण, उष्ण गुणानें वातनाशक (वातानिबंध घालविणारे) तेल स्निग्ध व उष्ण, तर तुप स्निग्ध गुणानें आणि दूध तर शीतहि आहे. पण केवळ स्निग्ध गुणाची वाढ व रूक्षता वायूचा हा गुणच कमी करणारे, सुंठ, लसूण, हे पदार्थहि कांहीं प्रमाणांत स्निग्ध आहेत. परंतु त्यांतील उष्ण आणि विबंधनाशक हा गुण महत्वाचा असुन ज्यावेळीं मार्गावरोधामुळें वायूचा कोप होऊन एकादा विकार झाला असेल त्या वेळीं या व असल्या पदार्थांचा उपयोग ज्यावेळीं वायूची वाढ धातुक्षीणता व रूक्षता यामुळें झाली असेल त्यावेळीं तूप, दूध असले पदार्थ पाहिजेत. तेल हें उष्ण स्निग्ध विबंध नाशक असल्यानें सर्व वातनाशक पदार्थांमध्यें तें उत्तम ह्मणुन सांगितलें आहे. रोगकारी वायूची अवस्था बहुधा आवृत किंवा अवरूद्ध अशी असते व म्हणुन विबंधनाशक पदार्थ वायूवरील उपचार असतात. परंतु स्निग्ध व वातनाशक आणि उष्ण वातनाशक, इत्यादि प्रकारचे पोटभेदाची अवश्यकता समजणें अवश्य असतें.

" **वृद्धिःसमानैः सर्वेषां विपरीतैर्विपर्ययः** " (वाग्भट.)

सर्व गुणांची वाढ समान पदार्थांनीं आणि क्षय विरुद्ध गुणांचें पदार्थांनी होतो. या सामान्य नियमानुसार वाढलेल्या गुणाला विरूद्ध असें उपचारांचें धोरण असतें. अशा प्रकारें फरक असला तरी गुरु मंद इत्यादि त्रिदोषांच्या मुख्य वीस गुणांचा तीन दोषांत अंतर्भाव होत असल्यानें त्या त्या दोषांतील कोणत्याहि गुणाचा उल्लेख सामान्यतः दोषांचें नांवानें करण्यांत येतो. निदान चिकित्सेचे वेळीं त्यांचें पोटभेदाचा विचार करावयास पाहिजे.

विशिष्ट रोगावरील चिकित्सेमध्यें द्रव्य प्रकार मुख्य असतो. एकादें औषधद्रव्य एकाद्या रोगावर गुणकारी होतें. याला कारण त्या द्रव्यांतील नैसर्गिक आणि विशिष्ट प्रकारचें सामर्थ्यच असतें, असल्या रोगांवर सर्व सामान्य उपाय योजना अपयशस्वी असते. विशिष्ट ह्मणजे त्या त्या रोगांना विनाशक असले उपाय म्हणजे रोगचिकित्सा समजावयाची. कफामुळें, श्वास, कास, क्षय, वांती, सूज इत्यादि विकार होतात व " दोषा एव हि सर्वेषां रोगाणामेककारणं । " दोषच सर्व रोगांचें मुख्य कारण आहेत. या नियमान्वयें कफजन्य विकारांत सर्वसामान्य कफनाशक चिकित्सेचा उपयोग करावा. परंतु एकाच कफाच्या निरनिराळ्या गुणांमुळें आणि निरनिराळ्या स्थानांमध्यें असणाऱ्या अंशांनीं निराळ्या प्रकारचे अनेक रोग संभवतात. त्याचप्रमाणें त्या भिन्न प्रकारच्या रोगांवर भिन्न प्रकारचीं औषधें असावयास पाहिजेत. सामान्यतः दोषविनाशक औषधांचा परिणाम होणार नाहीं असें नाहीं. पण तो अप्रत्यक्ष रीतीनें, म्हणजे सर्व शरीरावर जो सामान्य परिणाम होणार त्याहून रोग स्थानीय प्रतिकारशक्तीमुळें थोडा अधिक इतकेंच. परंतु असल्या उपायांना रोगनाशक औषध म्हणतां येणार नाहीं; तें दोषनाशक होऊं शकेल. चिकित्सेंतील, दोषनाशक व रोगनाशक असे हे दोन मुख्य प्रकार महत्त्वाचे आहेत. यांनाच सामान्यचिकित्सा व विशेष चिकित्सा अशीं नांवें योजिलीं आहेत. सामान्यचिकित्सा ही विकृत दोषांना घालविणारी अर्थात् रोगप्रतिबंधक होय. आणि विशिष्टचिकित्सा ही विनाशक (रोगनाशक) समजावयाची. आयुर्वेदांत या दोन प्रकारांचा उल्लेख हेतुप्रत्यनीक आणि व्याधिप्रत्यनीक या नांवांनीं केलेला आहे. या दोन प्रकारांमध्यें व्याधिप्रत्यनीक किंवा रोगनाशक चिकित्सा अधिक महत्त्वाची. आणि आयुर्वेदीय चिकित्साग्रंथांतील हजारों औषधीकला या रोगविनाशक स्वरूपाचेच आहेत. निदानामध्यें ज्याप्रमाणें रोगस्थानीय विकृतिविज्ञान महत्त्वाचें त्याप्रमाणें चिकित्सेमध्यें रोगस्थानपरिणामी द्रव्यप्रभाव महत्त्वाचा. म्हणजे रोग तितकीं औषधें आणि जितक्या रोगावस्था तितक्या औषधियोजना हें चिकित्सेचें तत्व उघड होतें. व्याधिप्रभाव आणि द्रव्यप्रभाव हे शब्द याच अर्थाचे बोधक म्हणून आयुर्वेदांत अनेक ठिकाणीं दिसतात.

अशा रीतीनें नैसर्गिक द्रव्यप्रभाव हाच रोगविनाशक ठरल्यावर मग आणखी या त्रिदोषांची गरज काय ? अमुक औषध अमुक रोग घालवितें, तो त्याचा प्रभाव इतकें सांगितल्यानें कार्यभाग झाला. मग वातादि दोषांचा संबंध कोठें येतो ? रोग एकाद्या शरीरभागांत होत असतां जी विकृति होते तीचें सामान्य स्वरूप त्या त्या स्थलांतील विकृति असलें तरी ही विकृति वातादि दोषांतील ज्या एक अथवा अनेक दोषांच्या

विकृत स्वरूपामुळें होते त्या दोषाला विनाशक अशी चिकित्सा करणें अशक्य असतें. ज्वर हा विकार त्वचेंतील वाढत्या उष्णतेचा व ती उष्णता आमाशयांतील–लघ्वंत्रांतील–विकृतीमुळें असली तरी या विकृतीचें स्वरूप वातपित्तकफांचे अनुरोधानें निराळें असतें व म्हणून ज्वरनाशक असें औषध उपयोगांत आणीत असतां वातज्व-रावर ज्वरनाशक व वातनाशक, पित्तज्वरावर ज्वरनाशक व पित्तनाशक इत्यादि पोटभेदांची चिकित्सेमध्यें जी स्पष्टता ती त्रिदोषांचे मदती-शिवाय होत नाहीं कोणत्याहि ठिकाणीं रोगोत्पादक विकृति म्हणजे स्रोतसांचा अवरोध–अभिसरणांत व्यत्यय हें जें सामान्य कारण असतें त्यामध्यें, रूक्षताजन्य, दाहजन्य आणि अभिष्यंदजन्य असे वायु, पित्त व कफ यांचे आधिक्यानें पोटभेद असतात आणि या भेदांवर उपचार करीत असतां, वातनाशक, पित्तनाशक, कफनाशक उपचार याचा अर्थ, रूक्षता--क्षोभ घालवून रोगनाश करणें, दाहशामक गुणानें रोगनाश करणें व अभिष्यंदनाशक गुणानें रोगनाश करणें असे जे प्रकार संभवतात त्यांचा उल्लेख अनुक्रमें वातनाशक, पित्तनाशक व कफनाशक या नांवांनीं करण्यांत येतो. रोगनाशक अथवा प्रभावी द्रव्याची निवड करीत असतां या धोरणानें करावी हें सुचविण्यासाठीं चिकित्सेमध्यें दोषांचा उपयोग करण्यांत येतो. चिकित्सेंतील दोषांचा संबंध स्थूल स्वरूपाचे चिकित्सेचा पुरस्कर्ता नसून रोगनाशक द्रव्याचा उपयोग करतांनाहि त्यांतील सूक्ष्म भेद सुचविण्यासाठीं आहे. निदानांत रोगस्थानीय विकृतीचा पोटभेद दाखविणारा, चिकित्सेंत विकृतीभेदा-नुसार औषधीद्रव्यांचा पोटभेद सुचविणारा आणि द्रव्यगुणवर्णनांत द्रव्याचे विशिष्ट गुणकारित्वांतहि सूक्ष्मभेद स्पष्ट करणारा असा हा त्रिदोषांचा संबंध आहे. व या तीनहि ठिकाणीं जें त्रिदोषांचें वर्णन येतें त्याचा तात्त्विक अर्थ ध्यानांत घेऊन चिकित्सा केल्यास यशस्वी होते.

त्रिदोषांचा ज्यांज्या ठिकाणीं उल्लेख असेल तेथें त्यांचें स्वरूप मागें सांगितल्याप्रमाणें, गति पचन आणि संघटन हें अविकृत आणि क्षोभ अभिताय अथवा दाह व अभिष्यंद हें विकृत स्वरूपांतील अभिप्रेत असतें. हें सामान्य तत्व अबाधित असतें. सर्व वर्णन या मूलभूत तत्वाला अनुस-रून केलेलें आहे. आयुर्वेदांतील त्रिदोषांचें विवेचन म्हणजे निदानचिकि-त्सा–द्रव्यगुण–इंद्रियविज्ञान इत्यादि सर्व शास्त्रीय शाखांना एका विशिष्ट उपपत्तीमध्यें ग्रथित करणारें सर्वगामी सूत्र आहे. ही गोष्ट लक्षांत ठेवून त्यांचें तात्विक स्वरूप, पोटभेद निरनिराळ्या स्थानांतील व अवस्थांतील स्वरूप आणि कार्यें यांच्या अनुरोधानें विचार केल्यास योग्य अर्थबोध होऊं शकेल हें त्रिदोषवर्णन म्हणजे आयुर्वेदीयांच्या कांहीं तरी कल्पना नाहींत त्याचप्रमाणें केवळ त्यांच्या स्थूल स्वरूपानें कार्यभाग होण्यासारख्या

कल्पनाहि नाहींत. शास्त्राची ती विशिष्ट उपपत्ती असल्याने या औपपात्तिक भागाची योग्य व स्पष्ट कल्पना ध्यानीं घेऊन व्यवहार करावयास पाहिजे त्रिदोष काल्पनिक असल्या काल्पनिक समजूतीनें अथवा त्रिदोषांच्या स्थूल कल्पनेनें आयुर्वेदीय निदान चिकित्सेचा बोध होणार नाहीं. प्राच्य शास्त्राच्या विशिष्ट प्रकारच्या विवेचन पद्धतीला अनुसरून सर्वशास्त्राची सर्वसामान्य उपपत्ती संक्षिप्त पण अबाधित आणि व्याधीस्वरूपाची असावयाची. तशीच त्रिदोष ही आयुर्वेदाची उपपत्ती आहे. हेतुलिंगौषधस्वरूपी स्कंधत्रायात्मक आयुर्वेदामध्यें त्रिदोषांचा सर्वत्र उपयोग असुन त्यामध्यें एकसुत्रीपणा उत्तम प्रकारें आहे. वातजन्यरोग वातनाशक उपचार इत्यादि उल्लेख ह्मणजे जर अर्वाच्य कल्पनेप्रमाणें कांहीं तरी अज्ञानाच्छादक अशी भाषा असतीतर, वातनाशक ह्मणून, सांगितल्यावर आणखी वेगळे स्निग्ध, शीत, उष्ण इत्यादि गुण, निरनिराळे रोग उत्पन्न होतात अथवा जातात असा उल्लेख गुणवर्णनांत आला नसता, प्रत्येक रोगाचें स्वतंत्र निदान सांगितलें नसतें. आणि प्रत्येक रोग व त्याचे अनेक पोटभेद यांवर असंख्य उपचार सांगितले नसते. असें स्वतंत्र वर्णन आहे. यावरूनच त्रिदोषांच्या सूक्ष्म ज्ञानाची अवश्यकता आयुर्वेदाच्या या उद्देशाला अनुसरून त्याचे सूक्ष्म आणि व्यवहार्य ज्ञान करून घेणें शास्त्रीय साफल्याला अवश्य आहे.

आयुर्वेदांतील त्रिदोष हें जीवनव्यापाराचें तात्विक वर्णन आहे. त्याला अनुसरून सर्व इंद्रियांचे नित्य व्यापार व त्यांत घडणारी विकृति यांचा बोध करून घेण्यासाठीं हें तात्विक व व्यायी स्वरूप ध्यानांत घेणें अगत्याचें आहे. हें स्वरूप नीट ध्यानांत आल्यावर त्याचा सर्व शास्त्रीय व्यवहारांत उपयोग करून घेणें शक्य होईल. काल्पनिक ह्मणुन धिःकारणें किंवा स्थूलकल्पनेवरच भिस्त ठेवणें या दोनहि धोरणांनीं आयुर्वेदाचें शास्त्रीय स्वरूप समजणें अशक्य आहे. निरोगी अवस्था रोगस्थिति आणि चिकित्सेतील उपचारांचें गुणवर्णन यामध्यें वातादित्रिदोषांचा जो दोष या नांवांनीं उल्लेख येतो त्याचा व्यवहारी भाषेंत तात्पर्य खालीं दिल्याप्रमाणें होतो.

निरोगी अवस्थेतील वर्णन.

वायूची—गति, संवेदना, हालचाल, अभिसरण हीं कार्यें (गति) उत्सर्जन.

पित्ताची—उष्णता, पचन पृथक्करण करणें हीं कार्यें. (पचन)

कफाचीं–संचय, संग्रह, संघटन, चिकटपणा, पोषण हीं कार्यें (संग्रह)

विकृतावस्थेंतील.

वायूचीं–रूक्षता, संकोच, –ताप–शूल हीं लक्षणें– (क्षोभ)

पित्ताचीं—दाह, कुजणें, सडणें, (दाह—अभिताप)
कफाचीं—फाजील संग्रह, स्तब्धता, सूज, आर्द्रता, (अभिष्यंद)

गुणांचें वर्णन.

वातनाशक—स्निग्धता, स्वेदन, मृदुता आणणें. (स्रोतोविकासी)
पित्तनाशक—दाहशामक, कुजण्याला प्रतिबंधक (शामक)
कफनाशक—तीक्ष्णता वाढविणें, सूज घालविणें, संचय दूर करणें (क्षोभक).

अशा प्रकारचे अर्थ प्रचलित भाषेच्या व्यवहारांत बोधक होतील. आयुर्वेदामध्यें या त्रिदोषांचे वर्धक, क्षोभक व शामक असे जे पदार्थ-गुण सांगितले आहेत ते याच धोरणाचे आहेत.

उष्णेनयुक्ता रूक्षाद्या वायोः कुर्वंति संचयं ।
शीतेन कोपमुष्णेन शमं स्निग्ध द्यो गुणाः ॥ १ ॥
शीतेन युक्तास्तीक्ष्णाद्याश्चयं पित्तस्यः कुर्वते ॥
उष्णेन कोपं मंदाद्याः शमं शीतोपसंहिताः ॥ २ ॥
शीतेनयुक्ताः स्निग्धाद्याः कुर्वते श्लेष्मणश्चयं ॥
उष्णेन कोपं तेनैव गुणा रूक्षादयः शमं ॥ ३ ॥

(अष्टांगह. सू. अ. १२).

अर्थः—रूक्षादि गुण उष्णयुक्त झाले असतां वात वृद्धिकारक होतात. व याच रूक्षादि गुणांना शीत गुणाची मदत झाली असतां वायूचा प्रकोप (रोगकारक अवस्था) होतो. उष्ण आणि स्निग्ध या गुणांच्या मिश्रणानें वायूचा शम होतो.

शीतयुक्त तीक्ष्णादि गुणांनीं पित्ताचा संचय होतो. उष्ण गुणानें पित्ताचा प्रकोप होतो आणि शीत व मंद यांनीं पित्ताचा शम होतो.

स्निग्धादि गुण शीतयुक्त असतां कफाचा संचय, उष्णानें कफाचा प्रकोप व उष्णयुक्त रूक्षादि गुणांनीं कफाचा उपशम होतो.

अशा प्रकारें वातादि दोषांचा सामान्यतः वाढ रोगकर्तृत्व आणि उपशम याविषयीं उल्लेख आहे. व वरीलप्रमाणें त्यांचा तात्पर्यार्थ आहे.

यावरून ध्यानीं येईल कीं चिकित्सेमध्यें रोगावर प्रभावी गुणानें उपयोगीं पडणारीं औषधच मुख्य म्हणजे व्याधिप्रत्यनीक चिकित्सा महत्त्वाची परंतु त्यांतहि उत्पादक विकृतीचे पोटभेदांना अनुसरून उपचारोपयोगी पदार्थांचें तारतम्य या वातादिकांचे उल्लेखावरून ठरविलें जातें.

याप्रमाणें आयुर्वेदांतील वात-पित्त-कफांविषयींचा एकंदर खुलासा होतो. एकंदर विवेचनाचा निष्कर्ष येणेंप्रमाणें.

(१) त्रिदोषांची आयुर्वेदीय कल्पना जीवनव्यापारांतील क्रियांचे त्रिविध स्वरूपाला अनुसरून निर्माण झाली.

(२) वायु, पित्त आणि श्लेष्मा या नांवांनीं या त्रिविध जीवनव्यापारांचा आणि हे व्यापार घडविणाऱ्या पदार्थांचा आयुर्वेदानें उल्लेख केला आहे.

(३) वातादि दोषांचें वर्णन या क्रिया घडविणाऱ्या पदार्थांचें सहज स्वरूप आहे.

(४) तीन दोष व त्यांचे सांगितलेले वीस गुण यांमध्यें सर्व पदार्थांतील गुणांचा अंतर्भाव होतो.

(५) आणि या द्रव्याश्रयी गुणांचे तीन वर्ग म्हणजे तीन दोष.

(६) व म्हणूनच शारीर पदार्थ व शरीराबाहेरील पदार्थ यांचा वीस गुण किंवा त्या गुणांचे तीन वर्गांचे वाचक तीन दोष हे सर्वव्यापी तत्वें होऊं शकतात.

(७) त्रिदोषांचें तात्विक स्वरूप ध्यानीं घेऊन त्यांचा अनेक स्थानांतील कार्यकारी संबंध ध्यानीं घेतला कीं स्वस्थ शरीरांतील जीवनव्यापाराचा खुलासा होतो.

(८) व अर्थात् त्यांचे विकृत स्वरूपाचें ज्ञान रोगसंप्राप्तीचें बोधक होण्याला प्रत्यवाय नाहीं.

(९)याचप्रमाणें शरीरांतील एकाद्या गुणाची वाढ अथवा ऱ्हास झाला म्हणजे होणाऱ्या रोगांवर त्या त्या गुणाचा ऱ्हास अथवा वाढ करून रोगनाश होत असल्यानें गुणसमुदायवाचक दोषांनीं चिकित्साभेदांचा निर्देश केला आहे.

(१०) पदार्थांचे गुण ज्या शारीरगुणांशीं संलग्न होऊन परिणामकारक होणारे असतात तो शारीरिक गुण वातादीचे नांवानें संबोधले असल्यानें त्याच नांवानीं गुणधर्मांचा उल्लेख करणें विसंगत नसून सुसंगतच आहे.

(११) कर्तृत्वसंपन्न व अत्यंत महत्त्वाच्या वातादींना दोष हें नांव चिकित्सा शास्त्रानें दिलें त्याचें कारण रोगोत्पादक अवस्थेकडे लक्ष्य वेधावें इतकेंच.

(१२) समावस्थेंत वातादि पदार्थच देहधारक असतात व त्यांना धातु हें नांवही योग्य होईल.

(१३) कर्तृत्वसंपन्न अशा तीन दोषांशिवाय चौथा कोणताही पदार्थ शरीरांत नाहीं कीं, जो स्वतंत्रपणें शरीरावर इष्टनिष्ट परिणाम करूं शकेल.

(१४) शरीरांत ज्या कोणत्या भागांत एकादी विकृति उद्भवते तिचें आद्य कारण सर्वव्यापी अशा त्रिविध जीवनव्यापारांतील एकादा विकृत होणें हें असतें व त्याचें ज्ञान हाच निदानांतील त्रिदोष-संबंध होय.

(१५) विकृत जीवनव्यापाराला सुव्यवस्थित करण्याचें धोरण हें मुख्य असल्यानें त्याचा बोध होण्यासाठीं चिकित्सा आणि त्रिदोष यांचा संबंध आहे.

त्रिदोष वर्णनावरून आयुर्वेदानें शरीराचे जीवनव्यापाराविषयीं स्वीकारलेलीं कांहीं तत्वें--

(१) शरीर हें पांचभौतिक-परमाणूंच्या समुदायानें झालें आहे.

(२) हे परमाणु नित्य नवे उत्पन्न होतात अर्थात् नित्य झिजतात.

(३) झीज व वाढ ही त्यांतील बाह्य भागाची अथवा आवरणाची होते; व त्यांतील सूक्ष्म अंतर्भाग, अविनाशी असतो.

(शंभर किंवा कमी अधिक वर्षांच्या विशिष्ट आयुर्मर्यादेपर्यंत.)

(४)ही झीज आणि वाढ किंवा उत्पत्ति विनाश हाच जीवनव्यापार.

(५) या जीवनव्यापारांच्या तीन अवस्था आहेत एक संग्रह दुसरें पचन-पृथक्करण. तिसरें वियोजन-उत्सर्जन.

(६) हा त्रिविध जीवन व्यापार शरीरघटकांतील सूक्ष्म अशा अणूंनीं घडतो.

(७) ते अणु मुख्य पदार्थ होत.

(८) त्यांना अनुक्रमें श्लेष्मा, पित्त व वायू हीं नांवें दिलीं.

(९) यांचेमुळें शरीर दूषित होतें म्हणून त्यांना चिकित्सा-शास्त्रांत दोष या नांवानें संबोधावें.

(१०) शरीराच्या या जीवनव्यापाराला व्यत्यय येणें रोग होय.

(११) शारीरपदार्थांचे रासायनिक पचनकार्यांत सात पदार्थ, तयार होतात.

(१२) प्रथम रस, मग विशिष्ट उष्णतायुक्त रक्त, मग त्याहून घन मांस मग त्यापासून स्निग्ध पदार्थ मेद, त्यापासून कठिण व स्थिर हाडें त्यांपासून मज्जा व त्यांपासून शुक्र.

(१३) या सात अवस्थांतरांतील पदार्थांनीं शरीर भरलें आहे.

(१४) या प्रत्येक पदार्थामध्यें तीन अवस्था असतात. १ नवीन होणारी. २ झिजलेली किंवा मल स्वरूप व या दोनहि उत्पद्यमान अवस्थेंतील व क्षीयमान अवस्थेतील पदार्थांचे उत्पादकार्य करणारी तिसरी अवस्था.

(१५) या तीन अवस्थांतील पदार्थांना अनुक्रमें धातु, मळ, व दोष ही नांवें आहेत.

(१६) शरीर स्रोतोमय ह्मणजे साछिद्र किंवा छिद्रमय आहे.

(१७) हीं स्रोतसें कांहीं अंतर्वाही–अंतस्रावी व कांहीं बहिर्वाही बाह्यवाही अशीं आहेत.

(१८) या स्रोतसांतून वरील सात पदार्थांना नित्यक्रांती–स्थित्यंतर घडामोड चालु असते.

(१९) या क्रांतीला निरंतर वाहणें किंवा अभिसरण चालु असावें लागतें.

(२०) त्यांत अडथळा आला कीं शरीर विकृत होतें.

(२१) या सर्व व्यवहाराचें कर्तृत्व दोषाकडे असतें व म्हणुनच

"**वात पित्त श्लेष्माण एव देहसंभवेतः ॥**

वायु, पित्त व कफ हेंच देहोत्पत्ति व वाढ करणारे आहेत. असा आयुर्वेदाचा सिद्धांत आहे.

दोषविज्ञानांतील क्रम.

(१) तीन दोषांपैकीं कोणता दोष?

(२) दोषांचें मिश्रण असतां त्यांतील तारतम्य व प्राधान्य कोणाचें?

(३) दोषांचे गुणापैकीं कोणते व त्यांचें तारतम्य?

(४) दोषांचें संबंध कोणत्या धातूंतील किंवा दूष्यांतील?

(५) दोषविकृती ज्या ठिकाणीं झाली तेथील स्वाभाविक कार्य व त्याला अनुसरून विकृतीचें स्वरूप.

(६) विकृति प्रथम कोणत्या स्थानांत व कोणत्या स्वरूपाची झाली.?

(७) विकृतीचा प्रसार कोणत्या मार्गानें व किती स्थानांवर झाला आहे.

(८) रोगाला स्पष्ट स्वरूप कोणत्या ठिकाणीं आलें?

(९) दोष वाढून रोगकारी झालें कीं वाढ न होतां विकृति झाली?

(१०) मिश्र दोषांपैकीं प्रथम विकृति कोणाची व आरंभक कोण?

(११) विकृतीच्या लक्षणामध्यें अधिक कोणाची व त्यांतील अधिक बलवान कोणाची?

(१२) दोष धातु व मळ किती विकृत झालें.?

(१३) विकृतीची वाढ झपाटयानें होतें कीं मंद होतें?

(१४) कोणत्या वेळीं व कोणत्या ऋतूंमध्यें विकृतींत वाढ अथवा कमिपणा येतो ?

(१५) विकृती पूर्वींचे प्रकृतींतील स्वाभाविक दोष.

इतक्या गोष्टी ध्यानीं घेतल्या असतां रोगांतील दोषसंबंध नीट ध्यानीं येईल.

येणेंप्रमाणें आयुर्वेदांतील वातादिदोषांची कल्पना, तिचें शास्त्रीयत्व आणि निदान चिकित्सा शास्त्रांतील कार्यक्षमव्यवहार्यता यांविषयीं खुलासा केला आहे. शारीरिक पदार्थांतील अतिसूक्ष्म अशा भागाची आणि या सूक्ष्म भागाचे शारीरिक क्रियाकर्तृत्वाची जी आयुर्वेदीयांची स्पष्ट कल्पना ते हे त्रिदोष होत.आणि प्राचीन आचार्यांची ही त्रिदोषाविषयींची कल्पना त्यांनीं स्वीकारलेल्या विशिष्ट व पारिभाषिक विवेचनपद्धतीला अनुसरून विचारांत घेतां ती सत्य व पूर्ण शास्त्रीय कल्पना असल्याची खात्री पटून आयुर्वेदाचाच सिद्धांत मान्य होईल. तो हा कीं

विसर्गादान विक्षेपैः सोमसूर्यानिला यथा ॥
धारयंति जगद्देहं कफ पित्तानिला स्तथा ॥

समाप्त.

